18-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1


**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. विनायक मेटे )**

**पृ.शी.** : राज्यातील बहुतांशी शाळांमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था नसणे

**मु.शी.** : राज्यातील बहुतांशी शाळांमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था नसणे यासंबंधी श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :--

"राज्यात सहशिक्षण प्रणाली असल्याने मुले-मुली एकाच शाळेत शिकणे, शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने प्रत्येक शाळेमध्ये वापरण्यायोग्य स्वतंत्र स्वच्छता गृहे मिळण्याचा विद्यार्थ्यांचा हक्क असणे, शाळांमध्ये स्वतंत्र स्वच्छता गृहे नसल्याने व असणारी स्वच्छता गृहे वापरण्यायोग्य नसल्याने विद्यार्थांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होणे, अनेक विद्यार्थी यामुळे आजारी पडणे, मा.सर्वोच्च न्यायालयाने दखल घेऊन राज्य शासनास निर्देश देणे, अद्यापही कार्यवाही न होणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

महोदय, शाळांमधील स्वच्छता गृहांच्या संदर्भात मी ही अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे. या निमित्ताने मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, विद्यार्थ्यांना ज्याप्रमाणे भौतिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे, शैक्षणिक वातावरणाची गरज आहे, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रत्येक शाळेत को-एज्युकेशन असल्याने, मुले व मुली एकत्र शिकत असल्यामुळे स्वच्छता गृहे सुध्दा स्वतंत्रपणे असण्याची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयात सुध्दा हा विषय गेला होता व सर्वोच्च न्यायालयाने त्याबाबत असे स्पष्ट केले आहे. किंबहुना सर्व राज्य सरकारांना निर्देश दिलेले आहेत की राईट टू एज्युकेशन अंतर्गत शाळेत शैक्षणिक वातावरण, शिक्षकांची संख्या, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबरोबरच स्वच्छता गृहांच्या संदर्भात सुध्दा काळजी घेऊन तशी व्यवस्था शाळांमध्ये निर्माण करणे आवश्यक आहे. परंतु आपल्या राज्याची परिस्थिती विचारात घेतली तर अनेक शाळांमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहे नाहीत, ही वस्तुस्थिती आहे व ती नाकारुन चालणार नाही. माझ्या माहितीप्रमाणे जवळजवळ 89

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ......

हजार शाळा आहेत. त्यामधून जवळपास 52 टक्के शाळांमध्येच फक्त स्वच्छता गृहांची व्यवस्था आहे, 48 टक्के शाळांमध्ये ही व्यवस्था नाही, त्यामुळे ही खरोखरच चिंताजनक बाब आहे. साधारणपणे ज्या खाजगी शाळा आहेत त्यांचे मूल्यांकन करताना व अनुदान मंजूर करताना अशा प्रकारे मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहे आहेत काय याची चौकशी करुन पडताळणी केली जाते व त्यानुसार गुण दिले जातात. त्यानंतरच या शाळा अनुदानासाठी पात्र किंवा अपात्र ठरतात. त्यामुळे खाजगी शाळांमध्ये या निकषांप्रमाणे स्वच्छता गृहांची स्वतंत्रपणे व्यवस्था त्या त्या संस्थांकडून व शाळांमार्फत करण्याचे प्रयत्न होतात. याउलट स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांची परिस्थिती पाहिली तर अशा शाळांमध्ये गोरगरिबांची मुले शिकत असल्यामुळे विद्यार्थ्यांची प्रचंड संख्या असते. या शाळांमध्ये मात्र या मुलांची संख्या विचारात घेता आवश्यक तेवढ्या प्रमाणात व स्वतंत्र स्वच्छता गृहांची सोय दिसून येत नाही. माझ्या जिल्ह्यातील एका तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा, महानगर पालिकेच्या शाळा व काही नगर पालिकेच्या शाळांचा मी आढावा घेतला. त्यात मला असे दिसून आले की, अनेक शाळांमध्ये स्वच्छता गृहांची स्वतंत्रपणे व्यवस्था नाही. ज्या ज्या ठिकाणी ही व्यवस्था आहे ती फक्त नाममात्र अशीच आहे व एका शाळेत तर मुलांसाठी एक आणि मुलींसाठी फक्त एक असेच स्वच्छता गृह आहे. अशा प्रकारे 150 ते 200 मुला-मुलींसाठी फक्त स्वतंत्रपणे एक-एक स्वच्छता गृह असले तरी मुलांची संख्या जास्त असल्याने मधल्या सुट्टीत मुलांची एकच गर्दी होते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

मधल्या सुट्टीत शेकडो विद्यार्थ्यांना एकाच शौचालयाचा किंवा मुतारीचा वापर करावा लागत असल्यामुळे त्यांच्या आरोग्याचे प्रश्न बिकट बनलेले आहेत. खरे म्हणजे यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहेत.

सभापती महोदय, मुरबाड तालुक्यात 352 शाळा असून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये केवळ एकच स्वच्छतागृह आहे. काही शाळांमध्ये तर एकही स्वच्छता गृह नाही अशा शाळांची संख्या मुरबाड तालुक्यात किती तरी आहे.

सभापती महोदय, नगरपालिकेच्या शाळांमध्ये 150-200 विद्यार्थ्यांची संख्या असते परंतु त्या ठिकाणी एकाही स्वच्छतागृहाची सोय नसते. मी महानगर पालिकेच्या शाळेतील मुख्याध्यापकांना विचारले की, तुमच्या शाळेत स्वच्छतागृहाची सोय आहे काय, असलेली स्वच्छतागृहे वापरण्यायोग्य आहेत काय? काही ठिकाणी स्वच्छतागृहे आहेत परंतु वापरण्यापलीकडची आहेत.

सभापती महोदय, मी कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेच्या शाळांची माहिती घेतली असता मला असे आढळून आले की, धाकटे शहाड मधील शाळेमध्ये एकंदर 384 विद्यार्थी आहेत परंतु या ठिकाणी केवळ एकच स्वच्छतागृह आहे. मिलिंद नगरच्या शाळेमध्ये 198 विद्यार्थी आहेत परंतु त्या ठिकाणी केवळ एकच स्वच्छतागृह आहे. मांडयाची शाळा क्रमाक 60 या शाळेमध्ये 315 विद्यार्थी असून या ठिकाणी केवळ एकच स्वच्छतागृह आहे. खडे गोळवली शाळेमध्ये 385 विद्यार्थी असून त्या ठिकाणीही एकच स्वच्छतागृह आहे, डोंबिवली (पूर्व) 86 क्रमांकाच्या शाळेमध्ये एकंदर 587 विद्यार्थी आहेत व त्या ठिकाणी 2 स्वच्छतागृहे आहेत. नेतिवली मधील 19 क्रमांकाच्या शाळेत 995 विद्यार्थी असून या ठिकाणी स्वच्छतागृहांची संख्या केवळ दोन आहे. उमरडयाच्या शाळेत 552 विद्यार्थी असून या शाळेमध्ये एकच स्वच्छतागृह आहे. सापरडा येथील 13 क्रमांकाच्या शाळेत 314 विद्यार्थी असून त्या ठिकाणी एक एक स्वच्छतागृह आहे.

सभापती महोदय, शाळेला स्वच्छतागृह नसल्यामुळे त्याचा दुष्परिणाम विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होत आहे. विद्यार्थ्यांना स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. पाचवी, सहावीच्या मुलींना जर उघडयावर लघुशंका करावी लागत असेल तर ही बाब अत्यंत गंभीर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

असून त्याचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. या निमित्ताने माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, मध्यंतरी आपण जशी सर्व शाळांची पटपडताळणी केली होती तशी पडताळणी राज्यातील सर्व शाळांमध्ये स्वच्छतागृह, शौचालये आहेत की, नाहीत, असली तर किती आहेत, विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार किती स्वच्छतागृहांची आवश्यकता आहे, असली तर ती वापरण्योग्य आहेत की, नाही असली तर त्याची स्वच्छता केली जाते किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठी राज्यभर मोहीम घेतली जाणार आहे काय ? या मोहिमेतून जी काही वस्तुस्थिती समोर येईल त्यासंदर्भात आपण कोणती उपाययोजना करणार आहात यासंदर्भात माहिती मिळावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, शाळेमध्ये जी स्वच्छतागृहे आहेत ती शिक्षकांना किंवा विद्यार्थ्यांना साफ करावी लागत असतात. परवाच्या वर्तमानपत्रात शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छतागृह साफ करावयास लावल्यामुळे एका मुख्याध्यापिकेला अटक करुन तिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर शिक्षिका स्वच्छतागृहाची साफसफाई करीत असतांना मुलांना ते सहन न झाल्यामुळे मुलांनी स्वच्छतागृह साफ करण्यास मदत केली. परंतु याचा विपर्यास करुन स्वच्छतागृहाची साफसफाईचे काम विद्यार्थ्यांना सांगितल्यामुळे या शिक्षिकेवर गुन्हा दाखल झाला. त्यामुळे असे प्रकार होऊ नये यासाठी शाळेतील स्वच्छतागृह वापरण्यायोग्य असणे व स्वच्छतागृहाची निगा राखण्यासाठी योजना करणे यासाठी शासन काय करणार आहे ? याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी अशा प्रकारची विनंती अर्धातास चर्चेच्या निमित्ताने मी करीत आहे.

----

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) :सभापती महोदय, स्वच्छतागृह सर्व शाळांमध्ये असणे आवश्यक असून या बाबीला शासनाने यावर्षी प्राधान्य दिलेले आहे. सर्व शाळांमध्ये स्वच्छतागृहे असली पाहिजेत यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दि. 31 मार्च, 2012 रोजी निकाल दिलेला आहे. महाराष्ट्र सरकारने यासंदर्भात प्रतिज्ञापत्र फाईल केलेले आहे. प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांची संख्या 97,787 आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

त्यातील 95426 ठिकाणी कॉमन टॉयलेटस आहेत तर 2361 ठिकाणी कॉमन टॉयलेटस् नाहीत. म्हणजे राज्यात 2 टक्के कॉमन टॉयलेट नाहीत. राज्यात मुलींसाठी 94584 स्वच्छतागृहे उपलब्ध आहेत. राज्यात 3203 ठिकाणी मुलींसाठी स्वच्छतागृहे उपलब्ध नाहीत म्हणजे हे प्रमाण 3 टक्के आहे. राज्यात 2 टक्के कॉमन टायलेट आणि मुलींसाठी 3 टक्के टॉयलेट उपलब्ध नाहीत. विद्यार्थ्यांसाठी 100 टक्के स्वच्छतागृहे उपलब्ध झाली पाहिजेत.

माननीय सदस्यांनी सांगितल्या नुसार विद्यार्थी संख्येनुसार कार्यान्वित असलेली स्वच्छतागृहे उपलब्ध व्हावीत अशा प्रकारचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. सर्व शिक्षा अभियानाच्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये मुलींसाठी 20028 आणि मुलांसाठी 1202 कॉमन टॉयलेट बांधण्याची मागणी आपण सन 2012-2013 मध्ये केली आहे. या शिवाय डीपीडीसीमध्ये देखील इनोव्हेटीव्ह स्कीम आहे. त्या अंतर्गत प्राथम्याने स्वच्छतागृह बांधण्याचा कार्यक्रम घ्यावा अशा प्रकारचा आदेश दिनांक 21 नोव्हेंबर 2008 रोजी काढण्यात आला आहे. दिनांक 2 जून 2011 रोजी डायरेक्टर, एसपीडी ने जिल्हा परिषदेचे सीईओ यांना देखील पत्र लिहिलेले आहे. जिल्ह परिषदेने रिपेअर अँड मेंटेनन्ससाठी 5 हजार रूपये प्राथमिक आणि साडे सात हजार रूपये उच्च प्राथमिकसाठी देण्याचे मान्य केले आहे. शासनाने हा कार्यक्रम प्राथम्याने घेण्याचे ठरविले आहे. सर्व शाळांमध्ये 100 टक्के स्वच्छतागृहे असावीत, त्यासाठी पाणी असावे, ती कार्यान्वित असावी ती विद्यार्थी संख्ये प्रमाणे असावी अशा प्रकारचा कार्यक्रम घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुढच्या वर्षात हे उद्दिष्ट साध्य करण्याचा शासनाचा मानस आहे.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईच्या धर्तीवर जुने नाशिक भागात गावठाण पुनर्विकास योजना राबविणे.

**मु. शी.** : मुंबईच्या धर्तीवर जुने नाशिक भागात गावठाण पुनर्विकास योजना राबविणे यासंबंधी श्री.जयवंतराव जाधव वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकरी संस्था): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"नाशिक शहरातील जुन्या नाशिक भागातील घरे प्रामुख्याने भेंडे, दगडमातीची आणि मातीच्या ढिगाऱ्यांवर वसलेली असणे, या परिसरातील रस्ते अतिशय अरुंद असल्याने मुलभूत सुविधा, स्वच्छता व वाहतुकीचा प्रश्न निर्माण झालेला प्रश्न, गावठाण भागातील या सुविधा राबविण्याकरिता शासनाने महापालिकेकडून व्यापक विकास प्रस्ताव दर्शविणारी योजना तयार करुन शासनास सादर करण्याचे निर्देश देऊनही महापालिकेकडून कार्यवाही करण्यास विलंब होणे, मुंबईच्या धर्तीवर जुने नाशिक भागात गावठाण पुनर्विकास योजना तात्काळ राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, नाशिक ही पुण्यनगरी आहे. तिची ओळख जुन्या नाशिक भागापासून सुरू होते. जुने नाशिक गंगे लगत असलेला परिसर आहे. हा प्राचीन व जुना भाग आहे. या भागातील घरे भेंडे, दगडमाती यांचा वापर करून बांधलेली आहेत. ही घरे आजही आपल्याला तेथे पहायला मिळतात. ही घरे मोडकळीस आलेली आहेत. आज येथे पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही. स्वच्छतागृहांची सुविधा नाही. रस्ते नाहीत. लहान मुलांना खेळण्याकरिता जागा देखील नाही. दीडशे ते दोनशे चौरस फुटाच्या घरामध्ये अनेक कुटुंब वास्तव्य करीत आहेत. या परिसरात अतिशय गरीब लोक रहात आहेत. या घरांमध्ये भाडेकरूच राहतात. एकेका वाड्यामध्ये 25 ते 30 भाडेकरू राहतात. आज येथे भाडेकरूंची तिसरी पिढी वास्तव्य करीत आहेत. मूळ मालक या भागाचा विकास करू देत नाहीत व भाडेकरूंची देखील तशी परिस्थिती नाही. तेथे भूकंपाचा लहानसा धक्का बसला तरी तो संपूर्ण परिसर बेचिराख होईल. मंत्रालयाला देखील आगीचा सामना करावा लागला आहे.

यानंतर श्री.सरफरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव....

दुर्दैवाने त्या परिसरामध्ये अशी काही घटना घडली तर त्या ठिकाणी फायर फायटींगचे छोटे वाहन देखील जाऊ शकणार नाही अशी परिस्थिती आहे.

या संपूर्ण काजीची घडीलगत असलेल्या परिसरातील घरे जोराचा पाऊस आल्यानंतर कोणत्याही क्षणी वाहून जातील, त्यांची पडझड होईल, त्यामध्ये मनुष्यहानी मोठया प्रमाणात होईल. या करिता मी नाशिक महानगरपालिकेला विनंती केली होती. परंतु त्याकडे नाशिक महानगरपालिका पाहिजे तितके लक्ष देत नाही. माननीय मंत्र्यांना मी त्या बाबत विनंती केल्यानंतर त्यांनी सकारात्मकता दाखवून नाशिक महानगरपालिकेला विनंती केल्यानंतर नाशिक महानगरपालिकेने प्रस्ताव पाठविला. तो प्रस्ताव मान्य नसून पुन्हा प्रस्ताव पाठविण्याबाबत शासनाने नाशिक महानगरपालिकेला आदेशित केले. परंतु सदरचा प्रस्ताव किती दिवसात पाठविला पाहिजे यासाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही. शासनाने एक पत्र पाठविल्यानंतर देखील नाशिक महानगरपालिका त्या बाबत गंभीर नाही. या बाबत महानगरपालिका उदासीन असेल आणि शासन त्या महानगरपालिकेवर काही निर्बंध घालून तत्काळ उपाय योजना करण्याबाबत त्यांना आदेशित करीत नसेल तर त्या परिसरातील लोकांनी काय करावे? तेथील मूळ नाशिककर रहिवाशी आहेत त्यांच्यावर आज ही दुर्दैवी वेळ आली आहे.

या बाबत माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, वास्तू शास्त्रज्ञांनी तो परिसर कसा विकसित करावा या बाबत नाशिक महानगरपालिकेला शासनाने सूचना दिल्या आहेत. त्या नुसार त्या भागामध्ये एक स्क्वेअर तयार करुन त्यामध्ये एक उद्यान, लहान मुलांना खेळाचे मैदान, रस्ता बांधून एक चांगल्या प्रकारची आदर्श वसाहत निर्माण करावी. त्यासाठी जादा चटई क्षेत्र वाढवून द्यावा लागत असेल तर त्याबाबत गंभीरपणे विचार केला पाहिजे. त्या ठिकाणी जे भाडेकरु आहेत, जे मालक आहेत त्यांचे कोठेही नुकसान होणार नाही, त्या ठिकाणी रहात असलेल्या भाडेकरुंच्या तिसऱ्या पिढीला सुध्दा न्याय मिळेल या दृष्टीने तो परिसर आपण चांगल्या प्रकारे विकसित केला तर खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांसाठी असलेले हे शासन आहे असे गौरवाने म्हणता येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून नाशिक शहरामध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांच्या होत असलेल्या गैरसोयीबाबत चर्चा उपस्थित केली आहे.

सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, नाशिक महानगरपालिका 1993 साली स्थापन झाली. सन 2011 च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार नाशिक शहराची लोकसंख्या 14 लाख 86 हजार 973 इतकी नोंदविण्यात आली आहे. आपणा सर्वांना माहीत आहे की, शहरामध्ये राहणारे लोक शहरातील सोयी-सुविधांवर अवलंबून असतात आणि शहराच्या हद्दीबाहेर राहणारे लोक हे 25 टक्क्यापेक्षा जास्त असू शकतात. त्यामुळे शहरावर वाढत्या लोकसंख्येचा ताण पडतो याची शासनाला पूर्णपणे जाणीव आहे. नाशिक शहराला ऐतिहासिक आणि धार्मिक पार्श्वभूमी आहे. त्यामुळे या शहराला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे याची शासनाला जाणीव आहे. सन 2014 मध्ये नाशिकमध्ये महाकुंभ मेळा भरणार आहे याची सुध्दा शासनाला जाणीव आहे.

सभापती महोदय, मला आपणामार्फत संपूर्ण राज्याला सांगावयाचे आहे की, आपल्या देशामध्ये, राज्यामध्ये घटनेने प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकार अबाधित केले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेने जनतेसाठी कोणत्या प्रकारच्या सोयी-सुविधा उपलब्ध कराव्यात, त्यांचे नियोजन कसे करावे या बाबत त्या संस्थेला पूर्णपणे अधिकार दिले आहेत. त्या संस्थेचा दर 20 वर्षानंतर एक डेव्हलपमेंट प्लॅन तयार केला जात असतो. त्या 20 वर्षाच्या कालावधीमध्ये पुढील 50 वर्षामध्ये शहरामध्ये आपल्याला कोणकोणत्या सुविधा नागरिकांना द्याव्या लागणार आहेत यांचा विचार करुन प्लॅन तयार केला जातो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . ..

तसेच खऱ्या अर्थाने या महानगरपालिकेचा प्लॅन 1993 मध्ये करण्यात आला होता आणि आता त्याला पुढील वर्षी 20 वर्षे पूर्ण होतील.

सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, यापूर्वी एखाद्या शहराच्या डेव्हलपमेंट प्लॅनची मुदत संपली की पुढील दहा-दहा, पंधरा-पंधरा वर्षे सुध्दा नवीन प्लॅन तयार होत नव्हता आणि तो प्लॅन अस्तित्वात आल्यानंतर तो मागच्या दहा वर्षापूर्वीचा असावयाचा. परंतु आता शासनाने एक नवीन कायदा अंमलात आणलेला असून त्याला आपण सर्वांनी मंजुरी दिलेली आहे. आता शहराच्या डेव्हलपमेंट प्लॅनची मुदत संपण्याचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी प्रत्यक्षपणे त्या शहराचा पुढील प्लॅनचा ड्राफ्ट तयार करण्याची कारवाई सदरहू प्लॅन संपण्यापूर्वी दीड वर्षे अगोदर सुरु करावी आणि शासनाच्या मान्यतेसह पुढील तीन वर्षामध्ये तो प्लॅन अस्तित्वात यावा अशा प्रकारचे बंधन शासनासह त्या कायद्यामध्ये करण्यात आलेले आहे म्हणून माझ्या अंदाजाप्रमाणे याबाबतची कारवाई सुरु झाली असेल आणि तसे झाले नसेल तर तत्काळ महानगरपालिकेला त्या संदर्भात सूचना देण्यात येतील. तसेच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की,येथे तीन-तीन पिढ्या रहाणारी जे लोक आहेत त्यांची अडचण होणार आहे.तेथे मातीची, दगडाची घरे आहेत आणि जागा कमी आहे. त्यामुळे मुंबईच्या धर्तीवर किंवा मोठ्या शहराच्या धर्तीवर तेथे एफ.एस.आय. वाढवून द्यावा, तेथे रेसीडेन्शिअल झोन वाढवून ठेवावा, तेथे विद्यार्थ्यांसाठी शाळा ठेवावी, तेथे पिण्याच्या पाण्याकरता नियोजन करावे, तेथे मैदान असावे, तेथे सांस्कृतिक भवन असावे, तेथे ड्रेनेजची व्यवस्था असावी, तेथे कचऱ्याचे व्यवस्थापन केले जावे. तेथे क्षेपण भूमी असावी. वेगवेगळया धर्माकरता स्मशान भूमी असावी, कब्रस्थान असावे किंवा तेथे ख्रिश्चन समाजाचे लोक असतील त्यांच्या अत्यंविधीसाठी सुध्दा व्यवस्था असावी याचा सुध्दा त्यामध्ये कंपल्सरी अंतर्भाव असावा या प्रकारचा प्लॅन करावा अशा सूचना महानगरपालिकेला देण्यात येतील. त्यामुळे मला असे वाटते की, याबाबतीत प्रत्यक्षपणे कारवाई सुरु झालेली आहे.

सभापती महोदय, जरी आपण म्हणालात की, शासनाला महानगर पालिकेने पाठविलेला प्रस्ताव मान्य नाही.पण तसे नाही.शासनाकडे जो प्लॅन पाठवावयास हवा होता तो ज्या फॉरमॅटमध्ये पाठवावयास हवा होता, त्यानुसार महानगरपलिकेने पाठविला नाही. त्यांनी एक साधा ठराव पाठविला. मात्र तो त्यांनी फॉरमॅट मध्ये पाठवावा असे शासनाने त्यांना कळविले होते.पण ते अद्यापपर्यंत आलेले नाही ही गोष्ट खरी आहे. तसा प्लॅन आला तर त्याचा विचार करीत असताना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . ..

दुसऱ्या बाजूला डेव्हलपमेंट प्लॅन सुरु होईल आणि मला असे वाटते की, त्याला अंतिम मंजुरी मिळणार नाही म्हणून माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आता 2013 मध्ये मुदत संपत असल्यामुळे आपण नवीन डेव्हलपमेंट प्लॅन तयार करण्यास घेऊ या. त्यामध्ये तुम्हाला ज्या सोयी-सुविधा अपेक्षित आहेत त्याचा अंतर्भाव व्हावा अशा पध्दतीने तेथील नागरिकांची बैठक घेऊन त्यावेळी संबंधितांनी सूचना कराव्यात.जर त्या डावलण्यात आल्या असतील तर सजेशन ॲक्शनमध्ये आपल्याला ऑब्जेक्शन घेता येईल. त्याउपर काही प्रस्ताव नाकारण्यात आले तर आपण शासनाकडे येऊ शकता. शासन निश्चितपणे त्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करील असे मी आपल्याला आश्वासित करु इच्छितो.

----

ई-3 . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने अतिशय विस्तृत असे उत्तर सन्माननीय मंत्री श्री.भास्कर जाधव यांनी दिलेले आहे.

सभापती महोदय, पुढील दहा-वीस वर्षाचे प्लॅनिंग करताना आपण जी प्रक्रिया सुरु केलेली आहे, त्यामध्ये महानगरपालिका सहभागी होईल. जेव्हा आपण काही खात्यांच्या बाबतीत अशा सूचना करतो, त्यावेळी त्यामध्ये जन-सुनावणीची प्रक्रिया असते. या भागातील नागरिक हे जुने नाशिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागातील सर्व रहिवासी आहेत. त्यांचे म्हणणे ऐकण्यासाठी शासनामार्फत महापालिकेला जेव्हा आपल्या खात्याचे अधिकारी उपस्थित असतील त्यावेळी जर आपल्याला जनसुनावणी लावता आली तर त्यातून अधिक विधायक सूचना आपल्याला मिळू शकतील. अशा प्रकारे जनसुनावणीची शक्यता पडताळून पाहून त्याबद्दल कारवाई करता येणे शक्य आहे काय याबाबत सांगावे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तशा प्रकारचे शासनाचे सुनावणी अधिकारी नसतात. त्याठिकाणी एक कमिटी नेमली जाते त्यांच्यासमोर सुनावणी होत असते. पण सन्माननीय सदस्यांची सूचना अतिशय चांगली आहे. आपण त्या सुनावणी पूर्वी आपल्या सर्वांच्या उपस्थितीमध्ये एक बैठक घेऊ आणि आपल्या ज्या सूचना आहेत, त्या गोळा करुन त्या ॲडव्हान्समध्ये त्यांच्याकडे पाठविण्याची व्यवस्था करु.

-----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त
असलेली पदे भरण्याबाबत करावयाची कार्यवाही

**मु.शी.**: राज्यातील महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त
असलेली पदे भरण्याबाबत करावयाची कार्यवाही

या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 26033 ला
दिनांक 19 मार्च 2012 रोजी शासनाने दिलेल्या
उत्तराच्या संदर्भात श्री.विक्रम काळे यांनी उपस्थित
केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, "राज्यातील महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत करावयाची कार्यवाही" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 26033 ला दिनांक 19 मार्च 2012 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघेसाहेब या मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री आहेत. त्यांच्या अनुभवाचा फायदा व्हावा म्हणून त्यांच्याकडे सदरहू खाते देण्यात आलेले आहे आणि या खात्यामध्ये त्यांनी अनेक चांगल्या प्रकारचे बदल केलेले आहेत हे आम्ही पाहिलेले आहे. माननीय मंत्री महोदय आपणही पहातो की, दर चार दिवसानंतर वर्तमानपत्रामध्ये बातमी येते की, जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यामध्ये लाच घेण्यात आली. दोन-दोन, चार-चार, पाच-पाच लाख रुपये जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी घेतली जाते. माननीय मंत्री महोदयांनी यामध्ये लक्ष घातले पाहिजे आणि आमच्या सहकारी बंधूनी जो प्रश्न उपस्थित केला आहे की, सगळया कुटुंबाला देऊ नका. परंतु जर मी कुटुंब प्रमुख असेन आणि माझी जात वैधता झाली, मला जात प्रमाणपत्र मिळाले तर माझ्या मुलांना पुन्हा व्हॅलिडिटी सर्टीफीकेट घेण्याची गरज भासू नये हा यातील महत्वाचा मुद्दा आहे. मग संबंधितांना जात प्रमाणपत्र वेगवेगळे देण्यात यावे याच्याशी आमचा संबंध नाही. एकदा माझी म्हणजे कुटुंब प्रमुखाची व्हॅलिडिटी झाली असेल तर पुन्हा त्यासाठी खेपा मारण्याची गरज नाही आणि यामध्ये जो काही भ्रष्टाचार होत आहे त्याला लगाम बसेल आणि या साठी महाराष्ट्रातील लोकांना जो त्रास सहन करावा लागत आहे तो थांबेल. म्हणून माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, कुटुंब प्रमुखाची जात वैधता करुन कुटुंबातील सदस्यांना फक्त जात वैधता प्रमाणपत्र देणार आहात काय?

18-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E-2

APR/ KTG/ D/ 10:20

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, ठाणे येथे श्री.लोकरे नावाचे प्रांत ऑफीसर होते. त्यांनी जात पडताळणीच्या संदर्भात सांगावयाचे तर शाळा निहाय जेव्हा आपण नववी मधून दहावी मध्ये जातो त्याच वेळेस कास्ट सर्टीफीकेटसाठी अर्ज देऊन आणि शाळेमध्ये त्याचे व्हेरिफीकेशन झाल्यानंतर जर कलेक्टर ऑफीसकडे दिल्यानंतर मी दहावीची परीक्षा पास झाल्यानंतर लिव्हींग सर्टीफीकेट बरोबरच मला जातीचे प्रमाणपत्र देखील देता येईल. तसेच ही बाब जर कुटुंब प्रमुखाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाबतीत घडले असेल आणि यातील अटी व शर्ती पूर्ण केल्या असतील तर त्याचा मुलांना निश्चितच फायदा होईल असे मला वाटते.

----

. . . .ई-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी भावना केली आहे, ती बरोबर आहे. परंतु हे कास्ट सर्टीफीकेट अतिशय मौन्यवान आहे आणि ज्या पाल्यांच्या आई-वडिलांकडे सदरहू सर्टीफीकेट असेल त्यांच्या मुलांना हे सर्टीफीकेट मिळण्यासाठी वेळ लागणार नाही. त्याबाबतीत ताबडतोब व्यवस्था होईल. आता आपण एक-दीड महिन्यामध्ये ऑन लाईन करणार आहोत. तसेच तिसरी गोष्ट म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी सांगितले की, नववी मधून दहावी मध्ये जात असतानाच कास्ट व्हेरिफीककेशन सर्टीफीकेटसाठी कलेक्टर

ऑफीसकडे अर्ज दिल्यानंतर दहावीची परीक्षा पास झाल्यावर त्या मुलाला लिव्हींग सर्टीफीकेट बरोबरच जातीचे प्रमाणपत्र देखील देता येईल. परंतु मी याबाबतीत सांगू इच्छितो की, आताही तशी व्यवस्था अस्तित्वात आहे. ज्यावेळी मुलगा दहावीतून अकरावीमध्ये प्रवेश घेतल्यानंतर अकरावी व बारावी ही दोन वर्षे असतात. यासाठी ज्यांनी वेळेवर अर्ज केला असेल तर त्यांना आम्ही "होय" किंवा "नाही" ते सांगू शकतो. परंतु बरेचसे विद्यार्थी वेळेवर अर्ज देत नाहीत, वेळेवर विचार बदलतात. त्यामुळे हा प्रश्न निर्माण होतो. नाहीतर वेळेवर अर्ज केला तर त्याबाबतीत त्रास होण्याचे काही कारण नाही.

-----

. . . .ई-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E-4

APR/ KTG/ D/ 10:20

**पृ.शी.**: ग्रामीण भागातील शाळांमध्ये संगणकाची माहिती देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक नेमण्यासाठी करावयाची कार्यवाही"

**मु.शी.**: ग्रामीण भागातील शाळांमध्ये संगणकाची माहिती देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक नेमण्यासाठी करावयाची कार्यवाही" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 27764 ला दिनांक 16 एप्रिल 2012 रोजी दिलेल्या

उत्तराच्या संदर्भात श्री.विक्रम काळे यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, "ग्रामीण भागातील शाळां मध्ये संगणकाची माहिती देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक नेमण्यासाठी करावयाची कार्यवाही" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 28764 ला दिनांक 16 एप्रिल 2012 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, मी शेवटी राहिल्यामुळे माझ्या तीन अर्धा तास चर्चा आहेत. त्यामुळे याला जवळजवळ दीड तास लागेल. परंतु आता फक्त 28 मिनिटे शिल्लक राहिलेली आहेत.

**तालिका सभापती (श्री.विनायक मेटे)** : सन्माननीय सदस्यांच्या तीन अर्धा तास चर्चा आहेत आणि त्यासाठी 28 मिनिटांचा वेळ भरपूर आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मला थोडा वेळ लागला तर केवळ पाच मिनिटे वाढवावीत. राज्यातील अनेक महाविद्यालयातील वरिष्ठ प्राचार्यांची पदे आज सुध्दा रिक्त असून एकंदर किती पदे रिक्त आहेत हा माझा पहिला प्रश्न आहे. मी आता माझा विषय जास्त डेव्हल्प करणार नाही. त्यामुळे मूळ मुद्याबाबत बोलतो. तसेच मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, ते सुध्दा एका मोठ्या शिक्षण संस्थेचे एक घटक आहेत. त्यामुळे फिल्डवर काय वस्तुस्थिती आहे हे त्यांना देखील माहिती आहे.जेथे महाविद्यालय विना अनुदान तत्वावर चालविली जातात तेथे प्राचार्य कसे उपलब्ध होणार हा महत्वाचा प्रश्न आहे.एकतर आपण कायद्यानुसार, नियमानुसार रिटायर झालेले प्राचार्यांची नेमणूक करतो. एकतर आपण नियम केला की, तेथे प्राचार्याचे पद असले तरच त्यांना विद्यापिठाचे ॲपिलिएशन मिळेल. मग प्राचार्य कुठून मिळणार ? आज आपण





श्री.विक्रम काळे . . . .

पहातो की त्यांच्या अशा अटी आहेत की, तो पी.एच.डी.असला पाहिजे, 15 वर्षे नोकरी झाली पाहिजे, मग अशा वेळी अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांना तेथे येता येईल.परंतु ते प्राचार्य तेथील नोकरी सोडून याठिकाणी कशासाठी येईल. म्हणून माझा स्पेसिफीक प्रश्न आहे की, कायम विना अनुदानित आणि अनुदानित महाविद्यालये आहेत तेथील प्राचार्यांना नेमत असताना त्या ठिकाणी कार्यरत असलेले जे कोणी सेवा ज्येष्ठतेप्रमाणे वरिष्ठ शिक्षक आहेत, प्राध्यापक आहेत त्यानांच त्याठिकाणी प्रभारी प्राचार्य म्हणून त्यांच्या नियुक्तीला मान्यता दिली पाहिजे आणि तशा प्रकारचा बदल तातडीने करण्याची गरज आहे आणि हा बदल किती दिवसामध्ये करणार आहात हा माझा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महत्वाचा प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, अनुदानित महाविद्यालयांमध्ये सुध्दा प्राचार्यांचे पद भरत असताना त्या महाविद्यालयात त्या पात्रतेचे लोक उपलब्ध नसतील तर दुसऱ्या महाविद्यालयातून आमचे जे प्राध्यापक बांधव किंवा भगिनी असतील त्या सोडून प्राचार्य पदासाठी अर्ज करतात.

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : तीन वर्षात डी.एड. न झालेले अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षक अप्रशिक्षित शिक्षकांच्या वेतनश्रेणीपासून वंचित राहणे

**मु. शी.** : तीन वर्षात डी.एड. न झालेले अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षक अप्रशिक्षित शिक्षकांच्या वेतनश्रेणीपासून वंचित राहणे यासंबंधी श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यात शैक्षणिक वर्ष 2000-01 पासून शिक्षण सेवक योजना लागू असून नियुक्तीनंतर 3 वर्षे मानधन व 3 वर्षे समाधानकारक सेवेनंतर नियमित वेतनश्रेणी देण्याची तरतूद असणे, आरक्षणाची पदे भरण्यासाठी अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षण सेवकांची नियुक्ती करण्याची सवलत लागू असणे, अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षकांना 3 वर्षात डी.एड. प्रशिक्षणाची सोय शासनाकडून उपलब्ध न होणे, 3 वर्षात डी.एड. न झालेल्या शिक्षकांना मानधनावरच वेतन देणे, 3 वर्षापेक्षा अधिक काळ मानधनावर ठेवणे अन्यायकारक असून मागासवर्गीयांचे शोषण करणारे असणे, 3 वर्षानंतर अप्रशिक्षित शिक्षण सेवकांना अप्रशिक्षित शिक्षकांना वेतनश्रेणी अनुज्ञेय असणे, अप्रशिक्षित शिक्षकांच्या वेतनश्रेणीची तरतूद नियमात असणे, डी.एड. प्रशिक्षित व शिक्षण सेवक कालावधीचा संबंध नसल्याने 3 वर्षानंतर वेतनश्रेणी देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या मागासवर्गीय शिक्षकांच्या व्यथा या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न मी करीत आहे. या राज्यामध्ये सन 2000-2001 पासून कंत्राटी पध्दतीने किंवा मानधनावर काम करणारे शिक्षक नेमण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला. आर्थिक टंचाईच्या कारणामुळे शिक्षकांना त्यांची नियमित वेतनश्रेणी देण्याऐवजी त्यांना तीन वर्षे मानधन द्यावे आणि तीन वर्षे सेवा पूर्ण केल्यानंतर त्यांना नियमित वेतनश्रेणी द्यावी अशा प्रकारची ही योजना आहे. त्या योजनेला जरी त्यावेळी आमचा विरोध असला तरी

...2...

श्री. रामनाथ मोते ....

न्यायालयाने जो काही निकाल दिला, न्यायालयामध्ये जो काही समझोता झाला त्यानुसार शासनाने ही योजना न्यायालयाच्या परवानगीने या राज्यात लागू केली. या योजनेअंतर्गत आरक्षण पाळणे सर्व संस्थांवर बंधनकारक केलेले आहे. पूर्वीही बंधनकारक होतेच पण या ठिकाणी आरक्षण बिंदूवर अन्य कोणत्याही उमेदवाराची नेमणूक करण्यास या शिक्षण सेवक योजनेअंतर्गत परवानगी नाही. त्याचा परिणाम असा झाला की, आरक्षण बिंदू भरण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक मिळाले नाहीत तर अन्य प्रवर्गातील शिक्षक नेमण्याऐवजी मागासवर्गीयच शिक्षक नेमावेत, मागासवर्गीयांच्या जागेवर मागासवर्गीय शिक्षकच आला पाहिजे, त्याच प्रवर्गातील शिक्षक आला पाहिजे, मग तो प्रशिक्षित असेल तर फारच उत्तम आणि प्रशिक्षित नसेल तरी सुध्दा त्या अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षकाची नेमणूक करावी अशा प्रकारचा शासनाचा निर्णय होता.

शिक्षण सेवकांचे मानधन वाढल्यापासून आता तो निर्णय रद्द झाला. पण त्यापूर्वीचे जे शिक्षण सेवक तीन वर्षे काम करीत आहेत ते तीन वर्षे काम करीत असताना या अप्रशिक्षित शिक्षकांना शासनाच्या वतीने डी.एड.प्रशिक्षणासाठी पाठविले जाते. त्यांची निवड एससीआरटी करते. तीन वर्षे पूर्ण होण्याच्या आतच त्या सर्वांची प्रशिक्षणासाठी निवड होते असे अजिबात नाही. त्यांची जी काही प्रवेश क्षमता आहे त्यानुसार ते प्रशिक्षण देतात. या वर्षामध्ये 1200 विद्यार्थी, पुढच्या वर्षात 1 हजार विद्यार्थी, त्यानंतर 1400 विद्यार्थी या पध्दतीने एका विशिष्ट मर्यादेपर्यंत जशी क्षमता असेल त्याप्रमाणे ज्यांचा नंबर लागतो त्यांना प्रशिक्षण मिळते. तीन वर्षे पूर्ण होऊनही आमचे मागासवर्गीय शिक्षक त्या डी.एड. प्रशिक्षणाच्या प्रतिक्षेत असतात पण त्यांचा नंबर लागत नाही. हा त्यांचा दोष नाही.

सभापती महोदय, तीन वर्षे सेवा पूर्ण केल्यानंतर जरी ते प्रशिक्षित झाले नसले तरी सुध्दा त्यांना नियमाप्रमाणे अप्रशिक्षित शिक्षकाची वेतनश्रेणी देणे शासनावर बंधनकारक आहे. परंतु सातत्याने अनेक प्रयत्न करुन सुध्दा शासनाच्या वतीने आम्हाला एकच उत्तर मिळते की, ते प्रशिक्षित झाले नाहीत म्हणून त्यांना वेतनश्रेणी देता येत नाही. हे बरोबर नाही असे मला वाटते. यामुळे आपण मागासवर्गीयांवर अन्याय करीत आहोत. मागासवर्गीयांना त्यांच्या हक्कापासून आपण वंचित ठेवतो. प्रशिक्षणाचा आणि शिक्षण सेवकाच्या कालावधीचा काहीही संबंध नाही. आार्थिक

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

चणचण आहे म्हणून तीन वर्षे मानधन द्यावयाचे आणि तीन वर्षानंतर वेतनश्रेणी द्यावयाची अशी योजना आहे. प्रशिक्षितांना वेतनश्रेणी मिळते आणि अप्रशिक्षित राहिले तर त्यांच्यासाठी वेगळी वेतनश्रेणी आपल्या 1981 च्या नियमावलीत शेड्युल सी मध्ये दिलेली आहे. शिक्षक अप्रशिक्षित असेल तर त्याला कोणती वेतनश्रेणी द्यावी, त्यांना कोणती वेतनश्रेणी लागू होते याची तरतूद त्यामध्ये आहे. परंतु मी धाडसाने म्हणत आहे की, शासनाच्या वतीने या मागासवर्गीय शिक्षकांच्या बाबतीत अन्याय होतो. त्यांनी तीन वर्षे पूर्ण केल्यानंतर ते अप्रशिक्षित असले तरी त्यामध्ये त्यांचा दोष नाही. त्यामुळे या सर्व मागासवर्गीय शिक्षकांना न्याय देण्याच्या भूमिकेतून ज्यांना तीन वर्षे पूर्ण झालेली आहेत त्यांना अप्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी देणे ही न्यायाची भूमिका ठरेल. शासन ते करणार आहे का या संदर्भात माझा शासनाला प्रश्न आहे.

---

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, शिक्षण सेवक योजना लागू करताना त्यासाठी एस.एस.सी.,डी.एड., एच.एस.सी.,डी.एड. अर्हता निश्चित करण्यात आली होती. आदिवासी क्षेत्रामध्ये शाळा असेल तर त्यांना आदिवासींची बोली भाषा अवगत असावी. अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती व जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध झाले नाही तर त्यांना सुध्दा काही अटींवर नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. या उमेदवारांना प्राधान्यक्रमाने घेण्यात यावे. बी.ए.,बी.एस.सी.,वाणिज्य शाखेचे पदवीधर असतील किंवा त्यापेक्षाही अधिक क्वालिफाईड असतील त्यांना घेण्यात यावे. या शैक्षणिक पात्रतेचे शिक्षक मिळाले नाही तर एच.एस.सी.,डी.एड. उमेदवारांना घ्यावे अशी तरतूद केलेली आहे. मागासवर्गीय उमेदवार डी.एड.झालेले नसतील तर त्यांनी 3 वर्षात प्रशिक्षित झाले पाहिजे. 3 वर्षात प्रशिक्षित झाले नाही तर त्यांनी 3 वर्षात स्वखर्चाने प्रशिक्षण घेतले पाहिजे. ही त्यांची जबाबदारी असते. 3 वर्षात ते प्रशिक्षित झाले नाही तर त्यांना एक वर्षाचे एक्सटेंशन दिले जाते. एक वर्षातही ते प्रशिक्षित झाले नाही तर त्यांना सेवेतून कमी केले जाते. अशा प्रकारची ही तरतूद आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सभागृहाच्या रेकॉर्डवर चुकीचे येत आहे. मागासवर्गीय प्रशिक्षित होईपर्यंत त्यांच्या सेवेला संरक्षण देण्यात आलेले आहे. त्यासंदर्भातील जी.आर.मध्ये तशी तरतूद केलेली आहे.

प्रा.फौजिया खान : दिनांक 14.19.2010 रोजी शासनाने एक जी.आर.निर्गमित केलेला आहे. त्यात असे नमूद केले आहे की, 3 वर्षात उमेदवार प्रशिक्षित झाले किंवा 3 वर्षे उमेदवारांनी सेवा पूर्ण केली असेल तर त्यांना एका महिन्याच्या आत नियमित करता येईल. आता नवीन 'राईट टू एज्युकेशन' हा कायदा अस्तित्वात आलेला आहे. त्या कायद्यातील तरतुदीप्रमाणे 2015 पर्यंत जे शिक्षण सेवक असतील त्यांनी प्रशिक्षित होणे गरजेचे आहे. राज्यातील अप्रशिक्षित शिक्षण सेवक असतील त्यांनी 2015 पर्यंत प्रशिक्षित झाले पाहिजे असे या कायद्यानुसार बंधन घातलेले आहे. 5500 उमेदवारांना प्रशिक्षित करता येईल एवढ्या क्षमतेची सोय उपलब्ध आहे. एस.सी.आर.टी.ने त्या प्रमाणे नियोजनही केलेले आहे. राज्यात डायस डेटानुसार 5337 अप्रशिक्षित उमेदवार आहेत.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान....

केंद्र शासनाकडून 3 कोटी 20 लाख रुपये सुध्दा मंजूर झालेले आहेत. 2012-2013 या वर्षात सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून त्यांना प्रशिक्षित करण्याची सुविधा सुरु केली जाणार आहे. 5337 अप्रशिक्षित उमेदवारांना प्रशिक्षित होण्यासाठी 8 हजार रुपये खर्च येईल. त्यापैकी 6 हजार रुपये सर्व शिक्षा अभियानद्वारे खर्च करण्यात येईल आणि उर्वरित 2 हजार रुपये उमेदवारांनी खर्च करावयाचे आहेत. या योजनेद्वारे 2 वर्षात 100 टक्के शिक्षकांना प्रशिक्षित करावयाचे आहे. तसे एस.सी.आर.टी.ने नियोजनही केलेले आहे. त्यामुळे सर्वच शिक्षक प्रशिक्षित होतील.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी साधा प्रश्न विचारला होता. मराठवाड्यात एस.टी.प्रवर्गातील उमेदवारांसाठी जाहिरात देऊनही उमेदवार उपलब्ध होत नाहीत. त्यांच्या राहण्याची सोय केली तरी एस.टी.उमेदवार मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. आणि त्याची कल्पना मंत्री महोदयांनाही आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

आरक्षणाची पदे भरण्यासाठी विशेषत: एस.टी.ची पदे भरण्यासाठी अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षण सेवकांची नियुक्त करण्यात येते. अशा अप्रशिक्षित शिक्षण सेवकांना अप्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करणार का, असा साधा आणि सोपा प्रश्न आहे. ही वेतनश्रेणी आपल्याकडे आहे. आरक्षणाची पदे भरण्यासाठी उमेदवार मिळत नाहीत. त्यांना शोधून आणून आणावे लागतात. ते सेवेत टिकून रहावेत, विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून अशा अप्रशिक्षित शिक्षण सेवकांना अप्रशिक्षित शिक्षकाची वेतनश्रेणी देण्यात येईल काय ?

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस आणि सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांच्या प्रश्नांना मंत्री महोदयांनी एकत्रित उत्तर द्यावे.

श्रीमती शोभा फडणवीस : आदिवासी शिक्षक मिळत नव्हते म्हणून त्यावेळच्या युती शासनाने अशा आदिवासी उमेदवारांना प्रशिक्षण देऊन त्यांना नोकरीत सामावून घेण्याचे धोरण अंगीकारले होते. तेव्हा तशा प्रकारे उमेदवारांना प्रशिक्षण देऊन हा प्रश्न मार्गी लावण्यात येईल काय ?

श्री. रामनाथ मोते : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी प्रशिक्षण देण्यासंबंधी सांगितले. त्या शिक्षण सेवकांचा जेव्हा नंबर येईल त्यावेळी त्यांना प्रशिक्षण मिळून ते प्रशिक्षित होतील. हा नंतरचा विषय आहे. परंतु जे मागासवर्गीय आहेत आणि ज्यांची शिक्षण सेवक म्हणून 3 वर्षे सेवा पूर्ण झालेली आहे. ज्यांनी 3 वर्षे अल्पशा वेतनावर काम केलेले आहे त्यांना अप्रशिक्षित शिक्षकाची वेतनश्रेणी द्यावी अशी मागणी आहे. या शिक्षण सेवकांना शिक्षकाची वेतनश्रेणी द्यावी अशी आमची मागणी नाही. कायद्यानुसार अप्रशिक्षित शिक्षकाची वेतनश्रेणी आपल्याकडे आहे. ही अप्रशिक्षित शिक्षकाची वेतनश्रेणी कोणासाठी केलेली आहे ? तेव्हा या मागासवर्गीय शिक्षण सेवकांना अप्रशिक्षित शिक्षकाची वेतनश्रेणी देणार का हा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे आणि हाच या अर्धा-तास चर्चेचा मूळ गाभा आहे.

प्रा. फौजिया खान : खरे म्हणजे विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी शिक्षकांनी प्रशिक्षित होण्याची गरज आहे. त्यासाठी काही कालमर्यादा आणि बंधन ठेवल्या शिवाय अप्रशिक्षित शिक्षक प्रशिक्षित होणार नाहीत. शासनाने सर्व सुविधा देऊन देखील अप्रशिक्षित शिक्षक प्रशिक्षित होऊ





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

शकले नाहीत. यासंबंधीची आकडेवारी माझ्याकडे आहे. 2015 पर्यन्त सर्व अप्रशिक्षित शिक्षकांना प्रशिक्षित करावयाचे आहे. 5337 लोकांना प्रशिक्षण द्यावयाचे आहे. त्यासाठी 6 हजार रुपये शासनातर्फे आणि 2 हजार रुपये उमेदवाराने स्वत: भरुन प्रशिक्षण घेण्याचे नियोजन शासनाने केलेले आहे. या शिक्षकांनी प्रशिक्षित होण्याची गरज आहे. ते प्रशिक्षित झाल्यानंतरच त्यांना नियमित करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : मागासवर्गीय शिक्षण सेवकावरील अन्याय दूर करण्याची शासनाची इच्छा नाही. त्यांच्यावरील अन्याय हे शासन दूर करु शकत नाही याचा मी निषेध करुन सभात्याग करतो.

(सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते आणि सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे हे बहिर्गमन करतात.)

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 10:35

**पृ. शी.** : शालेय पोषण आहार योजनेच्या साहित्य खरेदीमध्ये झालेला भ्रष्टाचार

**मु. शी.** : शालेय पोषण आहार योजनेच्या साहित्य खरेदीमध्ये झालेला भ्रष्टाचार यासंबंधी श्री.जयंत प्र. पाटील,वि. प. स. यां□ उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयंत प्र. पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अ□मती□ □□म 92 अ□ये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित □रतो :-

"केंद्र शासनाच्या अनुदानावर राज्यामध्ये शालेय पोषण आहार योजना राबविण्यात येणे, चालू शैक्षणिक वर्षात शालेय पोषण आहार योजने अंतर्गत राज्यातील ३५ जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सुमारे २५ हजार प्राथमिक शाळांना साहित्याचे वाटप करण्याचे कंत्राट राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने औरंगाबाद येथील मे.गिरीजामाता जनहित सेवाभावी संस्था, नागपूर येथील इंटमेट प्रेस मेटल प्रायव्हेट लिमिटेड, वैद्य इंडस्ट्रीज व संकेत स्टील इंडस्ट्रीज यांना माहे फेब्रुवारी, २०१० व मार्च, २०१० या सुमारास साहित्य पुरवठा करण्याचे आदेश देऊन त्यांचे समवेत दर करार करुन सुमारे २० कोटी रुपयांची साहित्य खरेदी करणे, यामध्ये खुल्या बाजारात १८/- रुपयाला मिळणारा ग्लास २७/- रुपयाला, ४९ रुपयाला मिळणारे ताट ९५/- रुपयाला, ४८१ रुपयाला मिळणारी स्टील कोठी १,००८/- रुपयांना व २२४/- रुपयांना मिळणारी स्टील बादली ४८६/- रुपयांना याप्रमाणे खरेदी करुन शाळांना पुरवठा करणे व प्राथमिक शाळांच्या शिक्षकांना साहित्य न पहाताच वाटप करण्याचे आदेश देणे, या सर्व प्रकरणामध्ये झालेला भ्रष्टाचार कोटी रुपयांच्या वर असणे, सबब या गंभीर प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, केन्द्र शासनाच्या अनुदानावर राज्यात शालेय पोषण आहार योजना राबविण्यात येते. ही योजना राबवित असताना मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असतो. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत मुलांना दिल्या जाणा-या आहाराचा दर्जा कसा निकृष्ट असतो या बाबत या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. या योजनेअंतर्गत जे साहित्य खरेदी करण्यात

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आलेले आहे ते बाजारातील किंमतीच्या दुपटीने-तिपटीने किंमत देऊन खरेदी करण्यात आलेले आहे. 49 रुपयास मिळणारे ताट 95 रुपयास , 224 रुपयास मिळणारी स्टील बादली 486 रुपयास खरेदी केलेली आहे. अशा प्रकारे खरेदीमध्ये मोठया प्रमाणावर गैरव्यवहार, भ्रष्टाचार झालेला आहे.

...नंतर श्री. अजित...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, शालेय पोषण आहार योजनेतील गैरव्यवहारासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी कारवाई करण्या संदर्भात जी जी आश्वासने दिली त्यापैकी किती आश्वासनांची आतापर्यंत पूर्तता करण्यात आली ? गेली अनेक वर्षे ठराविक चार-पाच ठेकेदारांनाच शालेय पोषण आहार योजनाचे साहित्य पुरविण्याचा ठेका दिला जात आहे. त्यांचे एक रॅकेट आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदय हे रॅकेट तोडणार आहेत काय ? खुल्या बाजारामध्ये ग्लासची किंमत 18 रुपये असताना तो ग्लास 27 रुपयांना खरेदी करण्यात आला. 49 रुपयाला मिळणारे ताट 95 रुपयाला खरेदी करण्यात आले. 481 रुपयाला मिळणारी स्टील कोठी 1008 रुपयांना खरेदी करण्यात आली. 224 रुपयांना मिळणारी स्टील बादली 486 रुपयांना खरेदी करण्यात आली. या सर्व वस्तुंची खरेदी जादा किंमतीने केली असली तरी त्या वस्तुंचा दर्जा चांगला नाही. या खरेदीमध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. तेव्हा या खरेदीची वरिष्ठ पातळीवर चौकशी करण्यात येईल काय ?

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2009-2010 या आर्थिक वर्षासाठी ही केंद्र पुरस्कृत योजना होती. शालेय पोषण आहार योजनेतंर्गत शाळांना साहित्य वाटण्यासाठी 33 कोटी 26 लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. 40 हजार शाळांसाठी ही खरेदी करण्यात आली. प्रत्येक शाळेसाठी 25 ताटे, दोन पाण्याच्या टाक्या, दोन स्टील बादल्या, दोन धान्यांच्या कोठ्या आणि 20 ग्लास अशी खरेदी करण्यात आली होती. यामध्ये दोन प्रकारचे दर करार होते. सेंट्रल स्टोअर पर्चेस ऑर्गनायझेशन ही राज्य शासनाची संस्था तर डायरेक्टर जनरल ऑफ सप्लायर ॲन्ड डिस्पोझल ही केंद्र सरकारची संस्था आहे. डीजीएसखाली 10-12 संस्था आर.सी.वर आहेत. त्यामुळे वेगवेगळ्या संस्थांचे वेगवेगळे दर आहेत. आम्ही निगोशिएशन करुन दर कमी केलेले आहेत. राज्यातील मे.गिरीजामाता जनहित सेवाभावी संस्था ही आर.सी.वर आहे. या संस्थेला साहित्य पुरविण्याचे काम देण्यात आले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 18 रुपयाला मिळणारा ग्लास 27 रुपयांना विकत घेण्यात आला. मी त्यांना सांगू इच्छिते की, तो ग्लास 23.1 रुपयाला विकत घेतलेला आहे. स्टील कोठी 481 रुपयाला मिळत असताना ती 1008 रुपयांना विकत घेतली असेही त्यांनी सांगितले. परंतु प्रत्यक्षात स्टील कोठी 630 रुपयांना विकत घेतली आहे. स्टील बादली 224 रुपयांना मिळत असताना ती 486 रुपयांना विकत घेण्यात आली असे येथे सांगण्यात आले. प्रत्यक्षात ती बादली 420 रुपयांना विकत घेण्यात आली आहे. या सर्व गोष्टी सी.एस.पी.ओ.कडून खरेदी केलेल्या आहेत. हे दर बाजारभावापेक्षा जास्त असण्याचे कारण म्हणजे तिकडे टॅक्सेशन आणि क्वालिटी कंट्रोल नसल्यामुळे वस्तुंच्या किंमती कमी आहेत. तसेच वर्षभरात बाजारभावात चढउतार होत असल्यामुळे वस्तुंचे भाव स्थिर नसतात. या वस्तुंचे वाटप करण्यापूर्वी शासकीय अभियांत्रिकी आणि शासकीय तंत्रशिक्षण यांच्याकडून तपासणी करुन घेण्यात आली आहे. तेव्हा या खरेदीमध्ये भ्रष्टाचार झालेला असे दिसत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ज्या रजिस्टर्ड कंपन्या आहेत त्यांच्याकडून माल घ्यायचा असे शासनाने धोरणच ठरवावे. शासन टेंडर कशासाठी काढते ? कोणत्या तरी मार्केटींग फेडरेशन कडून खरेदी करायची, मी गेली 20 वर्षे मार्केटींग फेडरेशनवर संचालक आहे. माननीय मंत्री महोदय प्रत्येकवेळी थातूरमातूर उत्तरे देतात.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

या 10 कंपन्या रजिस्टर्ड झालेल्या आहेत, त्यांच्याकडूनच माल खरेदी करावयाचा, त्या कंपन्या जो रेट देतील तो मान्य करावयाचा असा या सभागृहात निर्णय घेतला गेला तर टेंडर काढण्याचा विषय संपून जाईल. तसे धोरण शासन घेणार आहे काय ?

**तालिका सभापती (श्री.विनायक मेटे)** : धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असेल तर माननीय मंत्री महोदयांना माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावी लागेल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपण चेअरवर बसला आहात त्यामुळे आपण असे बोलू नका अशी माझी विनंती आहे. माननीय मंत्री महोदय हे माननीय मुख्यमंत्र्यांच्या वतीने सभागृहात उत्तर देत आहेत अशी मला अपेक्षा आहे. माननीय मुख्यमंत्री धोरण ठरवतील अशा प्रकारच्या उत्तराची मला आपल्याकडून अपेक्षा नाही. सभागृहात मंत्री हे नेहमी संपूर्ण मंत्रिमंडळाच्या वतीने उत्तर देत असतात. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस बसून सांगत आहे की, साहित्यांचा दर्जा तपासणारे जे कॉलेज तुम्ही ठरविलेले आहे, त्या कॉलेजचाच दर्जा बरोबर नाही. हे कोणाचे कॉलेज आहे, त्या कॉलेजला काय स्टेटस आहेत या गोष्टीची माहिती माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी द्यावी, अशी माझी विनंती आहे. गेल्या दोन अधिवेशनापूर्वी मी ही अर्धा तास चर्चेची सूचना दिलेली होती, ती आज सभागृहात चर्चेला आलेली आहे. माझ्या सूचनेला न्याय मिळाला पाहिजे. सभागृहाच्या कामकाजाच्या नियमा प्रमाणे एका दिवशी दोन ते तीन अर्धा तास चर्चेच्या सूचना घेण्यात येत असतात. परंतु आपण या चर्चेच्या सूचना एकाच वेळी चर्चेला घेतो. सभागृहाच्या कामकाजाच्या बाबतीत आम्ही शासनाला सातत्याने सहकार्य करीत असतो. चटावरचे श्राध्द उरकावयाचे अशा प्रकारची नॉमिनल चर्चा सदर अर्धा तास चर्चेच्या सूचनेच्या बाबतीत होऊ नये असे मला वाटते.

**तालिका सभापती** : अर्धा तास चर्चेच्या सूचनांसाठी आपण भरपूर वेळ देत आहोत. ज्या सन्माननीय सदस्यांच्या अर्धा तास चर्चेच्या सूचना आजच्या कार्यक्रम पत्रिकेत दाखविण्यात आलेल्या आहेत, त्या सर्व सन्माननीय सदस्यांना त्यांची अर्धा तास चर्चेची सूचना उपस्थित करण्यासाठी भरपूर वेळ देत आहोत. त्यामुळे कमी वेळ देण्याचा प्रश्नच येत नाही.

2...

श्री.जयंत प्र.पाटील : माझा असा आक्षेप आहे की, साहित्यांचा दर्जा ज्या कॉलेजकडून तपासून घेतला आहे, ते कॉलेज बरोबर नाही अशी माझी माहिती आहे. ते कॉलेज कोणाचे आहे, त्या कॉलेजचे स्टेटस् काय आहे या बाबतची माहिती मला कळली पाहिजे.

श्री. निरंजन डावखरे : रायगड जिल्हयामध्ये शालेय पोषण आहार अंतर्गत विद्यार्थ्यांना खिचडीचे वाटप करण्यात येते. त्या खिचडीच्या दर्जाची चौकशी करण्यात आली आहे काय ?

श्रीमती शोभा फडणवीस : यामध्ये वाहतूक दर, टॅक्स याचा खर्च धरला तरी साहित्याची किंमत दुप्पट होऊ शकत नाही. साहित्याचा बाजारभाव 229 रुपये असेल आणि सरकारी खरेदी 429 रुपयांची असेल तर त्यात शासनाचे नुकसान आहे. टॅक्स वाढल्यामुळे खरेदीचा दर दुप्पट झाला असे मी मानत नाही. आपण साहित्य खरेदी करताना लॉटमध्ये खरेदी करतो. लॉटमध्ये खरेदी केल्यामुळे किंमती आपोआप कमी होतात हा बाजारभावाचा नियमच आहे. खरेदी केलेल्या साहित्यांचा दर्जा कमी प्रतीचा असतो. मी काही साहित्य मागे विधानसभेमध्ये आणून दाखविले होते. सर्व शिक्षा अभियान, शालेय पोषण आहार, आदिवासी विकास विभाग, समाजकल्याण विभाग यांच्याकडून साहित्य खरेदी करण्यात येते,ते साहित्य मी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले होते. अतिशय कमी दर्जा असलेली भांडी खरेदी करावयाची आणि त्यास तिप्पट किंमत द्यावयाची यात शासनाचेच मोठया प्रमाणात नुकसान होते. विद्यार्थ्यांना वाटीत देण्यात आलेले खाद्यपदार्थ खाताना जखमा होतात. अतिशय कमी दर्जा असलेले साहित्य खरेदी केले जाते अशा प्रकारचा प्रकार होत असतो. शासनाचे नुकसान होणार नाही तसेच विद्यार्थ्यांना उपयोगी येतील अशाच प्रकारचे साहित्य भविष्यात शासनाकडून खरेदी केले जाईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, दर करार असले तरी संबंधित विभागास साहित्य खरेदी संदर्भात टेंडर काढता येते. दर कराराप्रमाणे साहित्य खरेदी करतो असे नाही. जर दर करारा प्रमाणे अथवा टेंडर न काढता साहित्याची खरेदी केली तर त्या अनुषंगाने संबंधित विभागावर कारवाई करण्यात येते. वाहतूक खर्च, टॅक्स लागल्यामुळे किंमत दुप्पट झाली असावी या गोष्टीस सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस असहमती दर्शविली आहे. हे स्टीलचे साहित्य असते, त्या साहित्याचे वजन, त्याचा दर्जा बघितला जातो. या गोष्टीमुळे किंमतीमध्ये फ्लक्च्युएशन असते. सदर साहित्याची किंमत बाजारामध्ये एकाच दराने मिळते या संबंधी आपण तुलना करु शकत नाही. बाजारामध्ये साहित्याच्या किंमती वेगवेगळया असतात....

यानंतर श्री. कानडे...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KTG/ D/ 10:50

अर्धा-तास चर्चा क्र.7 .... श्रीमती फौजिया खान....

तसेच दर्जा तपासल्यानंतरच शासनाने ही साहित्य खरेदी केलेली आहे. माननीय सदस्यांनी कॉलेजच्या दर्जाच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला आहे. कॉलेजला ग्रेडेशन ठरविण्यासाठी यंत्रणा आहे. ज्या पध्दतीने ग्रेडेशन केलेले आहे त्या यंत्रणेवर विश्वास ठेवणे गरजेचे आहे. एखाद्या कॉलेजच्या बाबतीत काही चुकीचे निदर्शनास आले असेल दर्जा कमी असताना मान्यता दिली हे जर शासनाच्या लक्षात आणून दिले तर आम्ही संबंधित विभागाला कळवू.

-------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वन कायद्यामुळे गडचिरोली जिल्हयातील पाटबंधारे प्रकल्पांची रखडलेली कामें.

**मु. शी.** : वन कायद्यामुळे गडचिरोली जिल्हयातील पाटबंधारे प्रकल्पांची रखडलेली कामे यासंबंधी श्रीमती शोभाताई फडणवीस, वि. प. स. यांनी उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्रीमती शोभाताई फडणवीस (विधानसभा सदस्यांद्वारा ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अवये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित □रते :-

"राज्यात विशेषत: गडचिरोली जिल्हयातील 46 हजार 893 हेक्टर जमीन सिंचनाचे प्रकल्प हे वन कायद्याच्या धोरणामुळे वंचित असणे,जिल्हयात मोठयाप्रमाणात नद्या असूनही जिल्हयातील शेतकऱ्यांना सिंचनापासून प्रलंबित रहावे लागणे, मपत्र 1980 च्या वन कायद्यामुळे गडचिरोली जिल्हयातील तुलतुली,ता.आरमोरी, कारवाफा,ता.धानोरा,चेन्ना,ता.मुलचेरा,पोहार,ता.गडचिरोली, खोब्रागडी,ता.कोरची या प्रकल्पांची कामे 1983 पासून सुरु होऊनही अद्यापही कामे रखडली जाणे, त्यामुळे जिल्हयात सिंचनाची सोय असूनही अद्याप वन कायद्यामुळे सदर प्रकल्पाची कामे न होणे, परिणामी जिल्हयातील शेतकरी सिंचनापासून वंचित राहून पीक न घेऊ शकणे, त्यामुळे सदर प्रकल्पांना वनकायद्यातून मुक्त करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, आपल्या अनुमतीने सार्वजनिक महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी मी उभी आहे. गडचिरोली जिल्हयात 77 टक्के जंगल आणि 23 टक्के महसुली विभाग आहे. हा आदिवासी बहुल जिल्हा आहे. परंतु वन खात्याच्या कायद्यामुळे गेल्या 30 वर्षात जिल्हयात एकही सिंचन प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. त्यामुळे या मागासलेल्या व दुर्गम विभागात नक्षलवाद्यांनी थैमान घातलेले आहे. याठिकाणी मोठया प्रमाणात आदिवासी,अल्पभूधारक शेतकरी आहे. मोठा शेतकरी नाही. येथे मोठया प्रमाणात मोठया नद्या वाहतात. दाराशी पाणी आहे पण शेतकरी कोरडाच आहे अशा पध्दतीचे चित्र पहावयास मिळते. सिंचनाचा एकही प्रकल्प गडचिरोली जिल्हयात पूर्ण झालेला नाही हे खरे दु:ख आहे. 1983 साली मंजूर झालेले प्रकल्प अद्यापही पूर्ण झालेले नाही. सगळे बंद पडलेले आहेत. त्यावर शासनाचा पैसा खर्च झालेला आहे. करोडो

.....3



SSK/ KTG/ D/ पूर्वी श्री.गिते 10:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस

रुपये खर्च केलेले आहेत. 1983 पासून आजपर्यंत एकही प्रकल्प पूर्ण करु शकलो नाही आणि शेतकऱ्याला सिंचन मिळवून देऊ शकलो नाही. त्यामुळे माझ्या मनात विचार येतो की, महाराष्ट्राच्या नकाशातून गडचिरोली जिल्हा बाहेर टाकावयाचा आहे काय ? नक्षलवाद्यांच्या हातामध्ये हा जिल्हा देऊन गोंडवाना राज्य म्हणून हा जिल्हा घोषित करावयाचा आहे काय? अशा प्रकारची परिस्थिती तेथे निर्माण झालेली आहे.

नक्षलवाद्यांच्या धाकापोटी लोकप्रतिनिधी काम करावयाला तयार नाहीत. 371 लोकप्रतिनिधींनी राजीनामे दिलेले आहेत. त्याठिकाणी लोकशाही आहे असे आम्ही कोणत्या तोंडाने म्हणावयाचे ? नक्षलवाद कमी करावयाचा असेल तर मोठया प्रमाणात विकासाच्या योजना घेतल्या पाहिजेत. विशेष कृती कार्यक्रम मंजूर करतो. परंतु पैसा कुठे जातो , किती खर्च होतो आणि नक्षलवाद का कमी होत नाही याचा गंभीरपणे शासनाने विचार केलेला असेल असे माझे स्पष्ट मत नाही. गेली 20 वर्षापासून मी या गोष्टीसाठी भांडत आहे परंतु आम्हांला न्याय मिळालेला नाही किंवा शासनाच्या डोक्यात आणि नकाशात गडचिरोली जिल्हा आहे किंवा नाही असे दुर्देवाने म्हणावेसे वाटते.

सभापती महोदय, आरमोरी तालुक्यातील तुलतुली प्रकल्प 1983 साली मंजूर झाला. धानोरा तालुक्यातील कारवा प्रकल्प 1983 साली मंजूर झाला. मुलचेरा तालुक्यातील चेन्ना प्रकल्प हाही 1983 साली मंजूर झाला. गडचिरोली तालुक्यातील पोहार प्रकल्प 1983 सालातील आहे. कोरची तालुक्यातील खोब्रागडी प्रकल्प 1983साली मंजूर झाला आहे. हे पाचही प्रकल्प 1983 मध्ये मंजूर झालेले होते. 1983मध्ये कामे सुरु झाली परंतु वन विभागाच्या कायद्यामुळे याला बंधने आली आणि खर्च झालेला असून सुध्दा अजूनपर्यंत शेतकऱ्यांना एकही थेंब पाणी मिळालेले नाही. लघु आणि मध्यम प्रकल्प शासनाच्या विविध खात्यात रखडून पडलेले आहेत. मोठे प्रकल्प घेता येत नसतील तर लघु आणि मध्यम प्रकल्प तरी शासनाने होती घेतले पाहिजेत. त्याची फाईल येथे आली की समुद्रात गेल्यासारखे वाटते. फाईल सापडत नाहीत. पुन्हा अर्ज करतो तेव्हा मंत्रालयात सांगितले जाते की, पुन्हा फाईल पाठवा. फाईल सापडत नाही. आम्हीच विदर्भातील लोक सापडत नाही काय, आम्हांला समुद्रामध्ये बुडवून टाकले आहे काय असे वाटते. अशा पध्दतीचा विचार मनात येतो.

.....4



श्रीमती शोभा फडणवीस...

तुलतुली प्रकल्प 1983 सालातील आहे. प्रकल्पाचा त्यावेळचा खर्च 1 कोटी 69 लाख 40 हजार होता. 56 कि.मी.लांबीचा कालवा होता आणि ओलित क्षेत्र 23 हजार हेक्टर होते. अद्याप प्रकल्प पूर्ण झाला नाही.कारवा प्रकल्प 1983 च्या वन कायद्यामुळे बंद पडला आहे. प्रकल्पावरील त्यावेळेचा खर्च 27 कोटी 85 लाख रुपये होता. त्यावेळेस 425 हेक्टर सिंचनाखाली येणार होते. तोही प्रकल्प झाला नाही. चेन्ना प्रकल्प 1983 पासून बंद आहे. 3170 मीटर उंचीची भिंत घालावयाची होती. 10 मीटर उंचीची भिंत तयारही झाली. परंतु काम बंद झाल्यामुळे 14 कि.मी.चा कालवा अजून बांधण्यात आलेला नाही.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस .......

सिंचन मात्र 2230 हेक्टर होणार होते. पोहारा प्रकल्प सन 1983 पासून बंद आहे. या प्रकल्पावर आतापर्यंत 6.16 कोटी इतका खर्च झाला. या प्रकल्पातून 9738 हेक्टर सिंचनक्षमता निर्माण होणार होती. खोब्रागडी प्रकल्प देखील सन 1983 पासून बंद असून त्यावर आतापर्यंत 48 कोटी एवढा खर्च झाला आहे. यातून 7200 हेक्टर इतके सिंचन होणार होते. पण या सर्व प्रकल्पांची कामेच बंद झालेली आहेत. तसेच या प्रकल्पाची कामे अडविण्याचे कारण म्हणजे वन विभागाकडे वन जमिनीची रक्कम शासनाने वन विभागाकडे भरलेली नाही. ही रक्कम शासनाने भरली असती तर हे प्रकल्प पूर्ण झाले असते.

विजयवाडा पॅटर्न प्रमाणे आपण छोटे छोटे कालवे काढण्याचा विचार केला तरी शासनाने मंजूर झालेले प्रकल्प होते ते सुध्दा रद्द केले. म्हणजे कोणत्याही बाजूंनी आम्हाला, गडचिरोली जिल्ह्याला पाणी द्यावयाचे नाही असे शासनाने ठरविलेले दिसत आहे. त्याचा परिणाम म्हणून या भागातील आदिवासींना मोठ्या प्रमाणात दुष्काळाला तोंड द्यावे लागत आहे पण त्यांना न्याय मिळू शकत नाही. हे आदिवासी गरीब व इतके अडाणी आहेत की त्यांना कोठे जावे हे सुध्दा माहीत नाही. तहसील कार्यालय आणि गट विकास अधिकारी सुध्दा त्यांना कळत नाही. कार्ड कोठे काढावे याची त्यांना जाणीव नाही. तसेच गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी पाड्यांपैकी 50 टक्के भागात रस्ते व पाणी नाही याचा शासनाने विचार करावा.

महोदय, कारवाफा धरणाला वन कायद्यामुळे मंजुरी मिळाली नाही. पण या कारवाफा धरणाचे पाणी मराठवाड्यातील मांजरा प्रकल्पाला द्यावयाचे हे मात्र शासन ठरविते. म्हणजे प्रकल्प आमच्या भागात सुरु करायचे आणि वन विभागाच्या अडचणीमुळे ते पूर्ण होऊ शकत नाही म्हणून सांगायचे पण त्याच प्रकल्पाचे पाणी दुसऱ्या भागात, 300 किलोमीटर अंतरावर नेत असताना वन कायद्याची अडचण येत नाही हा काय प्रकार आहे हेच मला समजत नाही. आमच्याच प्रकल्पाचे पाणी आम्हाला मिळत नाही आणि शेजाऱ्यांना मात्र देण्याचा प्रयत्न होतो, असेच धोरण शासन घेत असेल तर गडचिरोली जिल्हा एकदाचा महाराष्ट्राच्य नकाशावरुन तरी काढून टाका. या जिल्ह्यात प्राणहिता नदी एवढी मोठी आहे की, संपूर्ण जिल्ह्यासाठी या नदीचे पाणी पुरेल एवढे तिचे पात्र आहे. अशा प्राणहिता आणि इंद्रावती या नद्यांवर आमच्या भागात धरण होत नाही. लाकांनी

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस ...

याबाबत मोठ्या प्रमाणात आंदोलन सुध्दा केले, तरी देखील आम्हाला या नदीवर धरण घेण्याची परवानगी मिळाली नाही. पण याच प्राणहिता नदीचे पाणी आंध्र प्रदेशातील तेवेला धरणाला देण्यासाठी मात्र शासनाने पावले उचलली आहेत. केंद्र शासनाचा वन कायदा फक्त विदर्भ आणि महाराष्ट्रालाच लागू आहे काय, आंध्र प्रदेशाला हा कायदा लागू होत नाही काय, मांजरा प्रकल्पाला हा कायदा लागू होत नाही काय याचाही खुलासा झाला पाहिजे. असेच शासनाचे धोरण असेल तर आम्ही न्याय तरी कोठे मागावयाचा हा खरा प्रश्न आहे. शासन दरबारी जर आम्हाला न्याय मिळत नसेल तर निदान आम्हाला सांगावे, आम्हाला शिक्षण द्यावे की, अमुक फाईल आपल्याला येथून पुढे जावी असे वाटत असेल तर अशा अशा प्रकारे तिचे वजन वाढविले पाहिजे, म्हणजे आम्ही तेही करु. विकासासाठी घर, आमचे दार सुध्दा विकून आमचा विकास करण्यासाठी आम्ही तयार आहोत. राज्यात अशा प्रकारे आमच्यावर नेहमीच अन्याय होत असेल तर त्याचाही विचार करण्याची गरज आहे. गडचिरोली हा जिल्हा नक्षलग्रस्त आहे, या जिल्ह्यात एक पैशाचेही सिंचन झ ालेले नाही. दुर्दैवाने नक्षलवादी अतिशय हेवी झालेला आहे, लोकशाही या जिल्ह्यात जिवंत नाही, हुकूमशाहीचेच राज्य आहे. आम्ही विरोध करायला गेलो तर एक दिवस आमच्यावर सुध्दा गोळी झ ाडली जाऊ शकते. या भागातील लोकांना आम्ही न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतो तेव्हा शासनाने सुध्दा आम्हाला मदत केली पाहिजे, कारण आम्ही शासनाच्याच बाजूने उभे असतो. या निमित्ताने माझी विनंती आहे की, ज्या प्रकल्पांची नावे मी आताच सांगितली ते प्रकल्प पूर्ण होऊन गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी माणसाला न्याय मिळवून देणार काय, तसेच वन विभागाचा एनपीयू आपण भरणार आहात काय अन्यथा एकदा जाहीर तरी करुन टाकावे की, गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्राच्या नकाशावरुन काढून टाकण्यात येत आहे व स्वतंत्र गोंडवाना राज्याची निर्मिती करण्यात येत आहे. एवढे बोलून मंत्री महोदयांकडून सर्व मुद्यांचे स्पष्टीकरण मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करते आणि माझे भाषण पूर्ण करते.

------

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ( जलसंपदा राज्यमंत्री ) :सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी गडचिरोली जिल्हयातील सिंचन प्रकल्प "वन कायद्या"मुळे वंचित राहत असल्याबाबत अर्धातास चर्चा उपस्थित केलेली आहे. गडचिरोली जिल्हयाची टोपोग्राफी अशी आहे की, साधारणत: 77 टक्के वनाने घेरलेला हा प्रदेश आहे. वन कायदा हा केंद्र शासनाचा कायदा आहे. एका विशिष्ट राज्यासाठी "वन कायदा" नाही तर हा "वन कायदा" संपूर्ण देशासाठी आहे. पूर्वीच्या काळात या जिल्हयामध्ये अनेक प्रकल्प राज्य शासनाने हाती घेतले होते. तुलतुली, कारवाफा,चेन्ना, पोहारा, खोब्रागडी अशा प्रकारचे अनेक प्रकल्प राज्य शासनाने हातामध्ये घेतले होते. गडचिरोली जिल्हयात नव्याने सिंचन क्षमता निर्माण करणे, जलसाठा निर्माण करणे असा उद्देश प्रकल्पाच्या माध्यमातून होता. गडचिरोली जिल्हयातील आदिवासी बहुल क्षेत्रातील जनतेची आर्थिक परिस्थिती तसेच एचडीआय ऊंचावण्यासठी प्रकल्पांचे काम शासनाने हाती घेतले होते. मी अगोदरच सांगितल्या प्रमाणे हा संपूर्ण भाग वनाने व्यापलेला असल्यामुळे वन विभागाने या प्रकल्पांना परवानगी नाकारली.

सभापती महोदय, गडचिरोली जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र 14.48 लक्ष हेक्टर असून लागवडीचे क्षेत्र 2.52 लक्ष हेक्टर आहे. गडचिरोली जिल्हयात दिना प्रकल्प असून त्यासोबत 25 लधु पाटबंधारे प्रकल्प तसेच 36 प्रकल्पांची कामे आतापर्यंत पूर्ण झालेली आहेत. या माध्यमातून 85.58 द.ल.घ.मीटर साठा उपलब्ध झालेला आहे. या प्रकल्पांमुळे 18,134 हेक्टर क्षेत्राची सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. गोंदिया जिल्हयातील इटियाहोड प्रकल्पामुळे जिल्हयात 17,780 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे. जिल्हयामध्ये एकंदरीत 35,914 हेक्टर सिंचन क्षमता निर्मित झालेली आहे. या व्यतिरिक्त 9 प्रकल्पांमुळे 20,250 हेक्टरचे क्षेत्र सिंचनाखाली येऊ शकते अशा प्रकल्पांची कामे सुरु आहेत.

सभापती महोदय, तुलतुली हा महत्वाकांक्षी प्रकल्प असून त्यातून 30,590 हेक्टर सिंचन क्षमता निर्मित होऊ शकते. परंतु वन बाधित क्षेत्र 2218 हेक्टर असल्यामुळे या प्रकल्पाला अद्याप पर्यंत मान्यता मिळाली नाही. कारवाफा, चेन्ना, पोहार, खोब्रागडी या सर्व प्रकल्पांची सिंचन क्षमता लक्षात घेतली तर 55,098 हेक्टर सिंचन क्षमता यामधून निर्माण होऊ शकते. या सर्व प्रकल्पांना

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक...

कार्यान्वित करावयाचे असेल तर साधारणत: 4,525.32 हेक्टर वन जमीन त्यासाठी अधिग्रहीत करावी लागेल. या भागातील सर्व वने वन संवर्धन कायद्याअंतर्गत येतात. तुलतुलीच्या संदर्भात केंद्रशासनाने दि. 3.8.1999 व 9.4.2002 च्या प्रस्तावास मान्यता नाकारलेली आहे. अशाच प्रकारे कारवाफा प्रकल्पाच्या संदर्भात मागील 35 वर्षापासून वन विभागाशी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतरही या प्रकल्पाला मान्यता मिळाली नाही.

या भागामध्ये सिंचन क्षमता निर्माण व्हावी यासाठी मंत्रिमंडळाने यासंदर्भात चर्चा केली असून दीड महिन्यापूर्वी मी माझ्या विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. या जिल्हयामध्ये जेवढया काही नद्या आहेत त्या नद्यांवर बॅरेजेस बांधले तर कमीतकमी जमिनीचे अधिग्रहण करावे लागेल व त्यासाठी वन विभागाची काहीच अडचण येणार नसल्यामुळे या ठिकाणी आपण मोठया प्रमाणात सिंचन क्षमता निर्माण करु शकतो. नद्यांवरील बॅरेजेसचे काम हाती घेतले तर मुल्लर, कोटगल, चिचडोह, कळंबगावन व येनबोथला या नद्यांवर बॅरेजेस लावू शकतो. मुल्लरच्या नदीवर जर बॅरेजेस बांधले तर 5500 चे हेक्टरची सिंचन क्षमता निर्माण होऊ शकते. कोटगल नदीवर बॅरेजेस बांधले तर 6620 व चिचडोहच्या माध्यमातून 11000 हेक्टर व कळंबगावनच्या माध्यमातून 13,246 व येनबोथलाच्या माध्यमातून 18000 हेक्टर जमिनीचे सिंचन होऊ शकते. गडचिरोली जिल्हयामध्ये एकंदर 26,409 हेक्टर सिंचन क्षमता बॅरेजेसच्या माध्यमातून निर्माण होऊ शकते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक...

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये 28137 हेक्टर सिंचन क्षमता बॅरेजेसच्या माध्यमातून निर्माण होऊ शकते. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हे शासन कटिबद्ध आहे. कोटगल आणि कळम गावासाठी आम्ही निर्णय घेतलेला आहे. सदर गावाचे प्रस्ताव आम्ही माननीय राज्यपाल महोदयांकडे पाठविले आहेत. त्यांची मान्यता आल्या बरोबर येथे बॅरेजेसचे प्रकल्प सुरू करणार आहोत. सर्व बॅरेजेसना प्राधान्यक्रम देऊन त्या भागामध्ये सिंचन क्षमता निर्मित करण्याचे ध्येय आहे.

सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जे जुने प्रकल्प आहेत. ते सुरू होऊ शकतील काय या बाबत देखील प्रश्नचिन्ह आहे. आपल्याला माहिती आहे की, वन कायदा हा केंद्र शासनाचा आहे. आम्ही आमच्या विधी व न्याय विभागाशी समन्वय साधून केंद्राच्या वन कायद्यामध्ये काही चेंजेंस आणूशकतो काय, हे देखील पडताळून पाहत आहोत. मी पुन्हा एकदा सांगतो की, वन कायदा केंद्र शासनाचा आहे. गडचिरोली जिल्हा हा वन विभागामध्ये येतो. या जिल्ह्याचा 70 टक्के भाग वनाने व्यापलेला आहे. येथे थिक फॉरेस्ट आहे. आजच्या काळात वनाचे संरक्षण करण्याची देखील आवश्यकता आहे. जगात इकॉलॉजिकल चेंजेंस होत आहेत. पर्यावरणाचे असंतुलन होत आहे ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. त्यामुळे या भागाला सिंचना पासून वंचित ठेवावे असा उद्देश असता कामा नये. तसा या शासनाचा बिलकूल उद्देश नाही. बॅरेजेस सारखी नवीन संकल्पना घेऊन आम्ही या भागाला सिंचन पुरविण्याचा निश्चितपणे प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, माझ्याकडे अर्थ व नियोजन खाते आहे. या खात्यांच्या माध्यमातून तेथील डीपीडीसीला दरवर्षी आम्ही नियतव्यय वाढवून देत आहोत. या वर्षी 250 कोटी रूपयांचा नियतव्यय गडचिरोली जिल्ह्याला दिलेला आहे. या सोबत केंद्र शासनाकडून या जिल्ह्यासाठी नॅशनल पॅकेज देखील प्राप्त होत आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून त्या भागाला इतर पॅकेज देण्यात येत आहे. येथे मोठ्या प्रमाणावर अनुसूचित जमातीचे लोक राहतात. हा दुर्बल घटक आहे. त्यांचे राहणीमान कसे उंचावता येईल या संदर्भात देखील राज्य शासन अत्यंत गंभीर आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक...

एनपीव्हीचे पैसे भरून इतर काही प्रकल्प पूर्ण करता येऊ शकतात काय, असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. या संबंधी मी नक्कीच माहिती घेतो. एनपीव्हीचे पैसे भरल्यानंतर आपण ते प्रकल्प पूर्ण करू शकतो काय, त्या प्रकल्पांना मान्यता मिळू शकते काय, एनपीव्हीची रक्कम देण्याकरिता निश्चित कोणते धरण आहे, या संबंधातील सकारात्मक माहिती सन्माननीय सदस्यांना निश्चित स्वरूपात देण्यात येईल. एनपीव्हीसाठी पैसा कमी पडला असेल तर तो देण्याचा आम्ही निर्णय घेऊ. आपण भविष्यात येथे बॅरेजेस करणार आहोत. त्या माध्यमातून या भागाला न्याय देण्याचे काम होईल. सिंचन क्षमता निर्माण करण्याचे काम होईल.

....

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी एवढेच विचारू इच्छिते की, गडचिरोली जिल्ह्यामध्ये लिफ्ट इरिगेशनच्या काही योजना मंजूर आहेत. त्या पैशा अभावी झालेल्या नाहीत. हल्दीपुराणी, महागाव, डोंगरगाव, ठाणेगाव, कोडगल, रेगुंठा, देवलमारी, तळोदी-मुकासा अशा योजना पैशा अभावी बंद आहेत. चिंचडोहावर आता बॅरेजेस घेणार आहात. या लिफ्ट इरिगेशन योजनांचे काम सुरू झालेले आहे. परंतु, ते पूर्ण झालेले नाही. रेगुंठा सिंचन योजना निधी अभावी रखडलेली आहे. सिरोंचा भागामध्ये नक्षलवाद्यांचा मोठा प्रभाव आहे. तेथे रेगुंठा, आसरअली, झिंगाणू, पेंडीपाडा व टेकडा या योजना मंजूर असून देखील लिफ्ट इरिगेशन पूर्ण केलेले नाही. या योजना निधी अभावी अडलेल्या आहेत असे बोलले जाते. या योजना पूर्ण करण्याकरिता शासनाने विचार करावा. आता आपण सांगितल्या प्रमाणे सर्व पाणी आरमोरीमध्ये जाते. गडचिरोली भागामध्ये कुठेही पाणी जात नाही. इरिगेशन हे फक्त वडसा, देसाईगंज आणि आरमोरी एवढ्या भागामध्येच आहे. बाकीचा जिल्हा हा कोरडा आहे. त्यामुळे या लिफ्ट इरिगेशनच्या योजना झाल्या तर सगळ्यांना मोठ्या प्रमाणावर पाणी मिळू शकेल. तेव्हा शासन या योजना पूर्ण करणार आहे काय ?

यानंतर श्री.सरफरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, उपसा सिंचन योजनेबाबत माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. त्या भागामध्ये उपसा सिंचन योजनेमधून स्थापित सिंचन क्षमता निर्माण होत असेल आणि त्यामध्ये काही तांत्रिक बाबी असतील तर त्या मी निश्चितपणे तपासून पहातो. हे अधिवेशन संपल्या नंतर या संदर्भात मी एक बैठक घेणार आहे. काल विधानसभेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केलेल्या चर्चेच्या वेळी मी सांगितले आहे की, त्या भागामधील लोकप्रतिनिधी, लोकसभेचे माननीय खासदार, विधानसभा आणि विधान परिषदेतील माननीय सदस्य या सर्वांना विश्वासात घेऊन एक बैठक आयोजित करण्यात येईल. त्याप्रमाणे सन्माननीय राज्यपालांनी या सर्व भागांसाठी दिलेल्या निर्देशानुसार सर्व बाबींचा समावेश असलेला एक नवीन ॲक्शन प्लॅन तयार करुन या भागामध्ये नवीन सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी हे शासन कटिबध्द आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जातीचे प्रमाणपत्र प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणे देण्यापेक्षा एका कुटुंबाला एक प्रमाणपत्र देण्याबाबत

**मु. शी.** : जातीचे प्रमाणपत्र प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणे देण्यापेक्षा एका कुटुंबाला एक प्रमाणपत्र देण्याबाबत या विषयावरील अतारांकि□त प्रश□□मां□ 25002 ला दि□ां□ 19 एप्रिल 2012 रोजी शास□ा□ दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. सतीश चव्हाण, वि.प.स. यां□ उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, "जातीचे प्रमाणपत्र प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणे देण्यापेक्षा एका कुटुंबाला एक प्रमाणपत्र देण्याबाबत" या विषयावरील अतारांकि□त प्रश□□मां□ 25002 ला दि□ां□ 19 एप्रिल 2012 रोजी शास□ा□ दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अ□ुमती□ि□यम 92 अ□वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित □रीत आहे.

सभापती महोदय, इंजिनिअरींग कॉलेज, पॉलिटेक्निक कॉलेज, व्यावसायिक महाविद्यालयांमध्ये जात पडताळणी अनिवार्य करण्यात आलेली आहे. या विषयावर सभागृहामध्ये बरीच चर्चा झाली असल्यामुळे मी जास्त बोलणार नाही. परंतु माननीय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे साहेबांनी अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये चर्चेला उत्तर देतांना सांगितले होते की, "सदर बाब शासनाच्या विचाराधीन असून त्याबाबत छाननी सुरु आहे". सभापती महोदय, एखाद्या मुलाच्या आई-वडिलांकडे जातीचे प्रमाणपत्र आहे, पहिल्या व दुसऱ्या मुलाकडे जातीचे प्रमाणपत्र आहे परंतु तिसऱ्या अपत्याला जातीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी खेटे मारावे लागत आहेत. हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी दर निश्चित करण्यात आला असून त्या बाबत या सभागृहात बरीच चर्चा झाली आहे. अशाप्रकारे मागासवर्गीय घटकातील मुला-मुलींना जातीच्या प्रमाणपत्रासाठी प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. सभापती महोदय, मला मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, "सदर बाब शासनाच्या विचाराधीन असून त्याबाबत छाननी सुरु आहे" अशा प्रकारे आपण दिलेल्या उत्तरानुसार छाननीचे काम केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे, त्या बाबत सकारात्मक निर्णय लवकरात लवकर जाहीर करण्यात येईल काय या बाबत आपण खुलासा करावा.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री, सतीश चव्हाण यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. एका संपूर्ण कुटुंबाला एकच जात प्रमाणपत्र देता आले किंवा एकाच वेळी कुटुंबाचे जातीचे प्रमाणपत्र तपासता आले तर त्यामुळे वेळ आणि पैसा वाचू शकेल हे खरे आहे. त्या संबंधी मी आश्वासन दिले होते व त्यानंतर मुख्य सचिवांकडे त्या बाबत एक बैठक घेऊन काही मुद्यांबाबत चर्चा करण्यात आली होती. तरी सुध्दा अजून काही मुद्दे अर्धवट राहिले आहेत ते पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने श्रीमती माधुरी पाटील वर्सेस महाराष्ट्र राज्य या प्रकरणी दि.2.9.1994 रोजी निर्णय दिला आहे. त्यावेळी संपूर्ण कुटुंबासाठी एकच जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे अशाप्रकारचा मुद्दा चर्चिला गेला होता. दुसरा मुद्दा असा की, एस.डी.ओ. ने एकदा प्रमाणपत्र दिल्यानंतर पुन्हा जातीचे प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता काय? त्या बाबत सुप्रीम कोर्टाने "असे करता येणार नाही" असा निर्णय दिला. प्रत्येकाला वैयक्तिक जातीचे प्रमाणपत्र दिले पाहिजे व त्याची जात पडताळणी केली पाहिजे असा निर्णय देण्यात आला.

सभापती महोदय, त्यानंतर हा विषय तपासून पाहण्याकरिता विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आला. या बाबत संबंधित कायदा अस्तित्वात असून त्यामध्ये सुध्दा आपल्याला सुधारणा करता येतील काय ही बाब सुध्दा तपासण्याचे काम सुरु आहे. दुसरी गोष्ट अशी की, देशाच्या पातळीवर आपण यामध्ये बदल करण्याचा प्रयत्न केला तर केंद्र सरकारच्या नोकऱ्या, सवलती घेण्याकरिता आपले कौटुंबिक प्रमाणपत्र चालणार नाही तर त्या ठिकाणी वैयक्तिक प्रमाणपत्र आवश्यक आहे. हा विषय देखील आम्ही तपासून पहात आहोत.

दुसरी बाब अशी की, एखाद्या मागासवर्गीय कुटुंबामध्ये उच्च वर्गीय मुलगी आली आहे, ती त्या कुटुंबाचा एक घटक असली तरी तिला एकत्र कौटुंबिक प्रमाणपत्र देता येत नाही. अशाप्रकारचे अनेक मुद्दे तपासून त्याबाबत निश्चितपणे न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर दिले असले तरी माझी वेगळी मागणी आहे. आपण या ठिकाणी सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाचा संदर्भ दिला, मुख्य सचिवांकडे झालेल्या बैठकीचा संदर्भ दिला. परंतु माझे असे म्हणणे आहे की, आई-वडिलांना जातीचे प्रमाणपत्र देत असतांना 15 ते 20 अटी घातल्या जातात. जर त्या मुलाच्या पालकांकडे जात पडताळणी प्रमाणपत्र असेल तर त्याचा आधार घेऊन त्या मुलाला तात्पुरत्या स्वरुपामध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण....

प्रमाणपत्र दिले तर महाविद्यालयामध्ये त्याला ॲडमिशन मिळू शकेल. त्या मुलाला शासनाच्या फी सवलत योजनेचा फायदा मिळू शकेल. या बाबत शासन अंतरिम निर्णय घेऊ शकेल काय असे मला विचारावयाचे आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे साहेब हे मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांना असलेला अनुभव लक्षात घेऊन त्यांच्याकडे सामाजिक न्याय विभागाचा कार्यभार दिलेला आहे. त्यांनी या विभागामध्ये अनेक चांगले बदल केल्याचे आम्ही पाहिलेले आहे.जात प्रमाणपत्र देण्यासाठी अधिकाऱ्यांनी लाच घेतल्याची बातमी आम्ही दर चार दिवसांनी वर्तमानपत्रात वाचतो.जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी चार-पाच लाख रुपये घेतले जातात. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी या प्रकरणात लक्ष घातले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला की, कुटुंब प्रमुखाला जातवैधता प्रमाणपत्र मिळाले तर त्याच्या मुलाला किंवा मुलीला जात वैधता प्रमाणपत्राची अट असू नये.आपण जात वैधता प्रमाणपत्र वेगवेगळे द्यावे, त्याबाबत आमचे काही म्हणणे नाही. कुटुंब प्रमुख म्हणून मला जात वैधता प्रमाणपत्र मिळाल्यानंतर माझ्या मुलांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी खेटे मारावे लागू नयेत. आपण अशा प्रकारचा निर्णय घेतल्यास गैरव्यवहाराला काही प्रमाणात आळा बसू शकेल. तसेच महाराष्ट्रातील जनतेला जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी जो त्रास सहन करावा लागत आहे तो कमी होईल. तेव्हा माझ्या सूचनेचा माननीय मंत्री महोदय विचार करतील काय?

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, आमच्या ठाणे विभागातील प्रांत अधिकारी श्री. रोकडे यांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याच्या संदर्भात सांगितले की, विद्यार्थी नववीतून दहावीला जातो त्याच वेळी जात वैधता प्रमाणपत्रासाठी शाळेतून जिल्हाधिकारी कार्यालयास अर्ज दिल्यास दहावी पास झाल्या बरोबर त्याला लिव्हींग सर्टीफिकेट बरोबर जात वैधता प्रमाणपत्र मिळू शकेल. कुटुंब प्रमुखाला जात वैधता प्रमाणपत्र मिळाले असेल आणि त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र त्या सोबत जोडले असेल तर त्याचा फायदा निश्चित होईल. तेव्हा माननीय मंत्री महोदय माझ्या मागणीचा विचार करतील काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी व्यक्त केलेले विचार योग्य आहेत. जात वैधता प्रमाणपत्र मिळणे फार महत्वाचे आहे. वडिलांचे जात वैधता प्रमाणपत्र असेल तर त्यांच्या मुलाला जात वैधता प्रमाणपत्र ताबडतोब मिळेल. आता आपण एक दीड महिन्यात ऑन-लाईन पध्दत सुरु करणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी नववीत असतानाच शाळेमार्फत जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा.मी त्यांना सांगू इच्छितो की, आपल्याकडे अशी पध्दत आहे की,विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी वेळेवर अर्ज केल्यास ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजराव मोघे . . . .

आम्ही वैध किंवा अवैध असे उत्तर देऊ शकतो. परंतु बरेचसे विद्यार्थी वेळेवर अर्ज करीत नाहीत. त्यामुळे त्यांना अडचण निर्माण होते. त्यांनी वेळेवर अर्ज केल्यास त्यांना दोन वर्षे काही काळजी करण्याचे कारण नाही.

-----

..3.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत करावयाची कार्यवाही

**मु.शी.**: राज्यातील महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत करावयाची कार्यवाही या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 26033 ला दिनांक 19 मार्च, 2012 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय,"राज्यातील महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत करावयाची कार्यवाही" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 26033 ला दिनांक 19 मार्च, 2012 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघेसाहेब राज्यातील महाविद्यालयांमध्ये प्राचार्याची किती पदे रिक्त आहेत ? माननीय मंत्री महोदया देखील एका संस्थेच्या घटक आहेत. तेव्हा त्यांना देखील वस्तुस्थिती काय आहे याची माहिती आहे. काही महाविद्यालये अनुदानित आहेत. परंतु जी महाविद्यालये विना अनुदान तत्वावर चालतात त्या ठिकाणी प्रार्चायांची नियुक्ती कशी करणार असा महत्वाचा प्रश्न आहे. आपण विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये निवृत्त झालेल्या प्राचार्यांची नियुक्ती करतो. नियमाप्रमाणे प्राचार्य पद असेल तर त्यांना विद्यापीठाचे ॲफिलेशन मिळते. या पदासाठी पी.एचडी व 15 वर्षाचा अनुभव अशा अटी आहेत. अशा प्रकारच्या अटींमुळे विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांची नियुक्ती होऊ शकेल. परंतु अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य तेथील नोकरी सोडून विना अनुदानित महाविद्यालयामध्ये नोकरी कशाला करतील ? तेव्हा माझा प्रश्न आहे की, विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राचार्यांची नियुक्ती करताना त्या महाविद्यालयात ज्येष्ठ प्राध्यापकांची प्रभारी प्राचार्य म्हणून नियुक्ती केली पाहिजे असा बदल तातडीने करण्याची आवश्यकता आहे, असा बदल आपण किती दिवसांत करणार आहात ?

सभापती महोदय,अनुदानित महाविद्यालयामध्ये प्राचार्याचे पद भरताना तेथील महाविद्यालयातील प्राचार्य पदासाठी कोणी पात्र उमेदवार नसतील तर दुसऱ्या महाविद्यालयातील प्राध्यापक त्या ठिकाणी अर्ज करतात.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

हे करीत असताना पहिले महाविद्यालय सोडताना त्यांना लिन घ्यावी लागते. ती लिन कधी दोन वर्षाची असते तर कधी लिन मिळतच नाही. अशा ज्या अडचणी आहेत त्यासाठी पाठपुरावा केला आणि त्याला आपण मान्यता दिली. आता लिनची मुदत पाच वर्षाची केली आहे. परंतु ही मुदत न घालता त्या महाविद्यालयाच्या इच्छेंनुसार आणि त्या प्राध्यापकाच्या इच्छेनुसार, जर त्याला त्या महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणून काम करावयाचे असेल तर लिनच्या बाबतीत ही वर्षाची अट असता कामा नये. ही मुदत आणखी 10 ते 15 वर्षे पर्यंत वाढविली पाहिजे. जोपर्यंत ती संस्था त्यांना ठेवण्यास तयार आहे आणि जोपर्यंत ती व्यक्ती प्राचार्य म्हणून त्या ठिकाणी राहण्यास तयार आहे तोपर्यंत त्यांना राहता येईल असे केले तर यातील अडचण दूर होऊ शकेल असे मला वाटते. हा निर्णय शासन घेणार आहे का असा माझा प्रश्न आहे.

--

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी. पी. सावंत ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी प्राचार्यांची किती पदे रिक्त आहेत असा पहिला प्रश्न असा विचारला. महाराष्ट्रात प्राचार्यांची एकूण मंजूर पदे 3801 आहेत. नियमित भरलेली पदे 1956 आहेत आणि रिक्त पदे 1816 आहेत. सन्माननीय सदस्यांनी असेही विचारले की, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये जी रिक्त पदे आहेत त्यासाठी शासन काय करीत आहे ? ही गोष्ट अतिशय बरोबर आहे की, सन्माननीय उच्च न्यायालयाने 2006 साली या बाबतीत सु-मोटो दखल घेतली होती आणि त्यांनी 2008 साली जो निर्णय दिला होता त्यामध्ये न्यायालयाने असे सांगितले होते की, प्राचार्यांची पदे ताबडतोब भरण्यात यावीत आणि ज्या महाविद्यालयांनी पदे भरली नाहीत त्यांची मान्यता काढून घ्यावी. त्या अनुषंगाने शासनाने सुध्दा कारवाई केली होती. परंतु काही संस्था चालक सर्वोच्च न्यायालयामध्ये गेले. सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला होता की, अशी पदे न भरलेल्या महाविद्यालयाची मान्यता काढता येणार नाही परंतु प्राचार्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही तशीच पुढे चालू ठेवावी. त्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी विद्यापीठांना सूचना दिलेल्या आहेत. जॉइन्ट डायरेक्टर्सना सूचना दिलेल्या आहेत आणि सर्व महाविद्यालयांना प्रायार्याची पदे लवकरात लवकर भरण्यासाठी आम्ही प्रवृत्त केले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्रात आपल्याला पी.एचडी. जास्तीत जास्त कसे वाढविता येतील याकरिता महाराष्ट्र शासन विशेष प्रयत्न करीत आहे. यासाठी आपण संशोधन शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना देण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे. 3 हजार विद्यार्थ्यांना दरमहा साडेसहा हजार रुपये देण्याच्या दृष्टीने जवळजवळ 23 कोटी रुपयांचा विशेष प्रस्ताव तयार केला आहे. काही दिवसातच तो प्रस्ताव कॅबिनेटसमोर आणण्यात येईल जेणेकरुन आपल्याला महाराष्ट्रात जास्तीत जास्त पी.एचडी. वाढविता येतील आणि प्राचार्य पदासाठी जास्तीत जास्त उमेदवार मिळू शकतील.

सभापती महोदय, लिनच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी प्रश्न विचारला आणि त्यांनीच उत्तर दिले आहे. आपण लिनची मुदत प्रत्यक्षात दोन वर्षावरुन पाच वर्षे केलेली आहे. पाच वर्षाच्या पुढे लिन वाढविण्याबाबतचा निर्णय आता तरी घेतलेला नाही. भविष्यात

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी. पी. सावंत .....

काय करता येईल याचा विचार पुढे करता येईल. या शिवाय सन्माननीय सदस्यांनी जे इतर प्रश्न विचारलेले आहेत त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, प्राचार्यांची पदे भरण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे आणि वेळोवेळी आपण विद्यापीठांना आणि जॉइन्ट डायरेक्टर ऑफीसला सूचना दिलेल्या आहेत. ही निरंतर चालणारी प्रोसेस आहे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी प्राचार्याच्या जागा रिक्त आहेत त्या त्या ठिकाणी विशेष प्रयत्न करुन विद्यापीठाच्या मार्फत आणि डायरेक्टर ऑफीसच्या मार्फत ही पदे भरण्याचा शासन निश्चित प्रयत्न करील असे मी सांगू इच्छितो.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी अतिशय अभ्यासपूर्ण उत्तर दिलेले आहे. एक महत्वाचा प्रश्न राहिलेला आहे. जी कायम विनाअनुदानित महाविद्यालये आहेत त्या ठिकाणी फार अडचणी येतात हे आपल्यालाही माहीत आहे. आपल्याला पी.एचडी. करणारे लोक मिळतील. आपण सांगितले की, पी.एचडीसाठी प्रोत्साहन देतो आणि पी.एचडी करणाऱ्यांना सहा हजार रुपये विद्यावेतन देणार आहोत. हा एक अतिशय क्रांतिकारक निर्णय आपण घेऊ पाहात आहात. परंतु तो निर्णय सुध्दा लवकर होणे गरजेचे आहे. मला असे वाटते की, आमच्या मंत्रालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अभ्यास करुन हा निर्णय घेण्याचा विचार केला आणि तो चांगला निर्णय आहे. परंतु या संदर्भात जो निर्णय व्हावयास पाहिजे किंवा जो जी.आर.निर्गमित व्हावयास पाहिजे ते झालेले नाही. तो जी.आर. शासन किती दिवसात काढणार ? जी कायम विनाअनुदानित महाविद्यालये आहेत ते आज त्यांची प्राचार्याची पदे भरु शकत नाहीत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

त्यामुळे तेथे वरिष्ठ प्राध्यापक असतील त्यांना प्रभारी प्राचार्यपदी नेमण्यासाठी नियमामध्ये बदल केला जाईल काय ?

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी राज्यात 50 टक्के प्राचार्यांची पदे रिक्त असल्याची माहिती दिली आहे. शिक्षण क्षेत्रासाठी ही गोष्ट चांगली नाही. ही पदे भरण्यासाठी सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी काही अटी व शर्ती पूर्ण करणे आवश्यक असते असेही सांगितले. त्याचा विचार केला तर भविष्य काळात ही सर्व पदे भरण्यासाठी खूप मोठा कालावधी लागेल. आपल्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असताना काही दीर्घकालीन गोष्टींबद्दल जरुर बोलावे. परंतु शासनाने इमिजिएट गोष्टी करण्याची गरज आहे. प्राचार्यांची पदे रिक्त राहिल्यामुळे महाविद्यालयीन शिक्षणाच्या दर्जाची काय अवस्था होत असेल हे वेगळे सांगावयास नको.

दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, प्राचार्य पदासाठी प्राध्यापकांनी पी.एचडी.असणे आवश्यक आहे. काही प्राध्यापक ठराविक विषयाची निवड करुन व त्यावर संशोधन करुन पी.एचडी.मिळवितात. पी.एचडी.मिळविल्यानंतर व प्राचार्य पद मिळाल्यानंतर प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळण्याची ताकद वाढते काय ? मी केमिस्ट्री या विषयात पी.एचडी.करीत असेल तर त्या विषयात मी आणखी पुढे जाऊ शकेन. परंतु प्राचार्य पद मिळाल्यानंतर त्यांना प्रशासकीय कामाची जबाबदारी पाडावी लागते. त्याची विभागणी करणे शक्य आहे काय ?

आरोग्य विभागामध्ये सिव्हिल सर्जन पदाबाबत सुध्दा हाच प्रकार आहे. सिव्हिल सर्जन एखाद्या फॅकल्टीचे तज्ज्ञ असतात. परंतु त्या उच्च पदावर गेल्यानंतर त्यांना वेगळे काम करावे लागते. त्यांच्या क्षेत्रात ते खूप मोठे असतील. पण प्रशासन चालविताना, आर्थिक बाजू सांभाळताना त्यांच्यातील उणीव जाणवू लागते. प्राचार्यांवर जबाबदारी असते, त्यांना जी कामे पार पाडावी लागतात त्यासाठी आवश्यक असलेल्या पात्रतेत मूलगामी बदल करण्याचा विचार शासन करणार आहे काय ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मी सांगतो की, संशोधन शिष्यवृत्ती देण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल. वरिष्ठ प्राध्यापकांना प्रभारी प्राचार्यपदी नेमण्याबाबत यापूर्वीच शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार त्या महाविद्यालयातील वरिष्ठ,पी.एचडी.धारक व 15 वर्षे सेवेची पूर्ण झालेली असतील अशा प्राध्यापकांना प्रभारी प्राचार्यपदी नेमण्याची परवानगी दिलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी पी.एचडी.पदवी व प्राचार्य पद यांचा काही संबंध नाही असे म्हटले आहे. परंतु यु.जी.सी.च्या नियमामध्येच तशी तरतूद आहे. त्यात प्राचार्य हे पी.एचडी.धारक असावेत असे बंधन घातलेले आहे. त्यामुळे शासन वेगळा विचार करु शकेल असे वाटत नाही.

----

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :वाढीव/अतिरिक्त तुकड्यांना गेल्या 7-8 वर्षात शासनाने मान्यता न दिल्याबाबत

**मु. शी.** :वाढीव/अतिरिक्त तुकड्यांना गेल्या 7-8 वर्षात शासनाने मान्यता न दिल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 26385 ला दिनांक 19 मार्च, 2012 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.विक्रम काळे वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, वाढीव/अतिरिक्त तुकड्यांना गेल्या 7-8 वर्षात शासनाने मान्यता न दिल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 26385 ला दिनांक 19 मार्च, 2012 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, सन 2003 पासून राज्यातील कोणत्याही शाळेतील वाढीव तुकड्यांना शासनाने मंजुरी दिलेली नाही ही अतिशय खेदाची बाब आहे. शहरातील शाळांमध्ये सातत्याने बाहेरुन येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. परिणामी वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. एकेका वर्गात मेंढरे कोंबल्याप्रमाणे 100-100 मुले शिक्षण घेत आहेत. ते पाहून मला दुःख होते. मी प्रत्येक आठवड्यात 2-3 शाळांना भेट देत असतो. त्यावेळी ही चिंताजनक परिस्थिती मला दिसून आलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

काल सभागृहामध्ये काही प्रश्नांच्या संदर्भात चर्चा झाली त्यावेळी माननीय शालेय शिक्षण मंत्री महोदय श्री. राजेंद्र दर्डा यांनी तुकड्यांना मान्यता देतो असे सांगितले, नव्हे त्यांनी तशी घोषणाच केली. या संदर्भात मंत्रालयामध्ये चौकशी केली त्यावेळी तसे काही आदेश निर्गमित झाले नसल्याचे आम्हाला समजले.

डीएड महाविद्यालय, पॉलिटेक्निक महाविद्यालय, फार्मसी महाविद्यालय या महाविद्यालयामध्ये जेवढी इण्टेक कपॅसिटी असेल तेवढयाच विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. उदा. डीएड महाविद्यालयाची इण्टेक कपॅसिटी 50 असेल तर 51व्या विद्यार्थ्याला प्रवेश देता येत नाही आणि जरी महाविद्यालयाने किंवा व्यवस्थापनाने 51व्या विद्यार्थ्याला प्रवेश दिला तरी परीक्षा मंडळ त्या विद्यार्थ्याची परीक्षा घेत नाही. अशा पध्दतीने या महाविद्याल्यावर नियंत्रण ठेवण्यात आलेले आहे. तशी व्यवस्था शाळांच्या तुकड्यांच्या बाबतीत केली तर शासनाचा बराचसा निधी वाचू शकेल. आता तुकड्या काढण्यासाठी शासनाला जी.आर. काढावा लागतो. काही शाळेत कमी विद्यार्थी आहेत तर काही शाळेत भरमसाठ विद्यार्थी आहेत. तेव्हा इण्टेक कॅपॅसिटीप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे धोरण शासनाने स्वीकारले तर सर्व शाळांना विद्यार्थी मिळतील. आज परिस्थिती अशी आहे की, 25 विद्यार्थ्यांसाठी तेवढाच खर्च आणि 100 विद्यार्थ्यांसाठी देखील तेवढाच खर्च होत आहे. तेव्हा मोठी शहरे, जिल्ह्याची आणि तालुक्याची ठिकाणे येथील शाळातून विद्यार्थ्यांना इण्टेक कपॅसिटी प्रमाणे प्रवेश देण्याची व्यवस्था केली तर मला वाटते दरवर्षी तुकड्यांचा निर्माण होणारा प्रश्न यापुढे निर्माण होणार नाही आणि सर्व शाळांना विद्यार्थी मिळतील. तेव्हा या बाबतीत शासन धोरणात्मक निर्णय घेईल काय ?

सभापती महोदय, तुकड्यांच्या संदर्भात "कायम" शब्द काढण्यात आला त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. "कायम" शब्द काढलेल्या तुकड्यांचे काय होणार, त्यांना अनुदान देण्यात येणार आहे काय ? या तुकड्यांना अनुदान द्यावे लागेल. या तुकड्यांचे मूल्यांकन कसे करणार ? तुकड्यांचे मूल्यांकन करायचे झाले तर तो फार गुंतागुतीचा प्रश्न निर्माण होईल. अनुदानित शाळांमध्ये या तुकड्या असल्यामुळे त्यावर एखाद्-दुसरा शिक्षक काम करतो त्यामुळे त्या तुकडीचा मोठा आर्थिक भार पडणार नाही. या तुकड्यांना अनुदान देत असताना या तुकडयांची विद्यार्थी क्षमता गृहीत धरुन अनुदान सूत्राप्रमाणे अनुदान देण्याच्या बाबतीत शासन कार्यवाही करील काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक, यांच्याकडून आदिवासी क्षेत्रामध्ये 391 आणि बिगर आदिवासी क्षेत्रामध्ये 9200 अशा एकूण 9591 तुकड्यांच्या मंजुरीचा प्रस्ताव दिनांक 25.3.2011 रोजी शासनास सादर झाला होता. हा प्रस्ताव सादर होत असताना विशेष पट पडताळणी मोहीम हाती घेण्यात आली. विशेष पट पडताळणी मोहीम झाल्यानंतर एक विशिष्ट अशी परिस्थिती निर्माण झाली. अनेक ठिकाणी सरप्लस शिक्षक झाले. अन्य विविध प्रकारचे प्रश्न निर्माण झाले. सध्या नऊ हजारापेक्षा अधिक तुकड्या आहेत. त्या कशा ठेवायच्या याबाबतची तपासणी करुन प्रस्ताव सादर करावा असे शिक्षण संचालकांना दिनांक 3 जानेवारी 2012च्या पत्रान्वये कळविण्यात आले. दिनांक 12 जून 2012 रोजी प्रस्ताव शिक्षण संचालकांकडून शासनाकडे मान्यतेसाठी सादर झालेला आहे. त्या प्रस्तावाला मान्यता देण्याची बाब अंतिम टप्प्यात आहे. आदिवासी क्षेत्रातील 391 आणि बिगर आदिवासी क्षेत्रातील 9200 तुकड्यांची पट पडताळणीचा तुलनात्मक अभ्यास केला तर आदिवासी क्षेत्रामध्ये 255 आणि बिगर आदिवासी क्षेत्रामध्ये 5718 या प्रमाणे तुकड्या कमी झालेल्या आहेत. अशा एकूण 5973 तुकड्यांचा प्रस्ताव शिक्षण संचालकांकडून शासनाकडे आलेला आहे.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान..

सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी इन्टेक कॅपॅसिटीच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे. मला येथे सांगावयाचे आहे की, आता राईट टू एज्युकेशन ॲक्ट आल्यामुळे प्राथमिक शाळेसाठी प्युपिल टीचर रेशियो 30:1 असा निश्चित करण्यात आलेला आहे. त्यामुळे या रेशियोप्रमाणे देणे अनिवार्य राहणार आहे. शासनाने सुध्दा या प्रमाणे निर्णय घेण्यास सुरुवात केलेली आहे. जसे एलिमेन्टरी सायकलचा निर्णय घेणे आवश्यक आहे. हजारो शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या फार कमी आहे. त्या विद्यार्थ्यांची कशी सोय करता येईल याचा आम्ही विचार करीत आहोत. अशा शाळा एकत्रित करुन तेथे वाहतुकीची व्यवस्था करुन मार्ग काढता येईल काय याचा शासन स्तरावर विचार सुरु आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मूल्यांकना संदर्भात मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत सांगू इच्छिते की, नवीन तुकडीचे मूल्यांकन करणे गरजेचे आहे आणि 20:40:60 या प्रमाणे नवीन तुकड्या दिल्या जाणार आहेत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी आदिवासी तुकड्या 5 हजार 418 आणि बिगर आदिवासी तुकड्या 255 असल्याचे सांगितले. माझा प्रश्न आहे की, आपण या तुकड्यांना मंजुरी दिली आहे काय ?

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जाहीर केले होते की, या संदर्भातील आदेश 15 दिवसांत काढण्यात येतील. माझा प्रश्न आहे की, अधिवेशन संपण्यापूर्वी हे आदेश काढण्यात येतील काय ? राईट टू एज्युकेशन ॲक्ट प्रमाणे विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात शिक्षक देण्याचे मान्य केलेले आहे. आपण हा नियम फक्त स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत लागू केला. परंतु खाजगी शाळांनासुध्दा आरटीई लागू आहे. असे असताना खाजगी शाळांच्या संदर्भात तसा आदेश काढलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. अनेक ठिकाणी तुकड्यांमधील विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिक्षक अतिरिक्त होत आहेत. तुकड्या कमी झाल्या असे म्हटले जाते. तेव्हा खाजगी शाळांतील आठवीपर्यंतच्या वर्गासाठी रेशियोनुसार शिक्षक निश्चित करण्याबाबतचे आदेश तातडीने काढणार आहात काय ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..2..

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, राईट टू एज्युकेशन ॲक्ट आपल्याला बंधनकारक आहे. या ॲक्टमधील सर्व आदेश टप्प्या टप्प्याने काढण्यात येणार आहेत. या कायद्याची तीन वर्षात अंमलबजावणी करावयाची आहे. तेव्हा कायद्यानुसार ज्या काही गोष्टी अनिवार्य आहेत त्या बाबतचे आदेश काढण्यात येणार आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तुकड्यांचे आदेश काढण्यात आलेले नाहीत. मी या ठिकाणी सांगितले की, संचालकांकडून प्रस्ताव तपासून आलेला आहे. शासन स्तरावर मान्यतेची कार्यवाही सुरु आहे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :ग्रामीण भागातील शाळांमध्ये संगणकाची माहिती देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक नेमणे

**मु.शी.**: ग्रामीण भागातील शाळांमध्ये संगणकाची माहिती देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक नेमणे या विषयावरील तारां□त प्रश□ □मां□ 28764 ला दि□ां□ 16 एप्रिल 2012 रोजी शास□□ दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. विक्रम काळे, वि.प.स. यां□ उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्री.विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, "ग्रामीण भागातील शाळांमध्ये संगणकाची माहिती देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक नेमणे "या विषयावरील तारां□त प्रश□ □मां□ 28764 ला दि□ां□ 16 एप्रिल, 2012 रोजी शास□□ दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अ□ुमती□ □ि□म 92 अ□्ये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित □रीत आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी माझ्या अगोदरच्या अर्धा तास चर्चेला जे उत्तर दिले त्या बाबत मी असमाधान व्यक्त करतो. "आम्ही तुकड्यांना मंजुरी दिली" असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याचे वर्तमानपत्रात छापून आले आहे. आम्हाला लोकांचे रोज फोन येतात, या बाबतचा प्रस्ताव आलेला आहे असे सांगायचे की मंजुरी दिली असे सांगायचे, आम्ही त्यांना काय उत्तर द्यायचे ?

**तालिका सभापती (विनायक मेटे )** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण उपस्थित केलेल्या अर्धा-तास चर्चेवरील चर्चा पूर्ण झालेली आहे. मी पुढची अर्धा-तास चर्चा पुकारली आहे. आपण त्या सूचनेवर बोलावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आजचे युग हे तंत्रज्ञानाचे आहे. इंटरनेटचे युग आहे. एक काळ असा होता की, ज्याला लिहिता वाचता येते त्याला साक्षर समजले जात होते. परंतु आता ज्याला संगणक चालविता येतो त्याला साक्षर म्हटले जाते. म्हणून आपण संगणक शिकत आहोत.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

हे ज्ञान ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळावे, यासाठी ग्रामीण भागातील शाळांमध्ये संगणक देण्याचे ठरविले आहे. केंद्र शासनाने सर्व शाळांना संगणक देण्याची योजना सुरु केलेली आहे, राज्य शासनाने ती योजना सुरु केलेली नाही. राज्य शासनाने या संदर्भात काहीही केलेले नाही. राज्य शासनाने देखील ही योजना चांगल्या प्रकारे राबविली पाहिजे, ग्रामीण भागातील सर्व शाळांना संगणक उपलब्ध करुन दिले पाहिजेत.

केंद्र शासनाने प्रत्येक शाळेस 10 संगणक पुरविण्याची व्यवस्था केलेली आहे. केंद्र शासनाच्या माध्यमातून प्रत्येक शाळांना संगणक तर उपलब्ध करुन दिले जात आहेत, परंतु त्यासाठी अद्यावत प्रयोगशाळा देखील सुरु करण्यात येत आहेत. ही केंद्राची योजना ग्रामीण भागातील बऱ्याच शाळांपर्यंत पोहोचलेली नाही. महाराष्ट्रातील अनेक प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा या योजनेपासून वंचित राहिलेल्या आहेत. किती माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि प्राथमिक शाळांना संगणक द्यावयाचे राहिले आहेत व ज्या शाळांना संगणक उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत, त्यांना किती दिवसात संगणके उपलब्ध करुन देण्यात येतील ? या योजनेतून संगणक प्रयोगशाळा दिल्या आहेत. परंतु या शाळांमधील विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान कोणी द्यावयाचे हा खरा प्रश्न आहे. ग्रामीण भागातील शाळांमधील शिक्षकांना संगणकाचे ज्ञान नाही. विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान देण्यासाठी आय.टी.शिक्षक नेमावे लागतील. त्या बाबतची तरतूद राज्य शासनाने केलेली नाही. विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण देण्यासाठी आय.टी.शिक्षक नेमावेत असे शासनाने आदेश काढलेले नाहीत. आपण यंत्र उपलब्ध करुन दिले, परंतु यंत्र चालविण्यासाठी माणूस दिला नाही तर त्या यंत्राचा फारसा उपयोग होऊ शकत नाही.

आपण इयत्ता 11 वी 12 वी ला आय.टी. विषयाची मान्यता दिलेली आहे. ती मान्यता कायम विना अनुदान तत्वावर दिलेली आहे. आज संस्थांनी आय.टी.शिक्षक नेमले असतील, पण त्यांना संस्था पगार देऊ शकत नाही. त्यामुळे शिक्षक हे व्दिधा मनस्थितीत आहेत. या राज्याचे मुख्यमंत्री केंद्रात आय.टी.विभागाचे मंत्री होते. त्यांना या क्षेत्रातील माहिती जास्त आहे. इयत्ता 11 वी आणि इयत्ता 12 वी मध्ये आय.टी.विषय दिलेला आहे, तो अनुदानावर आणावयाचा आहे असा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांकडे घेऊन गेलात तर माननीय मुख्यमंत्री त्या प्रस्तावास तातडीने मंजुरी देतील

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

आणि हा महत्वाचा प्रश्न मार्गी लागेल. इयत्ता 11 वी आणि 12 मध्ये आय.टी.विषय दिलेला आहे, तो अनुदानावर आणणार आहात काय ? ज्या माध्यमिक शाळा संगणकापासून वंचित राहिल्या आहेत, त्यांची संख्या किती आहे, त्यांना किती दिवसात संगणक उपलब्ध करुन दिले जातील ? ज्या शाळांना संगणके दिली आहेत, त्या ठिकाणी अनुदान तत्वावर आय.टी.शिक्षक नेमण्याची परवानगी शासनाकडून देण्यात येईल काय, आय.टी.शिक्षक अनुदान तत्वावर नेमण्यासंबंधीचे आदेश कधीपर्यंत निर्गमित करण्यात येतील ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...



ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.अजित 11:40

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियान या योजने अंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रमात संगणक शिक्षण देण्यास सन 2003-2004 पासून सुरुवात केलेली आहे. 2011-2012 पर्यंत 5141 शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये प्रयोग शाळांची निर्मिती करण्यात आलेली आहे. मायक्रोसॉफ्ट आणि वेदांत फाउंडेशन यांच्या मार्फत शिक्षकांना संगणकाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. शिक्षकांना वर्ड, एक्सेल, पॉवर पॉईंट, नोट पॅड, इंटरनेट यासंबंधी प्रशिक्षण देण्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन आणि वेदांत फाऊंडेशन यांच्यामध्ये या बाबतीत सामंजस्य करार झालेला आहे. वेदांत फाऊंडेशनकडून मोफत प्रशिक्षण, पुस्तके, आज्ञावल्या इत्यादी साहित्यांचे वाटप करण्यात आलेले आहे. वेदांत फाऊंडेशन यांनी आजपर्यंत 1631 शाळांमध्ये 3053 शिक्षकांना प्रशिक्षण दिलेले आहे. टप्प्या टप्प्यात सदर प्रशिक्षण देण्यात येत आहे. पाठ्यपुस्तकावर आधारित शैक्षणिक बालचित्रवाणी तयार करुन देण्यात आलेली आहे. याच्या शिवाय आय.टी.सी.योजना वेगळी आहे.

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये बूट मॉडेल म्हणजे बिल्ड ओन ऑपरेटंट आणि ट्रान्सफर या पध्दतीचे मॉडेल राबविण्यात येत आहे. माध्यमिक शाळांमध्ये प्रयोगशाळेसाठी फक्त खोली उपलब्ध करुन द्यावयाची आहे. त्या प्रयोगशाळेत संगणक ऑपरेटर संगणक ऑपरेट करतील, ते संगणकामध्ये सर्व प्रोग्रॅम इन्स्टॉल करतील. ते शिक्षकांना ट्रेनिंग देतील आणि पाच वर्षानंतर हे सर्व संगणके शाळेच्या मालकीची होतील. अशा पध्दतीचे हे मॉडेल आहे. या संदर्भात टेंडर्स काढण्यात आलेले आहेत. राज्यामध्ये 2500 शाळा दुसऱ्या टप्प्यात घेण्यात येणार आहेत. 500 शाळा हया पहिल्या टप्प्यामध्ये घेण्यात आल्या आहेत.

यानंतर श्री. कानडे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान .......

ही संपूर्ण संकल्पना आहे पण यातून आणखी चर्चा करुन आपल्याला याबाबतचे नियोजन करावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितले की, या कामासाठी नवीन शिक्षकांची नियुक्ती करावी. पण मला तसे वाटत नाही, कारण सर्व शिक्षकांनीच अध्ययन पध्दतीमध्ये या बाबीचा अवलंब करणे आवश्यक आहे. याचे कारण म्हणजे प्रायव्हेट संस्थांमध्ये सर्वच शिक्षक अशा प्रकारे डिजीटल पध्दतीचा उपयोग शिकविण्यासाठी करीत असतात. एवढे बोलून मी माझे बोलणे पुरे करते.

**तालिका सभापती (श्री विनायक मेटे)** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक सकाळी 10 वाजून 51 मिनिटांनी दुपारी 12 वाजेपर्यंत स्थगित झाली )

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**म्हाडाच्या 56 वसाहतींचा पुनर्विकास प्रलंबित असल्याबाबत**

**(1) * 30093 श्री.विनोद तावडे , श्री.रामनाथ मोते , श्री.चंद्रकांत पाटील** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) म्हाडाच्या जीर्ण व मोडकळीस आलेल्या 56 वसाहतींच्या पुनर्विकासाबाबत शासनाने सन 2008 मध्ये सुधारित विकास नियंत्रण नियमावली जाहीर केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या नियमावलीत कलम 33 (5) मधील 2 सी (ii) हा पर्याय दिनांक 20 सप्टेंबर, 2010 च्या परिपत्रकान्वये रद्द करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या परिपत्रकामुळे प्रस्ताव येत नसल्याने तसेच म्हाडा इमारतींचा विकास गतीने होण्यासाठी सदर परिपत्रकाबाबत फेरविचार करुन म्हाडा इमारतींच्या पुनर्विकासाबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल असे आश्वासन मा.राज्यमंत्री, गृहनिर्माण यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, त्याअनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. सचिन अहिर,श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता** : (1) म्हाडाच्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासंदर्भात शासन अधिसूचना, नगर विकास विभाग, दिनांक 6.12.2008 अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(2) नाही.

(3) अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रस्तुत विषयी संबंधीतांशी चर्चा करण्यात येईल असे आश्वासन मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी दिले होते व त्या अनुषंगाने दिनांक 05.07.2012 रोजी बैठक संपन्न झाली.

(4) म्हाडा प्राधिकरण स्तरावरून कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, म्हाडाच्या जुन्या वसाहतींच्या पुनर्विकासाचा हा प्रश्न आहे. मागील अधिवेशनात नियम 93 अन्वये या सभागृहात चर्चा उपस्थित करण्यात आली होती. या चर्चेच्या अनुषंगाने शासनाच्या वतीने असे सांगण्यात आले होते की, "धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाच्या संदर्भात तातडीने बैठक घेण्यात येईल."

सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात असे म्हटले आहे की, "दि. 5 जुलै, 2012 रोजी यासंदर्भात एक बैठक आयोजित करण्यात आली होती." माझ्या माहिती प्रमाणे दि. 5 जुलै, 2012 रोजी यासंदर्भात जी बैठक आयोजित करण्यात आली होती ती रद्द करण्यात आली होती.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 30093** ......

श्री. रामनाथ मोते .....

सभापती महोदय, जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. काल विधानसभेत सुध्दा या प्रश्नावर चर्चा उपस्थित करण्यात आली होती. हा विषय गंभीर असल्यामुळे सभागृहाचे कामकाज काही वेळेसाठी बंद करण्यात आले होते. त्यामुळे 16जून, 2011 रोजीचे जे परिपत्रक शासनाने जारी केलेले आहे ते रद्द केले जाणार आहे काय ? हे पावसाळी अधिवेशन संपण्यापूर्वी जुन्या इमारतींच्या पुनर्विकाससंदर्भात शासन धोरणात्मक तोडगा काढणार आहे काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनीच या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या प्रश्नाच्या संदर्भात विधानसभेत सविस्तर चर्चा झाली होती. विधानसभेत चर्चा झाली याचा अर्थ विधान परिषदेत चर्चा होऊ नये असे नाही. विधानसभेत माननीय मुख्यमंत्र्यांनी या चर्चेचे गांभीर्य लक्षात घेऊन या महिन्याच्या अखेरपर्यंत एक बैठक बोलावण्यात येईल असे जाहीर केलेले आहे. यासंदर्भात मी एकच सूचना करु इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी जी बैठक आयोजित केलेली आहे त्या बैठकीला विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांनाही आमंत्रित करण्याची भूमिका राज्य सरकार घेईल व त्या बैठकीत सकारात्मक निर्णय घेणे अजून सोपे होईल असे मला वाटते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, दि. 5.7.2012 जी बैठक संपन्न झाली होती त्या बैठकीमध्ये कोणा कोणाला बोलावण्यात आले होते, कोण कोणते निर्णय झाले याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी अशी विनंती आहे.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, दि. 5.7.2012 रोजीच्या बैठकीत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना बोलावण्यात आले होते. मुंबई शहराची वाढती लोकसंख्या व त्यातून होणारे शहरीकरण व त्यामुळे घरांची निर्माण होणाऱ्या समस्येसाठी म्हाडाच्या ले आऊटवर प्रिमियम न आकारता टू सी-1, टू सी-2 प्रमाणे हाऊसिंग स्टॉक टू इज टू वन घेण्याची भूमिका घेतलेली आहे. पुढील काळात केवळ एफएसआय देऊन पैसे कमावणे अशा प्रकारचे धोरण म्हाडाचे असता कामा नये.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30093...

श्री.सचिन अहिर..

त्यामुळे सर्वसामान्य भाडेकरूंसाठी हाऊसिंग स्टॉक निर्माण करण्याचे काम केले आहे. यात उद्देश चांगला होता. याबाबत देखील काही तक्रारी आल्या आहेत की, उद्देश साध्य करीत असताना जे जुने प्रस्ताव आहेत ते व्हायेबल होणार नाहीत. त्यामुळे यात व्हायामीडिया काढता येईल काय, ही भूमिका आपण दिनांक 5.7.2012 रोजी ......

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा प्रश्न असा होता की, जी बैठक झाली त्या बैठकीला कोणकोण उपस्थित होते ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, या बैठकीला अप्पर सचिव, म्हाडाचे सीईओ, जॉईंट सीइओ व इतर संबंधित अधिकारी होते.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, म्हाडा आणि शासनामध्ये समन्वय आहे काय ? मी मागच्या अधिवेशनामध्ये प्रश्न विचारला होता. दिनांक 26 ऑगस्ट 2009 रोजी 33 (5) संबंधी शासन निर्णय झाला होता. उच्च उत्पन्न गटातील सदनिकांचे क्षेत्रफळ 80 चौरस मीटर आहे अशा सदनिका मध्यम उत्पन्न गटामध्ये येत असल्याने इमारतींच्या पुनर्विकासासाठी सुधारित विकास नियमावली 33(5) प्रमाणे निर्णय घेण्यात येईल. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी जे उत्तर दिले होते ते मी वाचून दाखवितो. एक महिन्यामध्ये निर्णय घेतो असे आपण सांगितले होते. आपण आमचे जवळचे मित्र असल्यामुळे मी हक्कभंग दाखल करीत नाही. सभागृहामध्ये उत्तरे दिल्यानंतर तीन तीन महिने काहीच कार्यवाही होत नाही. म्हाडा शासनापेक्षा मोठी आहे काय ? निर्णय शासन घेते की, म्हाडा घेते ? आज म्हाडामध्ये मोठा गोंधळ आहे. कमर्शियलसाठी 33 (5) चा निर्णय घेतला आहे. निवासी बांधकामासाठी दुसरा निर्णय घेतला आहे. आपल्याच निर्णयामध्ये कुठेही एकवाक्यता नाही. म्हाडामध्ये कोणी तरी एक माणूस असा आहे की, तो म्हणतो की, मी हे होऊच देणार नाही. सभागृहात मंत्री उत्तर देत आहेत. शासन निर्णय होत आहे. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. तरी देखील निर्णय होत नसेल तर आपण तातडीने निर्णय घेणार आहात काय ? आपण काही सोसायट्यांचे 14 कोटी

ता.प्र.क्र.30093...

श्री.सचिन अहिर..

रूपये सन 2009 मध्ये घेतले आहेत. त्या सोसायटयांची नावे माझ्याकडे आहेत. वाटल्यास ती मी वाचून दाखवितो. गोराई लक्ष्मी सहकारी सोयायटी, गोराई शिवशंकर सहकारी सोसायटी, गोराई शिवापार्वती सहकारी सोसायटी अशा प्रकारे सोसायटयांची नावे आहेत. आपण 14 कोटी रूपये घेतले आहेत. त्यासंबंधी निर्णय झालेला आहे. तेव्हा त्याबाबतची अंमलबजावणी उद्याच्या आठ दिवसांमध्ये शासन करणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या उत्तरामध्ये देखील हे स्पष्ट केले होते. आपण शासन म्हणून भूमिका घेतली होती. आपण LIG, MIG, HIG असे तीन संवर्ग निर्माण केले. LIG साठी पुनर्विकास योजना आखण्याची भूमिका आपण घेतली. यामध्ये देखील युक्तिवाद चालला होता की, LIG च्या इमारतींमध्ये जे उच्च उत्पन्नाचे लोक राहतात त्यांना देखील पुनर्विकासाचा फायदा द्यावा काय ? याबाबत म्हाडा आणि शासन यांच्यामध्ये चर्चा करण्याचा प्रयत्न केला होता. राज्य शासनाची स्पष्ट भूमिका आहे की, त्या काळामध्ये HIG मध्ये त्यांना छोटा एरिया दिला असेल आणि आज ते LIG आणि MIG मध्ये येत असतील तर अशा लोकांना देखील पुनर्विकासाचा फायदा मिळाला पाहिजे. यासंबंधीचा प्रस्ताव विधी व न्याय विभागामध्ये पाठविण्याचे काम आम्ही केले आहे. या प्रस्तावावर विधी व न्याय विभागाचे अभिप्राय आल्यानंतर तो प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांकडे एका आठवड्यामध्ये पाठविण्यात येईल. आम्ही निर्णय घेतल्यानंतर एक क्वेरी आल्यामुळे प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे पाठविला आहे. त्यामुळे आम्ही एक महिन्यामध्ये विधी व न्याय विभागाचा अभिप्राय घेऊ. तदनंतर माननीय मुख्यमंत्र्यांकडे हा प्रस्ताव आठवड्याभरामध्ये पाठविण्यात येईल.

यानंतर श्री.सरफरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30093....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, विधी व न्याय विभागाकडे हा प्रस्ताव केव्हा पाठविण्यात आला, सदर प्रस्तावाची छाननी करुन तो अमुक इतक्या कालावधीत परत पाठविण्याबाबत त्यांना मुदत दिली होती काय? म्हाडाच्या जुन्या इमारतींचा विकास रखडला असल्यामुळे हा प्रश्न अत्यंत महत्वाचा झाला आहे. अशा जुन्या झालेल्या धोकादायक इमारतींमध्ये आज अनेक रहिवाशी रहात आहेत. विधानसभेमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी एक महिन्यात या बाबत बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल असे सांगितले. या पावसाळयामध्ये 56 इमारतींना धोका उत्पन्न झालेला आहे. अशा परिस्थितीत आपण म्हाडाचे धोरण बदलून प्रिमियमऐवजी घराच्या स्वरुपामध्ये मोबदला देण्याचे ठरविले आहे. त्यामुळे पुर्नविकास करण्यासाठी विकासक आणि सोसायटया देखील पुढे येत नाहीत. याबाबत आपण हे अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेणार आहात काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, हा प्रस्ताव एक महिन्यापूर्वीच विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आला आहे. त्याची तारीख निश्चितपणे आपल्याला देता येईल. दुसरी गोष्ट अशी की, या संबंधीची भावना विधानसभेमध्ये मांडण्यात आल्यानंतर या सभागृहामध्ये सुध्दा मांडण्यात आली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे केवळ या एकाच विषयासाठी अधिवेशन काळात बैठक घेतली तर व्यापक स्वरुपात चर्चा होणार नाही, ती चर्चा घाई-घाईत होईल. परंतु त्यांनी सभागृहाला आश्वासन दिल्या प्रमाणे या महिन्याअखेर ही बैठक घ्ेतली जाईल.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देतांना "म्हाडाबरोबर शासन बोलणी करीत आहे" असे सांगितले आहे. शासनाबरोबर चर्चा करणारी म्हाडा कोण? आपण तसे बोलला आहात व ते सभागृहाच्या रेकॉर्डवर आहे. म्हाडाच्या अधिकाऱ्यांसमोर हे शासन हतबल झाले आहे काय? म्हाडा छातीवर हात ठेवून सांगत आहे काय, आम्ही शासनाबरोबर बोलणी करीत आहोत. त्यामुळे हे वाक्य सभागृहाच्या कामकाजातून वगळण्यात आले पाहिजे.

सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, म्हाडा म्हणजेच शासन आहे. त्यामध्ये जागा आणि पैसे देण्याचे काम शासनच करते. तर मग सिडको देखील असेच म्हणते की, आम्ही शासनाबरोबर बोलणी करीत आहोत हे कसे काय? हे शासन त्यांना पैसे आणि जमीन देते, केवळ शासनाच्या वतीने सिडको आणि म्हाडा या ठिकाणी काम करीत आहेत. अशाप्रकारचे रेकॉर्डवर आले पाहिजे. त्यादृष्टीने मंत्री महोदय आपल्या उत्तरामध्ये सुधारणा करणार आहेत काय?

18-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Z 2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30093....

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, म्हाडा असो किंवा सिडको असो ही यंत्रणा शासनापेक्षा मोठी नाही. राज्य सरकारने जमिनी दिल्या म्हणूनच म्हाडा निर्माण होऊ शकले. ते जर ऐकत नसतील तर शासनाचे ऐकण्यासाठी आम्ही त्यांना भाग पाडू. परंतु कोणताही निर्णय घेत असतांना म्हाडा ही देखील शासनाची एक बॉडी असल्यामुळे त्यांच्याबरोबर शासनाने चर्चा करणे अभिप्रेत आहे.....

(गोंधळ)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या उत्तराला आमचा आक्षेप आहे.

(गोंधळ)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी म्हाडा करणार आहे काय, या ठिकाणी शासन मोठे आहे की, म्हाडा मोठे आहे, म्हाडा शासनाच्या अंगावर का धावून जात आहे, शासन एवढे लाचार का होत आहे, शासन हतबल का होत आहे, शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी म्हाडा करणार आहे काय?

(गोंधळ)

**उप सभापती** : माननीय राज्यमंत्र्यांनी शांतपणे आणि सोप्या अशा भाषेमध्ये उत्तर द्यावे.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी स्पष्ट केले आहे की, एलआयजीच्या बाबतीत शासनामार्फत निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यास म्हाडाला भाग पाडले जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी दोन वेळा विचारल्यानंतर माननीय राज्यमंत्र्यांनी बैठक झाल्याचे सांगितले. परंतु माझ्या माहितीप्रमाणे संबंधित सीईओ आजारी पडल्यामुळे ती बैठक झालेली नाही. मी माहितीच्या अधिकाराखाली त्या बैठकीची सर्व माहिती मागवून घेणार आहे. त्यानुसार जर ती बैठक झाली नसेल तर मी आपल्याविरुध्द हक्कभंगाचे आयुध वापरावयाचे काय? त्यामुळे या पुढे या सभागृहात असे होता कामा नये. ज्यावेळी आम्ही सभागृहात एखादी गोष्ट मांडतो त्यावेळी आमच्याकडे त्याबाबतची माहिती असते.

दुसरा महत्वाचा प्रश्न असा की, या ठिकाणी प्रिमियम देऊन वाढीव चटईक्षेत्र द्यावयाचे आहे, परंतु आपण ते प्रिमियम देऊन देणार नाही अशी माननीय मुख्यमंत्र्यांची सुध्दा भूमिका आहे.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30093....

श्री. दिवाकर रावते....

म्हणून मला आपल्याला सूचना करावयाची आहे की, त्यांना प्रिमियम देऊन वाढीव एफ.एस.आय. देण्यात यावा. त्यांच्याकडून मोफत घरे घ्या आणि ती गिरणी कामगारांना द्या. अधिक एफ.एस.आय. दिल्यामुळे या मुंबई शहरामध्ये किमान 50 हजार घरे गिरणी कामगारांसाठी उपलब्ध होतील. ती घरे फुकट बांधून मिळतील व लोकांना मोफत देता येतील. त्याबाबत आपली भूमिका काय आहे?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी बैठकीचा उल्लेख केला आहे. त्यावेळी दोन बैठका लावण्याचे काम केले होते. त्यापैकी एक बैठक माझ्या विभागाच्या स्तरावर झ ाली होती. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या प्रश्नासंबंधी चर्चा केली होती म्हणून त्यांच्यासमवेत एक बैठक घेण्यात येणार होती. त्यावेळी माननीय उपाध्यक्षांची तब्येत बरी नसल्यामुळे ते त्या बैठकीला गैरहजर राहणार होते म्हणून ती बैठक रद्द करुन आमच्या विभागाची बैठक घेण्याचे काम केले. माननीय विरोधी पक्ष नेते उपस्थित रहाणार असलेली बैठक झाली नसल्यामुळे मी त्याबाबत उल्लेख केला नाही. या बाबत मी माननीय विरोधी पक्षनेत्यांशी चर्चा केली नाही असेही म्हटले नाही. फक्त अमुक विषयासंबंधी बैठक घेण्यात आली एवढेच मी सांगितले. माननीय सदस्यांनी दुसरा विषय उपस्थित केला त्या बाबत सांगू इच्छितो की, आपल्याला हाऊसिंग स्टॉक निर्माण करावयाचा आहे. अशाप्रकारे हाऊसिंग स्टॉकमधून परवडणारी घरे निर्माण करीत असतांना त्याचा लाभ सर्वसामान्य लोकांना देणार आहोत त्यामधील काही हिस्सा गिरणी कामगारांना देण्याबाबत आपल्याला धोरणात्मक निर्णय घेता येईल.

------

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ D/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:15

मुंबई शहरात 268 इमारती धोाकादायक असल्याने करावयाची उपाययोजना

(2) *30309 श्री.किरण पावसकर , श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे, श्रीमती उषाताई दराडे , श्री.विनायकराव मेटे , श्री.सतीश चव्हाण , श्री.विक्रम काळे , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.अनिल भोसले , श्री.दिपकराव साळुंखे , श्रीमती विद्या चव्हाण , श्री.अरुण गुजराथी : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईत 268 इमारती धोकादायक असल्याचे नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, पावसाळ्यात जिवीत व वित्त हानी होवू नये म्हणून तेथे राहणाऱ्या नागरीकांच्या वास्तव्याचा प्रश्न सोडविणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव**, **श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) बृहन्मुंबई महानगरपालिकेने विभाग निहाय केलेल्या सर्वेक्षणामध्ये मुंबई शहर व उपनगरात मिळून सुमारे 755 धोकादायक इमारती असल्याचे आढळून आले आहे.

(2) बृहन्मुंबई शहरातील धोकायदायक इमारतीपैकी बहुतांश इमारती खाजगी मालकीच्या असून, काही इमारती महानगरपालिकेच्या मालकीच्या किंवा शासकीय आहेत, तर काही खाजगी इमारती उपकरप्राप्त प्रवर्गात मोडतात. धोकादायक इमारत ज्यांच्या मालकीची असेल त्यांचेवर त्यामधील रहिवाश्यांच्या वास्तव्याची पर्यायी सोय करण्याची जबाबदारी असते.

महानगरपालिकेच्या धोकादायक इमारतींची दुरुस्ती व देखभाल करणे व अत्यंत धोकादायक स्थितीतील महानगरपालिका इमारतींमधील रहिवाशांना संक्रमण शिबिरात हलविणे तसेच ह्या इमारतींचा पुनर्विकास करावयाचा असेल तेव्हा अशा पुनर्वसनावेळी रहिवाशांची व्यवस्था संक्रमण शिबिरात करणे ही जबाबदारी महानगरपालिकेकडून पार पाडली जाते. उपकरप्राप्त धोकादायक इमारतींच्या दुरुस्ती देखभालीची कार्यवाही म्हाडातर्फे करण्यात येते.

पावसाळ्यात धोकादायक इमारतींमुळे जिवित व वित्त हानी होवून नये याकरिता मानवीय दृष्टीकोनातून महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये धोकादायक इमारतींमधील रहिवाशांची तात्पुरत्या स्वरुपाची व्यवस्था करण्यात येते.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबई शहरातील धोकादायक इमारतींच्या संबंधातील हा प्रश्न आहे. तसेच शासनाने पहिल्या उत्तरामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की,"बृहन्मुंबई महानगरपालिकेने विभाग निहाय केलेल्या सर्वेक्षणामध्ये मुंबई शहर व उपनगरात मिळून सुमारे 755 धोकादायक इमारती असल्याचे आढळून आले आहे." याठिकाणी उत्तरामध्ये लिहिल्याप्रमाणे काही इमारती महानगरपलिकेच्या असतील, काही इमारती म्हाडाच्या असतील किंवा काही खाजगी मालकीच्या असतील.त्यामध्ये धोकादायक इमारती किती आहेत आणि अति धोकादायक किती आहेत याचे सर्वेक्षण पावसाळा आल्यानंतर करण्यात येते. ज्या इमारती

==2==



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

धोकादायक आहेत किंवा अति धोकादायक आहेत, त्याबाबतीत मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, तेथील रहिवाशांचे असे म्हणणे आहे की. आमचा जीव गेला तरी चालेल पण या इमारतीमधून बाहेर पडलो तर आम्हाला संक्रमण शिबिरामध्ये पाठविले जाईल. त्या संक्रमण शिबिरा मधून मी पुढच्या 15-20 वर्षामध्ये परत त्याठिकाणी कधी येईन याची कल्पना नाही. त्यासाठी आपण काही ठोस कारवाई किंवा नियम केलेले आहेत काय? कारण यापूर्वी अति धोकादायक इमारती मधील लोक संक्रमण शिबिरामध्ये गेले आहेत, ते गेल्या 15-20 वर्षापासून तेथेच रहात आहेत. परंतु आता संक्रमण शिबिरातील घरांची देखील दुरुस्ती करण्याची वेळ आलेली आहे. पावसाळा आल्यानंतर जिवितहानी होऊ नये म्हणून आपण सर्वेक्षण करीत आहात. याबाबतीत शेवटच्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की,"पावसाळ्यात धोकादायक इमारतींमुळे जिवित व वित्त हानी होऊ नये याकरिता मानवीय दृष्टीकोनातून महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये धोकादायक इमारतीं मधील रहिवाशांची तात्पुरत्या स्वरुपाची व्यवस्था करण्यात येते." माझा शासनाला एवढाच प्रश्न आहे की, ज्या रहिवाशांना तात्पुरत्या स्वरुपामध्ये शाळेत ठेवणार आहात, त्यांना किती काळासाठी तेथे ठेवण्यात येणार नाही. तसेच या रहिवाशांना शाळेमधून काढल्यानंतर कुठे ठेवणार आहात ?

**उप सभापती** : तेथील रहिवाशांच्या मुलांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत ठेवणार असतील.

श्री.किरण पावसकर : ज्या ठिकाणी शाळा आहेत तेथे काय करणार आहात. याठिकाणी शासन मुंबई शहर व उपनगरात मिळून सुमारे 755 इमारती धोकादायक आहेत असे उत्तरामध्ये सांगत आहात. अशा प्रकारे 755 धोकादायक व अति धोकादायक इमारतीतील रहिवाशांना जागा देण्यासाठी आपण किती संक्रमण शिबिरांची व्यवस्था केलेली आहे. त्यासाठी म्हाडा, खाजगी विकासक आणि महानगरपालिका यांच्याकडे बोट दाखवून चालणार नाही. कारण उत्तरामध्ये म्हटले आहे की, "मानवीय दृष्टीकोनातून महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये धोकादायक इमारतींमधील रहिवाशांची तात्पुरत्या स्वरुपाची व्यवस्था करण्यात येते." माझा असा प्रश्न आहे की, या बाबतीत मानवी दृष्टीकोन काय आहे? त्यासाठी कोणती व्यवस्था केलेली आहे? तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, एकंदर संक्रमण शिबिरे किती आहेत आणि तेथे बेकायदेशीरपणे जे लोक रहात आहेत, त्यांना बाहेर काढण्यासाठी कोणती व्यवस्था केलेली आहे? तसेच जे कायदेशीरपणे रहात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30309 . . . .

श्री.किरण पावसकर . . . .

आहेत, त्यांना किती कालावधीसाठी संक्रमण शिबिरामध्ये ठेवणार आहात याबाबतीत शासनाची भूमिका काय आहे ?

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30309......

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, साधारणपणे पावसाळ्यापूर्वी मुंबई शहरामधील धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींचे सर्वेक्षण एका टीममार्फत केले जाते आणि त्या सर्वेक्षणामध्ये किती इमारती धोकादायक निदर्शनास आल्या असा पहिला प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. सन्माननीय सदस्यांनी प्रश्नामध्ये 268 इमारतींचा उल्लेख केला आहे पण आम्ही उत्तरामध्ये 755 इमारती धोकादायक आहेत असे उत्तर दिलेले आहे. या इमारतींचे जे प्रकार आहेत त्यामध्ये महानगरपालिकेच्या इमारती असतील, उपकरप्राप्त इमारती असतील, खाजगी इमारती असतील, शासकीय इमारती असतील, अशा प्रकारच्या एकूण 755 इमारती वेगवेगळ्या वॉर्डामध्ये आहेत. सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे त्यामध्ये अतिधोकादायक इमारती 14 आहेत. या 14 इमारतींपैकी 6 इमारती पूर्णपणे डिमॉलिश केलेल्या आहेत आणि 8 इमारतीतील लोकांना बाहेर काढलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा विचारला की, अशा पध्दतीने मुलांना किंवा तेथील नागरिकांना किंवा रहिवाशांना जेव्हा शाळेमध्ये ठेवण्यात येते तेव्हा किती कालावधीकरिता ठेवण्यात येते ? त्यांना शाळेमध्ये कायमस्वरुपी ठेवण्याचे धोरण किंवा जबाबदारी महानगरपालिकेची नाही. अचानकपणे जर अशी एखादी दुर्घटना घडली, पावसाळ्यामध्ये एखादी इमारत कोसळली किंवा एखादी इमारत धोकादायक असल्याचे तत्काळ लक्षात आले तर त्या लोकांची तात्पुरती सोय करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. एखादी शासकीय इमारत असेल किंवा शाळा असेल त्या ठिकाणी तो पावसाळा जाईपर्यंत त्यांची तात्पुरत्या स्वरुपाची व्यवस्था महानगरपालिका करते. त्यामुळे ते रहिवाशी त्या ठिकाणी किती कालावधीकरिता राहतात हा प्रश्न उपस्थित होत नाही. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न असा विचारला की, जी कायमस्वरुपी संक्रमण शिबिरे आहेत त्या ठिकाणी कायदेशीरपणे किंवा नियमानुसार जे लोक राहू शकतात असे किती लोक आहेत आणि नियमबाह्य राहणारे लोक किती आहेत ? याकरिता सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारावा.


असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



...2...

ता. प्र. क्र. 30309......

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरामध्ये 755 इमारती धोकादायक आहेत असे म्हटले आहे. यामधील जी वर्गवारी आहे ती माननीय मंत्री महोदयांनी स्पष्ट करावी. दुसरा प्रश्न असा आहे की, संपूर्ण मुंबई शहरामध्ये महानगरपालिकेच्या किती इमारती आहेत ? या इमारती सेस नसलेल्या आहेत. महानगरपालिकेने स्वत: या इमारतींच्या पुनर्बांधणीचा कोणता कार्यक्रम घेतलेला आहे ? जर महानगरपालिकेचे असे कोणतेही धोरण नसेल तर या इमारतींसंबंधी महानगरपालिका काय करणार आहे, हे माननीय मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे. जर या महानगरपालिकेच्या इमारती असतील आणि त्या धोकादायक असतील तर त्या इमारतींमधील रहिवाशांसाठी, जसे उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांसाठी म्हाडातर्फे संक्रमण शिबिराची व्यवस्था करण्यात येते त्या पध्दतीने महानगरपालिकेच्या इमारतींमधील रहिवाशांसाठी महानगरपालिकेने किती संक्रमण शिबिरे बांधलेली आहेत ? या 755 इमारतींमध्ये एकूण घरकुलांची संख्या किती आहे ? यातील ज्या इमारती तातडीने पडतील त्यासाठी म्हाडाने काही वेगळ्या संक्रमण शिबिरांची किंवा काही गाळ्यांची व्यवस्था केली आहे का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारला त्या बाबतीत सांगू इच्छितो की, यामध्ये महानगरपालिकेच्या 77 इमारती आहेत. उपकरप्राप्त इमारती 82 आहेत. खाजगी इमारती 566 आहेत आणि शासकीय इमारती 30 आहेत. अशा प्रकारे एकूण 755 इमारती आहेत. उपकरप्राप्त इमारतींकरिता जशी संक्रमण शिबिरे बांधलेली आहेत तशी संक्रमण शिबिरे महानगरपालिकेने बांधलेली आहेत का असा दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. साधारणपणे अशा ज्या धोकादायक इमारती असतात तेथील भाडेकरुंना आणि संबंधित इमारत मालकाला कलम 354 (ब) अन्वये महानगरपालिका नोटीस देते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30309.... श्री.भास्कर जाधव....

महानगरपालिकेच्या संक्रमण शिबिरांची आकडेवारी सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. पण माझ्या माहितीप्रमाणे महानगरपालिकेची संक्रमण शिबिरे नाहीत. एस.आर.ए.योजना किंवा पुनर्विकासाच्या योजना नियम 33/7, 33/9, 33/10, 33/11 अन्वये केल्या जातात. त्यावेळी जो कोणी डेव्हलपर असेल त्याने त्या प्रकल्पासाठी जेवढा कालावधी लागेल तेवढ्या कालावधीसाठी भाड्यासहित भाडेकरुंची सोय करावी अशी तरतूद आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, महानगरपालिकेच्या काही इमारती धोकादायक आहेत. डेव्हलपमेंटचा भाग वेगळा आहे. भाडेकरुंना संक्रमण शिबिरे उपलब्ध होत नाहीत. अशा वेळी त्यांनी रस्त्यावर जाऊन रहावयाचे काय ? ही तरतूद उपकरप्राप्त इमारतींसाठी केली असेल तर महानगरपालिकेच्या इमारती उपक्रप्राप्त कराव्यात आणि म्हाडाच्या ताब्यात द्याव्यात. त्यामुळे भाडेकरुंना संक्रमण शिबिरे उपलब्ध होतील आणि त्यांना रस्त्यावर येण्याची वेळ येणार नाही. याचा शासनाने काही विचार करणार आहे की नाही ?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी अत्यंत मूलभूत प्रश्न विचारलेला आहे. महानगरपालिकेच्या इमारतीतील रहिवाशांसमोर असा प्रश्न उद्‌भवतो त्यावेळी त्यांची सोय केली जाते. ज्यावेळी एखाद्या ठिकाणी एस.आर.ए.योजना राबविली जाते किंवा पुनर्विकासाची योजना राबविली जाते त्यावेळी महानगरपालिकेने सुध्दा स्वत: गाळे बांधलेले असतात. सन्माननीय सदस्यांच्या सूचनेची दखल घेण्यात येईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, 2008 मध्ये उपनगर शहरासाठी अफझलपूरकर समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने शासनाला अहवाल सादर केला होता हे खरे आहे काय, उपनगरामध्ये अशा 4-5 हजार इमारती असून त्यांच्यासंबंधी शासनाने कोणती भूमिका घेतलेली आहे ?

श्री.भास्कर जाधव : उपनगरातील इमारती व शहरातील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करताना नेमके कोणते धोरण अवलंबवावे यासाठी अफझलपूरकर समिती नेमली होती.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30309....

श्री.प्रकाश बिनसाळे : अफझलपूरकर समिती ही शहरातील इमारतींसाठी नाही तर उपनगरातील इमारतींसाठी नेमली होती.

श्री.भास्कर जाधव : मी उपनगराचाच उल्लेख केलेला आहे. उपनगरातील इमारतींसाठी एक समिती नेमली होती. त्या समितीने शासनाला गाईड लाईन्स दिल्या होत्या. त्या गाईड लाईन्ससंबंधी शासन वेगवेगळ्या पातळीवर विचार करीत आहे.

--------

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3....

**पेण (जि. रायगड) येथील बाळगंगा प्रकल्पाबाबत**

**(3) * 30216 श्री.जयंत प्र.पाटील , श्री.चरणसिंग सप्रा** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पेण (जि. रायगड) तालुक्यातील बाळगंगा नदी प्रकल्प हा पाणी पुरवठा करणारा प्रकल्प सिडकोने मालकीचा असून सिडकोच्या या प्रकल्पास सन 2009 मध्ये प्रशासकीय मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, धरणाची मूळ अंदाजपत्रकीय रक्कम किती आहे व या प्रकल्पास सिडकोने आत्तापर्यंत किती आर्थिक निधी उपलब्ध करुन दिला आहे,

(3) कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांच्या अधिपत्याखालील सदर काम सुरु असून या कामाच्या मूळ अंदाजपत्रकात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, अंदाजपत्रकात किती रकमेची वाढ झाली व रकमेत वाढ होण्याची कारणे कोणती आहेत,

(5) असल्यास, वाढीव खर्चाच्या अनुषंगाने सिडकोने त्रिसदस्यीय समिती नियुक्ती केली आहे काय, असल्यास, समितीची नियुक्ती केंव्हा झाली व यामधील सदस्य कोण आहेत,

(6) असल्यास, वाढीव खर्चाच्या अनुषंगाने समितीने निर्णय घेतला आहे काय, असल्यास निर्णयाचे स्वरुप काय आहे?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) होय.

(2) मंजूर निविदेनुसार धरण बांधकामाची किंमत रु.495.45 कोटी इतकी आहे व या प्रकल्पात सिडकोने आत्तापर्यंत धरण बांधकामासाठी रु.469.41 कोटी व भूसंपादन, पुनर्वसन इत्यादीबाबीसाठी रु.43.88 कोटी असा एकूण रु.513.29 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

(3) होय.

(4) मंजूर निविदेनुसार धरण बांधकामाची किंमत रु.495.45 कोटी होती. कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने त्यांच्या दि.23.2.2011, दि.10.6.2011 व दि.11.6.2012 रोजीच्या पत्रान्वये धरण बांधकामाची सुधारित किंमत कळविली असून दि.11.6.2012 च्या पत्रान्वये ती रु.1070.63 कोटी इतकी कळविली आहे. त्याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आली आहेत :- (1) संधानकाच्या कामामध्ये बॅचिंग प्लान्टचा वापर (2) मुख्य सांडव्याच्या द्वारसंख्येमध्ये (4) नग वरून 6 नग वर) झालेली वाढ (3) धरणाचे खोदकाम सुरु असताना भूस्तरामध्ये बऱ्याच ठिकाणी उताराची जमीन आढळून आली त्यामुळे Stripping च्या एकंदरीत खोलीमध्ये झालेली वाढ, इत्यादीच्या परिमाणामध्ये व दरामध्ये झालेली वाढ,

(5) होय,

सिडकोने दि.11.5.2011 रोजी त्रिसदस्यीय समिती गठीत केली आहे. सदर समितीतील सदस्य खालीलप्रमाणे आहेत. (1) श्री.एस.आर.तांबे, निवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,(2) श्री.आर.जी.कुलकर्णी, निवृत्त सचिव, पाटबंधारे विभाग व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(3) श्री.एस.जी.पिंगळे, निवृत्त मुख्य अभियंता व महाव्यवस्थापक (तांत्रिक), सिडको.
(6) वाढीव खर्चाच्या अनुषंगाने त्रिसदस्यीय समितीने आपला अंतिम अहवाल सादर केला आहे व सदर अहवाल सिडको संचालक मंडळापुढे ठेवण्यात आलेला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी सिंचन विभागाला हा प्रश्न विचारला होता. परंतु जाणूनबुजून हा प्रश्न नगरविकास विभागाकडे वळविण्यात आला आहे. माननीय नगरविकास राज्यमंत्री सिंचनाशी संबंधित असलेल्या प्रश्नांना उत्तर देणार आहेत काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजाची प्रथा अशी आहे की, सन्माननीय सदस्यांना जर छापील उत्तर मान्य नसेल तर त्यांनी मंत्री महोदयांना छापील उत्तरात सुधारणा करावयाची आहे का असे सुरुवातीलाच विचारले पाहिजे. परंतु त्यांनी तसे विचारले नसल्यामुळे त्यांनी माझ्या संबंधी जो प्रश्न विचारला आहे तो अबाधित राहत नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहात चुकीचे रेकॉर्डवर येत आहे. सन्माननीय सदस्य या सदनाचे सदस्य आहेत. त्यामुळे ते तसा प्रश्न विचारु शकतात.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांचा प्रश्न अबाधित राहत नाही असे म्हटलेले आहे. त्याचे कारण असे की, ते माझ्या क्षमतेबद्दलच संशय व्यक्त करु शकत नाहीत. (अडथळा)

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30216....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सकाळच्या विशेष सत्रामध्ये अर्धा-तास चर्चेच्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही 50 वर्षाचे नियोजन करु. ते नियोजन सुरु आहे असेही त्यांनी सांगितले. हेटवणे, बाळगंगा ही धरणे सिंचनासाठी बांधण्यात आलेली आहेत. आपण जेव्हा दुसरी मुंबई, तिसरी मुंबई, चौथी मुंबई अशी शहरे विकसित करतो किंवा पुण्यासारख्या झपाट्याने वाढणा-या शहरांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी पाणी साठ्याच्या नव्या जागांची पाहणी नगरविकास विभागाने केलेली आहे काय ? सिंचनासाठी राखून ठेवलेले पाणी नागरीवस्तीसाठी पळविले जाणार नाही यादृष्टीने नगर विकास विभागाने नियोजन केलेले आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : एखादे शहर वसते किंवा एखादी वस्ती आपोआप वसते त्यावेळी त्या शहरी भागामध्ये किंवा नागरी वस्तीमध्ये रस्ते, पाणी, दिवाबत्ती, आरोग्य इत्यादी प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांची असते आणि शासन या संस्थाचे प्रमुख असल्यामुळे शासनाची देखील ती जबाबदारी असते.शासनाची पाणी देण्याची जबाबदारी आहे काय असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. त्या प्रश्नाचे उत्तर "होय" असे आहे. सन्माननीय सदस्यांनी दुस-या प्रश्नामध्ये शेतीचे पाणी पळविले जाते असे सांगितले. जेव्हा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होतो त्यावेळी पहिल्यांदा पिण्यासाठी, नंतर शेतीसाठी आणि त्यानंतर उद्योगासाठी या प्राधान्यक्रमाने पाणी दिले जाते.

श्री. राजन तेली : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे या प्रश्नाचे उत्तर जलसंपदा विभागाने द्यावयास पाहिजे होते. सिडकोने दिनांक 11.5.2011 रोजी त्रिसदस्यीय समिती नेमली होती. सदर समितीचा अहवाल प्राप्त झालेला आहे काय, असल्यास अहवालामध्ये काय नमूद करण्यात आलेले आहे ?

श्री. भास्कर जाधव : मूळ टेंडरची किंमत आणि नंतर वाढलेली किंमत अशा प्रकारचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडून नगरविकास विभागाकडे आला. या धरणासाठी सिडको मार्फत निधी पुरविण्यात येणार असल्यामुळे किंमतीमध्ये कशामुळे फरक पडला हे पहाण्याचे सिडकोचे काम आहे. हा फरक शोधण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली होती. या समितीने आपल्या फायडिंग्ज दिलेल्या असून त्या छापील उत्तरामध्ये स्पष्टपणे नमूद केलेल्या आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30216....

श्री. जयंत प्र. पाटील : माझा पहिला प्रश्न माननीय मंत्री महोदयांना नीटसा समजलेला नाही असे दिसते. महाराष्ट्रामध्ये झपाट्याने नागरीकरण होत आहे. सिंचन क्षमता वाढविण्यासाठी धरणे केली जातात. त्याप्रमाणे नव्याने होणा-या नागरीकरणासाठी पाणी उपलब्ध व्हावे याकरिता धरणे राखून ठेवण्याचे धोरण शासन अवलंबिणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव :नव्या मुंबईसाठी सिडकोने जलसंपदा विभागाकडून मोरबे धरण घेतले. मुंबई महानगरपालिकेने देखील मुंबई शहरासाठी पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून मध्यवैतरणा, काळू ही धरणे घेतलेली आहेत. आता पुणे महानगरपालिकेमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झालेली आहे.

...नंतर श्री. अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30216....

श्री.भास्कर जाधव....

पुणे शहराला वेगवेगळ्या चार धरणांतून पाणी पुरविण्यात येत आहे. तरी सुध्दा त्या ठिकाणी वाढलेली लोकसंख्या विचारात घेता तेथे नवीन पाण्याचा स्त्रोत निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सुध्दा कमी पाणी आहे. तेव्हा भविष्यात प्रत्येक नगरपालिका आणि महानगरपालिकेने स्वत:चा पाण्याचा सोर्स निर्माण करावा अशा धोरणात्मक निर्णयाप्रत शासन येत आहे.

--------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील विविध शहरांत परवडणाऱ्या घरांसाठी भागीदारी तत्वावर**

**पुनर्विकास प्रकल्प राबविण्याच्या निर्णयाबाबत**

**(4) * 30670 श्री.रामदास कदम , श्री.दिवाकर रावते , श्री.प्रकाश बिनसाळे , डॉ.नीलम गोऱ्हे** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई, पुण्यासह राज्यातील विविध शहरांत परवडणाऱ्या घरांसाठी असलेली मोठी मागणी आणि त्यासाठी असलेला तुटपुंजा पुरवठा यावर तोडगा काढण्यासाठी शासनाने जमीन मालक आणि खाजगी बांधकाम व्यावसायिक/विकासकांसोबत भागीदारी तत्वावर (जॉईंट व्हेंचर) अनेक पुनर्विकास प्रकल्प म्हाडाची मदत घेऊन राबविण्याचा निर्णय दिनांक 9 मे, 2012 रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या निर्णयाचे स्वरूप काय आहे व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सचिन अहिर, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) व (2) अशा प्रकारचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय,मुंबई-पुण्यातील घरांचा प्रश्न सोडविण्यासाठी जमीन मालक आणि खाजगी बांधकाम व्यावसायिक/विकासकांसोबत भागीदारी तत्वावर पुनर्विकास प्रकल्प म्हाडाची मदत घेऊन राबविण्याचा प्रस्ताव आहे काय, या प्रश्नाचे लेखी उत्तर "अशा प्रकारचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे" असे दिलेले आहे. खरे म्हणजे राज्यातील जनतेला कमी दरात चांगल्या दर्जाची घरे उपलब्ध करुन देण्यासाठी म्हाडाची निर्मिती झालेली आहे. असे असताना म्हाडाला खाजगी विकासकांबरोबर भागीदारी तत्वावर पुनर्विकास करण्याची आवश्यकता का वाटली ? तत्कालीन माननीय मुख्यमंत्री महोदयांनी 50 एकरचे 62 प्लॉटस् आमदार आणि अधिकाऱ्यांच्या घशात टाकले. हे सर्व प्लॉटस कोट्यावधी रुपयांचे आहेत. तेव्हा आमदार आणि अधिकाऱ्यांच्या घशात घातलेले प्लॉटस् परत घेऊन त्या जागेवर म्हाडा गरिबांसाठी चांगल्या आणि कमी किंमतीमध्ये घरे बांधणार काय ?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30670...

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मुंबई शहर आणि लगतच्या एमएमआर रीजनमध्ये शासकीय जमिनी उपलब्ध नाहीत. ज्या ठिकाणी खाजगी जमिनी उपलब्ध असतील त्या ठिकाणी खाजगी जमीन मालकांबरोबर भागीदारी तत्वावर पुनर्विकास करण्याचे धोरण प्रलंबित आहे. या ठिकाणी खाजगी विकासक असा शब्द वापरणे अयोग्य ठरेल. या संदर्भात 37(1)(ए) प्रमाणे हरकती आणि सूचना मागविण्याचे काम पूर्ण झालेले आहे. तेव्हा 37 (2) ची कारवाई लवकरात लवकर करणे अभिप्रेत आहे.

सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला आहे त्या बाबत सांगू इच्छितो की, ते भूखंड आरक्षणाच्या माध्यमातून राखून ठेवण्यात आले होते. ते भूखंड शाळा, मेडिकल कॉलेज, रुग्णालय, रिक्रीएशन ग्राऊंडस, मार्केट अशा वेगवेगळ्या कारणांसाठी राखीव आहेत. आपणास त्या भूखंडावरील आरक्षण बदलता येत नाही. सदरहू भूखंड नियम 16 अन्वये वितरीत करण्यात आले आहेत. तेव्हा या प्रश्नाचा मूळ प्रश्नाशी काही संबंध नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, एमएमआर रीजनमध्ये जमिनीची कमतरता आहे. नागपूरमध्ये एम्प्रेस मिल आहे. त्या मिलच्या जागेच्या संदर्भात टेंडर काढण्यात आले होते. त्या टेंडरनुसार म्हाडाने ती एम्प्रेस मिल विकत घेतली. अशा पध्दतीने आपण खाजगी जमीन मालकांकडून जमिनी विकत घेणार आहोत काय ? खाजगी जमीन मालकाने त्याच्या जमिनीचा भाव सांगावा. आज बिल्डर पाचशे, हजार, दोन हजार इतके प्रॉफीट मार्जिन ठेवतात. तेव्हा मी वर नमूद केल्याप्रमाणे जमिनी विकत घेऊन त्या जमिनीवर कमी प्रॉफीट मार्जीन ठेवून कमी किंमतीमध्ये जास्तीत जास्त घरे उपलब्ध करुन, खाजगी बिल्डर्सना स्पर्धेमध्ये उतरवून म्हाडा घरांच्या किंमती स्थिर ठेवण्यासाठी काही पावले उचलणार आहे काय ?

यानंतर श्री.गिते..

अस्सुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.30670....

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, होय. शासनाने अशा प्रकारची भूमिका स्वीकारलेली आहे. ही भूमिका 20-25 वर्षापूर्वी स्वीकारली असती तर आपल्याला लॅन्ड स्टॉक मोठया प्रमाणात निर्माण झाला असता. आता शासनाने प्रायोगिक तत्वावर औरंगाबाद, पुणे जिल्हयातील इंडस्ट्रीयल झ ाोन असलेले चाकण या ठिकाणी अशा प्रोसेसमध्ये जाण्याचे काम केलेले आहे. अशा प्रकारचे धोरण निश्चितपणे म्हाडाच्या माध्यमातून राबविण्यात येईल. सरकार म्हणून या बाबतीत अजून एक पाऊल पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहोत की, ज्या ठिकाणी अशा जमिनी घेतल्या जातील, त्या जमिनी घेतल्या जात असताना म्हाडाकडून आपला दर लावला जातो. त्या दराला सबसिडाईज करता येईल काय किंवा प्राईजींग पॉलिसीवर सबसिडाईज करता येईल काय तसेच शासनाच्या स्तरावर अशा प्रकारच्या म्हाडाच्या योजनांना काही अनुदान सरकार म्हणून देता येईल काय असाही प्रस्ताव विचाराधीन आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी जे उत्तर दिले आहे त्यात विसंगती दिसून येते. म्हाडाचे 62 भूखंड दवाखाना, गार्डन, शाळा, क्रीडांगण यासाठी आरक्षित होते. या भूखंडावरील आरक्षण न उठविता ते भूखंड माननीय मंत्र्यांच्या संस्थांना का दिले, सदरच्या भूखंडावरील आरक्षण काढून ते भूखंड सामाजिक संस्था यांना का देण्यात आले नाहीत, सदरचे म्हाडाचे भूखंड माननीय मंत्र्यांच्या संस्थांना कोणत्या नियमाच्या आधारे दिले, सदरचे 62 भूखंड वितरित करण्यात आले आहेत, त्यातील किती भूखंडाचे आरक्षण बदलण्यात आले आहे, प्रत्यक्षात किती भूखंडांवर बांधकाम करण्यात आलेले आहे?

श्री.सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे तो प्रश्न या प्रश्नाशी संबंधित नाही. सन्माननीय सदस्यांनी अतिरिक्त माहिती या ठिकाणी विचारली आहे. मी या संदर्भात अगोदरच स्पष्ट केलेले आहे की, ज्या संस्थांना भूखंड दिलेले आहेत, शासनाच्या अधिकारातील 16 अन्वये खाली मंत्रिमंडळाची उप समिती नेमलेली आहे, त्या उप समितीच्या बैठकीमध्ये निर्णय घेऊन नंतरच सदरचे भूखंड देण्याचे काम झालेले आहे.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, विदर्भामध्ये म्हाडाने अनेक खाजगी जमिनीवर म्हाडाचे आरक्षण ठेवून 1894 च्या भूसंपादन कायद्याखाली कोणतीही जागा संपादित केली नाही. म्हाडाने वाटघाटी व दादागिरी करुन 50 एकर खाजगी जमिनीवर आरक्षण ठेवले आहे. त्यातील

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30670... श्री.गोपीकिशन बाजोरिया....

70 टक्के जमीन आरक्षण काढून मोफत दिली आणि 30 टक्के जागा कोणत्याही प्रकारचा मोबदला न देता खाजगी जमीन मालकांकडून घेतलेली आहे. त्यावर म्हाडाने घरांची योजना राबविलेली आहे. म्हाडा ती घरे ग्राहकांना जास्त दराने विक्री करीत आहे. म्हाडाने दादागिरीने मोफत खाजगी मालकांकडून घेतलेली जमिनीवर घरे बांधलेली आहेत. तेथील घरे लोकांना स्वस्त भावात देणार काय ?

श्री.सचिन अहिर : नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : कोणकोणत्या मंत्र्यांच्या संस्थांना सदरचे भूखंड दिले गेले आहेत याबाबतची आपणाकडे लागलीच माहिती नसेल. ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मुळात हा प्रश्न हा विचारलेल्या प्रश्नाशी संबंधित नाही. माननीय मंत्री असा शब्द येथे वापरणे अयोग्य होईल. ज्या ज्या संस्थांना भूखंड दिले गेले आहेत त्या बाबतची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

---------

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औरंगाबाद शहरातील विविध रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी निधी मिळण्याबाबत महानगरपालिकेने पाठविलेला प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(५) * ३००७२ श्री.सतीश चव्हाण , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात मंजूर विकास आराखड्यानुसार विविध रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी मनपाने २५० कोटी रुपये शासनाकडून मिळणेसाठी दिलेला प्रस्ताव अद्याप शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ता रुंदीकरणाच्या कामात (२० बाय ३० चे प्लॉट असणाऱ्या मालमत्ता खरेदी व्यवहार केवळ मुद्रांकावर झालेल्या नागरिकांच्या) मालमत्ता बाधित झाल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गरीब व श्रमिक नागरिकांना रुंदीकरणाची झळ पोहचल्यामुळे माणुसकीच्या दृष्टीकोनातून शासन आवश्यक ती मदत करणार आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न क्र.१, २ व ३ ची शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(५) असल्यास, त्यानुसार रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्यांना शासनाने भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पृथ्वीराज चव्हाण** : (१) सन २०११-१२ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेने औरंगाबाद शहर विकास योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने रस्ते विकास करण्यास रू.२०० कोटी इतके शासन अनुदान मिळण्याविषयी प्रस्ताव सादर केलेला होता. सदर प्रस्तावाची आर्थिक व्याप्ती पहाता यासंदर्भात "महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान" अंतर्गत शासन निर्णय दिनांक २०/२/२०१० मधील विहित कार्यपद्धतीस अनुसरून शासनाकडे स्वतंत्रपणे सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे आवश्यक असल्याबाबत महानगरपालिकेस कळविण्यात आलेले आहे.

(२) व (३) औरंगाबाद शहरातील रस्ता रुंदीकरणाच्या कामामुळे काही असे लहान भूखंड देखील बाधित झालेले आहेत ज्यांचे खरेदी व्यवहार केवळ मुद्रांकावर झालेले असून रीतसर दस्त नोंदणी झालेली नाही. अशी मालमत्ता संबंधित नागरिकांच्या नावांवर नसल्यामुळे त्यांना हस्तांतरणीय विकास हक्क किंवा निधीच्या स्वरूपात नुकसान भरपाई देता येत नाही. तथापि अशा बाधित मालमत्त्यासंदर्भात संबंधित नागरिकांना माणुसकीच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेच्या मौजे हर्सूल येथील गट नं. २१६ व २१७ मध्ये २०' X ३०' चे भूखंड वाटप करण्यात आले आहेत.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

..२...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, उत्तरामध्ये नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास सादर करण्याबाबत महानगरपालिकेला कळविण्यात आलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, सविस्तर प्रकल्प अहवाल येईपर्यंत 200 कोटींची ॲडहॉक तरतूद करणार काय? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मुंबईच्या धर्तीवर लहान भाडेकरुंना घरे देण्याऐवजी त्याच भूखंडावर मोफत घरे बांधून देणार काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारले आहेत. शासनाकडून महानगरपालिकेला कळविण्यात आलेले आहे की, सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत अपेक्षित 200 कोटी रुपये आहेत त्याचा डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट पाठवावा. डीपीआर रिपोर्ट पाठविण्यापूर्वी पैसे देणार काय असा प्रश्न माननीय सदस्यांनी विचारला आहे.

सभापती महोदय, अशाप्रकारे पैसे देता येत नसतात. कारण पैसे कोणकोणत्या कामाकरिता, कोणकोणत्या कारणाकरिता, कोणत्या आयटेमला किती पैसे लागतात हे पहावे लागेल. रस्त्याकरिता पैसे द्या असे जरी म्हटले तरी माझ्याकडे जी माहिती आहे त्यानुसार 108 कोटी रुपये रस्त्याकरिता आणि प्रत्यक्ष भूसंपादनाकरिता 128 कोटी रुपयांची गरज आहे. 128 कोटी रुपये रक्कम महानगरपालिकेला देण्याच्या दृष्टीने मोठी आहे. म्हणून डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट आल्यानंतर सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल. गट नं.216 मध्ये हर्सूल येथे छोटया भूखंडधारकांना जी जागा दिलेली आहे त्या ठिकाणी मुंबईच्या धर्तीवर त्याच ठिकाणी घरे बांधून देणार काय असा प्रश्न माननीय सदस्यांनी विचारला आहे. हे सगळे छोटे प्लॉटधारक आहेत यांच्या नावावर प्रॉपर्टी कार्ड नाही. 7/12 उताऱ्यावर यांची नावे नाहीत. फेरफार उतारा नाही. पण यांचा दोष काही नाही. या लोकांनी त्यांच्या समजुतीनुसार 100 रुपयांच्या, 50 रुपयांच्या बाँडपेपरवर या जागा खरेदी केलेल्या आहेत. म्हणून त्यांना निष्कासित करता येत नाही. त्यादृष्टीने महानगरपालिकेने त्या गावामध्ये त्यांना स्वतंत्र अशी जागा उपलब्ध करुन दिली आणि त्यांना राहण्याची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे. कायद्याचा आधार घेऊन त्यांना पूर्णपणे बाजूला केलेले नाही.

..3..

श्री.किशनचंद तनवाणी : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, हर्सूल गावामध्ये ज्यांच्याकडे नोंदणी नाही आणि बॉंडपेपरवर ज्यांनी लिहून दिलेले आहे अशा लोकांना महानगरपालिकेने जागा उपलब्ध करुन दिलेली आहे, परंतु डीपी रोडमुळे बाधित झालेले लोक आहेत त्या सर्वांना जागा मिळालेली नाही. त्या ठिकाणी महानगरपालिकेची कामे अजून सुरु आहेत. अजून रस्ता रुंदीकरण होणार आहे. त्यामुळे बाधित लोकांना जागा उपलब्ध करुन देणार काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ज्यांनी जागा खरेदी केलेल्या आहेत त्यांना नियमाचा आधार घेऊन निष्कासित करण्याऐवजी जे कुणी राहिले असतील त्या सर्वांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मराठवाडयाची राजधानी म्हणून औरंगाबाद शहराला ओळखले जाते. हे ऐतिहासिक असे शहर आहे. केवळ राज्यातूनच नव्हे तर बाहेरच्या देशातून पर्यटक येत असतात. औरंगाबाद शहराची अवस्था काय झाली आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांना याची कल्पना आहे. महापालिकेला दिनांक 20.2.2012 रोजी अहवाल पाठविण्यास कळविलेले आहे. तीन वर्षे झाली तरी अहवाल पाठविला नाही. मंत्रीमहोदयांना प्रश्न असा आहे की, हा अहवाल तातडीने येण्यासाठी लोकप्रतिनिधींसमवेत आणि महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेणार काय? रस्ते अतिशय खराब आहेत ते करणे गरजेचे आहे. दैनंदिन वाहन प्रवाशांना त्रास होत आहे. जनतेला त्रास होत आहे. रस्ते करणे गरजेचे आहे. रस्ते करण्यासाठी निधी देणार आहात त्यासाठी प्लॅन तयार करण्याकरिता लोकप्रतिनिधींसमवेत बैठक किती दिवसात घेणार?

नंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30072......... श्री. विक्रम काळे ......

हा सर्व पैसा महानगर पालिकेकडे न देता एमएसआरडीसीच्या माध्यमातून रस्त्यांची कामे करणार आहात काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, औरंगाबाद शहराचे ऐतिहासिक व पर्यटनाच्या दृष्टीने महत्व राज्य शासनाला निश्चितपणे मान्य आहे. अशा प्रकारचा प्रश्न खालच्या सभागृहात सुध्दा उपस्थित करण्यात आला होता. या शहरातील जुने पूल बांधणे आवश्यक होते, यासंदर्भात स्थानिक सन्माननीय सदस्यांनी शासनाकडे आग्रहाने 3 कोटी रुपये मागितले परंतु माननीय उप मुख्यमंत्री तसेच अर्थमंत्री यांनी तेथेच हस्तक्षेप करुन 18 कोटी रुपये देता येतील असे सांगितले. त्याचप्रमाणे या रस्त्याला मदत करण्यासाठी शासनाचे सहानुभूतीपूर्वक धोरण राहील आणि आपण म्हणता त्याप्रमाणे आवश्यक वाटल्यास निश्चितपणे लोक प्रतिनिधींच्या सोबत बैठक आयोजित करण्यात येईल. तसेच आपण सुचविल्यानुसार एमएसआरडीसीकडे हे पैसे वर्ग करण्याबाबत आताच सभागृहात भाष्य करणे उचित होणार नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, यासंदर्भात संभाजीनगरचे माननीय खासदार श्री. चंद्रकांतजी खैरे आणि आमचे महापौर यांनी दिलेली माहिती योग्य आहे काय ? दि. 2 फेब्रुवारी, 2012 रोजी महानगर पालिकेने शासनाकडे अहवाल पाठविला होता पण नंतर मंत्रालयातील फाईल्स जळाल्यामुळे पुन्हा फाईल तयार करुन देण्याची सूचना केली आणि त्यानुसार 12 जुलै रोजी पुन्हा हा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे. शासन त्यावर किती दिवसात कार्यवाही करणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, पहिली गोष्ट म्हणजे मला कालच माननीय खासदार श्री. चंद्रकांत खैरे भेटले होते पण याबाबत ते काही बोलले नाहीत. आमची इकडची तिकडची विचारपूस सुरु होती. पण मी सांगू इच्छितो की, फाईल जळाली की नाही यामध्ये जाण्यापेक्षा सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे 12 जुलै रोजी ही फाईल पाठविली असेल तर आजच्या आजच ती पाहून स्क्रुटिनी समितीकडे पाठविली जाईल व आवश्यक ती मदत करण्याची भूमिका घेतली जाईल.

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30072........

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, उत्तरात "महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान" असा उल्लेख केलेला आहे. ही संकल्पना मला समजली नाही, ती मंत्री महोदयांनी स्पष्ट करावी.

श्री. भास्कर जाधव : महोदय, आपल्या राज्याच्या निर्मितीला 50 वर्षे पूर्ण झालेली आहेत. ज्या पध्दतीने केंद्र शासनाने जेएनएनयुआरएम सारखी महत्वाकांक्षी योजना सुरु केली आहे, त्याच धर्तीवर 50 वर्ष पूर्ण झाली म्हणून ही योजना आपण सुरु केली आहे. त्यानुसार जेएनएनयुआरएम योजनेत मोठी शहरे, एआयडीएसएस योजनेत छोटी शहरे आणि वन स्ट्रोकमध्ये काम करण्यासाठी ही नवीन योजना आपल्या राज्याने सुरु केली आहे.

--------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात आदिवासी असल्याचे खोटे दाखले देऊन आदिवासींच्या नोकऱ्या मिळविल्याबाबत**

**(6) *30146 श्रीमती विद्या चव्हाण** :सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात आदिवासी असल्याचे खोटे दाखले देऊन तब्बल 1लाख 5 हजार जणांनी आदिवासींच्या नोकऱ्या मिळविल्याचे माहे एप्रिल,2012 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. फौजिया खान, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही. अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दि. 15.6.1995 नंतर लागलेल्या एकूण 42,907 कर्मचाऱ्यांपैकी 32,520 कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र वैध ठरले आहे व 1,184 कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले असल्याचे आत्तापर्यंत प्राप्त झालेल्या माहितीवरुन निदर्शनास आले आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता व्हावयाची आहे.

(2) व (3) अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दि. 15.6.1995 पूर्वी शासन सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास त्यांच्या सेवेस संरक्षण देण्याचा निर्णय दि. 15.6.1995 च्या शासन निर्णयानुसार घेण्यात आला आहे. दि. 15.6.1995 नंतर नोकरीस लागलेल्या कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास, त्यांच्या सेवेस संरक्षण नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा. सुरेश नवले : महोदय, उत्तरात 1184 कर्मचाऱ्यांची जात प्रमाणपत्रे अवैध ठरल्याचे सांगितले आहे, त्याचे कारण काय आहे व त्यांच्याकडे कोणती कागदपत्रे नव्हती म्हणून त्यांची प्रमाणपत्रे अवैध ठरलेली आहेत ?

प्रा. फौजिया खान : महोदय, एस.टी. च्या दाखल्याच्या आधारे शासन सेवेत आलेले जे अधिकारी व कर्मचारी असतात त्यांची माहिती शासनाने प्रत्येक विभागाकडून मागविली होती. त्याप्रमाणे विभागवाईज एस.टी. उमेदवारांची संख्या किती आहे, जातीचे वैधता प्रमाणपत्र ज्यांनी सादर केले त्यांची संख्या आणि असे प्रमाणपत्र सादर न केलेल्यांची संख्या किती आहे, अशी माहिती आपण विचारली होती.

यानंतर श्री. जुन्नरे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ... ता.प्र.क्र. : 30146 ......

जे प्रमाणपत्र अवैध ठरवले गेले तसेच ज्यांच्याकडे एसबीसीचे जात प्रमाणपत्र आहे त्यांची संख्या किती आहे यासंदर्भातील आकडेवारी आपल्या समोर आलेली आहे. दि. 15.6.95 पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रावर सेवेत आलेले आहेत अशांची संख्या 39,491 आहे व दि. 15.6.1995 नंतर जे कर्मचारी सेवेत लागले आहेत त्यांची संख्या 42907 आहे अशी एकंदर कर्मचाऱ्यांची संख्या 82,398 आहे. वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्यांची संख्या 52,662 असून ज्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत त्यांची संख्या 29,783 आहे. 1995 पूर्वी ज्यांचे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र अवैध ठरले व ज्यांनी विशेष मागासवर्ग प्रवर्ग किंवा दुसऱ्या इतर प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशांची संख्या 1,672 आहे व 1995 पूर्वीचे 9414 असे एकंदर संख्या 2,465 आहे. ज्यांचे प्रमाणपत्र अवैध ठरले तसेच ज्यांनी कोणतेही जात प्रमाणपत्र दिलेले नाही अशांची संख्या 641 आहे. यातील 6 कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात येईल. 161 कर्मचाऱ्यांवर कोर्ट केसेस करण्यात आलेल्या आहेत. 1995 नंतरच्या 380 कर्मचाऱ्यांना नोटीस देण्यात आली असून विभागाकडून टर्मिनेट करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

आतापर्यंत ज्या कर्मचाऱ्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, अशा कर्मचाऱ्यांनाही 3 महिन्याची नोटीस दिलेली आहे. त्यांना जात प्रमाणपत्र सादर करण्याची नोटीस देण्यात आली असून त्यांनी प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांना टर्मिनेट करण्यात येईल अशा प्रकारचे निर्देश देण्यात येतील. या शिवाय ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी स्क्रुटीनी समितीकडे प्रमाणपत्र दिलेले आहे त्यांच्या प्रमाणपत्राची तपासणी आदिवासी विभागाने ठराविक काळात करुन ते शासनाकडे पाठवावे असे सांगण्यात येईल.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, 1184 कर्मचाऱ्यांचे प्रमाणपत्र अवैध ठरलेले आहे. कोळी, टोकरे कोळी, महादेव कोळींच्या जात प्रमाणपत्राचा विषय आहे. जळगाव जिल्हयातील या जमातीतील अनेक कर्मचाऱ्यांचा समावेश या 1184 कर्मचाऱ्यांमध्ये येतो. त्यामुळे यासंदर्भात आपण काही वेगळा पर्याय देणार की, सक्तीची निवृत्ती देणार ? सक्तीची निवृत्ती दिल्यानंतर अशा कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतरचे बेनिफिट्स दिले जाणार आहेत काय ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 30146 ......

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ज्या कर्मचाऱ्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तसेच एसबीसीमध्ये एकंदर 41 प्रवर्ग असून त्या प्रवर्गाचेही प्रमाणपत्र किंवा कोणत्याही जातीचे प्रमाणपत्र या कर्मचाऱ्यांनी सादर केलेले नाहीत. तसेच या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी सुध्दा अप्लाय केलेला नाही त्यांच्यावर सुध्दा ॲक्शन घेणे गरजेचे असल्यामुळे त्यांना नोटीस देऊन कारवाई करण्यात येईल.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, बोगस प्रमाणपत्र देऊन काही कर्मचारी शासकीय सेवेत लागलेले आहेत. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हयातील ठाकर समाजाला काही कालावधीत एस.टी. चे जात प्रमाणपत्र देण्यात आल्यामुळे ठाकर समाजातील लोक सेवेत रुजू झाले होते. सिंधुदुर्ग जिल्हयातील ठाकर समाजाची परिस्थिती अशी आहे की, भावाला जात प्रमाणपत्र दिले तर बहिणीला दिले जात नाही, वडीलांना एसटीचे प्रमाणपत्र दिले तर मुलाला दिले नाही अशा प्रकारचे 14 दाखले दिलेले आहेत व ते सर्व दाखले सभागृहाला सादर केले होते. सिंधुदुर्ग जिल्हयातील जिल्हा परिषदेत तसेच शासकीय सेवेतील 92 लोकांना जात पडताळणीचे प्रमाणपत्र मिळालेले आहे. जिल्हा परिषद या लोकांना नोटीस देत असल्यामुळे यातील काही लोक कोर्टात गेलेले आहेत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30146....

श्री.राजन तेली....

जिल्हा परिषद त्यांना नोटीस देते की, लवकर व्हेरिफिकेशन करावे. जे कोर्टात गेले आहेत त्यांच्याबाबत आपण कोणता निर्णय घेणार आहात ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, जे कोर्टात गेले आहेत त्यांच्याबाबतीत आपण सध्या तरी काहीच भूमिका घेणार नाही. कारण काही लोकांना कोर्टाने स्टे दिलेला आहे. कोर्टाचे जस जसे निर्णय येतील त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**उप सभापती** : मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देतो की, जात पडताळणी समिती संबंधी अनेक तक्रारी आहेत. या जात पडताळणी समिती वर कोण अधिकारी आहेत यांची पहिल्यांदा जात तपासली पाहिजे. त्यांच्यामध्ये माणुसकी आहे की नाही या अर्थाने मी जात हा शब्द वापरला आहे.

प्रश्नोतराचा तास संपला आहे.

......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आता शासकीय विधेयक चर्चेला घेण्यात येईल.

**सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 15 - महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयकाच्या संयुक्त समितीवर विधान परिषद सदस्यांचे नामनिर्दिष्ट न करणे**.

श्री.जयंत प्र.पाटील : महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयक, 2012 हे चांगले आहे. या विधेयकासाठी संयुक्त समिती नेमली होती. या विधेयकासाठी संयुक्त समिती नेमावी अशी खालच्या सभागृहामध्ये मागणी करण्यात आली होती. आपल्या सभागृहामध्ये मागणी न करता आपल्या सदनातील सदस्य त्या समितीवर कामकाज करण्यासाठी गेले आहेत. हे कायद्याने, नियमाने धरून नाही. कमीत कमी येथे प्रस्ताव आणला गेला पाहिजे होता. मग त्या समितीवर सन्माननीय सदस्यांची नियुक्ती करायला पाहिजे होती, हे मी मुद्दाम रेकॉर्डवर आणतो. पुन्हा ही चूक होता कामा नये. मी रेकॉर्ड बघण्याचा प्रयत्न देखील केला आहे. कोणतीही कार्यपद्धती न अवलंबिता आपल्या सदनातील सन्माननीय सदस्यांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. ही प्रथा चुकीची आहे. ती नियमबाह्य आहे. त्यामुळे सदर बिल चर्चेला येण्यापूर्वी आपण योग्य ती दुरूस्ती करावी व याबाबत आपण रूलिंग द्यावे अशी मी विनंती करीत आहे. सभापती महोदय, हे बिल मांडण्यापूर्वीच माझा आक्षेप आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जो मुद्दा मांडला आहे तो योग्य आहे. हा प्रोसिजरचा विषय आहे. आपल्या सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे झाले पाहिजे एवढेच आमचे म्हणणे आहे. याबाबत कोणा विरूद्ध काहीही आक्षेप नाही. सरकार विरूद्ध देखील आक्षेप नाही. ही नावे त्यांनी थेट जाहीर केलेली आहेत. त्यात चुकीचे केले असे म्हणणे नाही. पण जी पद्धत आहे ती अनुसरली नाही. त्यावेळी ही बाब सचिवांनी निदर्शनास आणायला पाहिजे होती. यात फक्त दोन मिनिटांचाच प्रश्न होता. मी असा प्रस्ताव मांडतो एवढेच म्हणायचे होते व त्यास मंजुरी घ्यायची होती. येथे संसदीय कार्यपद्धतीचा विषय आहे. सचिवांच्या माध्यमातून मंत्रिमहोदयांनी ही दुरूस्ती केली असती तर हे घडले नसते. यात सचिवांकडून देखील दुर्लक्ष झालेले आहे हे मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हे ज्येष्ठांचे सभागृह आहे. खालच्या सभागृहाने काहीही ठरविले असले तरी आपण येथे योग्य तो निर्णय घेतला पाहिजे. असे जर केले तर चुकीची प्रथा पडेल.

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सदर बाब तपासून घेतल्यानंतर मी याबाबत निर्णय देईन. यापुढे असे होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

यानंतर श्री.सरफरे ...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयक.

**L. A. BILL NO. XV OF 2012**

(A BILL TO REGULATE AND PROMOTE THE CONSTRUCTION, SALE, MANAGEMENT AND TRANSFER OF FLATS ON THE OWNERSHIP BASIS IN THE STATE OF MAHARASHTRA AND TO ESTABLISH THE HOUSING REGULATORY AUTHORITY AND HOUSING APPELLATE TRIBUNAL AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

(विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रश्न पुनः प्रस्तुत करण्यात आला.)

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.स.वि. क्रमांक 15 महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयकावर बोलण्याकरिता आपण मला संधी दिली. त्याबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार मानते.

सभापती महोदय, गोरगरिबांच्या घरांच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या सन्माननीय नेत्या श्रीमती मृणाल गोरे यांचे काल निधन झाले. मुंबई शहरामध्ये वेगवेगळया भूखंडांचे प्रश्न निर्माण होतात, काही वादग्रस्त भूखंडांचे प्रश्न निर्माण होतात, त्या संदर्भात बांधकाम व्यावसायिक, ग्राहक आणि शासन यांच्यामध्ये समन्वय साधून त्यामधून योग्य मार्ग काढण्यासाठी संयुक्त चिकित्सा समितीकडे हे विधेयक पाठविण्यात आले. या संदर्भात आपल्याला हजारो उदाहरणे देता येतील. जेणेकरुन त्या प्रत्येक गोष्टीबाबत या कायद्याची गरज कां भासली हे त्यामधून स्पष्ट होईल. या विधेयकावर चर्चा करीत असतांना त्यामध्ये चार-पाच वैशिष्टयपूर्ण बाबी सुध्दा आहेत. त्यातील कलम 3 मध्ये 20 मुद्दे दिले दिले आहेत, त्यामध्ये प्रवर्तकांनी माहिती उघड करावयास पाहिजे. बऱ्याच वेळा आपल्याला मोठ-मोठया इमारती उभ्या राहिलेल्या दिसतात. एखाद्या माणसाने साईटवर जाऊन बुकींग कुठे होते याची चौकशी केली तर "आम्ही साईटवर बुकींग करीत नाही, तुम्ही आम्हाला मेल करा" असे त्याला सांगितले जाते. बऱ्याच वेळा बुकींग करणारा ग्राहक कोण आहे हे न पहाता बुकींगचा लावण्यात आलेला दर त्या ग्राहकाला कळू नये या करिता त्याला माहिती दिली जात नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

अशावेळी बुकींग करण्यासाठी पैसे देणाऱ्या ग्राहकाला आपल्याला न्याय मिळेल की नाही याची खात्री वाटत नाही. बऱ्याचशा गुन्हेगारीच्या प्रकरणांमध्ये असलेल्या वादग्रस्त जागांवर अनेक लोकांकडून क्लेम लावले जातात. त्याठिकाणी सुध्दा ग्राहकांची फसवणूक केली जाते. माझे नातेवाईक आणि माझ्या घरामधील लोकांबाबत देखील मुंबई, पुणे शहरामध्ये घडलेल्या घटना माझ्या कानावर आल्या आहेत. अशाप्रकारे लोकांची फसवणूक होऊ नये यासाठी हा कायदा कशाप्रकारे उपयुक्त ठरेल या संदर्भात मी काही मुद्दे या ठिकाणी मांडणार आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . ..

सभापती महोदय, मुंबई शहरात सात, आठ किंवा नवव्या मजल्यावर फ्लॅट बुक केल्यानंतर त्याच्या वरच्या मजल्यांना परवानगी मिळालेली नसते. तेव्हा ग्राहकाला कम्प्लीशन सर्टीफीकेट वेळेवर उपलब्ध होत नाही अशा घटना घडल्याचे दिसून येते.मुंबईमध्ये माहीम भागात एका इमारतीमध्ये सुंदर फ्लॅट होता. त्याबाबतीत माहिती घेतल्यानंतर जेव्हा सौदा करण्याची वेळ आली तेव्हा असे कळले की, हे फ्लॅट अगोदरच दोन-तीन गिऱ्हाईकांना विकण्यात आले आहेत. मग अंडरवर्ल्डचे लोक किंवा भीषण स्वरुपाची गुन्हेगारी करणारे लोक यांच्या भीतीमुळे पहिल्यांदा सौदा केलेल्या लोकांना पैसे देखील परत केले जात नाहीत. त्याचबरोबर नवीन सौदा करीत असताना त्यांना कोणीही थांबविण्याची हिंमत करीत नाही. उलट त्या इमारतीवर बिल्डींग असोसिएशनचे सर्टीफीकेट लावलेले होते. त्याचबरोबर काही वेळेला शेवटच्या हप्त्यासाठी घाई केली जाते आणि त्याचा परिणाम म्हणजे कम्प्लिशन सर्टीफीकीट न मिळताच लोकांना त्या जागेमध्ये रहाण्यासाठी जावे लागते. मग पाणी आणि लिफ्ट यासारख्या सोयी राहिल्याचे दिसून येते.

सभापती महोदय, अलीकडे आपण सगळया वृत्तपत्रांमध्ये पाहिले तर पहिल्या पानावर प्रचंड मोठ्या जाहिराती असतात आणि क्लब हाऊस, खेळाची मैदाने या सारख्या सुखसोयी उपलब्ध करुन देऊ असे सांगितलेले असते. काही अतिशय चांगले बांधकाम व्यावसायिक आहेत जे पाच-पाच, दहा-दहा, पंधरा-पंधरा वर्षे या सुखसोयी सुरु ठेवतात. पण अनेक वेळेला दोन-तीन वर्षानंतर या सुखसोयी गुंडाळल्या जातात आणि अशा वेळेला त्याचा अधिभार कशा पध्दतीने उचलला जाणार आहे हा प्रश्न आहे. कारण यासंदर्भात खूप अडचणी तयार होतात. प्रवर्तकांनी माहिती उघड करण्याच्या संदर्भात 3 नंबरचे जे कलम आहे त्यामध्ये 20 छोटे-छोटे मुद्दे आहेत ते अतिशय महत्वाचे आहेत. आठव्या क्रमांकामध्ये आपण जाहीर केलेले आहे की, या इमारतीमध्ये किती सदनिका उपलब्ध आहेत आणि लोकांनी त्याची कशा प्रकारे नोंदणी करावयाची आहे याची बिल्डरनी सर्व माहिती संकेत स्थळावर दिली पाहिजे आणि हे सुध्दा महत्वाचे कलम आहे असे मला सांगावेसे वाटते. त्याचबरोबर या सदनिका गहाण ठेवावयाच्या असतील किंवा त्यावर काही कर्ज काढण्याची वेळ आली किंवा त्यावर बोजा ठेवण्याची वेळ आली याबाबत सुध्दा बंधने घालण्यात आली आहेत. या शिवाय सदनिका खरेदीदाराची कर्तव्ये सुध्दा यामध्ये मांडण्यात आली आहेत. शेवटचा परंतु अत्यंत महत्वाचा मुद्दा म्हणजे आपण नियामक प्राधिकरण स्थापन केलेले आहे

सभापती महोदय, आपण शिक्षण शुल्काच्या प्रश्नासंबंधात देखील अतिशय चांगले विधेयक



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . ..

मान्य केले आहे. त्या नंतर केंद्र सरकारकडे ते परवानगीसाठी पाठविण्यात आले. पण परवानगी न मिळाल्यामुळे वर्ष-दीड वर्षे ते तसेच रखडलेले आहे.म्हणून मला या विधेयकाच्या बद्दल असे विचारावयाचे आहे की, हे विधेयक मान्य करण्यासाठी म्हणजे त्याला अंतिम स्वरुप देण्यासाठी किती वेळ लागणार आहे? तसेच जेव्हा बांधकाम व्यावसायिकांचा मुद्दा उपस्थित होतो, तेव्हा आपण बिल्डरच्या विरुध्दच बोलत असतो. परंतु मला असेही लोक भेटले की, जे मध्यम वर्गाच्या चाळींचे बांधकाम करीत आहेत. त्यांचे म्हणणे असे की, म्हाडातर्फे आम्हाला बांधकामासाठी परवानगी मिळण्यास काही ठिकाणी पाच-पाच वर्षे लागतात. त्यासंदर्भात आपण अशा वेळी सरकारकडून काही ना काही कारणाने जे नियामक मंडळ आहे त्यांच्याकडे सुध्दा इमारत व्यावसायिकांनी किंवा ग्राहकांनी जाऊन बांधकामासाठी परवानगी मिळू शकते किंवा नाही याबद्दल देखील स्पष्टीकरण करावे. तसेच किती कालावधीमध्ये सदरहू परवानगी मिळणे बंधनकारक करण्यात येणार आहे. बऱ्याच लोकांना मान्य असते पण एखाद्या ठिकाणी वाद सुरु झाल्यावर बांधकाम व्यावसायिक भाडे देणे देखील बंद करतो.अशा वेळी संक्रमण शिबिरामध्ये देखील लोकांची राहण्याची व्यवस्था नसते. तसेच तीन-तीन, चार-चार, पाच-पाच वर्षे झाल्यावर बांधकाम व्यावसायिकाचे पैसे अर्धवट अडकलेले असतात आणि जे भाडेकरु आहेत किंवा ज्यांना घरे पाहिजेत त्यांना सुध्दा आता कुठे रहावे असा प्रश्न निर्माण होतो. म्हणून या विधेयकाच्या बाबत सांगावयाचे तर ते जसे खाजगी व्यावसायिकांना लागू आहे, तसे ते जेथे म्हाडाच्या परवानगीने पुनर्विकासाचे काम सुरु आहे त्याबद्दल सुध्दा हे विधेयक कशा प्रकारे काम करणार आहे यावर प्रकाश टाकला जाणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, याशिवाय असे सांगितले जाते की, आम्ही वेगवेगळया सुखसोयी उपलब्ध करुन देऊ म्हणजे बाथरुममध्ये अमुक प्रकारची उपकरणे लावली जातील किंवा आतमध्ये अजून काही ड्राय एरिया ठेवलेला असेल. परंतु प्रत्यक्षात असे लक्षात येते की, याठिकाणी घाणेरड्या प्रतीची साधने वापरण्यात आलेली असतात. त्यामुळे याबाबत तक्रारी सुरु होतात. आमच्याकडे सुध्दा लोकांच्या अनेक प्रकारच्या तक्रार येतात आणि लोक असे विचारतात की, आता आम्ही काय करावे? कारण जर संबंधितांनी फ्लॅटचा ताबा घेतला नाही तर त्यावर व्याज लावले जाते. त्यामुळे आपण आपल्या या सगळ्या तक्रारींचे किती दिवसामध्ये निवारण करु शकतो या संदर्भात देखील स्पष्टीकरण मिळाले पाहिजे.





डॉ.नीलम गोऱ्हे . . ..

सभापती महोदय, इमारतींचे बांधकाम करीत असताना काही वेळेला मजुरांचे मृत्यू होतात आणि आम्हाला सदनामध्ये नेहमी असे उत्तर दिले जाते की, बांधकाम व्यावसायिक आणि मजूर पुरविणारे कंत्राटदार यांच्यामध्ये कशा प्रकारचा करार होतो यावर बऱ्याचशा गोष्टी अवलंबून असतात. मला असे वाटते की, या नियामक मंडळाच्या अखत्यारीमध्ये असलेल्या बांधकाम व्यावसायिक आणि मजूर पुरविणारे कंत्राटदार यांनी समन्वयाच्या दृष्टीकोनातून विचार केला पाहिजे. याठिकाणी आपणही कामगार नेते म्हणून काम केलेले आहे.माननीय उप मुख्यमंत्री सदनामध्ये उपस्थित आहेत. हे विधेयक गृहनिर्माण विभागापुरते मर्यादित असले तरी देखील या प्रश्नांवरुन जे वाद होतात, ते जर सोडविण्यात आले तर शेवटी ग्राहकाला अनेक कामे करणे शक्य होईल. बांधकाम व्यावसायिकांमध्ये सुध्दा चांगले काम करणारे अनेक लोक आहेत आणि त्यांच्या चांगल्या रेप्युटेशनमुळे लोक संबंधितांकडे जात असतात. याबाबतीत ज्या अपप्रवृत्ती आहेत, त्या सदरहू विधेयकामुळे रोखणे शक्य होऊ शकेल यादृष्टीने मी या विधेयकाचे स्वागत करतो.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा असा की, ज्यावेळेला सदनिका घेतल्या जातात. तेव्हा आपण नेहमी असे म्हणतो की, पती-पत्नी या दोघांच्या नावावर सदनिका घेण्याच्या दृष्टीकोनातून आपण कायदा करणार आहोत. याबाबतीत आपण पुढे कोणती पावले उचलली आहेत किंवा नियामक मंडळ पावले उचलणार आहे काय याबद्दल देखील खुलासा करण्यात यावा. धन्यवाद.

------

. . . .2 एल-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) LL-4

APR/ D/ KTG/ 13:10

**पृ.शी.** : महाराष्ट्र (व्दितीय पुरवणी) विनियोजन विधेयक

L.A. BILL NO. XXIV OF 2012.

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH, 2013.)

श्री.अजित पवार (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्या प्रमाणे सन 2012 चे वि.स.वि. क्रमांक 24 - दिनांक 31 मार्च 2013 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी कराव्यात.

(खंड 2 ते 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उप सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयक.

**L. A. BILL NO. XV OF 2012**

(A BILL TO REGULATE AND PROMOTE THE CONSTRUCTION, SALE, MANAGEMENT AND TRANSFER OF FLATS ON THE OWNERSHIP BASIS IN THE STATE OF MAHARASHTRA AND TO ESTABLISH THE HOUSING REGULATORY AUTHORITY AND HOUSING APPELLATE TRIBUNAL AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

( चर्चा पुढे सुरु )

श्री. सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, अत्यंत महत्वाचे आणि संपूर्ण राज्यातील ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणारे महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास ) विधेयक, 2012 सभागृहासमोर मांडलेले आहे. आपणा सर्वांना माहीत आहे की, 1963 साली मोफा कायदा राज्यात आणण्याची आपण भूमिका घेतली. हे विधेयक आणत असताना ग्राहक आणि विशेषकरुन जे खरेदी-विक्री करणारे आहेत त्यांच्या व्यवहारामध्ये पारदर्शकता यावी या दूरदृष्टीकोनातून हे विधेयक आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. मला सांगण्यास आनंद होतो की, 1963 साली हा कायदा झाल्यानंतर त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा करुन 49 वर्षानंतर हे नवीन विधेयक विधानसभेमध्ये आणि विधान परिषदेमध्ये मांडलेले आहे.

सभापती महोदय, मला सुरुवातीला सांगितले पाहिजे की, हे विधेयक आणण्यासाठी राज्याचे आदरणीय मुख्यमंत्री, आदरणीय उप मुख्यमंत्री, विशेषकरुन आमच्या गृहनिर्माण विभागाचे सचिव आणि त्यांचे सर्व सहकारी त्याचप्रमाणे संयुक्त चिकित्सा समितीचे सर्व सन्माननीय सदस्यांनी फार मोठ्या प्रमाणावर मौल्यवान सहकार्य केले. त्यांनी नुसते सहकार्यच केले नाही तर यामध्ये आणखी पारदर्शकता कशी आणता येईल आणि हे विधेयक सर्वसामान्य लोकांसाठी अधिक उपयुक्त कसे होईल या दृष्टीने सूचना केल्या त्याबद्दल मी सर्वांचे सुरुवातीला आभार मानतो. हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविल्यानंतर लोकांकडून सूचना व हरकती मागविण्यात आल्या आणि

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर .....

त्यामध्ये तीन ते साडेचार हजार सूचना आणि हरकती प्राप्त झाल्या. मला आवर्जून सांगावे लागेल की या सूचना आणि हरकती प्राप्त झाल्यानंतर विशेषकरुन विधिमंडळाच्या स्टाफने चांगले सहकार्य केले आणि त्यामुळे आलेल्या सर्व हरकती आणि सूचनांवर आणि त्याचा जो गाभा आहे त्यावर चर्चा घडविण्याचे काम आपण केले.

सभापती महोदय, आधीचा जो मोफा कायदा होता त्यामध्ये 18 कलमे होती. गेल्या 49 वर्षामध्ये त्या कायद्यातील वेगवेगळ्या कलमांमध्ये 24 सुधारण्धा केल्या होत्या. त्यामुळे तो कायदा वाचत असताना देखील फार कन्फ्युजन होत होते किंवा व्यवस्थितपणे तो कायदा वाचता येत नव्हता. आज मला सांगण्यास आनंद होतो की, आता आपण जे नवीन विधेयक आणलेले आहे त्यामध्ये 56 कलमांचा समावेश केलेला आहे.

सभापती महोदय, मला आवर्जून सांगावे लागेल की, मोफा कायदा करीत असताना 1963 साली त्यावेळचे श्री. होमी जे. एच. तल्यारखान यांनी या खात्याचे मंत्री म्हणून या विधिमंडळामध्ये विधेयक मांडण्याचे काम केले होते. त्यावेळी तत्कालीन उप सभापती हे सभापतीस्थानी होते. योगायोगाने विधान सभेमध्ये सुध्दा माननीय उपाध्यक्ष हे अध्यक्षस्थानी होते. आज योगायोगाने आपण देखील सभापतीस्थानी आहात. या विधेयकावरील चर्चेच्या वेळी विधानसभेत माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते आणि आता विधान परिषदेमध्ये माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित आहेत. या सर्वांच्या साक्षीने हे विधेयक मंजूर होत आहे आणि हा एक ऐतिहासिक क्षण आहे असे म्हटले तर चुकीचे होणार नाही.

सभापती महोदय, 1963 साली श्री. तल्यारखान यांनी जे म्हटले होते त्यातील दोन तीन ओळी मी वाचून दाखवितो. त्यांनी असे म्हटले होते की, "Sir, this is a pioneer legislation which has been introduced, and if I am not mistaken, perhaps for the first time in India for controlling and regulating the system of ownership flat which is largely prevalent in the Greater Bombay of our State and also in some other parts to the smaller extent." यासाठी त्यावेळी पे मास्तरांची कमिटी

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D

श्री. सचिन अहिर .....

स्थापन करण्याचे काम केले होते. त्या पे मास्तरांच्या समितीच्या सूचनांवर आधारित कायदा करण्याची भूमिका आपण घेतली. श्री. तल्यारखान त्यांनी त्यावेळी जे म्हटले त्यातील आणखी एक ओळ वाचण्यासारखी आहे. त्यांनी असे म्हटले होते की, "I would, at the outset, narrate briefly the types of abuses, the defects and the evils which have been noticed in the past few years and which have come to the light again and again. I personally feel that this will eradicate all these kinds of abuses and practices happening in the system and happening in the State."

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर....

सांगण्याचा हेतू असा आहे की, 1963 साली सुध्दा ॲब्युसिव्ह आणि माल प्रॅक्टिसेस सुरु होत्या. त्याला आळा घालण्यासाठी मोफा कायदा आणला होता. 50 वर्षानंतर दूरदृष्टी ठेवून शासनाने हा कायदा आणण्याची भूमिका घेतली आहे. या कायद्याची व्याप्ती 3 स्तरावर आहे. पहिल्यांदाच याबाबत एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात येत आहे. पुढील काळामध्ये मार्केटमध्ये जे विकासक येणार आहेत त्या सर्वांना रजिस्ट्रेशन बंधनकारक करण्याची भूमिका घेतलेली आहे. प्रमोटर्स कोण असणार आहेत, त्यातील कंत्राटदार कोण असतील, चार्टर्ड इंजिनिअर कोण असणार आहेत, चार्टर्ड आर्किटेक्ट कोण असणार आहेत, टर्म की कॉन्ट्रॅक्टर कोण असणार आहेत याबाबतची माहिती वेबसाईटवर टाकावी लागणार आहेत.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये 2-3 चांगल्या सूचना समाविष्ट केलेल्या आहेत. यापूर्वी या संदर्भात मोफा कायदा तयार करण्यात आला होता. पण त्यावेळी त्या कायद्याला हात लावण्याची भूमिका घेण्यात आली नव्हती. हा कायदा केल्यामुळे अपप्रवृत्तीला ताकदीने आळा घालता येईल. अयोग्य काम करणारे जे लोक आहेत त्यांना पकडण्यासाठी या कायद्यात दूरदृष्टी दाखवून दोन नियामक मंडळे स्थापन करीत आहोत. एक नियामक प्राधिकरण व दुसरे अपील न्यायाधिकरणाची स्थापना करीत आहोत. तसेच या नियामक मंडळात प्रधान सचिव दर्जाचे अधिकारी असतील. मग ते गृहनिर्माण, नगरविकास, विधी व न्याय किंवा वित्त विभागातील असू शकतील. यापैकी दोन सदस्यांची मिळून ही समिती गठित करीत आहोत. एखाद्याला अपील करावयाचे असेल तर विद्यमान जज्ज किंवा सेवानिवृत्त जज्ज यांच्या अध्यक्षतेखाली एक किंवा दोन सदस्यांची समिती गठित करीत आहोत. 3 महिन्याच्या आत त्यांनी न्यायनिवाडा करावा अशी तरतूद केलेली आहे. अपील न्यायाधिकरणास सिव्हिल कोर्टाचे अधिकार व दर्जा दिलेला आहे. त्यांना हा दर्जा प्राप्त झाल्यानंतर भविष्यात एखाद्या ग्राहकाची फसणूक झाली आणि ग्राहकाला विकासकाने सहकार्य केले नाही तर मला तुमचा विषय मान्य नसल्यामुळे तुम्हाला कोठे जायचे आहे तेथे जावे असे सांगण्याची हिंमत होणार नाही. एखाद्या ग्राहकाचे प्रकरण न्यायाधिकरणाकडे आले तर त्यांना 3 महिन्याच्या आत न्याय देण्याची भूमिका घेण्यात आलेली आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.सचिन अहिर....

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्या प्रमाणे अनेक वेळा सदनिकांचे बांधकाम पूर्ण केले जात नाही. बांधकाम अर्धवट सोडण्याचा प्रयत्न केला जातो. एकच रुम 4-4 जणांना विकली जाते. म्हणून या विधेयकात तरतूद केल्या प्रमाणे एकूण जागेच्या 10 टक्के जागा राखीव ठेवावी लागेल. संपूर्ण प्लॉटच्या 10 टक्के जागा रिटेन करावी लागेल. दुर्दैवाने ती इमारत त्याने पूर्ण केली नाही, ओ.सी.सर्टिफिकेटपर्यंत ते आले नाहीत तर नियामक प्राधिकरण निर्णय घेईल आणि खरेदी केलेल्या ग्राहकांपैकी 60 टक्के ग्राहक पुढे आले तर त्यांना सोसायटी स्थापन करण्याची व त्यांना एस्क्रो एजन्ट या नात्याने तो 10 टक्के एरिया संबंधित सोसायटीला देऊन ती इमारत पूर्ण करण्याचा अधिकार देण्यासाठी तरतूद करण्यात येत आहे.

लोकांनी बुकिंग केल्यानंतर विकासकाने जर डिस्प्लेजर केले तर इनिशिअल बुकिंगच्या वेळी त्यांनी जी रक्कम भरलेली असेल ती रक्कम 15 टक्के व्याजासहित लोकांना विकासकाने परत करण्याची तरतूद यामध्ये करण्यात आलेली आहे. संपूर्ण इमारतीच्या बाबतीत ग्राहकांची फसवणूक झ ाल्यानंतर विकासकाला पेनल्टी भरावी लागेल. नुकसान भरपाई सुध्दा द्यावी लागेल. नियमामध्ये विहित केलेल्या व्याज दरानुसार ग्राहकाला नुकसान भरपाई मिळणार आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर...

अनेक वेळा विकासक ग्राहकाला असे सांगतात की फ्लॅटच्या समोर गार्डन आहे, स्विमिंग पूल आहे, सी-व्ह्यू आहे. परंतु नंतर त्यामध्ये बदल केला जातो. परंतु या कायद्याप्रमाणे विकासकाला खेळाचे मैदान, वेल्फेअर सेंटर, स्विमिंग पूल अशा देऊ केलेल्या सोयीसुविधामध्ये बदल करता येणार नाही. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी पेनल्टीचा उल्लेख केला. विकासकाला लावलेली पेनल्टी त्याने भरली नाही तर त्याबाबतीत 10 लाख रु. दंड आणि 3 वर्षे सक्त मजुरीच्या शिक्षेची तरतूद कायद्यामध्ये केलेली आहे. मी सन्माननीय सदस्यांना आश्वस्त करु इच्छितो की, अत्यंत पारदर्शक आणि ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणारे असे हे विधेयक आणलेले आहे. हे विधेयक संमत करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 56 (दोन्ही सम्मिलित), अनुसूची विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012चे वि.स.वि.क्रमांक 15 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2012चे वि.स.वि. क्रमांक 15 संमत झाले आहे.

----

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम), (पहिली सुधारणा) नियम, 2012 प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर 0312/प्र.क्र.227/पुनर्बांधणी-1/परि-2, दिनांकित 25 जून 2012 सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.15 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 1.28 ते 2.15 पर्यंत मध्यंतर)

--

...नंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर )**

**(सभापतीस्थानी उप सभापती )**

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "राज्यामध्ये अत्यंत कमी पाऊस झाल्यामुळे ग्रामीण भागात जनावरांच्या चाऱ्याची टंचाई निर्माण झालेली असणे, जनावरांच्या चाऱ्याचे वाटप व्यवस्थितरित्या होत नसल्याने जनावरांच्या मृत्यूचे प्रमाण वाढणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणे, राज्यात जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था शासनाने प्राथम्यक्रमाने करण्याची आवश्यकता" या विषयावर म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना केव्हा घेतो ?

**उप सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासानंतर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना घेतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपणाकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली असताना आपण प्रश्नोत्तराच्या तासानंतर माझी प्रस्तावाची सूचना का घेतली नाही ?

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 15- महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयक 2012 घ्यायचे असे काल ठरले होते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कामकाजपत्रिकेवरील क्रमानुसार कामकाज होत असते. परंतु नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव हा वेगळा विषय आहे.

**उप सभापती** : मी ज्यावेळी विधेयकाचे कामकाज पुकारले त्यावेळी आपण सभागृहात उपस्थित होता. आपण मला त्याचवेळी सांगावयास पाहिजे होते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सचिवांच्या माध्यमातून आपणास मार्गदर्शन होत असते. ठरल्याप्रमाणे कामकाज होणार नसेल तर त्याला काय अर्थ आहे ? गृहनिर्माण विधेयक नंतर मंजूर झाले असते. नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना मांडायला परवानगी देणे, त्यावर सरकारकडून उत्तर येणे अपेक्षित असते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, आपण सभागृहात उपस्थित असताना मी हे विधेयक पुकारले आणि त्यानंतर या विधेयकावर चर्चा सुरु झाली. आपण येथे उपस्थित नसताना मी आपण दिलेली नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना पुकारली.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नियमाप्रमाणे कामकाज चालविण्याचा अधिकार आपला आहे. आम्ही प्रत्येकवेळी उठून भांडायचे असेल तर ते आम्ही करु. खरे म्हणजे आपणास सचिवांनी मार्गदर्शन करावयास पाहिजे होते. इतर वेळी एखादा सदस्य जास्त वेळ बोलत असेल तर लगेच उठून ते आपणास तत्परतेने सांगत असतात. सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाच्या विषया संबंधी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे असे आपणास सचिवांनी का सांगितले नाही ?

सभापती महोदय, आज जनावरांना चारा आणि पाणी मिळत नसल्यामुळे जनावरे मरत आहेत. काल मी औचित्याच्या मुद्याद्वारे हा विषय सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी तालिका सभापती आसनावर होते. मला या संदर्भात मुद्दा मांडायचा आहे तेव्हा आपण पुनवर्सन मंत्री डॉ.पंतगराव कदम यांना सभागृहात बोलवावे असे सायंकाळी 7.00 वाजता सांगितले. तरी देखील ते सभागृहात उपस्थित झाले नाहीत. शेवटी मी पुरवणी मागण्यांच्या वेळी तो उल्लेख केला. आतापर्यंत 12 जनावरांचा मृत्यू झालेला आहे. हा गंभीर विषय आहे. या संदर्भात शासनाची कोणती भूमिका आहे हे आम्हाला समजले पाहिजे. या चाऱ्याच्या प्रश्नावरुन सभागृहात गोंधळ झाला होता. मी या सर्व गोष्टींचा निषेध करुन बहिर्गमन करीत आहे.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात. )

**उप सभापती** : नियम स्थगित करण्या संदर्भात मे.कौल आणि शकधर यांच्या "प्रॅक्टीस ॲण्ड प्रोसिजर ऑफ पार्लमेंट" या ग्रंथात नमूद केल्या प्रमाणे प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासाठी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात एखादा विशिष्ट असा प्रस्ताव सभागृहा समोर असणे आवश्यक आहे व तो विचारात घेण्यासाठी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्या संबंधात प्रस्ताव देता येईल.

**उप सभापती...**

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये "राज्यामध्ये अत्यंत कमी पाऊस झाल्यामुळे ग्रामीण भागात जनावरांच्या चाऱ्याची टंचाई निर्माण झालेली असणे, जनावरांच्या चाऱ्याचे वाटप व्यवस्थितरित्या होत नसल्याने जनावरांच्या मृत्यूचे प्रमाण वाढणे,त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणे, राज्यात जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था शासनाने प्राथम्यक्रमाने करण्याची आवश्यकता" या विषयावर सूचना दिलेली आहे. सदरहू विषय हा आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवरील कोणत्याही विषयाशी संबंधित नाही. त्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये आज दुष्काळी परिस्थिती आहे. पाऊस केव्हा पडेल याचा काही अंदाज नाही.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

आज पाण्यावाचून शेतकऱ्यांची जनावरे कत्तलखान्याकडे जात आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी जी चीड व्यक्त केली, ती बरोबर आहे. राज्यातील पाणी टंचाईच्या बाबतीत सरकार गंभीर दिसून येत नाही. ज्या ठिकाणी जनावरांसाठी छावण्या उभारल्या गेल्या आहेत, तेथील जनावरांना चारा मिळत नाही. पिण्यासाठी पाणी मिळत नाही. या राज्यात सध्या चारा माफिया तयार झालेले आहेत. छावणीमध्ये चारा आणि पाणी उपलब्ध करुन देण्याची कामे ठेकेदारांकडे सोपविलेली आहेत. छावण्यांना चारा आणि पाणी उपलब्ध करुन देणाऱ्या ठेकेदारांना अद्याप देयके अदा केली गेलेली नाहीत. म्हणून या सभागृहात गंभीर विषयाच्या बाबतीत शासनाने तातडीने चर्चा घडवून आणावी. या विषयाची चर्चा येत्या दोन-तीन दिवसात सभागृहात करण्यात यावी अशी मी आपणास नम्र विनंती करतो.

**उप सभापती** : ठीक आहे. सदर विषयाची चचा येत्या दोन-तीन दिवसात सभागृहात उपस्थित करण्याकरिता माननीय सभापती यांचेशी विचार विनिमय करुन तारीख आणि वेळ निश्चित करण्यात येईल.

------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वये सूचना**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "मुंबई शहरातील 24 विभाग कार्यालयांतर्गत सफाई कामगारांच्या वसाहतींचा पुनर्विकासाचा प्रकल्प राबविण्याकरिता करावयाची उपाययोजना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "पुणे शहरात धायरीफाटा शिवसेना हवेली तालुका प्रमुख श्री.पांडुरंग रामचंद्र आंबिके यांची झालेली निघृण हत्या " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी " चंद्रपूर जिल्हयातील भद्रावती तालुक्यातील बरोज मोकासा येथील कर्नाटक एम्टा या खाजगी कंपनीने अतिरिक्त 25 एकर अवैध मार्गाने सुरु केलेले कोळसा उत्खनन " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी " बुलढाणा जिल्हयातील मेहकर येथील पेनटाकळी कालव्याच्या पाझरामुळे शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे व पिकांचे होणारे नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी "नांदेड जिल्हयातील नायगाव बाजार येथे खरिपाच्या पेरणीची तयारी करुनही शेतकऱ्यांना बाजारातून योग्य दरात खते व बियाणे न मिळणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

3..



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.अजित 14:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे यांनी "मौजा वढाणे (ता.बारामती,जि.पुणे) येथील पद्मावती पाझर तलावाच्या सांडवा दुरुस्तीच्या कामात झालेला मोठा आर्थिक गैरव्यवहार " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मनिष जैन,कपिल पाटील यांनी " बाबा आमटे यांच्या आनंदवनातील अपंग कर्मशाळेसह राज्यातील अनुदानित अपंगांच्या शासनमान्य कर्मशाळेतील निदेशक व निदेशकेतर व संलग्न वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीवेतन व उपदान योजना लागू करण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी " डी.एड.सी.ई.टी.पर्नपडताळणी पात्र उमेदवारांचे बेमुदत आमरण उपोषण " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित नियम 93 च्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली आहे.

---------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.**:रायगड जिल्हयातील मुरुड नगरपारिषदे व्दारे करण्यात येणा-या पाणी पुरवठयाच्या पाण्यात आढळून आलेले किडे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे ( पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक ....सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

5...

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : मुरुड नगरपरिषद क्षेत्रामध्ये दिनांक 4 जून, 2012 रोजी नळाव्दारे येत असलेल्या पिण्याच्या पाण्यात किडे आढळून आले. या पाण्याची तपासणी कोणी आणि कधी केली, पाण्यामध्ये दररोज टी.सी.एल.पावडर, तुरटी टाकून पाणी शुध्द केले असतानाही ते पाणी गढूळ अवस्थेत आढळून आले होत काय ? अल्कापूर येथे पिण्याच्या पाण्याच्या टाक्या बांधण्यात आलेल्या आहेत. मुरुड नगरपरिषदेमार्फत धार्मिक समारंभासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात येते, ते पाणी मोफत दिले जाते की पैसे घेऊन दिले जाते ?

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे : धार्मिक कार्यक्रमासाठी एखादा माणूस पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत नगरपालिकेला विनंती करतो. धार्मिक कार्यक्रमासाठी पाण्याची जास्त गरज भासते. अशा वेळेलाच पाणी उपलब्ध करुन देण्याची मागणी नगरपालिकेकडे करण्यात येत असते. अशा कार्यक्रमाच्या वेळी नगरपालिकेच्या परवानगीने पाणी उपलब्ध करुन दिले जाते. परंतु ते पाणी संबंधिताला विकत दिले जाते की मोफत दिले जाते या बद्दलची माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. त्याच बरोबर 8 तासासाठी एक वॉचमन या प्रमाणे 24 तासासाठी 3 वॉचमन ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे कोणत्याही प्रकारची सुरक्षिततेे संबंधी काळजी करण्याचे कारण नाही. तुरटी असो अथवा टी.सी.एल.पावडर असो ते पाण्यात टाकण्यासंबंधीची देखील काळजी घेतली जाते. संबंधित नगरसेविका श्रीमती जोशी यांनी दिनांक 6.6.2012 रोजी एक तक्रार अर्ज केला होता. त्यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे त्या ठिकाणचे पाणी प्रयोग शाळेत तपासण्यात आले. त्या पाण्यात कोणत्याही प्रकारचे किडे आढळून आले नाहीत वा घाणेरडे पाणी आढळून आले नाही.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ D/ KTG/ पूर्वी श्री.गिते 14.25

निवेदन क्र.1... प्रा. लक्ष्मण ढोबळे...

परंतु सदरचे पाणी गढूळ असल्याचे जाणवले एवढीच माहिती प्रशासनाला प्राप्त झालेली आहे. त्यानंतही दर महिन्याला पाण्याचे 10 नमुने तपासले जातात. हे 10 नमुने लॅबमधून तपासून आल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारची अनिष्ट गोष्ट आढळून आली नाही. त्यामुळे पाण्यामध्ये किडे आढळून आले अशा प्रकारची जी तक्रार संबंधित नगरसेविका यांनी केली होती ती तक्रार निराधार आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, गढूळ पाणी आहे असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. गढूळ पाण्यात किडे नाहीत. नागरिकांनी गढूळ पाणी प्यावे अशी शासनाची अपेक्षा आहे काय ? गढूळ पाणी पिण्यासाठी दिले जाते. टीसीएल पावडर आणि तुरटी यावर खर्च होतो. ती तुरटी आणि टीसीएल पावडर पाण्यात नगरपालिका टाकत नाही असा माझा आक्षेप आहे. तुरटी आणि टीसीएल पावडर न टाकताच पाणी सोडले जाते आणि यामध्ये भ्रष्टाचार होत आहे याबाबत शासनाने खुलासा करावा.

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, त्याठिकाणी फक्त एकदा-दोनदा गढूळ पाणी आल्याबद्दलचा मी याठिकाणी उल्लेख केला. कोकणामध्ये जिवंत झरे आहेत त्या ठिकाणावर पाणीपुरवठा अवलंबून आहे. अशा परिस्थितीमध्ये तुरटी टाकली जात नाही, महाराष्ट्रामध्ये काही ठिकाणी काही वेळेला दुर्लक्ष केले जाते अशी जी माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी मानून नगरपरिषदेला निश्चितपणाने ताकीद देण्यात येईल.

-----

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : शासकीय आश्रमशाळेतील कंत्राटी शिक्षकांना सेवेत सामावून घेणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते,विनोद तावडे,नागो पुंडलिक गाणार वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. बबनराव पाचपुते ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SSK/ D/ KTG/ पूर्वी श्री.गिते 14.25

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांमध्ये तासिका तत्वावर काम करणाऱ्या शिक्षकांचा हा प्रश्न आहे. प्राथमिक आणि माध्यमिक आश्रमशाळांमध्ये अशा प्रकारे घडयाळी पध्दतीवर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी काम करण्याची प्रथा अन्य कोणत्याही माध्यमिक किंवा प्राथमिक शाळांमध्ये अस्तित्वात नाही. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून कंत्राटी पध्दतीने कर्मचारी नेमले अशा शिक्षकांची संख्या किती ? तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या किती ? मी मंत्रीमहोदयांना धन्यवाद देईन की, त्यांनी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या संदर्भात त्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टिकोनातून सहानुभूतीचा दृष्टिकोन स्वीकारलेला आहे. आदिवासी विकास विभागाच्या आयुक्तांकडून त्यांनी अहवाल मागविला होता तोही आता प्राप्त झालेला आहे. यासंदर्भात लवकरात लवकर कार्यवाही करावी अशी मी यानिमित्ताने विनंती करतो. ही कार्यवाही किती दिवसात होणार आहे असा माझा पहिला प्रश्न आहे.

सभापती महोदय, तासिकेवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना न्याय देण्याच्या भूमिकेतून अन्य विभागामध्ये कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ज्याप्रमाणे सामावून घेण्यात आले आहे त्याच पध्दतीने या विभागातील कर्मचाऱ्यांना देखील सामावून घेण्याच्या संदर्भात किती दिवसात निर्णय घेतला जाणार आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी या प्रश्नासंबंधी खूप पाठपुरावा केलेला आहे. 2/3 अधिवेशनामध्ये त्यांनी हा विषय मांडला होता. आता सर्व माहिती प्राप्त झालेली आहे. 1303 शिक्षक आणि 1277 शिक्षकेवर कर्मचारी आहे. साधारणपणे 2500 कर्मचारी कंत्राटी पध्दतीने तासिकेवर काम करणारे शिक्षक आहेत. त्यावेळेस गरज होती म्हणून त्यांना नेमण्यात आले होते. त्यांच्याकडून आम्ही क्लेम करणार नाही असे लिहून घेण्यात आले होते. तरीसुध्दा अनेक वर्षापासून ते सेवेत सामावून घेण्याची मागणी करीत आहेत. याविषयी सहानुभूतीने विचार करुन निर्णय घेण्यासाठी 3/4 बैठका देखील झाल्या आहेत. त्यानंतर इतर खात्यांमध्ये अशा प्रकारच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत काय निर्णय घेतला आहे याची माहिती घेतली आहे. त्यानंतर 18 जुलै, 2008 मध्ये एक परिपत्रक काढले होते.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

यानंतर श्री.खर्चे...

निवेदन क्र. 2........ श्री. बबनराव पाचपुते .....

की ज्यांची सेवा पाच वर्षापेक्षा अधिक झालेली आहे त्यांची माहिती कळवावी. या दरम्यान सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण गेले असता सर्वोच्च न्यायालयाने बॅक डोअर एन्ट्री बंद करण्याचे आदेश दिले. त्यानंतर हे लोक कोर्टात गेले असता उच्च न्यायालयाने देखील 6 जून, 2011 रोजी त्यांचे म्हणणे फेटाळले आहे. तरी देखील मानवतेच्या दृष्टीकोनातून या कर्मचाऱ्यांचा विचार करावा म्हणून पुन्हा प्रस्ताव मागविण्यात आले. त्यात पाच वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून काम करणारे असतील त्यांच्या बाबतीत काय करता येईल याचा विचार शासन करीत आहे. तसेच आदिवासी भागात काम करणारे कर्मचारी, जे आदिवासींचे राहणीमान, बोली भाषा व त्यांच्या संस्कृतीशी समरस झालेले आहेत, जुळवून घेतलेले आहे अशा लोकांच्या बाबतीत काही तरी मार्ग काढता येईल काय या अनुषंगाने दोन तीन बैठका घेण्यात आल्या. आज सुध्दा एक बैठक आम्ही आयोजित केली आहे. अशा प्रकारे या प्रश्नाकडे शासन सहानुभूतीने पाहत आहे. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण जे उपोषण सुरु केले आहे ते कृपया मागे घ्यावे, कारण यातून सकारात्मक दृष्टीकोन ठेवूनच मार्ग काढण्यात येईल असेही सांगू इच्छितो.

--------

..........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यात होत असलेले अवैध रेव्ह पार्ट्यांचे आयोजन
**मु.शी.** :राज्यात होत असलेले अवैध रेव्ह पाट्यांचे आयोजन यासंबंधी श्री अनिल भोसले, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जुहू (मुंबई) येथील ओकवूड हॉटेलमध्ये दिनांक 20 मे, 2012 रोजी टाकण्यात आलेल्या पोलिसांच्या धाडीत अमली पदार्थांचे सेवन केल्याबदल तसेच रेव्ह पार्टी आयोजित करुन त्यात सहभागी झाल्याबद्दल एकूण 92 व्यक्तींना पकडण्यात येणे, त्यापैकी सुमारे 44 व्यक्तींच्या रक्ताच्या नमुन्यांमध्ये अमली पदार्थांचा अंश आढळून 44 जणांचे अहवाल पॉझिटिव्ह आल्याची बाब उघडकीस येणे, अजूनही 50 टक्के व्यक्तींचे अहवाल येण्यास विलंब लागणे, या व्यक्तींमध्ये अनेक हिंदी व मराठी टिव्ही सिरियल कलाकार, फॅशन डिझायनर, उद्योगपती, बिल्डर यांच्या मुलांचा समावेश असणे, यापूर्वी पुणे शहरातील तीन विविध ठिकाणी रेव्ह पार्टीचे आयोजन करुन त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांचे सेवन झाल्याचे त्यावेळी घातलेल्या छाप्यात सिध्द होऊनही संबंधित अमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या तसेच पुरवठादार व्यक्ती व संयोजकां विरोधात गुन्हा दाखल होऊन अद्याप एकाही व्यक्तीविरुध्द शिक्षेची कारवाई पूर्ण न होणे, तसेच मुंबई, पुणेसह, नागपूर या ठिकाणी रेव्ह पार्टयांचे करण्यात येत असलेले आयोजन, त्याकरिता इंटरनेट वरुन देण्यात येणारी निमंत्रणे या सर्वांवर त्वरित पायबंद घालण्याची नितांत आवश्यकता, तसेच ज्या 44 व्यक्तींचे अहवाल पॉझिटिव्ह आले आहेत त्यांना त्वरित अटक करुन त्यांच्यावर कडक कारवाई करणेबाबत पोलिसांकडून होत असलेले अक्षम्य विलंब, यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या मनात निर्माण झालेली चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.आर.आर.पाटील (गृह मंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल भोसले : महोदय, राज्यात विशेष करुन पुणे व मुंबई शहरात ज्या पध्दतीने रेव्ह पार्ट्यांचे आयोजन करण्यात आले व त्या माध्यमातून काही लोकांवर कारवाई झाली होती, काहींवर झालेली नाही, काहींचे अहवाल अद्याप आलेले नाहीत. या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, महापालिका जी बांधकामे अवैध ठरविते अशा ठिकाणच्या हॉटेल्समधून शक्यतोवर अशा अवैध स्वरुपाच्या पार्ट्या आयोजित केल्या जातात. मग त्यासाठी एक दिवसाचा मद्य परवाना घेऊन नेहमीसाठी त्याच परवान्याचा आधार घेऊन पार्ट्या आयोजित केल्या जातात. अशा प्रकारे मद्य परवाना देताना एक दिवसाचा परवाना दिला जातो काय, की त्याची अन्य कोणती प्रोसिजर आहे ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, एक दिवसाचा परवाना आणि एक दिवसासाठी हॉटेल हा प्रकार नव्यानेच ऐकायला मिळत आहे. अशा प्रकारे कोणतेही काम केले असेल अथवा परवाना दिला असेल तर त्याची माहिती घेण्यात येईल. तसेच याबाबत सुस्पष्ट अशी नियमावली तयार करण्यात येईल.

श्री. अनिल भोसले : महोदय, वर्षानुवर्षे त्या एक दिवसाच्या परवान्यावर पार्ट्या चालतात तसेच मद्य परवान्याचा सुध्दा अशा प्रकारे फायदा घेतला जातो. अशा प्रकारे एक दिवसाच्या मद्य परवान्यावर हॉटेल चालविता येते काय ?

श्री. आर.आर.पाटील : हॉटेल्सना परवाना देत असताना पार्किंगची पुरेशी सुविधा आहे काय, ट्राफिक जॅमची परिस्थिती निर्माण होणार आहे काय अशा प्रकारे सर्वच नियमांचे पालन करतील हे पाहूनच परवाना दिला जातो. एक दिवसाचा परवाना घेऊन असे गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आले तर त्यांच्यावर कारवाई करुन चांगली नियमावली सुध्दा तयार करण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन 2007-2008 मध्ये रेव्हपार्टयांवर छापे टाकण्यात आले होते व त्यासंदर्भात नागपूर अधिवेशनात सविस्तर चर्चा झाली होती. काही महिन्यापूर्वी अमली पदार्थांच्या पार्टीवर छापा टाकण्यात आला होता त्यावेळी त्या पार्टीमध्ये आयपीएलचे काही खेळाडू सुध्दा सापडले होते. हॉटेल्स मधील छाप्याच्या दरम्यान मीडियाला घेऊन छापे टाकले जातात हा कोणता प्रकार आहे ? आमच्या सारखे जे मध्यवमवर्गीय लोक आहेत त्यांचे म्हणणे असे आहे की, अमली पदार्थांचा व्यवहार अयोग्य असून तो रोखला गेलाच पाहिजे व त्यासाठी जी काही माध्यमे आहेत ती वापरली गेली पाहिजेत. परंतु मीडियाला घेऊन, चॅनल्स वाल्यांना घेऊन छापे टाकता कामा नये. गृह विभागाने छापे जरुर टाकावेत परंतु ते छापे चॅनल्सला बरोबर न घेता टाका. जे अमली पदार्थांचे सेवन करतात त्यांची तपासणी होऊ द्या, त्यांना शिक्षा होऊ द्या. सन 2007-2008 च्या रेव्ह पार्टीवर छापे टाकून चार वर्षे होऊनही त्याचा निकाल लागला नाही, त्यावेळी जे सॅम्पल्स घेतले गेले होते त्याचे काय झाले ? ठराविक अधिकारीच रेव्ह पार्टयांवर छापे टाकतांना दिसतात त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रभर एकाच अधिकाऱ्यावर रेव्ह पार्टयांवर छापे मारण्याची जबाबदारी टाकण्यात आलेली आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, अशा प्रकारच्या पार्टया असतांना पोलिसांनी कॅमेरे घेऊन छापे टाकता कामा नये. मागील महिन्यातील मुंबईच्या रेव्हपार्टीमध्ये एकंदर 46 व्यक्तींच्या रक्ताचे नमुने घेण्यात आले होते व त्यातील 44 नमुने पॉझीटीव्ह आढळून आले होते. फक्त दोनच नमुने पॉझीटीव्ह आढळून आले नव्हते. दोन व्यक्तींनी ड्रग्ज घेतले नव्हते हे स्पष्ट झालेले आहे. छापा टाकतांना कॅमेरे होते परंतु रिपोर्ट येई पर्यंत त्या दोन व्यक्तींची अवस्था वाईट झालेली असणार हे सत्य आहे. त्या दोन व्यक्ती निरापराध होत्या हे स्पष्ट झालेले आहे. अशा प्रकारे जेव्हा छापे टाकले जातात तेव्हा मीडिया किंवा कॅमेरे घेऊन छापे टाकले जात नाहीत. अलीकडच्या काळात मीडिया फास्ट झालेला आहे. एखाद्या ठिकाणी 10-20 पोलीस किंवा 5-10 पुढारी निघाले की, मीडिया त्यांच्या अगोदर त्या ठिकाणी पोहचलेला असतो. मीडिया गतिमान झाल्याचे हे लक्षण आहे. पोलीस अशा छाप्यांच्या वेळेस कोणालाही बरोबर घेऊन जात नाहीत एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : या प्रकारातील विदारक सत्य मी आपल्याला सांगतो. मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, मीडिया गतिमान झालेला आहे. परंतु मीडियाची गतीमानता एखाद्याला अगदी वर पोहचवेल त्या दिवशी आपल्या सगळयांचे डोळे उघडतील. पोलिसांची गतीमानता जिकडे पाहिजे तिकडे होत नाही व कन्व्हीनियंट ठिक्राणी जर गतीमानता होत नसेल तर ते बरोबर नाही. गतीमानतेची अनेक उदाहरणे मी आपल्याला देऊ शकतो. त्यामुळे सत्य परिस्थितीला सामोरे गेले पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रेव्हपार्टी सुरु असेल व त्या ठिकाणच्या रुम मध्ये आम्ही बसलेलो असलो व त्याचे चित्रीकरण झालेले असेल तर ती समाजाच्या दृष्टीने गंभीर बाब आहे. मुंबई शहर आणि उपनगरातील हॉटेलमध्ये लोक आता पार्टी करण्यास घाबरतात. रेव्ह पार्टीच्या नावाखाली पोलीस हॉटेलवर छापे मारतात त्यामुळे लोक आता हॉटेलमध्ये पार्टी करण्यास धजावत नाहीत. त्यामुळे आज जे वातावरण निर्माण झालेले आहे ते बदलण्याचे काम आपला विभाग करणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, ज्या पाटर्यांमध्ये ड्रग्ज घेतले जात नाहीत अशा पाटर्यांवर पोलिसांची हरकत असण्याचे काहीच काम नाही. ड्रग्ज नाही, इन्फॉर्मेशन नसतांना पोलीस पार्टीमध्ये घुसले व त्यासंदर्भात कोणी तक्रार केली तर त्यासंदर्भात जरुर चौकशी केली जाईल व संबंधितांवर कारवाई केली जाईल.

**उप सभापती** : तोपर्यंत त्यांची अब्रू 2 गेलेली असेल त्याचे काय ? मुंबईमध्ये हल्ली चांगली मंडळी जेवणासाठी हॉटेलमध्ये जायचे म्हटले तर हजारवेळा विचार करतात.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** ....

पूर्वी गुंड हॉकी स्टीक हातामध्ये घेत होते. आता पोलीस अधिकारी हॉकी स्टीक हातामध्ये घेऊन निघतात ही शोभनीय गोष्ट आहे काय ? आज पोलीस कुठेही घुसतात आणि मग त्यांचे प्रमुख कौतुक करतात. जो सर्वसामान्य माणूस व्यवस्थित जगू इच्छितो तो देखील भरडला जातो. त्यामुळे या गोष्टीवर कुठे तरी नियंत्रण हे असलेच पाहिजे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, नियंत्रण आहेच. आज मोठ्या प्रमाणावर तरूण पिढी ड्रग्ज घेत आहे. त्यावर प्रभावीपणे कारवाई केली पाहिजे, अशा प्रकारची अपेक्षा होती. पण मीडिया आणि अन्य बाबीकडे ही लक्षवेधी सूचना झुकायला लागली आहे, असे मला एकंदरीत वाटते आहे. काहीही झाले तरी पोलिसांनी बघूच नये. पोलिसांनी रेडच करू नये असे मला हे सदन सांगणार आहे काय ? त्यामुळे आपल्याला नेमके काय म्हणायचे आहे ते कळू द्यावे. मग मला त्याचे उत्तर देणे सोपे होईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी परत एकदा पाच सहा वाक्यामध्ये माननीय मंत्र्यांना काही प्रश्न विचारणार आहे. अंमली पदार्थांचे सेवन हा आंतरराष्ट्रीय स्तरावरचा गुन्हा आहे. तो रोखला पाहिजे. जे दलाल आहेत, जे विक्री करणारे आहेत त्यांना प्रतिबंध करणे हे कायद्याने बंधनकारक आहे. त्यामुळे पोलिसांनी योग्य पद्धतीने कारवाई केली पाहिजे. आम्ही सुद्धा ज्या कारवाया करण्यात येतात त्या पाहतो. भारतातील महाराष्ट्र हे एकमेव राज्य असे आहे की, रेड करीत असताना मीडिया तेथे पोचतो. आपण म्हणाला की, मीडिया फार अलर्ट झाला आहे. पोलिसांनी माहिती दिल्या शिवाय मीडिया तेथे पोचत नाही. म्हणून त्यावर नियंत्रण आणावे अशी मी अपेक्षा व्यक्त केली. जे शॉटस् मीडिया दाखवत आहे ते बघितल्यावर असे वाटते की, मीडिया हे शॉटस् अंमली पदार्थ रोखण्यासाठी दाखवत आहे की, अजून कसले प्रदर्शन त्यांना करायचे आहे ? असे प्रश्न बघणाऱ्यांच्या मनामध्ये निर्माण होत आहेत. जे निष्पाप आहेत ते देखील आपली मुले इकडे-तिकडे गेली आहेत काय हे शोधत आहेत. गुन्हेगारांपेक्षा पोलिसांची भीती सामान्य माणसांना वाटत असेल तर कुठे तरी कार्यपद्धती आपण बदलणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी येथे माननीय मंत्री महोदयांना एक गंमत सांगू शकेन. येथे मीडियाचा प्रश्न उपस्थित केला म्हणून मी वस्तुस्थिती सांगतो आहे. मी त्या गावाचे व जिल्ह्याचे देखील नाव सांगत नाही. रेड मध्ये ज्यांचा काही संबंध नव्हता त्यांना देखील पोलिसांनी नेले होते. त्यांना डॉक्टरांच्या बाजूला बसवून पी.आय.ने सांगितले की, असे सर्टिफिकेट दे नाही तर तुला बघतो. त्या घटनेचा दिनांक, ठिकाण, त्या इन्स्पेक्टरचे नाव मी आपल्याला खाजगीत सांगेन. अशी जी दादागिरी चालली आहे ती चुकीची आहे. ज्यांचा काहीही संबंध नाही त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात येत आहे. आता आपण सांगाल की, असे होणार नाही याची दक्षता आम्ही घेऊ.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ऐककाळी आपण गृह मंत्र्यांना उत्तरे तयार करून दिलेली आहेत. त्यामुळे मी आता काय उत्तर देणार आहे हे आपल्याला माहीत असणे स्वाभाविक आहे. या लक्षवेधी सूचनेकडे बघताना आपण दोन गोष्टीकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. जीवनातील आनंद लुटण्यासाठी निरपराध लोक पार्टीसाठी जात आहेत, मेजवानीसाठी जात आहेत. त्यांच्या आनंदामध्ये व्यत्यय आणण्याचे काम पोलिसांनी करू नये, असा प्रश्न माननीय सभापती महोदयांनी उपस्थित केला आहे. कायद्याच्या बाहेर जाऊन मारझोड करण्याचे अधिकार कोणालाही नाही. याबाबत योग्य त्या सूचना देण्यात येतील. अलीकडच्या काळात रेव्ह पार्टीचे प्रकार आणि प्रमाण वाढत आहेत याचा देखील सदनाने विचार केला पाहिजे. अतिरेकी हल्ले करून, बनावट नोटा बाजारात आणून, तर कधी देशातील तरूण पिढी उद्ध्वस्त करून देशाला कमकुवत करण्याचा प्रयत्न देशाचे शत्रू करीत आहेत. ड्रग्जमध्ये आयएसआयचा हातभार मोठ्या प्रमाणावर आहे.

यानंतर श्री.सरफरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर. पाटील....

या ड्रग्जमध्ये आय.एस.आय. चा खूप मोठया प्रमाणात हातभार आहे. त्यामधून मिळणारे कोटयवधी रुपये आतंकवादी कारवायांसाठी वापरले जात आहेत. या गोष्टी जागतिक स्तरावर स्पष्ट झाल्या आहेत. या ड्रग्ज पार्ट्यामध्ये सापडलेल्या मुलांचे रेकॉर्ड पाहिले तर या सदनामधील माननीय सदस्यांना किंवा अन्य कुणालाही मिळाले नसतील इतके मेरीटमधील मार्क्स त्यांना मिळालेले आहेत. ही मुले म्हणजे खऱ्या अर्थाने या देशाचे मोठे ॲसेट्स आहे. ही मुले जर या ड्रग्जमध्ये अडकावयास लागली तर त्यामध्ये या देशाचे सुध्दा नुकसान होणार आहे. देशाचे शत्रू जो हेतू डोळयासमोर ठेवून ड्रग्ज पुरविण्याचे काम करीत आहेत त्यांचा हा विजय आहे. या करिता सभागृहाने देखील या बाबतीत खंबीर भूमिका घेणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पाठीशी राहिले पाहिजे.

जे लोक कायदेशीररित्या कुठे मेजवान्या करीत असतील तर त्यांना कुणाचीही आडकाठी राहणार नाही याची सुध्दा दक्षता घेतली पाहिजे. यामध्ये जे इनोसंट आहेत त्यांना सुध्दा लोकांपुढे न आणण्याची दक्षता माध्यमांनी पाळली पाहिजे. पोलिसांनी सुध्दा कॅमेरे घेऊन व स्वत: शूटींग करुन ते माध्यमांना पुरविण्याचे काम करु नये. अधिकाऱ्यांनी प्रसिध्दीचा मोह टाळण्यासाठी त्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या जातील. सभापती महोदय, ड्रग्जमध्ये आजची तरुण पिढी अडकली असल्याबाबत जी माहिती समोर येत आहे त्याकडे गांभीर्याने बघण्याची आवश्यकता आहे. या गोष्टीकडे जे पोलीस अधिकारी गंभीरपणे पहात आहेत,चांगल्या भूमिकेतून पहात आहेत त्यांचे आपण अभिनंदन केले पाहिजे. माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना मला समजल्या असून त्या बाबत संबंधितांना योग्य त्या सूचना देण्यात येतील.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, व्यसनाधीनता ही समाजाला लागलेली एक कीड आहे. शहरातील तरुण मुले दुर्दैवाने या ड्रग्ज माफियांच्या नादी लागून वेगवेगळया प्रकरणांमध्ये गोवली जात आहेत. सभापती महोदय, एक दिवसांचे दारुचे लायसन्स देण्याचा जो प्रकार आहे तो पहिल्यांदा थांबविला पाहिजे. मीडियाबाबत मी सरकारला विनंती करु इच्छितो की, ज्या ज्या ठिकाणी रेड पडतील त्या त्या ठिकाणी मीडियाचे लोक गेले पाहिजेत. जे अशाप्रकारचे वाईट व अनैतिक कृत्य करीत आहेत, हे कृत्य करण्यामागे ज्या एजन्सी काम करीत आहेत त्यांना मीडियाच्या माध्यमातून लोकांसमोर आणले गेले पाहिजे. आज मुबई, पुणे सारख्या शहरामध्ये भयानक प्रकार सुरु आहेत. अशावेळी श्री. वसंत ढोबळे यांच्यासारखा कार्यक्षम अधिकारी मुंबई

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे....

शहरामध्ये काम करीत असेल तर त्याच्या पाठीशी शासनाने उभे राहिले पाहिजे. या अधिकाऱ्यामुळे या शहरातील पब्ज, बारवाल्यांमध्ये एक प्रकारची दहशत निर्माण झाली आहे. म्हणून माझा असा प्रश्न आहे की, पोलीस अधिकारी छापे घालण्यासाठी सोबत मीडियाला घेऊन जात नसतील तर यापुढे मीडियाला सोबत घेऊन जाण्याबाबत आपण त्यांना आदेश देणार काय?

दुसरा प्रश्न असा की, श्री. वसंत ढोबळेंसारखा एक प्रामाणिक अधिकारी या मुंबई शहरामध्ये छापे टाकण्याचे काम करीत आहे, त्याच्या पाठीशी हे शासन उभे राहिल काय? तिसरा प्रश्न असा की, छाप्यामध्ये ज्या लोकांना पकडले जाते त्यांना पाच-पाच वर्षाच्या शिक्षेची तरतूद आपण करणार काय? जेणेकरुन अशी शिक्षा झाल्यामुळे तरुणांमध्ये देखील दहशत निर्माण होईल. या मधून मुंबई, पुणे शहरातील तरुण, सुशिक्षित मुले वाईट मार्गाला जाण्यापासून वाचतील. सभापती महोदय, प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याच्या हातामध्ये दंडुका असल्याशिवाय तो शोभून दिसणार नाही. या करिता दंडुके आणि हॉकी स्टीकचा वापर करुन जी पोलिसांची कारवाई सुरु आहे ती आणखी खंबीरपणे होईल काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, अशा ठिकाणी रेड टाकत असताना मीडियाच्या प्रतिनिधींना घेऊन जावे काय याबद्दल सदनामध्ये टोकाची भिन्न मते मांडण्यात आली आहेत. एका बाजूला असे मत आहे की, मीडियाच्या प्रतिनिधींना बिलकूल बरोबर घेऊन जाऊ नये आणि दुसऱ्या बाजूला मीडियाच्या प्रतिनिधींना घेऊनच रेड करण्यात याव्यात. परंतु सरकार यामध्ये मध्यम मार्ग काढेल. जर सिलेक्टेड ठिकाणी दाखविणे आवश्यक असेल तर प्रतिनिधी तसे करतील.पण मी याच्याशी सहमत आहे की, प्रत्येक ठिकाणी मीडियाच्या प्रतिनिधींना घेऊन धाडी टाकल्या जात नाहीत, रेड टाकल्या जात नाहीत. पण आपण देखील पहातो की, आपण कुठे गेलो तर त्याठिकाणी मीडिया पोहोचतो याचा अर्थ आपण त्यांना कळवून जातो अशातला भाग नाही. त्यांचा वावर सगळीकडे आहे. एखाद्या हॉटेल मध्ये रेड पडत असेल तर तेथे ज्या मुली असतात, त्यांना दाखविण्यात येऊ नये अशा पध्दतीच्या सूचना दोघांनाही शासनाच्या वतीने देण्यात येतील.

सभापती महोदय, जे अधिकारी चांगले काम करतात, ज्यांचा हेतू चांगला आहे त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे रहाण्याची भूमिका शासनामार्फत घेतली जाईल हे सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर आहे.यामध्ये ज्या शिक्षेची तरतूद आहे ती कडक स्वरुपाची आहेच. तरी सुध्दा यातील कन्व्हीक्शन रेट वाढविणे आवश्यक आहे. काही ठराविकच अधिकाऱ्यांनी या गोष्टीचा चांगला अभ्यास केला आहे म्हणून ते धाडी टाकत आहेत. तसेच अनेक अधिकाऱ्यांना खसखशीची झाडे ही अफूची झाडे असतात हे माहिती नव्हते. म्हणून ती झाडे दाखवून याला अफू म्हणतात, याला गांजा म्हणतात असे सांगावे लागले. कारण त्यांनी ही झाडे कधी पाहिलेलीच नाहीत तर मग त्यांना कसे कळणार? त्यामुळे आतापर्यंत ज्या अधिकाऱ्यांनी रेड टाकलेल्या आहेत, त्यांनी या संबंधात खूप चांगली माहिती मिळविलेली आहे. याबाबतीत वर्कशॉप घेऊन बाकीच्या अधिकाऱ्यांना सुध्दा ट्रेंड केले जाईल की ज्यामुळे रेड टाकण्याचे प्रमाण वाढविता येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याठिकाणी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, अद्यापही 44 व्यक्तींच्या संबंधातील अहवाल यावयाचे आहे. माझा असा प्रश्न आहे की, हे अहवाल प्राप्त न होण्याचे कारण काय आहे? जर बाकीच्या लोकांचे अहवाल आले तर या 44 लोकांच्या बाबतीत अहवाल का आले नाहीत ? तसेच मी मागील अधिवेशनाच्या वेळी देखील सन्माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली होती की, सध्या रस्त्यावर कचरा वेचणारे लोक हे ड्रगचा व्यवसाय करतात.पार्ला येथील साठे कॉलेजच्या बाहेर किंवा सहार रोडवर हे प्रकार सुरु आहेत. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले होते की, आम्ही याबाबतीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

ॲक्शन घेऊ. त्यानंतर तेथे रेड टाकली असता ड्रग सापडले आहेत. परंतु आपल्या पोलिसांनी ही रेड टाकलेली नव्हती. उलट तेथील स्थानिक लोकांनी रेड टाकून संबंधितांना मारुन बाहेर काढले आणि मग पोलिसांना बोलविण्यात आले. माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे आहे की, याबाबतीत आमच्याकडून सजेशन पाहिजे. परंतु जेव्हा आम्ही सजेशन देतो तेव्हा त्याबाबतीत ॲक्शन होत नाही. त्यामुळे ज्या अधिकाऱ्यांनी पार्ला येथे कारवाई केली नव्हती, त्या अधिकाऱ्यांवर सरकार कारवाई करणार आहात काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला आहे की, केवळ 46 जणांचे नमुने आले, उर्वरित लोकांचे का आले नाहीत ? याबाबत सांगावयाचे तर फॉरेन्सिक लॅबमध्ये कामाचा लोड असल्यामुळे ते तपासण्यास वेळ लागत आहे. जेवढ्या लोकांचे रिपोर्ट तपासून झाले आहेत, त्याबाबतचा पहिला रिपोर्ट पाठविला आहे.उर्वरित नमुने सुध्दा तीन-चार दिवसामध्ये प्राप्त होणार आहेत. त्यासंबंधात मी सकाळीच माहिती घेतलेली आहे. उर्वरित नमुने सुध्दा आठवड्याभरामध्ये फॉरेन्सिक लॅब कडून संबंधित पोलीस स्टेशनला पाठविले जातील. ड्रगच्या बाबतीत केंद्र शासनाची एजन्सी आपल्या राज्यामध्ये काम करते आणि आपले लोक देखील काम करीत आहेत. ही गोष्ट खरी आहे की, याबाबतीत आपला ॲन्टी नार्कोस्टीक हा सेल आहे त्यासाठी त्यांना लागणारे मनुष्यबळ, तेथील अधिकारी यांची संख्या खूप कमी आहे आणि दिवसें दिवस या संकटाची व्याप्ती वाढत चालली आहे. त्यामुळे तो सेल सुध्दा मजबूत केला जाईल. पण तसे करीत असताना आपण कितीही संख्या वाढविली तरी त्याला मर्यादा रहाणारच आहे. म्हणून स्थानिक पोलीस स्टेशनला सुध्दा अशा गंभीर बाबींकडे लक्ष देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, याठिकाणी हॉकी स्टीकबाबत उल्लेख करण्यात आला. जर कोणी हॉकी खेळत असेल आणि नंतर कळले की, ही रेड आहे तर मग हॉकीची काठी फेकून द्यावयाची काय? त्यामुळे हॉकी स्टीक घेऊन गेले तर त्याचा वेगळा अर्थ काढला जात आहे. पण मी त्यांच्या एका मताशी सहमत आहे. काही अधिकारी थोडे आऊट ऑफ वे जाऊन काही गोष्टी करतात. पण त्यांचे इन्टेन्शन बोनाफाईड आहे. ज्यांचे इन्टेन्शन बोनाफाईड आहे व जे पैशासाठी या गोष्टी करीत नाहीत त्यांना पाठबळ देणे हे शासनाचे कर्तव्य ठरते. पण तरीसुध्दा कोणीही कायद्याचे उल्लंघन करु नये या सूचना शासनाच्यावतीने देण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुलुंड-गोरेगाव लिंक रोडवरील नाहूर रेल्वे पुलाचे रुंदीकरण व नूतनीकरण करण्याच्या कामाकडे होत असलेले दुर्लक्ष

**मु. शी.** : मुलुंड-गोरेगाव लिंक रोडवरील नाहूर रेल्वे पुलाचे रुंदीकरण व नूतनीकरण करण्याच्या कामाकडे होत असलेले दुर्लक्ष यासंबंधी श्री. चरणसिंग सप्रा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. चरणसिंग सप्रा ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई पूर्व द्रुतगती महामार्गवरील मुलुंड येथील मुलुंड-गोरेगांव लिंक रोडच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण झालेले असणे, परंतु सदर रोडवरील नाहुर रेल्वे पुल हा अरुंद व जुना असल्यामुळे येथे वाहतुकीची नेहमी फार मोठा प्रमाणात निर्माण होत असलेली कोंडी, प्रवाशाचे होत असलेले आतोनात हाल, सदर रेल्वे पुलाचे रुंदीकरण आणि नूतनीकरण करण्यात यावे अशी जनतेची मागील 8 ते 9 वर्षापासूनची होत असलेली मागणी, यासंदर्भात लोकप्रतिनिधी सतत पाठपुरावा करणे, परंतु महानगरपालिका आणि रेल्वे विभागाचे याकडे जाणूनबुजुन होत असलेले दुर्लक्ष, परिणामी परिसरातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, मुलुंड गोरेगाव लिंक रोडचे ॲक्विझिशन 1970 मध्ये झालेले आहे. नाहूर रेल्वे उड्डाण पूल 50 वर्षापूर्वी बांधलेला आहे. 50 वर्षानंतर आता तो पूल मोडकळीस आलेला आहे. 50 वर्षापूर्वी जेव्हा हा पूल बांधण्यात आला तेव्हा मुलुंडची लोकसंख्या 1 लाखापर्यंत होती. आता ती लोकसंख्या वाढून साडेचार ते पाच लाख झालेली आहे. लोकसंख्या वाढली म्हणून महानगरपालिकेने 2000 साली मुलुंड-गोरेगाव लिंकरोडच्या रुंदीकरणाचे काम हाती घेतले. 2000 साली ते काम झाले पण त्या रुंदीकरणामध्ये येणारा हा पूल महापालिकेने तसाच सोडून दिलेला आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, मुंबई महानगरपालिकेकडून जाणूनबुजून दुर्लक्ष होत आहे, हे खरे नाही. जर हे खरे नसेल तर हा नक्की अधिकाऱ्यांचा आळशीपणा आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

सभापती महोदय, या रोडचे ॲक्विझिशन 1970 मध्ये झाले आणि त्या रोडवर 50 वर्षे अगोदर पूल बांधलेला आहे. त्या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम दहा वर्षे अगोदर महानगरपालिकेने केलेले आहे ते करताना तो पूल सोडून बाकीचा पूर्ण रोड बांधलेला आहे. त्यामुळे हा आळशीपणा नाही तर काय आहे ? महानगरपालिकेने उत्तरामध्ये जनरल ॲरेजमेंट ड्रॉईंग असा उल्लेख केला आहे. ती जनरल ॲरेजमेंट ड्रॉईंग महानगरपालिकेने ऑक्टोबर, 2011 मध्ये रेल्वेकडे पाठविलेली आहेत. एका रोडच्या रुंदीकरणाचे काम 2000 साली होते आणि त्यामधला एवढ्या भागाच्या बाबतीत 2011 मध्ये परवानगीसाठी किंवा एनओसीसाठी ती ड्रॉईंग रेल्वेकडे जात आहे. हा आळशीपणा नाही तर काय आहे ? हा जो विलंब झालेला आहे त्यामुळे साडेचार ते पाच लाख लोक लोकांना त्रास होत आहे. एखाद्या रुग्णाला ॲम्ब्युलन्समधून तत्काळ रुग्णालयात घेऊन जात असेल आणि तो जर वाहतुकीच्या कोंडीत सापडला तर तो नक्की दबावला जाईल. हा विषय अतिशय गंभीर आहे. 2011 मध्ये जीएडीची जी ड्रॉईंग पाठविली आहे त्या विलंबाच्या बाबतीत शासन संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करणार का ?

सभापती महोदय, आता दिल्लीला जी जनरल ॲरेजमेंट ड्रॉईंग पाठविली आहे ती ड्रॉईंग रेल्वे बोर्डापर्यंत जाणार आहे तिथून महापालिकेला एनओसी घेऊन यावे लागेल. यासाठी आपण माननीय आयुक्त यांना कालावधी ठरवून देऊन त्यांच्यावर ही एनओसी घेऊन येण्याची जबाबदारी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चरणसिंग सप्रा .....

सोपविणार का ? या उड्डाण पुलाची एनओसी जर आली तर त्यानंतर त्या कामाकरिता पैशाची तरतूद करण्यासाठी विलंब लागू शकतो. तो विलंब लागू नये म्हणून आपण पैशाची तरतूद करण्याच्या दृष्टीने हा उड्डाणपूल बांधण्याच्या कामाचे एस्टिमेट अगोदर तयार करुन मंजूर करुन घ्यावे. त्यामुळे एनओसी आल्यानंतर लगेच काम सुरु होऊ शकते आणि ज्या कामासाठी 10 ते 11 वर्षाचा विलंब लागलेला आहे तो प्रश्न सोडविता येईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मुंबईतील अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मुलुंड ते गोरेगाव या लिंक रोडचे रुंदीकरण अतिशय चांगल्या प्रकारे झालेले आहे, बांधकाम चांगले झालेले आहे परंतु केवळ या पुलामुळे त्या ठिकाणी जो बॉटल नेक तयार होतो त्यामुळे ट्राफिक पूर्णपणे जाम होतो या संदर्भातील प्रश्न सन्माननीय सदस्यांनी केवळ या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहामध्येच विचारलेला आहे असे नाही तर या बाबत सन्माननीय सदस्यांनी गेली अनेक वर्षे सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारले. त्याचे उत्तर देण्यापूर्वी एक गोष्ट मला सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाची आहे की, मुळात हा रस्ता महानगरपालिकेने केला परंतु पूल केला नाही याचे कारण असे आहे की, हा रेल्वे क्रॉस ब्रीज आहे. रेल्वेला क्रॉसींग करणारा हा पूल आहे. त्यामुळे मध्य रेल्वेच्या परवानगीशिवाय या पुलाचे बांधकाम करता येणार नाही.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

म्हणून सेंट्रल रेल्वेकडे बांधकामाची परवानगी मागितलेली आहे. ती परवानगी अद्याप देण्यात आलेली नाही. या प्रकरणाचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांवर सोपवावी असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले.

आज सकाळी आम्ही या संदर्भात चर्चा केली. ही जबाबदारी केवळ मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांवर टाकून आम्ही थांबणार नाही. आमच्या नगरविकास खात्याचे सचिव हे अन्य कामाकरिता, युडी-2चे प्रस्ताव मंजूर करुन घेण्याकरिता दिल्लीला जात असतात. तेव्हा त्यांच्यावर ही जबाबदारी टाकलेली आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी केन्द्रातील सरकारमध्ये काम केलेले असल्यामुळे त्यांचे दिल्ली दरबारी चांगले वजन आहे. तेव्हा केवळ मुलुंड-गोरेगाव लिंक रोडच्या बाबतीत नाही तर विद्याविहार, विक्रोळी आणि मुलुंड-गोरेगाव लिंकरोड असे मुंबईतील तीन कामांचे प्रस्ताव केन्द्र शासनाकडून मंजूर करुन घेण्याकरिता खास प्रयत्न आम्ही करणार आहोत.

या कामासाठी बजेटरी प्रोव्हीजन करावी असेही सन्माननीय सदस्यांनी सांगितले. काही वेळा सेंट्रल रेल्वे, क्रॉसिंगचा भाग आम्ही बांधून देतो आणि दोन्ही बाजूचे ॲप्रोच रस्ते स्थानिक संस्थेने म्हणजे महापालिकेने, एमएमआरडीएने किंवा एमएसएसआरडीसीने करावे असे सांगते. त्या बाबतीत निर्णय झालेला नाही. काही वेळा एकूण एस्टिमेटच्या 50 टक्के रक्कम देण्याची तयारी सेंट्रल रेल्वेकडून दर्शविली जाते. या बाबतीतही निर्णय झालेला नाही. तेव्हा हे निर्णय झाल्या शिवाय या पुलाच्या कामाचे निश्चित एस्टिमेट सांगता येणार नाही. या कामासाठी महापालिकेने आर्थिक तरतूद केलेली आहे.

श्रीमती अलका देसाई : तांत्रिक सल्लागाराची नेमणूक केव्हा करण्यात आलेली आहे, या 11 वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र शासन आणि रेल्वे प्रशासन या दोघांनी या कामाच्या बाबतीत काय प्रगती केलेली आहे, राहिलेल्या कामामध्ये केव्हा प्रगती होईल ?

श्री. भास्कर जाधव : सर्व गोष्टींचा विचार करता कोणत्याही परिस्थितीमध्ये येत्या 3 महिनामध्ये या कामाला परवानगी मिळण्याची अपेक्षा आहे.

श्री. हेमंत टकले : या कामावरुन एकूणच प्रशासकीय यंत्रणा कशा प्रकारे काम करीत आहे हे दिसून येते. आता आयटी क्षेत्रामुळे आपली कामे अतिशय वेगाने होऊ शकतील, ऑफिस





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

पेपरलेस होतील असे आपण म्हणत असतो. तेव्हा जी कागदपत्रे आपल्याला दिल्लीला पाठवायची आहेत ती आपण इंटरनेटच्या माध्यमातून पाठवून शकत नाही काय ? त्या बाबतीत काही ऑब्जेक्शन्स असतील तर ती त्यांनी इंटरनेटच्या माध्यमातून आपणास कळवावीत आणि आपणही त्याचा कम्प्लायन्स इंटरनेटच्या माध्यमातून करावा जेणेकरुन कागदांची भलीमोठी फाईल तयार करुन ती दिल्लीला घेऊन जावी लागणार नाही. नाही तर फाईल मंजुरीसाठी दिल्लीला घेऊन जाणे आणि पुन्हा त्या फाईलीचा सेंट्रल रेल्वे प्रशासन, त्यानंतर नगरविकास खाते, त्यानंतर महापालिका असा उलट प्रवास होणे यामध्ये खूप कालापव्यय होतो. सन्माननीय सदस्य श्री. चरणसिंग सप्रा यांनी सांगितल्या प्रमाणे जो 4-5 लाख लोकांचा प्रश्न होता तो कामाच्या बाबतीत निर्णय होईपर्यन्त 10 लाख लोकांचा प्रश्न होण्याची शक्यता आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिल्लीत चांगले काम केले असल्यामुळे त्याचा फायदा होतो. तसेच माननीय मुख्यमंत्री हे आय.टी.मध्ये देखील प्रवीण आहेत. तेव्हा या सर्व गोष्टी विचारात घेऊन हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी माननीय मंत्री महोदय काही पावले उचलणार आहेत काय ?

...नंतर श्री. अजित...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेने या प्रकरणी गांभीर्याने, आस्थेने व संभाव्य होणाऱ्या अडचणीची दखल घेऊन जेवढा पाठपुरावा करायला पाहिजे होता तेवढा केलेला नाही ही गोष्ट सत्य आहे. निवेदनात स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, "दिनांक 17.10.2011 पासून सातत्याने पाठपुरावा करण्यात आलेला आहे, सातत्याने स्मरणपत्रे पाठविलेली आहेत." ई-मेल द्वारे किंवा पत्राद्वारे पाठपुरावा झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना मी सांगू इच्छितो की, ई-मेलद्वारे माहिती देणे किंवा घेणे एवढेच शक्य होऊ शकते. परंतु निर्णय घ्यावयाचा असल्यास आपणास फेस-टू-फेस चर्चा केल्याशिवाय पर्याय नाही. आपणास कोणत्याही परिस्थितीमध्ये हा विषय तीन महिन्यात मार्गी लावावा लागेल. त्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझ्या माहिती प्रमाणे महाराष्ट्रातील प्रश्नांच्या संदर्भात केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यासाठी एक यंत्रणा आहे. आता ती यंत्रणा अस्तित्वात आहे किंवा कसे याची मला माहिती नाही. परंतु अशी यंत्रणा आहे अशी माझ्याकडे माहिती आहे. माझा प्रश्न आहे की, या प्रश्नाच्या संदर्भात महानगरपालिकेने त्या यंत्रणेचा वापर करुन केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला होता काय ? ही यंत्रणा सक्षम नसल्यामुळे महाराष्ट्रातील अनेक प्रश्न केंद्र सरकारकडे मार्गी लागत नाही. तेव्हा ही यंत्रणा सक्षम करण्यासाठी शासन काही पावले उचलणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अशी एखादी यंत्रणा अस्तित्वात असल्यास ती फक्त एका विभागाच्या विषया संबंधी पाठपुरावा करण्यासाठी असणार नाही. ती यंत्रणा सर्व विभागांकरिता असेल आणि अशी यंत्रणा सर्व विभागांकरिता असते तेव्हा काय परिस्थिती असते हे आपणास माहीत आहे. तेव्हा आम्ही या प्रश्नाचा वैयक्तिकरित्या पाठपुरावा करण्याचे ठरविले आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या यंत्रणेचा देखील उपयोग करुन घेण्यात येईल. या प्रश्नाची जबाबदारी आम्ही घेतली असल्यामुळे हा विषय तीन महिन्यात मार्गी लागण्याचा प्रयत्न करणार आहोत.

सन्माननीय सदस्यांनी सदर यंत्रणा सक्षम करण्यात येईल काय असा प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, या प्रश्नाचे उत्तर आता देणे अवघड आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. पुणे आणि नाशिक येथून येणारी वाहतूक पश्चिम उपनगराकडे जाते आणि ही सर्व वाहतूक या ब्रिजवरुन जाते. हा ब्रिज सोडून बाकीचे रस्ते सहा पदरी केलेले आहेत. मुलुंड (पश्चिम) येथे वोखार्ड आहे. जर मुलुंड (पूर्व) येथील रुग्णाला वोकार्ड रुग्णालयात न्यायचे असेल तर रुग्णाला रुग्णवाहिकेमधून याच मार्गे न्यावे लागते. या ब्रिज नंतर मुंबई शहरात अनेक ब्रिज झालेले आहेत. तेव्हा ब्रिजचे काम उशिराने होण्याची कारणे काय आहेत ? या ठिकाणी सांगण्यात आले की, रेल्वे विभाग हा केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. दिल्लीमध्ये आपले आयुक्त कार्यालय आहे. या प्रश्नाच्या संदर्भात त्या कार्यालयाकडे पाठपुरावा केला आहे काय, त्यांनी जर काही कार्यवाही केली नसेल तर त्यांना आपण जाब विचारणार आहात काय, हा प्रश्न किती दिवसांत मार्गी लावणार आहात ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हा प्रश्न तीन महिन्यात मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न आहे असे मी यापूर्वीच सांगितलेले आहे. महानगरपालिकेकडून ज्या गांभीर्याने पाठपुरावा व्हावयास पाहिजे होतो तसा तो झालेला नाही हे देखील मी कबूल केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरावे. कोणाला जबाबदार धरण्यापेक्षा हा विषय मार्गी लावण्यास आपण प्राधान्य देत आहोत.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गेल्या दोन वर्षात पुण्यात एक हजारांहून अधिक महिलांचा भाजून झालेला मृत्यू

**मु. शी.** : गेल्या दोन वर्षात पुण्यात एक हजारांहून अधिक महिलांचा भाजून झालेला मृत्यू या संबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुण्यात गेल्या दोन वर्षात एक हजारांहून अधिक महिलांचा भाजून मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती नुकतीच उघडकीस येणे, यावरून महिलांच्या आरोग्यासह कौटुंबीक स्थितीबाबतही प्रश्न चिन्ह निर्माण होणे, सन 2010 आणि 2011 या दोन वर्षात पुण्यासारख्या पुढारलेल्या आणि सांस्कृतिक शहरात 1005 महिलांचा मृत्यू झाल्याची नोंद असून मृत्यूचे कारण समजू शकले नाही, तरी कौटुंबीक कलहातून महिलांनी रागाच्या भरात रॉकेल ओतून पेटवून घेतल्याच्या किंवा त्यांना पेटविल्याचे प्रकार घडल्याचा अंदाज व्यक्त होणे, सदरहू आकडेवारीवरुन पुण्यातील महिलांचे आयुष्य अत्यंत दाहक होत चालल्याने त्यावर नियंत्रण आणण्याकरिता कठोर उपाययोजना तसेच कडक कायदे करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मागील दोन वर्षात पुण्यात एक हजारांहून अधिक महिलांचा भाजून मृत्यू झालेला आहे. या संबंधात एखादी कौटुंबीक केस कौटुंबीक न्यायालयात किंवा तिच्या माहेरच्या पोलीस स्टेशनला नोंदविली आहे किंवा नाही याची माहिती न घेता त्या महिलेच्या मृत्यूची अपघाती नोंद पोलीस स्टेशनला केली जाते. महिलांचे मोठ्या प्रमाणावर सासरी मृत्यू होतात. अशा प्रकारच्या अपघाती मृत्यूची तीच तीच कारणे सांगितली जातात ,स्टोव्हचा भडका उडाला, अंगावर चिमणी पडली, गादी पेटली, रॉकेलचा कॅन चुलीत पडला अशी कारणे दिली जातात व या कारणांवर पोलीस अधिकारी विश्वास ठेवतात

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

आणि अशा मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींचा अत्यंसंस्कार करण्यासाठी ताबडतोबीने परवानगी मिळते. पोलीस विभागाकडे फाईल झालेली प्रकरणे अनेक आहेत. त्या प्रकरणांची आपण एकदा पाहणी करावी. 50 टक्के भाजलेली महिला ही मृत्युमुखी पडते. मृत्युपूर्व जबानी होईपर्यंत त्या प्रकरणाची पूर्णपणे वासलात लागलेली असते. विहिरीमध्ये पडणे, उंच मजल्यावर पडून झालेले मृत्यू, दरीतून पडणे, टू व्हीलरवर असताना फक्त पत्नी कुठे तरी पडणे आणि तिचा त्यात मृत्यू होणे, गरम पाणी करण्यासाठी हिटरचा जो रॉड असतो त्यास हात लावला तर शॉक बसतो. तशा प्रकारे शॉक लागून महिलांचा मृत्यू होणे, गाडी पाठीमागे घेत असताना पत्नी चिरडून मरणे असे पाच, सहा प्रकार अपघात म्हणून दाखविले जातात.

महोदय,मी या बाबतीत कोणावर संशय घेणार नाही. तरीही त्यांच्यात कौटुंबीक तंटा होता काय, त्याची केस पोलीस स्टेशनला प्रलंबित होती काय, कौटुबीक न्यायालयामध्ये त्यांनी काही प्रयत्न केले होते काय, या बद्दलची माहिती घेतल्या शिवाय मला असे वाटते की, अशा प्रकरणांच्या बाबतीत ताबडतोबीने गुन्हा दाखल झाला नाही तरी सुध्दा अशा प्रकरणांची चौकशी केली पाहिजे. या चौकशी प्रोसीजरमध्ये काही बदल कराल काय असा माझा प्रश्न आहे. चंद्रशेखर धर्माधिकारी समितीचा उल्लेख केलेला आहे. परंतु दुर्देवाने समिती या तपशीलापर्यंत अजूनही पोहोचलेली नाही. गेल्या दोनृ तीन वर्षामध्ये अशा प्रकारची शेकडो प्रकरणे होऊन गेली आहेत. गॅसने गुदमरुन मृत्यू अशा प्रकरणांमध्ये जो पर्यंत क्लिअरकट हा अपघात नाही, हा अपघातच आहे यासंबंधी सासरचे आणि माहेरचे लोकांकडून खात्रीलायक माहिती येत नाही, तो पर्यंत गुन्हा दाखल न करता सुध्दा त्याची माहिती एकत्र करुन ती माहिती तपासणीसाठी सी.आय.डी.कडे वर्ग करण्याच्या संदर्भात शासन विचार करील काय ?

श्री.आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी एका गंभीर प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधले आहे. या बाबतीत शासनाने अगोदरच या गंभीर बाबतीत विचार सुध्दा केलेला आहे आणि त्या दृष्टीने काही उपाय सुध्दा योजले आहेत. न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती, त्या समितीने या बाबतचा अभ्यास करुन दोन अंतरिम अहवाल सुध्दा शासनाला दिलेले आहेत. त्या अहवालातील जास्तीत जास्त गोष्टी शासनाने

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

स्वीकारलेल्या आहेत. एकंदरीत स्टोव्हच्या भडक्याने, दिवा पडून भाजून झालेल्या मृत्यूंची माहिती ही थोडीशी धक्कादायक आहे. राज्यात सन 2008 मध्ये 1896 महिलांचे मृत्यू स्टोव्हच्या भडक्याने व दिवा पडून भाजल्यामुळे झालेले आहेत. 2009 मध्ये 1998, तसेच 2010 मध्ये 2011 आणि 2011 या वर्षात 2021 महिला मृत्युमुखी पडलेल्या आहेत. अशा महिलांच्या संदर्भात त्यांच्या सासरच्या अथवा माहेरच्या लोकांना माहिती असेल, तर काही वेळेला माहेरचे लोक पुढे येतात. त्यांच्याकडून सांगितले जाते की, हुंडयासाठी छळ केला जात होता. दुसरे लग्न करण्यासाठी छळ केला जात होता. अशा वेळी पोलीस यंत्रणा अतिशय बारकाईने तपास करीत असते.

पुणे येथे 2010 व 2011 या दोन वर्षात अशा प्रकारच्या 187 घटना घडलेल्या आहेत. त्यातील 57 घटना अशा आढळून आल्या आहेत की, त्या महिलांचा छळ जीवंत असताना नवरा, सासू, सासरे, जवळचे नातेवाईक करीत होते. कौटुंबीक कलहामुळे महिलांनी जाळून घेण्याच्या घटना जवळपास 57 आहेत. येथे सुध्दा आत्महत्येस प्रवृत्त करण्यासंबंधीचे गुन्हे नोंदले जाऊ शकतात. ज्यांची काहीच हिस्ट्री नाही, शेवटच्या टप्प्यामध्ये कोणाचा मृत्यू झाला तर डाईंग डिक्लरेशनमध्ये त्या महिला देखील माहिती देत नाहीत. माहेरची माणसे दु:खात असतात, ती काही माहिती देत नाहीत, आमची काही तक्रार नाही असे पोलीस स्टेशनला लिहून देतात. त्यामुळे पोलिसांचे हात बांधले जातात. पण अशा घटनांची वाढणारी संख्या लक्षात घेताना स्टोव्हचे भडके का वाढले आहेत याच्या खोलात जाण्याची आवश्यकता आहे. मी एवढेच सांगतो की, जो चौकशी अधिकारी असतो, तो ज्या घटनेची चौकशी करतो आहे, त्याने आपला अंतिम तपास केला तर चौकशी अधिकाऱ्याच्या वरच्या एका टप्प्याचे अधिकारी तो तपास बरोबर केला आहे किंवा नाही, त्या चौकशीत काही त्रुटी आहेत काय, या गोष्टी तपासून बघतील. वरच्या अधिकाऱ्याला एखाद्या गोष्टीच्या बाबतीत संशय आला तर तो अधिकारी त्या गोष्टीची पुन्हा चौकशी करु शकेल.

राज्यामध्ये अशा प्रकारच्या मृत्यूच्या घटना घडत आहेत, त्या एकूण केसेस मधील किमान 5 टक्के केसेस त्या त्या जिल्हयातील सी.आय.डी.कडे चौकशीसाठी वर्ग केल्या जातील. टप्प्यावरचे अधिकारी प्रकरणाचा तपास करतीलच. ज्या प्रकरणामध्ये संशय येतो आहे, ज्या प्रकरणाच्या संदर्भात तक्रारी आहेत, निनावी पत्रे आलेली आहेत, अशा प्रकारच्या 5 टक्के केसेस जिल्हयातील

3...



ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.अजित 15:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील..

सी.आय.डी.कडे सोपवून  त्या प्रकरणांची चौकशी करण्यात येईल. अशा प्रकारचे धक्कादायक मृत्यू सहन करावयाचे नाही अशा प्रकारची सरकारची भूमिका आहे. त्यासाठी जे म्हणून उपाय करावे लागतील ते शासनामार्फत केले जातील.

यानंतर श्री. कानडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 4.....

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांचे मी आभार मानते. त्यांनी 5 टक्के केसेच्या संदर्भात पाऊल उचलले आहे. त्यामधून जी वस्तुस्थिती समोर येईल त्यातून अजून काही पुढे जाता येऊ शकेल. सभापती महोदय, आगीच्या भडक्याने झालेल्या मृत्यूसोबतच दरीत ढकलून देखील मृत्यू झाल्याच्या घटना घडत आहेत. आजच बोर घाटात महिलेला दरीत ढकलून देण्यात आले. फिरायला म्हणून घेऊन गेले आणि दरीत ढकलून दिले आहे. महाबळेश्वर येथे देखील गेल्या वर्षी अशाच प्रकारच्या तीन घटना घडल्या होत्या. ज्या संशयास्पद घटना असतील म्हणजे विहिरीमध्ये पडून मृत्यू झाल्याची घटना असेल अशा घटनांचा यामध्ये समावेश करणार काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, तपासी अधिकारी अशा संशयास्पद मृत्यूच्या प्रकरणांची फाईल तयार करीत असताना आणि फायनल निष्कर्षावर येत असताना याला अपवाद होत असेल तर एक टप्पा वरचा अधिकारी ही फाईल बघेलच. त्याला जर संशय आला तर निश्चितपणाने सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल. मी जरी जेवढे मृत्यू होत आहेत त्याच्या 5 टक्के असे जरी म्हटले असले तरी चुकीचा मेसेज जाऊ नये म्हणून मी स्पष्ट करु इच्छितो की,वरिष्ठ अधिकारी तपास करीत असताना त्याला जरा जरी कुठे संशय आला तरी ती सर्व प्रकरणे सी.आय.डी.कडे पाठविली जातील. यापुढच्या काळामध्ये अशा घटनांमधून मृत्यू झाला तर जे तपासी अधिकारी आहेत ते तपास करतीलच. त्याने केलेल्या तपासात कोणत्या त्रुटी आहेत काय याचा तपास एक टप्प्यावरील वरिष्ठ अधिकारी करीलच. यामध्ये दोघांपैकी कुणालाही एकाला संशय येत असेल आणि कुणीही संशय व्यक्त करीत असेल तर अगदी नातेवाईक असतील तरी सुध्दा ती प्रत्येक केस सी.आय.डी.कडून व्हेरीफाय करुन घेतली जाईल तपासून घेतली जाईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : धन्यवाद.

------

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी./मु. शी.** : गेवराई,जि.बीड येथील उर्दू महाविद्यालयात शिक्षकांची पदे भरणे याबाबत ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

" मागील अकरा वर्षापूर्वी गेवराई,जि.बीड येथील उर्दू कनिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक शिक्षकांचे पद निर्मितीचे प्रस्ताव तयार न करणे व संच मान्यता न घेणे, उपसंचालकांची मान्यता न घेणे, 2001 मध्ये जिल्हा परिषद बीड यांनी सदर उर्दू कनिष्ठ महाविद्यालय सुरु केले,त्यापूर्वी विद्यार्थ्यांना बीड किंवा इतरत्र जावे लागत होते. अर्जून-निदा-ए-उर्दू या स्वयंसेवी संस्थेने पुढाकार घेऊन उर्दू 11 वी 12 वी ची मान्यता मिळवली. या महाविद्यालयासाठी पाच शिक्षक आवश्यक होते. परंतु फक्त दोनच शिक्षकांवर वर्ग चालतात. सदरची शाळा 100 टक्के अनुदानित शाळा आहे. तेव्हा 11 वर्षे दुर्लक्षित झालेल्या पदनिर्मितीचे प्रस्ताव करुन त्वरित मंजूर करणे, यासाठी शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना."

------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :उल्हासनगर शहरातील 200 धोकादायक इमारतीमधील रहिवाशांचे पुनर्वसन याबाबत श्री.निरंजन डावखरे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

" उल्हासनगर शहरातील 200 इमारती धोकादायक असल्याचे उल्हासनगर महापालिकेने जाहीर केलेले आहे. त्यापैकी 172 इमारती अत्यंत धोकादायक असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे या इमारतींमधून कोणीही वास्तव्य करु नये वा या इमारतीजवळ कोणीही जाऊ नये कारण या इमारती जीर्णावस्थेत असून त्याठिकाणी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता असल्याचे महापालिकेने आगाऊ सांगितलेले आहे. या धोकादायक इमारतींच्या यादीत शाळा, रुग्णालये आणि सरकारी कार्यालयांचा समावेश आहे. विशेष म्हणजे या धोकादायक सरकारी इमारती 1992 ते 1995 दरम्यान बांधण्यात आलेल्या असून त्यासाठी निकृष्ट दर्जाचे बांधकाम साहित्य वापरण्यात आले असल्याचे उघडकीस आले आहे. दरम्यान, काही दुर्घटना घडली तर त्यास संबंधित घरमालक व रहिवाशीच जबाबदार असतील असेही महापालिकेने स्पष्ट केलेले आहे. मात्र पावसाळयापूर्वीच हा सर्व्हे झाला असला तरी धोकादायक इमारतींमधल्या रहिवाशांची पर्यायी जागा स्थलांतर करण्याची कुठलीही उपाययोजना करण्यात आलेली नाही आणि त्यामुळे नाईलाजास्तव नागारिकांवर तिथेच राहण्याची ओढवलेली आपत्ती. या पार्श्वभूमीवर रहिवाशांचे पुनर्वसन आणि उपाययोजना करण्याबाबत दूरदृष्टी नसल्याचा स्थानिकांचा आरोप. याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही एवढीच मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाकडे करीत आहे."

------

यानंतर श्री. खर्चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : कृषी उत्पन्न बाजार समिती, चिमूर (जि. चंद्रपूर) मध्ये करण्यात आलेली अवैध नोकर भरती याबाबत श्री.मितेश भांगडिया, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. मितेश भांगडिया (वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांनी मान्यता दिल्यानंतर सभापती व सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, चिमूर यांनी दिनांक 10 मार्च, 2012 रोजी दैनिक लोकमत या एकाच दैनिकात नोकर भरतीची जाहिरात देणे, संचालक मंडळाच्या कोणत्याही सभेत नोकर भरतीचा हा विषय स्वतंत्ररित्या न ठेवता ही नोकर भरती करण्यात येणे, विधान परिषदेच्या निवडणुकीची आचार संहिता लागू असताना ही भरती करण्यात येणे, ही नोकर भरती करताना संस्थेच्या आर्थिक बाबींकडे पूर्णत: दुर्लक्ष करण्यात येणे, सन 2020-11 या आर्थिक वर्षात संस्थेच्या आर्थिक परिस्थतीत घट असताना व अगोदरच सहा कर्मचारी कार्यरत असताना नव्याने तीन कर्मचाऱ्यांची करण्यात आलेली भरती ही पूर्णत: नियमांना डावलून करण्यात आलेली असणे, या भरतीमुळे कर्मचाऱ्यांचे भविष्यातील वेतन देण्यास अडचणी निर्माण होण्याची असलेली शक्यता, या सर्व बाबींचा विचार करता जोपर्यंत संस्थेच्या वार्षिक उत्पन्नात वाढ होऊन संस्थेची आर्थिक परिस्थिती सुधारत नाही तोपर्यंत नव्याने नियुक्ती करण्यात आलेल्या तीन कर्मचाऱ्यांची भरती रद्द करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे."

--------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : गोविंदा पथक व गणपती मंडळांना विमा संरक्षण मिळण्याबाबत होत असलेली मागणी

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महोदय, राज्यातील गोविंदा पथकांना व गणपती विसर्जनाच्या वेळी महापालिका कार्यकर्त्यांचे अपघात होऊन बऱ्याच जणांचे मृत्यू झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. या पथकांना विमा संरक्षणाची मागणी मागील वर्षापासून सातत्याने करण्यात येणे, या मागणीकडे महापालिका व शासन स्तरावर अद्याप कोणताही निर्णय न घेण्यात आल्यामुळे गोविंदा पथक व गणपती मंडळ यांच्यामध्ये पसरलेले निराशेचे वातावरण, गोविंदा पथक व गणपती मंडळ यांना विम्याचे संरक्षण मिळण्याच्या मागणीबाबत अभ्यास करुन निर्णय घेण्याची गरज, यावर शासनाने तातडीने केलेली कार्यवाही वा करावयाची उपाययोजना" यासाठी मी हा विशेष उल्लेख उपस्थित करुन सभागृहाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

---------

**उप सभापती** : आता आपण कामकाज पत्रिकेवरील क्रमांक आठ वर दाखविलेली डॉ. दीपक सावंत यांची अल्पकालीन चर्चा सभागृहात चर्चेसाठी घेऊ.

डॉ. दीपक सावंत : महोदय, अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून सभागृहात मी जो विषय उपस्थित करणार आहे त्या विषयाचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांना सभागृहात बोलावण्याची व्यवस्था करावी व तोपर्यंत सभागृहाची बैठक 10 मिनिटे तरी स्थगित करावी, अशी मी विनंती करतो.

**उप सभापती** : मी सभागृहाची बैठक 3.45 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.23 ते 3.45 पर्यंत स्थगित झाली)

-------

यानंतर श्री. जुन्नरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. विनायक मेटे )**

पृ.शी. : स्त्री भ्रूण हत्यांबाबत होणाऱ्या कारवाईमुळे सामान्य स्वरुपाची औषधे मिळण्यात येत असलेल्या अडचणी

मु.शी. : स्त्री भ्रूण हत्यांबाबत होणाऱ्या कारवाईमुळे सामान्य स्वरुपाची औषधे मिळण्यात येत असलेल्या अडचणी याबाबत डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**तालिका सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी एक तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"राज्यातील स्त्री-भ्रूण हत्येच्या व एमटीपी किटच्या पार्श्वभूमीवर अनेक केमिस्ट डिस्ट्रिब्युटर्स वर धाडी पडणे, त्यामुळे केमिस्ट व ड्रगिस्ट यांनी संप पुकारणे, एफ.डी.ए. नी अनेक बीएएमएस, बीएचएमएस डॉक्टरांची प्रिस्क्रीपशन्स परत पाठवणे व औषध देण्यास नकार देणे, ब्लडप्रेशर डायबेटीसची औषधे फ्रेश प्रिस्क्रीप्शन शिवाय न देणे, असे काढलेले आदेश त्यामुळे ग्रामीण व शहरी आरोग्य व्यवस्था बाधित होणे, राज्यातील एमएमबीएस डॉक्टरांचे प्रमाण कमी असल्यामुळे इतर डॉक्टर ॲलोपेथिक औषधांची प्रॅक्टिस सुरु करीत असणे, शेड्युल-के मध्ये ड्रग ॲड कॉस्मेटिक रुल मध्ये अंगणवाडी सेविकांना ॲलोपॅथिक औषधे देण्याची मुभा असणे, राज्यात बीएएमएस डॉक्टरांना पीएचसी वर मेडिकल ऑफिसर म्हणून नेमणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, स्त्री-भ्रूण हत्येचा विषय माणुसकीला काळिमा फासणारा आहे. राज्यामध्ये स्त्री-भ्रूण हत्या होऊ लागल्या व या प्रकरणाला एक वेगळेच वळण लागले. स्त्री-भ्रूण हत्या माणुसकीला कलंक आहे ही बाब आपण सर्वांनी मान्य केलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

सभापती महोदय, स्त्री-भ्रूण हत्येच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने धोरण कडक केल्यामुळे राज्यातील संपूर्ण केमिस्टच्या दुकांनावर धाडी पडावयास लागल्या. केमिस्टच्या दुकानातून एमटीपी किटस् आणि त्यांसदर्भातील तत्सम औषधे जमा करावयास लागले. या सर्व प्रकारामुळे केमिस्ट हवालदिल झाले. राज्यातील एमबीबीएस व्यतिरिक्त कोणत्याही डॉक्टरने यासंदर्भातील प्रिस्क्रीप्शन देऊ नये यासंदर्भात एफडीएने एक फतवा काढला होता. बीएएमएस, डीएचएमएस,बीएचएमएस व तत्सम डॉक्टरांनी स्त्री-भ्रूण हत्येच्या संदर्भातील कोणतेही प्रिस्कीप्शन्स देऊ नये असा फतवा काढला. यामुळे राज्यातील सर्व केमिस्ट दुकानदार संपावर गेले. हा संप मागे का घेतला, यावर काय तोडगा निघाला याची माहिती अद्याप पर्यंत आम्हाला मिळू शकली नाही. काही दिवसानंतर बीएएमएस, डीएचएमएस, बीएचएमएस डॉक्टरांनी संप केला व त्यामुळे राज्यातील सुमारे एक लक्ष दवाखाने बंद होते. हा प्रश्न गेल्या 20 वर्षापासून एमबीबीएस व्यतिरिक्त प्रॅक्टीस करणाऱ्या डॉक्टरांचा आहे. या प्रश्नाचा संबंध वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाशी येतो.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या संबंधित एक लक्षवेधी सूचना विधानसभेत आल्यानंतर वैद्यकीय शिक्षण खात्याच्या माननीय मंत्री महोदयांनी सवंग लोकप्रियता लक्षात घेऊन घोषणा केली की, सर्व डॉक्टरंना त्या त्या पॅथी मध्ये प्रॅक्टीस करण्यासाठी परवानगी दिली जाईल. ॲलोपॅथीचा डॉक्टर असेल तर त्याला आयुर्वेदामध्ये प्रॅक्टीस करण्यास परवानगी देणार, होमियोपॅथीचा डॉक्टर असेल तर त्याला ॲलोपॅथी व आयुर्वेदामध्ये प्रॅक्टीस करण्याची परवानगी देणार अशा प्रकारे सर्व पॅथीमध्ये प्रॅक्टीस परवानगी देण्याची घोषणा करण्यात आली.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी सवंग लोकप्रियतेसाठी विधानसभेत घोषणा केली अशी जी माहिती आता दिलेली आहे ती वस्तुस्थितीला धरुन नाही. प्रिस्क्रीप्शन लिहिण्याच्या पध्दतीला फॉरमॅटमध्ये आणण्यासाठी व इतर पॅथीच्या डॉक्टरांना ही औषधे प्रिस्क्राईब करावयाची असेल तर त्यांच्यासाठी एक वर्षाचा वेगळा कोर्स करण्याची घोषणा करण्यात आली होती.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

तो कोर्स केल्यानंतर, प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्यांना औषधे प्रिस्क्राईब करता येतील हा त्या प्रश्नातून सोडवणूक करण्यासाठी केलेला तोडगा होता. यात सवंग लोकप्रियतेचा उल्लेख आहे. तो अनावश्यक आहे. तसा उल्लेख करू नये अशी माझी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना विनंती आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझे संपूर्ण भाषण होऊ द्यावे. मग माझे म्हणणे चूक होते की,बरोबर होते हे कळेल. राज्यामध्ये पूर्वी पासून आयुर्वेदिक डॉक्टर प्रॅक्टीस करीत आहेत. त्यांची पदवी BAMS अशी आहे. त्यानंतर त्या पदवीचे शुद्ध आयुर्वेदिक असे नाव झाले. BHMS अशी देखील पदवी आहे. BUMS पदवी आहे. अशा प्रकारचे कोर्सेस राज्यामध्ये आहेत.

मी सवंग लोकप्रियता हा शब्द का वापरला ते सांगतो. श्रीमती पूनम वर्मा आणि श्री.अश्विन पटेल यांची केस झाली. त्यावेळी कोर्टाने निर्णय दिला की, ज्याने त्याने आपापल्या पॅथीमध्ये प्रॅक्टीस करावी. कोणीही क्रॉस प्रॅक्टीस करू नये. त्यामुळे यामध्ये बंधन आले. होमियोपॅथी ॲक्टमध्ये 'only' हा शब्द 1987-1988 मध्ये लागू झाला. बॅचलर ऑफ आयुर्वेदिक मेडिसीन अँड सर्जरी चे आयुर्वेदिक मेडिसीन असे नामकरण करण्यात आले. हे सर्व करीत असताना मुख्तीयार चंदचे जजमेंट आले. त्यात देखील हेच सांगितले आहे.

युतीच्या काळात आपण देखील मंत्री होता. त्यावेळी कॅबिनेट निर्णय झाला आणि गणेरीवाल समिती नेमण्यात आली. या समितीने कोणकोणती औषधे द्यावीत आणि कोणती देऊ नयेत यासाठी कोर्स फॉर्म्युलेट केला. 1997 साली तत्कालीन मंत्री डॉ.दौलतराव आहेर यांनी एका रात्रीत जी.आर काढला. तो जी.आर.श्रीमती शीला कर्नानी यांच्या नावाने व सहीने आहे. तो आपल्या रेकॉर्डला असेल. त्यांनी सांगितले की, आयुर्वेदिक डॉक्टर ॲलोपॅथी प्रॅक्टीस करू शकतात. कारण फॉर्माकॉलॉजी हा विषय त्यांच्या अभ्यासक्रमामध्ये आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी MBBS डॉक्टर मिळत नसल्यामुळे तेथे धडाधड आयुर्वेदिक डॉक्टर नेमायला सुरूवात केली.

सभापती महोदय, श्रीमती कर्नानी यांनी जो जी.आर. काढला त्यावर सर्वांचे ओपिनियन आले आहे. हा जी.आर.अतिशय वाईट होता. अशा प्रकारचे मत देखील एका ॲडव्होकेट जनरलने

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

दिले आहे. दोन-तीन ॲडव्होकेट जनरलनी आपली मते दिली आहेत. ती मते माननीय मंत्री महोदयांकडे आहेत. माझ्याकडे देखील आहेत. ॲडव्होकेट जनरल रवी कदम यांनी असे मत दिले की, "Their should be a Refresher Course for these students." हा कोर्स ज्यांनी पूर्ण केला असेल त्यांना नियमित करू शकता. या लोकांचे प्रिसक्रीप्शन FDA ने ऑनर करायचे असेल तर काय करायला पाहिजे ? 4 गोष्टी करायला पाहिजेत. महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीशनर्स ॲक्ट 1961 मध्ये कलम 33 आहे त्यामध्ये सुधारणा करावी लागेल. दुसरे काय करायला पाहिजे. ड्रग्ज ॲन्ड कॉस्मेटीक ॲक्ट मध्ये सुधारणा करावी लागेल. तसेच इंडियन मेडिकल कौन्सिल ॲक्ट 1956 मधील कलम 10 (a) मध्ये सुधारणा करावी लागेल. हे सर्व एका रात्रीत होत नाही. जी.आर.काढून कुठल्याही पॅथीच्या लोकांना कुठल्याही पॅथीमध्ये प्रॅक्टीस करण्यास परवानगी देऊ शकत नाही, हे मला या चर्चेच्या निमित्ताने आपल्या समोर आणायचे आहे म्हणूच मी सवंग लोकप्रियता हा शब्द वापरला.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

मी "सवंग" हा शब्द काढून त्या ठिकाणी "लोकप्रियता" हा शब्द ठेवतो.

सभापती महोदय, होमियोपॅथीच्या संदर्भात विधानसभेमध्ये लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती. त्यावर उत्तर देतांना मंत्री महोदयांनी असे म्हटले की, "अध्यक्ष महाराज, राज्यातील जनतेच्या भावना लक्षात घेऊन या कोर्सेसला मान्यता देत आहोत, नंतर काही लोक कोर्टामध्ये जातील. आपले म्हणणे स्टँड झाले पाहिजे, सहा महिन्यांच्या सर्टिफिकेट कोर्समध्ये स्टँड होऊ शकत नाही. या संदर्भात संपूर्णपणे कायद्याचा अभ्यास केल्यानंतर जे फ्रेम केले आहे त्या नुसार परिक्षा पास झ ााल्याशिवाय प्रॅक्टिस सुरु करता येणार नाही या संबंधी ऑगस्ट महिन्यामध्ये प्रयत्न करुन मंजुरी मिळवून या बाबतचा अध्यादेश निघू शकेल" असे मंत्री महोदयांनी विधानसभेमध्ये उत्तर देतांना सांगितले आहे. गतिमान, गतिशील सरकार असेल तर हे ऑगस्ट महिन्यापर्यंत होऊ शकेल. गणेरीवाल समितीने सन 2000 मध्ये आपला अहवाल दिला. त्यामध्ये त्यांनी असे सांगितले होते की, अशाप्रकारे औषधे वापरण्यासाठी कोर्स करणे आवश्यक आहे. होमियोपॅथीचे जवळ जवळ 57 हजार डॉक्टर आणि आयुर्वेदिकचे जवळ जवळ 52 हजार डॉक्टर प्रॅक्टिस करणारे आहेत. ही संख्या जवळ जवळ एक लाखाच्या घरामध्ये आहे. त्यांना एक वर्षाचा कोर्स द्यावयाचा म्हटले तरी राज्य शासनाकडे फार्माकॉलॉजी शिकविणारे एवढे प्रोफेसर आहेत काय, टप्या टप्प्याने करावयाचे म्हटले तरी या संपूर्ण प्रक्रियेला पाच ते सात वर्षे लागतील. आपल्याकडे फार्माकॉलॉजीचे पुरेसे प्रोफेसर आहेत काय, आपण हे कोर्सेस कोणत्या मेडिकल कॉलेजमध्ये सुरु करणार आहात?या बाबत एफ.डी.ए. कोणता स्टँड घेणार आहे, असा मला या ठिकाणी प्रश्न विचारावयाचा आहे?

सभापती महोदय, जुलै महिना सुरु आहे, हा ॲडमिशनचा महिना आहे. आपल्याकडे होमियोपॅथीची कॉलेजेस कुणाची आहेत, आयुर्वेदिक कॉलेजेस कुणाची आहेत? त्या संस्था चालकांचा प्रचंड दबाव मंत्री महोदयांवर आहे. याचे कारण अशाप्रकारे ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करण्यास परवानगी मिळणार नसेल तर त्या कॉलेजमध्ये कुणी ॲडमिशन्स घेणार नाहीत, ती कॉलेजेस रिकामी राहतील. म्हणून या ठिकाणी ही घोषणा झाली आहे हे मी या ठिकाणी पुन्हा सांगतो. माझ्या या आरोपाला आपण उत्तर द्यावे.

सभापती महोदय, मंत्री महोदयांना जर खरोखर या गोष्टी अंमलात आणावयाच्या असतील तर कायद्यातील शेडयुल्ड "के" मध्ये अंगणवाडी सेविकांना पॅरासिटेमॉलपासून क्लोरोक्वीनपर्यन्त सर्व औषधे हाताळण्यासाठी देता. ताप आल्यानंतर, डायरीया झाल्यानंतर अंगणवाडी सेविका औषध

डॉ. दीपक सावंत....

देऊ शकते, थंडी वाजून ताप आला तर मलेरियाच्या गोळया देऊ शकते. सभापती महोदय, ही विसंगती कायद्यामध्ये का ठेवण्यात आली आहे? आज राज्यामध्ये एम.बी.बी.एस. झालेल्या डॉक्टर्सची कमतरता आहे. क्रॉस प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टर्सची संख्या मोठी आहे. त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला सातवीपर्यन्त शिक्षण झालेली अंगणवाडी सेविका औषधे देऊ शकते. तिसऱ्या बाजूला गर्भपात कायद्याचा अवलंब करुन 20 आठवडयाऐवजी 36 आठवडयापर्यन्त गर्भपात होऊ शकतो. अशाप्रकारची आपल्या सार्वजनिक आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण विभागाची अवस्था आहे हे मला या चर्चेच्या निमित्ताने निदर्शनास आणावयाचे आहे. हा सामान्य माणसाच्या जीवनाशी निगडीत असलेला मुद्दा आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ D/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 16:00

डॉ.दीपक सावंत . . . .

शेड्यल-के मध्ये अंगणवाडी सेविका ॲलोपॅथीची औषधे देऊ शकते. पण कायद्यानुसार साडेचार वर्षाचा कोर्स करुन पास झालेला डॉक्टर ती देऊ शकत नाही. It is bad in Low. दुसरीकडे एम.टी.पी.ची औषधे, एम.टी.पी.च्या गोळ्या देण्यासाठी आपल्याला 20 आठवड्यापर्यंत परवानगी आहे. पण एफ.डी.आय.चे लोक काय करीत आहेत ? जरी 20 आठवड्याच्या आत काही केले तरी देखील त्यांच्यावर केसेस दाखल करीत आहेत. पाच हजारापासून पाच लाख रुपयापर्यंतच्या मागण्या केल्या जात आहेत म्हणजे पुन्हा एकदा इन्स्पेक्टर राज सरु होत आहे अशी आपल्या राज्यातील आरोग्य व्यवस्था आहे.

सभापती महोदय, दुसरीकडे बी.ए.एम.एस.,बी.यु.एम.ए.स.आणि बी.एच.एम.एस.यांची प्रिस्क्रीप्शन ऑनर होत नाहीत म्हणून लोक तक्रार करीत आहेत आणि पोलीस त्यांच्याकडे जाऊन हप्ता घेत आहेत. एका गोष्टीमुळे हे सगळे असे सर्कलमध्ये आलेले आहे आणि ही सायकल कशी ब्रेक करणार असा माझा सर्व माननीय मंत्री महोदयांना प्रश्न आहे. एका माननीय मंत्री महोदयांसाठी प्रश्न नाही. माननीय मंत्री महोदयांनी घोषणा केली आणि ती कशी केली हेच मला सांगावयाचे आहे. मी आपल्याला माझे सजेशन देतो की, जर महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था वैद्यकीय शिक्षण विभागामधून सोडवावयाची असेल तर आपल्या हातामध्ये एकच गोष्ट रहाते की, रजिस्टर मेडिकल प्रॅक्टीशनार ही संज्ञा आहे, ती लागू करणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, जर शासनाने रजिस्टर मेडिकल प्रॅक्टीशनर ही संज्ञा लागू केली तर या मध्ये खूप गोष्टी आहेत. एक म्हणजे तुमच्याकडे नोटीफीकेशन काढण्याची पॉवर आहे आणि हे नोटीफीकेशन काढताना जर आपण महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीशर्नस् ॲक्टमधील क्लॉज क्र. 33/1 व 33/2 एकत्रितपणे वाचला तर तुम्हाला आर.एम.पी.म्हणजे रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टीशनर्स्चे डेफीनेशन मिळेल. त्यानुसार तुम्ही त्यांना रेग्युलराईज करु शकता. पण त्यांना रेग्युलराईज करण्यामध्ये धोका देखील आहे. कारण ऊठसूठ सगळे लोक या डेफीनेशनच्या अंतर्गत येतील. त्या मुळे आपल्या कोर्टाचा जो निर्णय आहे तो जरी बरोबर असला तरी देखील त्याला काही मर्यादा आहेत. कारण तुम्हाला आय.एम.ए.सोडणार नाही, ते कोर्टामध्ये जाणार आणि त्यावेळी शासन काय करणार आहे? अशा वेळी त्यांना कोर्टामध्ये जाऊ दे असेही म्हणता येणार नाही. मात्र त्यासाठी तुम्हाला अगोदर कॅव्हेट दाखल करावे लागेल त्याशिवाय कोर्टामध्ये जाता येणार नाही आणि त्या शिवाय डिक्लरेशन करु शकत नाही. कारण पाचलेकर साहेबांनी सुरुवातच केली आहे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

डॉ.विजयकमार गावित : सभापती महोदय, करु दे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री डॉ.विजयकुमार गावित साहेब आपणच घोषणा केलेली आहे आणि सर्व वर्तमानपत्रांनी जल्लोषही केलेला आहे.

**तालिका सभापती (श्री.विनायक मेटे)** : मी सन्माननीय सदस्य श्री.दीपक सवंत यांना सांगू इच्छितो की, त्यांनी माननीय मंत्री महोदयांच्या बोलण्याकडे आता लक्ष देऊ नये. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु ठेवावे. माननीय मंत्री महोदय उत्तराच्या भाषणामध्ये काय ते सांगतील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, त्यामुळे मी आपल्याला सांगू इच्छितो की, महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था पाहता जर कोणी महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षण घ्यावयाचे म्हटले तर आरोग्य विद्यान विद्यापीठ असले तरी त्यांच्या अंतर्गत हा विषय येतच नाही. तुम्हाला केवळ फार्माकॉलॉजीचा अभ्यास करावयाचा असेल तर त्यासाठी किती लेक्चर्स् देणार, त्याचे शेड्यल कसे असेल हे सर्व आपल्याला पहावे लागेल आणि ते ऑगस्ट महिन्यापर्यंत होणार नाही. कारण त्याच्या अगोदर ज्या तीन दुरुस्त्या सुचविल्या आहेत, त्या प्रथम करुन घेतल्या पाहिजेत आणि त्या मांडल्या पाहिजेत.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, सेंट्रल कौन्सिल ऑफ होमिओपॅथी आणि आयुष यांची देखील परवानगी घ्यावी लागेल. जर तसे नसेल तर माझे काही म्हणणे नाही. तुम्ही नंतर कोर्टामध्ये कस करावी. मी हे एवढ्यासाठीच सांगितले की, एखादी घोषणा केल्यानंतर त्याचे रिपर्केशन काय होणार आहेत आणि यामध्ये सकारात्मक कोणते विचार आहेत अशा दोनच गोष्टी सांगण्यासाठी मी उभा आहे. शेवटी याबाबतीत काय करावयाचे हे सरकार म्हणून तुम्हालाच ठरवावयाचे आहे. शासनाला सजेशन देण्याचे काम आमचे आहे. कारण लोकांना चांगली रुग्णसेवा उपलब्ध होणे आवश्यक आहे एवढेच मला आमदार म्हणून समजते.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

लोकांना चांगली आणि स्टॅण्डर्ड रुग्णसेवा मिळेल, दिलेल्या औषधांचा त्याच्यावर कोणताही दुष्परिणाम होणार नाही, जो डॉक्टर प्रॅक्टीस करतो त्यांना कोणत्याही प्रकारच्या कोर्ट-कचेऱ्या कराव्या लागणार नाहीत, त्यांना तुरुंगात जावे लागणार नाही आणि त्यांची इमेज खराब होणार नाही हे पाहिले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. हे मांडण्यासाठी सभागृह माध्यम आहे. या संदर्भात विधानसभेमध्ये चर्चा झालेली आहे आणि त्या चर्चेनंतर आज या सभागृहामध्ये चर्चा होत आहे. त्यामुळे मला याचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी आहे की, टू ईई, ड्रग्स अँड कॉस्मॅटिक ॲक्ट हा कायदा 1971 आणि 1972 साली अबेयन्समध्ये ठेवला होता आणि त्यानंतर बाकीच्या गोष्टी केल्या गेल्या होत्या. जर आपण हा टू ईई, ड्रग अँड कॉस्मॅटिक ॲक्ट अबेयन्समध्ये ठेवला तर आज जे डॉक्टर्स तयार होतील ते 7 वर्षानंतर फार्माकॉलॉजीचा अभ्यास करणार आहेत का ? तोपर्यंतच्या काळामध्ये ते काय करणार ? ते चोरुन प्रॅक्टीस करणार. पुन्हा केसेस होणार. पुन्हा लोक कोर्टात जाणार आणि हे सर्व असेच चालत राहणार. त्यामुळे एकंदर जे शेड्युल आहे ते आपल्याला दोन वर्षामध्ये संपवावे लागणार आहे. तरच आपल्याला त्याचा उपयोग होईल. ज्या सन्माननीय सदस्यांना या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपले विचार मांडावेत. मी सवंग लोकप्रियता असा शब्द का वापरला या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांचे समाधान झाले असेल.

श्री. हेमंत टकले : 'सवंग' शब्द कामकाजातून काढावा..

डॉ. दीपक सावंत : ठीक आहे. 'सवंग' हा शब्द काढून टाकतो. केवळ लोकप्रियतेसाठी असा शब्द का वापरला याबाबत आपले समाधान झाले असेल. सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने मी माननीय मंत्री महोदयांना चार प्रश्न विचारु इच्छितो. ते प्रश्न माननीय मंत्री महोदयांनी लिहून घ्यावेत. ज्या ठिकाणी आपण त्यांना शिक्षण देणार त्या बीएचएमएस, बीएएमएस कॉलेजेसची राज्यातील परिस्थिती काय आहे ? माननीय मंत्री महोदयांनी ॲनॉटॉमीचा उल्लेख आपल्या भाषणामध्ये केलेला आहे. सभागृहामध्ये एका सदस्याने प्रश्न विचारला त्याला माननीय मंत्री

डॉ. दीपक सावंत ....

महोदयांनी असे उत्तर दिले आहे की, ॲनॉटॉमी ही सारखीच असते त्यामुळे त्यांना ते पूर्ण ज्ञान आहे. या कॉलेजेसमध्ये ॲनॉटॉमीच्या किती लेबॉरटरीज आहेत आणि त्यांना किती डिसेक्शन्स मिळतात या बाबत माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

इंडियन मेडिकल कौन्सिल जर कोर्टात गेली तर आपण त्यांना काऊन्टर कसे करणार ? फार्माकॉलॉजी शिकविण्याच्या अभ्यासक्रमाची पध्दत आपण बीएएमएस, बीएचएमएस, बीयूएमएस यांना कायम स्वरुपी ठेवणार की यासाठी काही मर्यादा घालणार आहात ? 2008 पर्यंत पास झालेल्या डॉक्टरांनाच हा कोर्स लागू केला जाईल की कायम स्वरुपी लागू करणार याबाबत खुलासा करावा. तसे करावयाचे असेल तर मग आपण वेगवेगळ्या पॅथी कशाला धरावयाच्या ? यामुळे जर त्या पॅथीचे अस्तित्वच राहणार नसेल तर ही होमियोपॅथी आहे, हे आयुर्वेद आहे, हे युनानी आहे हे कशाला धरावयाचे ? कारण शुद्ध आयुर्वेदिक किंवा शुद्ध होमियोपॅथीमध्ये प्रॅक्टीस करणारे हाताच्या बोटावर मोजण्याइतके डॉक्टर्स असतील. जर त्यांचे अस्तित्वच राहणार नसेल तर मग या पॅथीचे काय होणार ? आपल्या कुलगुरुंनी सुचविल्याप्रमाणे एकच कोर्स सगळ्यांसाठी राबवावा आणि नंतर त्यांनी पोस्ट ग्रॅज्युएशन त्या त्या पॅथीमध्ये करावे. बेसिक कोर्स एमबीबीएस सारखा असेल आणि त्यानंतर जर आयुर्वेदाचे किंवा होमियोपॅथीचे शिक्षण घ्यावयाचे असेल त्या बेसिक कोर्सनंतर आयुर्वेदाचे शिक्षण घ्यावे किंवा होमियोपॅथीचे शिक्षण घ्यावे. मग इतर पॅथींचे काय होणार ? आयुष आणि सीसीएच यांची भूमिका काय राहणार आहे ? आज लोकांच्या दृष्टीने जीवनमरणाचा प्रश्न आहे. त्यामुळे या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. ज़मा ( महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित ): सभापति महोदय, मैं माननीय सदस्य डॉ. दिपक सावंत साहब को धन्यवाद देना चाहूंगा कि उन्होंने एक बहुत ही गंभीर विषय पर यहां पर चर्चा उपस्थित की है. माननीय सदस्य डॉ. दिपक सावंत ने इस विषय पर बहुत ही डिटेल स्टडी की है और काफी अच्छी रिसर्च करने के बाद उन्होंने बहुत ही विस्तार से अपने विचार यहां पर रखे हैं.

लेकिन माननीय सदस्य ने यह बात भी कही कि अपनी लोकप्रियता बढ़ाने के लिए सरकार ने विधान सभा में इससे संबंधित एक घोषण की है. मुझे लगता है कि ऐसी बात नहीं है. इस बारे में माननीय सदस्य श्री हेमंत टकले साहब ने भी अपनी बात स्पष्ट की है. मैं यहां पर सिर्फ दो-तीन बातें ही कहना चाहता हूं. मेरा कहना है कि इस विषय पर गहन चिंतन की आवश्यकता है. यह विषय बहुत ही सेंसिटिव है. इस विषय के दो-तीन पहलू हैं.

आजकल स्त्री-भ्रूण हत्या के बारे में समाज में बहुत चर्चा हो रही है. इस बारे में सरकार की ओर से, जनता की ओर से तथा सिविल सोसायटी की ओर से भी कोशिश की जा रही है कि स्त्री-भ्रूण हत्या रोकी जाये. स्त्री-भ्रूण हत्या एक सामाजिक पाप है. इसके अलावा हमारे समाज में स्त्री और पुरुषों की संख्या में जो समानता बने रहना आवश्यक है, उस दृष्टि से भी यह भ्रूण-हत्या हमारे समाज के लिए बहुत ही घातक सिद्ध हो सकती है.

मैं कहना चाहूंगा कि एफडीए ने कार्रवाई चालू की है. सोनोग्राफी से संबंधित बहुत सारी घटनाएं हमारे सामने आयी हैं. इसलिए शासन के सामने यह समस्या है कि भ्रूण-हत्या को रोकने के लिए क्या उपाय किये जाएं. यह विषय एफडीए के सामने है, यह विषय शासन के सामने है कि भ्रूण-हत्या करने के लिए की जाने वाली सोनोग्राफी को कैसे रोका जाये.

इस समस्या से जुड़ा हुआ एक विषय हमारे यहां पर प्रचलित पेथीज के बारे में है. यह बात माननीय सदस्य डॉ. सावंत ने भी अपने भाषण में कही है. हमारे यहां पर ॲलोपेथी है, यूनानी सिस्टम है, आयुर्वेद तथा होम्योपेथी भी है. इन पेथीज में बहुत सारे कॉन्ट्राडिक्शन्स हैं. भारत सरकार की एक पॉलिसी है, और वह होनी भी चाहिए कि हमारे यहां पर मेडिकल साइंस की जो पुरानी व्यवस्थाएं हैं, उनको बढ़ावा कैसे दिया जाये. हमारे यहां पर चाहे आयुर्वेद सिस्टम

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. ज़मा ....

हो, होम्योपेथी सिस्टम हो या यूनानी सिस्टम हो, मेडिकल साइंस के इन सभी सिस्टम्स को बढ़ावा देने की पॉलिसी हमारी सरकार की है. उसके लिए उन्होंने अलग से एक काउंसिल की स्थापना भी की है. जिस प्रकार से इंडियन मेडिकल काउंसिल है, उसी प्रकार की काउंसिल दूसरी पॅथीज के लिए भी बनाई गयी है.

आज सभी पॅथीज में 50-60 हजार या उससे भी ज्यादा स्टूडेंट्स सभी पेथीज के हैं. हमारे यहां पर सभी पॅथीज के कॉलेज हैं, हमने वहां पर बच्चों को शिक्षा दी है. उन बच्चों को हमने विभिन्न मेडिकल साइंस की डिग्री और डिप्लोमा दिए हैं. लेकिन वे बच्चे आज बेकारी की हालत में हैं. उनके पास रोजगार नहीं है. हमारे यहां पर हेल्थ मिनिस्ट्री में ॲलोपेथी के जो डाक्टर्स अपाइंट हो रहे हैं, उसमें उन्होंने आयुर्वेद के डॉक्टर्स को 25 परसेंट रिजर्वेशन दिया है. इसी प्रकार का रिजर्वेशन उन्होंने होम्योपेथी के डॉक्टर्स को दिया है. लेकिन यूनानी साइंस के डॉक्टर्स को वहां पर रिजर्वेशन नहीं दिया गया है. यूनानी साइंस के बहुत सारे लोग इस बारे में लड़ाई लड़ रहे हैं. उस बारे में सरकार का कहना है कि उनके पास सर्जरी करने की शिक्षा नहीं है, जबकि बाकी सभी पेथीज में सर्जरी की शिक्षा दी जाती है. चाहे बीओएमएस हो, बीएएमएस हो या बीएचएमएस हो, सभी के अंदर सर्जर की शिक्षा दी जाती है. इसलिए जब यूनानी साइंस के लोग मांग करते हैं कि नौकर भर्ती में उनको भी 25 परसेंट रिजर्वेशन मिलना चाहिए तो उनसे कहा जाता है कि क्योंकि आप सर्जरी नहीं कर सकते इसलिए आपकी पोस्टिंग प्राइमरी हेल्थ सेंटर्स में नहीं हो सकती. इसलिए मेरा कहना है कि भ्रूण हत्या, मेडिकल स्टूडेंट्स की बेरोजगारी तथा मेडिकल साइंस से संसबंधित अन्य सभी समस्याओं को इंडियन मेडिकल काउंसिल तथा मेडिकल एज्यूकेशन से संबंधित जो अन्य काउंसिल्स हैं, उन सब का समन्वय किया जाना चाहिए तथा इस बारे में एक निश्चित कदम सरकार को उठाना चाहिए.

मेरा कहना है कि ॲलोपेथी के अलावा जो बाकी मेडिकल साइंस हैं, उनका उपयोग यदि ज्यादा पैमाने पर बढ़ाना है तो बच्चों को इससे संबंधित उचित एज्यूकेशन तथा ट्रेनिंग दी जानी चाहिए तथा उनको उचित सर्टिफिकेट दिए जाने चाहिए. यह पूरी व्यवस्था महाराष्ट्र सरकार को

श्री एस. क्यू. ज़मा ....

करनी होगी. मैं बताना चाहूंगा कि पब्लिक हेल्थ तथा मेडिकल एज्यूकेशन के मंत्रालाय अलग-अलग हैं और दोनों मंत्रालयों की नीतियों में काफी कॉन्ट्राडिक्शन्स हैं. बच्चों को मेडिकल साइंस की शिक्षा एज्यूकेशन डिपार्टमेंट के मार्फत दी जाती है और उन बच्चों की भर्ती पब्लिक हेल्थ डिपार्टमेंट के मार्फत की जाती है.

इसलिए मेरा सुझाव है कि विधान सभा और विधान परिषद के जो माननीय सस्य मेडिकल साइंस में रुचि रखते हैं या जिन माननीय सदस्यों ने मेडिकल साइंस की पढ़ाई की है उन सभी सदस्यों की एक मीटिंग नागपुर अधिवेशन शुरु होने से पहले बुलायें और सभी माननीय सदस्यों की इस संबंध में राय जानी जाए कि भ्रूण-हत्या को रोकने तथा मेडिकल साइंस से संबंधित अन्य समस्याओं को कैसे हल किया जा सकता है. इतना ही मुझे कहना है, धन्यवाद.

-0-

( इसके बाद श्री अजित शिगम )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे ( नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी नियम 97 अन्वये एका महत्वाच्या विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रश्नाला दोन महत्वाच्या बाजू आहेत. यातील पहिली कायदेशीर बाजू सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सविस्तरपणे मांडलेली आहे. दुसरी सामाजिक बाजू अशी की, आपल्या देशात प्रचंड लोकसंख्या आहे. तसेच ग्रामीण भागात डॉक्टरांचा अभाव आहे. बरेचसे होमिओपॅथी आणि आयुर्वेदिक डॉक्टर्स हे ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करतात हे उघड सत्य आहे. परंतु त्यांनी समाजाची खूप मोठी गरज भागविली आहे. दुर्गम आणि आदिवासी भागांमध्ये, खेड्यापाड्यामध्ये या डॉक्टर्सनी सेवा दिलेल्या आहेत. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याची गरज मोठ्या प्रमाणावर भागलेली आहे हे आपण नाकारु शकत नाही.

सभापती महोदय, केंद्र सरकारने बी.आर.एम.एस. कोर्स सुरु करण्याचे ठरविले आहे. हा साडेतीन वर्षाचा कोर्स आहे. या कोर्सचा उद्देश म्हणजे थोड्या दिवसांत हा कोर्स पूर्ण करुन त्यांना ग्रामीण भागात पाठवावयाचे. कारण आपल्याकडे तेवढे डॉक्टर्स नाहीत ही वस्तुस्थिती आहे. मी आपणास संगमनेर तालुक्याचे उदाहरण देतो. त्या ठिकाणी पोस्ट गॅज्युएट झालेले ॲलोपॅथीचे डॉक्टर्स बरेच आहेत. परंतु एमबीबीएस होऊन जनरल प्रॅक्टीस करणा-या डॉक्टर्सची संख्या हाताच्या बोटावर मोजण्या इतकी आहे. 200 डॉक्टर्समधील फक्त 10 डॉक्टर्स एमबीबीएस असतील. आपण बी.आर.एम.एस. कोर्सची मागणी करीत आहोत. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, हा प्रश्न केंद्र शासनाशी निगडीत असला तरी हा प्रश्न राज्य शासनाशी देखील निगडीत आहे. या प्रकरणी आय.एम.सी.ची भूमिका महत्वाची आहे. तेव्हा होमिओपॅथिक, आयुर्वेद, युनानी यांच्या संघटनांना एकत्र बोलावून, तज्ज्ञ डॉक्टरांना बोलावून यातून योग्य मार्ग काढला पाहिजे. हे डॉक्टर्स अतिशय चांगली प्रॅक्टीस करीत आहेत. त्यांनी समाजाच्या अनेक गरजा भागविलेल्या आहेत. यामध्ये दोन भाग येतील. जे नवीन डॉक्टर्स होणार आहेत त्यांच्या अभ्यासक्रमामध्ये बदल करावा लागेल. जे आज प्रॅक्टीस करीत आहेत त्यांना इन प्रॅक्टीस कोर्स द्यावा लागेल. हे खरे आहे की त्यांचा हा कोर्स पूर्ण होईपर्यंत त्यांना कुठेतरी मार्ग काढून द्यावा लागेल जेणेकरुन त्यांच्या पाठीमागे कायद्याचा बडगा राहणार नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे...

सभापती महोदय, आपले आरोग्य खाते दोन विभागांमध्ये विभागले आहे त्यामुळे असे प्रश्न निर्माण होतात. तरी सुध्दा या प्रश्नाच्या बाबतीत आपण सर्वांना एकत्रित येऊन यातून मार्ग काढणे गरजेचे आहे असे मला वाटते. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण विचार या चर्चेच्या माध्यमातून मांडले आहेत. त्यांनी सांगितले की, आपणास जी.आर.काढून चालणार नाही तर तीन ॲक्टस्‌मध्ये सुधारणा करावी लागणार आहे. मी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, इतर राज्यांमध्ये काय नियम आहेत हे पाहिले पाहिजे. त्या ठिकाणी होमिओपॅथीचे डॉक्टर्स ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करतात काय ?

सभापती महोदय, आपण संबंध हिंदुस्थानाचा विचार केला तर महाराष्ट्रात डॉक्टर्सची संख्या सर्वात जास्त आहे. शासकीय रुग्णालयांची संख्या महाराष्ट्रात जास्त आहे.आपल्याकडे डॉक्टर्सची संख्या वाढलेली आहे. माननीय मंत्री महोदय डॉ.विजयकुमार गावित हे आमच्या तालुक्याला बऱ्याच वेळा आलेले आहेत. पूर्वी तालुक्यामध्ये एक एमबीबीएस डॉक्टर असायचा, आता 50 डॉक्टर्स झालेले आहेत. परंतु दुर्गम आणि आदिवासी भागांमध्ये एमबीबीएस डॉक्टर्स नाहीत.
शासनाने यातून मार्ग काढलेला आहे की, होमिओपॅथिक डॉक्टर्सनी त्यांच्या प्रिस्क्रिप्शनवर एमबीबीएस डॉक्टरची सही घ्यायची त्यानंतर रुग्णाला औषध द्यायचे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत त्यांच्या भाषणात शॉर्ट टर्म सोल्यूशन आणि लॉग टर्म सोल्यूशन संदर्भात तातडीने कोणत्या उपाय योजना केल्या पाहिजेत याची माहिती देतील अशी माझी अपेक्षा होती.

आयुर्वेद, योग निसर्गोपचार, युनानी सिध्द आणि होमिओपॅथी (आयुष) हा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचा महत्वाचा घटक आहे. आयुष कर्मचाऱ्यांकरिता प्रशिक्षण, आयुषच्या पध्दतींना राष्ट्रीय आरोग्य सुविधा पुरविणाऱ्या पध्दतीच्या मुख्य प्रवाहात आणणे, दर्जा राखण्यासाठी नियामक व्यवस्थेचे बळकटीकरण करणे,

यानंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी...

तसेच संशोधन व विकास असे शासकीय व अशासकीय क्षेत्रात उत्कृष्ट केंद्राच्या निर्मिती व्यतिरिक्त प्रयोगशाळा निर्माण करणे, आयुष अंतर्गत राज्यात 62 आयुर्वेदीक महाविद्यालये, 489 आयुर्वेदीक दवाखाने, रुग्णालयाशी संलग्न अशा 8 युनानी महाविद्यालये, 25 युनानी दवाखाने आणि 45 होमियोपॅथीक दवाखाने अशा पध्दतीने शासन कसे काय पुढे जाईल हा एक मोठा चिंतेचा विषय आहे. काही प्रश्न असे असतात की, ते त्वरेने सुटतात. काही प्रश्न असे असतात की, त्यावर फक्त चर्चा होते, ते प्रश्न सत्वर सुटत नाहीत. हा प्रश्न देखील तसाच आहे. युनानी, होमियोपॅथी डॉक्टरांना सांगितले की, तुम्हाला ॲलोपॅथीचे प्रिस्क्रिप्शन लिहू देणार नाही. कशात कमी नुकसान आहे या गोष्टी प्रथम बघितल्या पाहिजेत.

आपण या ठिकाणी म्हटले आहे की, शेडयूल "के" मध्ये ड्रग आणि कॉस्मॅटीक रुलमध्ये अंगणवाडी सेविकांना ॲलोपॅथीची औषधे देण्याची मुभा आहे. जर अंगणवाडी सेविकांना जर मुभा असेल, तर मग होमियोपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथीची औषधे लिहून देण्याचे अधिकार का नाहीत ? या संबंधीच्या कायद्यात दुरुस्ती करुन सदरची औषधे देऊ शकतात अशा प्रकारचे अधिकार दिले पाहिजेत असे मला वाटते. रिमोट एरिया असेल, त्या ठिकाणी डॉक्टरांची उपलब्धता नाही, अशा ठिकाणी होमियोपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथीची औषधे देण्यात अडचणी निर्माण होतात. डॉक्टर कोणत्याही पॅथीचा असला तरी रुग्ण उपचाराने बरा झाला पाहिजे हा त्यातील महत्वाचा भाग आहे. त्यातून मार्ग काढण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने प्रयत्न केला पाहिजे. या ठिकाणी अतिशय महत्वाची चर्चा घडवून आणली. माननीय मंत्री महोदयांना विनंती करीन की, माननीय मंत्री महोदय हे अतिशय रिर्सोसफूल आहेत त्यामुळे या बाबतीत कायम स्वरुपी काय करु शकतो या बाबतची माहिती मिळावी अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

--------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननी सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू. जमा, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे, सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी अल्पकालीन चर्चेच्या निमित्ताने अतिशय चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, मी सर्व प्रथम सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, युतीच्या काळामध्ये मी राज्यमंत्री होतो. त्यावेळेला या बाबतीत 6 महिन्याचा कोर्स करण्यासंबंधीची योजना होती. प्रसिध्दीसाठी किंवा नाव मिळविण्यासाठी करावयाचे असे आपण म्हणत असाल तर ते योग्य नाही असे मला वाटते. युती काळापासूनच या बाबतीत नाव मिळावे म्हणून आपण प्रयत्न केला होता असे समजण्यास हरकत नाही असे देखील मला वाटते.

डॉ.दीपक सावंत : मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंबंधीचा निर्णय झाला होता. परंतु महाराष्ट्रात माननीय श्री.विलासराव देशमुख यांचे सरकार सत्त्ेवर आले, त्यावेळी शेवटच्या तीन महिन्यात इ ाालेले निर्णय पुन्हा रिव्हू झाले. त्याच्यामध्ये हा निर्णय रद्दबादल करण्यात आला.

डॉ.विजयकुमार गावित : अशा पध्दतीचे करण्याचे ठरविले होते. माझ्या माहिती प्रमाणे या संदर्भात कॅबीनेट डिसीजन झाला नव्हता. परंतु ही गोष्ट फॉर्म्युलेट करण्याचे ठरविले होते. त्यावेळी या अनुषंगाने प्रस्ताव देखील सादर झालेला होता.

सभापती महोदय, मी एक गोष्ट सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, बेसीक प्रिन्सिपल असे आहे की, ज्याने ज्या पॅथीचा अभ्यास केलेला आहे, त्याच पॅथीची प्रॅक्टीस केली पाहिजे. ही गोष्ट कायद्याने बंधनकारक आहे. हे कायद्याने बंधनकारक असले तरी राज्य शासनाला या बाबतीत काही अधिकार दिलेले आहेत. राज्य शासनाने एखादी नवीन कोर्स सुरु केला अथवा नवीन शिक्षण पध्दती आणली तर ती शिक्षण पध्दती राज्याच्या बाहेर वापरता येत नाही. डॉक्टर्स स्वत:च्या पॅथीची प्रॅक्टीस करीत असताना काही डॉक्टर मंडळी दुसऱ्या पॅथीचा वापर करीत असतात. मी ॲलोपॅथीचा डॉक्टर आहे. परंतु बऱ्याच वेळेला आम्ही आयुर्वेदीक पॅथीचा वापर करीत होतो. ज्या पॅथीचे शिक्षण घेतले असेल, त्याच पॅथीची प्रॅक्टीस डॉक्टरांनी करणे कायद्याने बंधनकारक आहे. या संदर्भातील अध्यादेश सुधारणासह काढावयाचा होता. यामध्ये बऱ्याच सुधारणा करण्याची आवश्यकता आहे याची मला माहिती आहे.

यानंतर श्री.कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावीत...

सभापती महोदय, एमएमसी असेल, युनानी असेल, 3/4 प्रकारच्या पॅथीमध्ये सुधारणा करावी लागणार आहे. ही सुधारणा केल्याशिवाय अध्यादेश काढता येणार नाही याची मला कल्पना आहे. जे काही शिक्षण यातून मिळणार आहे त्याची प्रॅक्टीस त्यांना राज्यामध्ये करावी लागणार आहे. कोर्स देऊन चालणार नाही. तर त्याला पूर्णवेळ अभ्यास करावा लागेल,प्रॅक्टीकल करावे लागेल. परीक्षा पास करावी लागेल. परीक्षा पास झाल्याशिवाय प्रॅक्टीसला परवानगी मिळणार नाही. त्यापध्दतीने सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत आहोत. औषध व सौंदर्य प्रसाधने अधिनियम 1945 मधील कलम 2 (ई) (ई) मध्ये सुधारणा करावी लागणार आहे. जोपर्यंत त्याचा कोर्स पूर्ण होत नाही तोपर्यंत त्या डॉक्टरला प्रॅक्टीस करता येणार नाही. त्यानंतर दुसरे याठिकाणी only हा शब्द वगळावा असे म्हणत आहोत. कोर्स केल्याशिवाय हा शब्द वगळता येणार नाही. म्हणून या सर्व गोष्टीचा व्यवस्थितपणे कोर्स तयार करणे आवश्यक आहे. पूर्वी हा कोर्स 6 महिन्याचा करावा असे म्हणत होतो. इमर्जन्सी ड्रग वापरायला परवानगी द्यायची. इमर्जन्सी ड्रग वापरण्यासाठी युनानी,होमियोपॅथी किंवा आयुर्वेदिक डॉक्टरकडे गेल्यानंतर तो इमर्जन्सी ड्रग वापरील परंतु त्याचबरोबर त्याला इतरही ड्रग वापरावे लागतात. त्यामुळे अर्धी अर्धी वेगळया प्रकारची औषधे फिजीबल होत नाहीत. म्हणून त्याला परिपूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे. जी औषधे वापरली जाणार आहेत त्याची संपूर्ण माहिती त्या डॉक्टरला असली पाहिजे. मेकॅनिझम माहिती असणे आवश्यक आहे. म्हणून तशा पध्दतीचा कोर्स आपण फॉर्म्युलेट करीत आहोत. या सर्व गोष्टी विद्यापीठाकडे देणार आहोत. त्यांच्याकडून परीक्षा घेतली जाईल.

सभापती महोदय, ॲलोपॅथी,होमियोपॅथी, आयुर्वेदिक याची परिस्थिती कशी आहे याची शासनाला कल्पना आहे काय असा दुसरा मुद्दा माननीय सदस्यांनी मांडला आहे. आपण विश्वास कोणावर ठेवणार असा प्रश्न निर्माण होतो. इंडियन मेडिकल कौन्सिलने कॉलेजला परवानगी दिली की आपण ते बरोबर आहे असे म्हणणार. सीसीआयने परवानगी दिली की होमियोपॅथी आणि आयुर्वेदिक डॉक्टर चांगले आहेत असे म्हणणार. मेडिकल कौन्सिलने परवानगी दिली आहे, कॉलेज चालू आहेत आणि त्याठिकाणी सर्व सुविधा आहेत असे आपल्याला गृहीत धरावेच लागते. कारण कायद्याने त्यांना परवानगी देण्याचा अधिकार आहे आणि त्यांनी ती दिलेली आहे. त्यामुळे मला वाटते की, हे राज्याला अधिकार असल्यामुळे आपण ते करु शकतो.

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावीत...

हे डॉक्टर्स जरी इंडियन मेडीकल कौन्सिलकडे गेले तरी ते कोर्टामध्ये टिकू शकणार नाही हे आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, यासर्व गोष्टींसाठी वेळ लागणार आहे. म्हणून स्टॉप गॅप अरेंजमेंटसाठी काही करणार आहात काय ? शेडयूल के इंट्रोडयूस करणार काय किंवा आरएमपीचा दर्जा देणार काय ? असे काही प्रस्तावित आहे काय? कारण या सर्व प्रक्रियेला एक वर्षाचा कालावधी लागून पहिली बॅच पुढील वर्षी जूनमध्ये बाहेर पडणार आहे. तोपर्यंत प्रॅक्टीससाठी जैसे थे परिस्थिती ठेवणार आहात की एफडीए धाड घालणार आहे.

डॉ. विजयकुमार गावीत : सभापती महोदय, जोपर्यंत प्रशिक्षण होत नाही तोपर्यंत कायद्याने काहीही करता येत नाही.

-------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री): सभापती महोदय, याठिकाणी जी चर्चा उपस्थित करण्यात आली त्यातील एकच प्रश्न माझ्या विभागाशी संबंधित आहे. केमिस्टच्या संपाबद्दल प्रश्न विचारला होता. त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर संप मागे घेतलेला आहे. त्यांच्या काही अडचणी होत्या त्याबाबत चर्चा केली आणि त्यांचे प्रश्न मार्गी लावण्याचा निर्णय घेतला. त्यांची मत-मतांतरे होती ती मिटवून प्रश्न मार्गी लावण्यासाठी एक समिती नेमली आहे. ड्रग ॲन्ड कॉस्मेटीक ॲक्टबद्दल त्यांचे काही प्रश्न होते. मेडिकल फार्मासिस्टचा विषय होता. नवीन मेडिकल दुकानांचा विषय होता. सगळया विषयांबाबत संप होता. सर्व विषयांचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमलेली आहे आणि त्या समितीचा अहवाल एक महिन्यात येईल. त्यामुळे त्यांनी संप मागे घेतलेला आहे.

**तालिका सभापती** (श्री. विनायक मेटे) : अल्पकालीन चर्चा आता संपलेली आहे.

-------

नंतर श्री. खर्चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेला परिसंवाद

**तालिका सभापती (श्री. विनायक मेटे)** : आपणा सर्वांना विदित आहेच की, महाराष्ट्र विधान मंडळाचे अमृत महोत्सवी वर्ष तसेच आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष सन 2012-13 या कालावधीत साजरे करण्यात येत आहे.

त्या निमित्त महाराष्ट्र विधानमंडळ आणि राष्ट्रकूल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे "शिक्षणाचा अधिकार" या विषयावर परिसंवादाचे आयोजन माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच अन्य मान्यवरांच्या सन्मान्य उपस्थितीत शुक्रवार, दिनांक 20 जुलै, 2012 रोजी दुपारी 3.00 ते 5.00 या वेळेत मध्यवर्ती सभागृह, चवथा मजला, विधान भवन, मुंबई येथे करण्यात आले आहे. यासंबंधीचे निमंत्रण सर्व माननीय सदस्यांना त्यांच्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या टपाल खणाद्वारे वितरीत करण्यात येत आहे. तरी सर्व माननीय सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या कार्यक्रमास अवश्य उपस्थित रहावे.

-------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे अपघातांचे वाढत असलेले प्रमाण

**मु.शी.**: राज्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे अपघातांचे वाढत असलेले प्रमाण या विषयावर डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, विजयसिंह मोहिते-पाटील, मोहन जोशी, अरुण गुजराथी, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री दीपकराव साळुंखे, अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती अलका देसाई, श्री. राजन तेली वि.प.स. यांचा प्रस्ताव

डॉ. सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये खालील प्रस्ताव मांडतो :--

"रस्ते अपघातांचे दिवसेंदिवस वाढत असलेले चिंताजनक प्रमाण, वाढती वाहतूक, अपुरे व अरुंद रस्ते, बेकायदेशीर वाहतूक, बेशिस्त, अप्रशिक्षित व बेजबाबदार वाहनचालक, अकार्यक्षम वाहतूक नियंत्रण व्यवस्था, यासारख्या प्रश्नांमुळे अपघातांमुळे मृत्यू पावणाऱ्यांची संख्या आज हृदयरोग व अन्य कुठल्याही आजारांमुळे मृत्यू पावणाऱ्यांपेक्षा खूप अधिक आहे. वाहनांचा वाढलेला वेग, यामुळे अतिशय भीषण अपघात सतत होत असतात. परिणामी मृत्यू वा जीवघेण्या जखमा यांचे प्रमाण खूप अधिक असणे, या गंभीररित्या जखमींवर उपचार करण्यासाठी असलेल्या ट्रॉमा सेंटर्स व ॲम्ब्युलन्स व्यवस्था अपुरी व तोकडी असणे, या अपघातांमध्ये बळी पडणाऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी असणे, तरुण व्यक्ती बळी पडल्यामुळे कुटुंब निराधार होऊन उद्‌ध्वस्त होणे, या अपघातात बळी पडलेल्यांना "अपघात विमा" च्या सुविधा योग्य रितीने उपलब्ध नसणे, रस्ते अपघाताचा हा प्रश्न अतिशय महत्वाचा असल्याने यावर त्वरीत उपाययोजना करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश असलेली समिती नेमणे आवश्यक असून या सर्व समस्यांवर तोडगा काढण्यासाठी शासनाने करावयाची ठोस उपाययोजना याबाबत शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री. जुन्नरे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे ...

सभापती महोदय, रस्ते अपघात हा अतिशय चिंतेचा विषय आहे. नुकत्याच घडलेल्या अपघातांची संख्या लक्षात घेतली तर आपल्याला असे दिसून येईल की, मुंबई-पुणे एक्सप्रेसवे वरील खालापूर येथे झालेल्या अपघातामध्ये 27 लोक भीषण अपघातात मृत्युमुखी पडले होते. शिर्डी-हैद्राबाद हायवेवर 20 लोकांचा मृत्यू झाला होता. नीरा नदीमध्ये बस उलटून त्यामध्ये 9 वारकरी ठार झाले होते. या घटना क्वचित घडणाऱ्या नाहीत तर या घटना सातत्याने आपल्या कानावर येत असतात. या अपघातांच्या घटनेचे गांभीर्य लक्षात यावे म्हणून मी काही आकडेवारी मांडतो आहे.

सभापती महोदय, मागील पाच वर्षात राज्यातील वेगवेगळया महामार्गावरील अपघातांमध्ये मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या अतिशय भयानक आहे. मुंबई-गोवा महामार्गावर 1500 लोक मृत्युमुखी पडले होते. धुळे-नागपूर महामार्गावर 1471 लोक मृत्युमुखी पडले होते, पुणे-सोलापूर महामार्गावर 690 लोक मृत्युमुखी पडले होते, पुणे नाशिक हा 196 कि.मी.चा छोटासा हायवे आहे परंतु या हायवेवर सर्वात अधिक अपघात होत असतात. कल्याण-नगर-बीड या महामार्गावर 914 लोक मृत्युमुखी पडले होते, नागपूर-रायपूर हायवेवर 601 लोक मृत्युमुखी पडले होते.

सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी मागच्या वर्षी अपघाताच्या संदर्भात उत्तर देतांना सांगितले होते की, राज्यामध्ये गेल्या 3 वर्षात 2,11,000 अपघात झाले असून त्यामध्ये 36,800 लोक मृत्युमुखी पडले होते. ही सर्व आकडेवारी चिंताजनक आहे. जगाच्या तुलनेने आपल्या देशात 10 ते 15 पट अधिक रस्ते अपघात होत असतात. देशामध्ये दर वर्षी 1.5 लक्ष लोक मृत्युमुखी पडतात व 28 लक्ष लोक गंभीर रित्या जखमी होत असतात. अपघातामध्ये महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक असून तामिळनाडू राज्याचा पहिला नंबर आहे. आपल्या राज्यात रोजच्या अपघातामुळे जवळपास 30 ते 40 लोक मृत्युमुखी पडत असतात. अपघातांची आकडेवारी देत असतांना मला खूप वेदना होत आहेत. रस्ते अपघातातील 84 टक्के अपघात हे मानवी चुकांमुळे होत असतात. खरे म्हणजे हे अपघात आपल्याला टाळता येण्यासारखे आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या राज्याचा अपघातामध्ये पहिला नंबर का नाही याची चिंता दिसते.

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, रस्ते अपघातामध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या आपल्या राज्यात फार मोठया प्रमाणात आहे. यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे...

जगाच्या तुलनेमध्ये 10 ते 15 पट अपघात आपल्या देशामध्ये होत आहेत. फॅटेलिटी इंडेक्स देखील महत्त्वाचा आहे. मृत्युमुखी किंवा गंभीररित्या जखमी झालेल्यांची व अपंगत्व आलेल्यांची संख्या पाहिली तर असे दिसून येईल की, जपानमध्ये फॅटेलिटी इंडेक्स 0.9 टक्के एवढा आहे. ही आकडेवारी मी मुद्दाम सांगत आहे. इतर देशामध्ये हे प्रमाण 3 ते 4 टक्के आहे. आपल्या देशामध्ये फॅटेलिटी इंडेक्सचे प्रमाण 19 टक्के आहे म्हणजे अपघातामध्ये मृत्युमुखी किंवा गंभीर जखमी होणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळेच आपण रस्ते अपघाताकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. यात मृत्युमुखी पडणारे लोक तरूण आहेत. हे तरूण 20 ते 40 या वयोगटातील आहेत. एखादी तरूण व्यक्ती अपघातामध्ये मृत्युमुखी पडते तेव्हा ते कुटुंब पूर्णत: उद्‌ध्वस्त होत असते. आपल्या देशात तरूण मोठ्या प्रमाणावर बळी पडत आहेत. त्यामुळे समाजाची खूप मोठी हानी होते असे मला वाटते. यासाठी दरवर्षी 55 हजार कोटी रूपये खर्च होतो. देशाच्या जीडीपीच्या 3.2 टक्के खर्च अपघातामुळे जे वेगवेगळे प्रश्न निर्माण होतात त्यासाठी खर्च होत असतो. त्यामुळे या प्रश्नाकडे अतिशय गंभीरतेने पाहणे गरजचे आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, आपल्या राज्यात अपघाताच्या कारणांची मिमांसा करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सचिव श्री.शशिकांत तांबे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने 1999 मध्ये अहवाल दिलेला आहे म्हणजे अहवाल देऊन 12 वर्षे झालेली आहेत. या अहवालातातील शिफारशींची अंमलबजावणी किती केली हे सांगण्यासाठी एक गोष्ट पुरेशी आहे. आज अपघातांचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यांनी कारणे सांगितले की, आपल्याकडे रस्ते अपुरे आहेत, अरूंद आहेत. त्यामुळे वाढलेली रहदारी आणि उपलब्ध असलेले रस्ते यांचे प्रमाण अतिशय व्यस्त आहे. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे असे त्यांनी अहवालात नमूद केले आहे. तसेच त्यांनी सूचना केली आहे की, त्याचा उल्लेख मी नंतर करणार आहे. या समितीच्या अहवालाची अंमलबजावणी आपण केली नाही तर त्या गोष्टीला फारसा अर्थ रहात नाही. या अपघामध्ये मानवी चुका खूप महत्त्वाच्या आहेत.

पूर्वी तांत्रिक गोष्टीमुळे अपघात होत असत. ब्रेक फेल मुळे, टायर फुटल्यामुळे, इंजिनला आग लागल्यामुळे अपघात व्हायचे. हे सर्व प्रकार ऑटोमोबाईल इंडस्ट्रीमध्ये क्रांती झाल्यामुळे कमी झालेले आहेत. फक्त 16 टक्के अपघात

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे...

तांत्रिक चुकांमुळे होत आहेत. उरलेले 84 टक्के अपघात मानवी चुकांमुळे होत आहेत. मानवी चुका टाळता येण्या सारख्या आहेत. अपघातात निष्पाप लोक मृत्युमुखी पडत आहेत. ते टाळण्यासाठी उपाययोजना करणे खूप महत्वाचे आहे. 70 टक्के चुका ह्या वाहन चालकामुळे होतात. गाडीवरचा ताबा सुटणे, रात्री डुलकी लागणे, अतिपरिश्रम होणे यामुळे अपघात होतात. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर अपघात झाला त्यावेळी तो ड्रायव्हर दोन दिवस झोपला नव्हता किंवा पुणे हैद्राबाद मार्गावर झालेल्या अपघाता संबंधी सांगण्यात आले की, तो चालक 12 तास गाडी चालवत होता. म्हणजे अतिपरिश्रमामुळे हा अपघात झाला होता. नॅशनल परमिटच्या गाड्या चालविणाऱ्या वाहन चालकांना बारा-बारा तास गाड्या चालवाव्या लागतात. त्यांना पगार देखील खूप कमी असतो. अधिक पैसे मिळावेत म्हणून जास्त डयुटी करत असतील तर ते चुकीचे आहे.

दुसरे असे की, चालक जास्त शिकलेले नसतात. त्यांना योग्य प्रशिक्षण मिळालेले नसते. तेव्हा त्यांना योग्य प्रशिक्षण मिळणे गरजेचे आहे. महामार्गावर वेगवेगळ्या साईन बोर्ड असतात. रस्त्यावर साधारण 100 ते 150 साईन बोर्ड असतात.

यानंतर श्री.सरफरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे....

साधारणपणे 100 ते 150 वेगवेगळया प्रकारच्या खुणा रस्त्यावर केलेल्या असतात व त्या खुणांचे वेगवेगळे अर्थ असतात. त्या खुणांचा अर्थ आपल्या सारख्या माणसाला देखील समजत नाही. त्यामुळे या सर्व खुणांचे अर्थ वाहन चालकांना समजले पाहिजेत. तिसरी गोष्ट अशी की, वाहन चालकांमध्ये असलेले दारुच्या व्यसनाचे प्रमाण. दारु पिऊन गाडी चालविणे हे अपघाताचे प्रमुख कारण आहे. या बाबतीत शासनाने कडक कायदे केले नसल्यामुळे या वाहन चालकांवर त्याचा विशेष परिणाम होत नाही.

सभापती महोदय, वाहनांचा वेग हा देखील एक महत्वाचा मुद्दा आहे. आज वाहने 100 ते 120 च्या वेगाने चालविली जातात. विशेषत: आपण पाहिले तर हायवे वर 120 च्या स्पीडने वाहने चालविली जातात. त्याचप्रमाणे वाहनांसाठी वापरल्या जाणाऱ्या टायर्सचे डिझाईन 80 कि.मी. च्या स्पीडसाठी केलेले असते. परंतु त्या टायरने 120 च्या स्पीडने वाहन चालविल्यानंतर ते फुटतात व त्यामधून अपघात होतात. अति वेगाने होणाऱ्या अपघातांची भीषणता देखील खूप असते. त्यामध्ये मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांची संख्या वाढते, गंभीररित्या जखमी होणाऱ्या लोकांची संख्या सुध्दा वाढते. सभापती महोदय, या सर्व गोष्टींचा विचार केल्यास अपघात होण्यासाठी मानवी चुका कारणीभूत असल्याचे दिसते. या चुका आपण वेगवेगळया माध्यमातून टाळू शकतो. त्याचप्रमाणे अपुरे, अरुंद आणि खराब रस्ते हे देखील अपघाताचे एक कारण आहे. सभापती महोदय, पुणे-नाशिक या 196 कि.मी. च्या रस्त्यावर सर्वात जास्त अपघात होतात. या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम होणार असल्याचे आम्ही नेहमी ऐकतो. त्याचप्रमाणे धुळे - जळगाव या रस्त्याची अवस्था आहे. वाहनांची संख्या वाढल्यामुळे वाहतूक मोठया प्रमाणात वाढली आहे हे लक्षात घेता या रस्त्यांचे चौपदरीकरण तर काही ठिकाणी सहा पदरीकरण लवकरात लवकर करणे आवश्यक आहे. परंतु या बाबतीत ज्या गतीने ही गोष्ट होणे आवश्यक आहे ती होत नाही. या रस्त्यांवर काही ठिकाणी बॅड स्पॉट असतात, ब्लॅक स्पॉट असतात, अपघातप्रवण क्षेत्र असतात अशा ठिकाणी विशेष काळजी घेतली पाहिजे. काही ठिकाणी अरुंद पूल असतात, छोटया, अरुंद मोऱ्या असतात त्या रुंद होणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे रस्त्यांवर असलेले दुभाजक लोकांच्या लक्षात येत नाहीत. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे रिफ्लेक्टर लावले जात नाहीत. रात्रीच्या वेळी रस्त्यावर वाहने उभी करुन ठेवली जातात परंतु त्या ठिकाणी रिफ्लेक्टर लावले नसल्यामुळे दिवसा होणाऱ्या अपघातांपेक्षा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे....

रात्रीच्या वेळी होणाऱ्या अपघातांचे प्रमाण जास्त असते. रात्रीच्या वेळी प्रखर दिव्यामध्ये देखील रस्त्यावर उभा असलेला ट्रक रिफ्लेक्टर न लावल्यामुळे दिसत नाही व त्यामधून अपघात होतो. तसेच, रस्त्यावर चाललेल्या बैलगाडीला रिफ्लेक्टर लावलेला नसल्यामुळे अपघात होतात, कधी-कधी रस्त्यावरुन जाणाऱ्या मोटार सायकलला रिफ्लेक्टर न लावल्यामुळे सुध्दा अपघात होतात. अशी वाहने अचानक समोर आल्यामुळे ट्रकला आदळून खूप मोठया प्रमाणात अपघात झाले आहेत.

माझ्याकडे जी सांख्यिकी माहिती उपलब्ध झाली आहे त्यानुसार पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवेवर झालेल्या अपघातापैकी जवळपास 200 अपघात हे रस्त्यावर बंद पडलेल्या वाहनांमुळे झाले आहेत. सभापती महोदय, त्याच प्रमाणे रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडांवर देखील रिफ्लेक्टर लावलेले नसतात. वाहन चालकांना रात्रीच्या वेळी व्यवस्थित न दिसल्यामुळे ते वाहन झाडावर जावून आदळते व अपघात होतो. त्याचप्रमाणे रस्त्याच्या मधोमध जी स्ट्रिप लावलेली असते ती सुध्दा काही ठिकाणी नसते. त्याचबरोबर ज्या ठिकाणी रस्ता संपतो त्या ठिकाणी सुध्दा व्यवस्थित स्ट्रिप लावलेली नसते. त्यामुळे तो रस्ता कुठे संपत आहे हे लोकांना समजत नाही.

सभापती महोदय, रस्त्याच्या वळणांवर आणि बाजूला अनेक फलक लावले जातात ते सुध्दा सुस्पष्ट नसतात. या अपघाताची जी कारणे आहेत ती मानवनिर्मित असून ती आपल्याला टाळता येण्याजोगी आहेत. त्यामध्ये अतिशय मूल्यवान असे लोकांचे जीव जात आहेत. सभापती महोदय, मानवनिर्मित अपघातामध्ये वाहन चालक हा एक अत्यंत महत्वाचा फॅक्टर आहे. त्याला वाहन चालविण्याचा परवाना देतांना त्याची कोणत्याही प्रकारे परीक्षा घेतली जात नाही. या बाबत अनेक वेळा मी आर.टी.ओ. च्या अधिकाऱ्यांना विचारले असता त्यांनी सांगितले की,आमच्याकडे आठची फिगर काढण्यासाठी मोठे ग्राऊंड नाही. किंवा उतारावरुन खाली येत असतांना त्याला वाहनाचा वेग नियंत्रित करता येतो काय याची सुध्दा परीक्षा घेता येत नाही. परदेशामध्ये वाहन चालकाकडून एखादी चूक झाली तर त्याच्या लायसन्सवर शेरा मारला जातो आणि सतत तीन चुका झाल्यानंतर त्याचे लायसन्स कायमचे रद्द होते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे . . . .

ही बाब अतिशय महत्वाची आहे. दिल्लीमध्ये, हरियाणामध्ये प्रशिक्षण संस्था निघालेल्या आहेत. त्या धर्तीवर आपल्याही राज्यामध्ये अशा प्रकारची प्रशिक्षण संस्था काढणे खूप गरजेचे आहे. शिक्षणाची अट देखील महत्वाची आहे.

सभापती महोदय, जर आपण सर्व चालक पाहिले तर ते वैद्यकीय दृष्टया अनफीट असतात. 70 टक्के चालक हे अनफीट असल्याचे दिसून आले आहे. म्हणून त्यांची वैद्यकीय तपासणी करुन त्यांच्यामध्ये जो दृष्टीदोष असतो,तो दूर होणे आवश्यक आहे.कारण त्यांच्यामध्ये कलर ब्लाईंडनेस, असल्यामुळे अशा प्रकारचे अपघात होत असतात.तसेच सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्यामध्ये एक बेफीकीर वृती असते, बेदरकारपणा असतो. आपल्यामुळे कोणाचा तरी मृत्यू होत आहे, आपण कोणाच्यातरी मृत्यूला कारणीभूत होत आहोत अशा प्रकारची त्यांना कोणतीही जाणीव नसते.

सभापती महोदय, यानिमित्ताने ओघाने एक सूचना करावीशी वाटते. शाळांमध्ये नागरीक शास्त्र हा विषय असतो. या विषयाच्या माध्यमातून रस्त्यावरील ज्या वेगवेगळया खुणा असतात, त्या संबंधातील माहितीचा आठवी, नववी आणि दहावीच्या शालेय अभ्यासक्रमामध्ये समावेश होणे खूप गरजेचे आहे. महत्वाची बाब म्हणजे जंगलामध्ये काही कायदा नसतो म्हणून आपण जंगल कायदा असे म्हणतो. दुर्दैवाने आज आपल्या देशामध्ये अशी स्थिती आहे की, रस्त्यावरील वाहतुकीच्या बाबतीत कोणताही कायदा पाळावयाचा नाही. त्यामुळे रस्त्यावरील वाहतुकीच्या बाबतीत सांगावयाचे तर सध्या त्याचे जंगल कायद्याप्रमाणे रुपांतर झालेले आहे. ज्याला जसे वाटेल, ज्याला जसे पटेल त्याप्रमाणे प्रत्येक जण गाडी चालवित असतो आणि यामुळे कोणाचा मृत्यू होईल काय याची देखील संबंधितांना पर्वा नसते. अशा वेळी अपघात झाल्यानंतर जे खटले भरले जातात त्यामध्ये संबंधितांना जुजबी स्वरुपाच्या शिक्षा होतात. बऱ्याच वेळेला वाहन चालकाला शिक्षा होते, मालकाला कधीच शिक्षा होत नाही. त्यामुळे मालकाला सुध्दा याबाबतीत समाविष्ट करता येईल काय अशा पध्दतीचा काही . . ..

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : मालकाचा काय संबंध आहे?

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, मालकाचा देखील संबंध अशासाठी आहे की, ड्रायव्हर अतिश्रमाने थकलेला असतो. मी सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांना सांगू इच्छितो की, जर कोणी एखाद्या ड्रायव्हरला दिवस-रात्र काम करावयास सांगत असेल तर त्याचा काहीतरी विचार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केला पाहिजे.तसेच दारु पिऊन गाड्या चालविण्याचे प्रमाण जास्त आहे.यासाठी ब्रेथ-ॲनलायझर करुन संबंधितांनी दारु प्यायली आहे की नाही हे डिटेक्ट करणे आणि तसे आढळून आल्यास संबंधितांना कडक शासन करणे याची देखील कठोर अंमलबजावणी झाली पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, वेगाच्या बाबतीत सांगावयाचे तर वाहने अतिशय वेगाने चालविली जातात त्यावर कशा प्रकारे नियंत्रण ठेवता येईल. तसेच जे चालक वेगाची मर्यादा ओलांडतात, त्याचे डिटेक्शन होणे फार महत्वाचे आहे. याकरता टोल नाक्याच्या ठिकाणी सी-सी टी.व्ही.कॅमेरे लावता येतील, तसेच वाहनांचा स्पीड मोजण्यासाठी तेथे यंत्रणा कशी निर्माण करता येईल यादृष्टीने व्यवस्था करण्याची गरज आहे.कारण टोल नाक्यावर टोल भरण्यासाठी गाड्या थांबतातच.अशा वेळी मोबाईलवरुन माहिती देऊन तेथे पोलिसांची व्यवस्था करुन संबंधितांना शिक्षा करता येईल किंवा मोठ्या प्रमाणात दंड करता येईल.

सभापती महोदय, तरुण मुले अतिशय वेगाने गाड्या चालवित असतात.कारण या अपघातांचे प्रमाण पाहिले तर त्यामध्ये 22 टक्के अपघात हे दुचाकी वाहनांचे होत आहेत.हल्ली मुले ही अतिशय बेशिस्तपणे गाड्या चालवित असतात.मी याठिकाणी उपाययोजना सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.परंतु या उपाययोजनांमध्ये प्रामुख्याने चार विभाग होतात. एक म्हणजे संबंधितांचे प्रबोधन केले पाहिजे, दुसरे म्हणजे एन्फोर्समेंट म्हणजे याबाबतीत अतिशय कठोरपणे कायद्याची अंमलबजावणी केली पाहिजे आणि गरज पडेल तेथे नव्याने कायदा करण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे इमर्जन्सी सर्व्हीसेस निर्माण केल्या पाहिजेत.जेव्हा एखादा अपघात होतो त्यावेळचा सुरुवातीचा जो तास असतो ज्याला गोल्डन अवर असे म्हणतात आणि त्या एक तासातील जो अर्धा तास असतो त्याला आम्ही प्लॅटीनम अव्हर म्हणतो. त्या काळामध्ये जर त्याठिकाणी वैद्यकीय सेवा उपलब्ध झाल्या तर अनेकांचे मृत्यू टाळता येतील, लोकांचे जीव वाचू शकतील. याबाबतीत तामिळनाडू सरकारने अत्यंत सुंदर मॉडेल केलेले आहे. तामिळनाडू मध्ये अशा प्रकारच्या इमर्जन्सी मेडीकल सर्व्हीसेस निर्माण केलेल्या आहेत. त्याठिकाणी प्रत्येक 50 कि.मी.वर ॲम्ब्युलन्स्‌ची उपलब्धता केलेली आहे. या ॲम्ब्युलन्स्‌ अतिशय सुसज्ज आहेत. त्यामध्ये डी-फेब्युलेटर आहे, व्हेन्टीलेटर आहे, सक्शन मशीन आहे आणि सगळयात महत्वाचे म्हणजे तेथे प्रशिक्षित अशा दोन व्यक्ती असतात. तसेच त्या ॲम्ब्युलन्स्‌च्या ड्रायव्हरला देखील याबाबत प्रशिक्षण दिलेले असते.

अशुध्दित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे .....

त्यांनी ठिकठिकाणी ट्रॉमा सेंटर्स उभे केलेले आहेत. कोणत्याही ठिकाणापासून पंधरा मिनिटामध्ये ट्रॉमा सेंटरवर पोहोचता येईल अशा पध्दतीने त्यांनी सेंटर्स उभे केलेले आहेत. असे ट्रॉमा सेंटर्स आपल्याला कसे उभे करता येतील आणि त्यासाठी शासनाला किती खर्च लागेल याचा विचार करावा. यामध्ये जर आपण खाजगी रुग्णालयांचा सहभाग घेऊन असे ट्रॉमा सेंटर्स हायवेवर उभे करण्याचा प्रयत्न केला तर खूप चांगल्या पध्दतीने मार्ग निघू शकतो असे मला वाटते. आयएमए सारखी संस्था आहे. तामिळनाडूमध्ये आयएमए या संस्थेचा खूप मोठा सहभाग घेतलेला आहे. त्याचप्रमाणे लायन्स क्लब, रोटरी क्लब यांचाही सहभाग घेता येईल. प्रत्येक ठिकाणी लायन्स क्लबच्या, रोटरी क्लबच्या ॲम्ब्युलन्स असतात. त्यांना जर आपण सुरुवातीला गाडी घेण्यासाठी थोडीशी मदत दिली आणि त्याच्या माध्यमातून जर आपण या ॲम्ब्युलन्सची व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला निश्चितपणे आपल्याला चांगली व्यवस्था निर्माण करता येईल.

सभापती महोदय, त्या ठिकाणी तीन लेव्हलच्या ट्रिटमेंटची आवश्यकता आहे. पहिली गोष्ट म्हणजे त्या ठिकाणी ॲम्ब्युलन्स पाहिजे. त्या ॲम्ब्युलन्सची स्थिती एखाद्या रुग्णालयासारखी असली पाहिजे. हॉस्पिटल ऑन व्हील अशा पध्दतीची ती ॲम्ब्युलन्स असली पाहिजे. त्यामध्ये सर्व प्रकारच्या सुविधा असल्या पाहिजेत. त्या ॲम्ब्युलन्समध्ये अगदी छोटेसे ऑपरेशन थियेटर सुध्दा निर्माण करु शकलो पाहिजे. अपघात झाल्यानंतर अतिरिक्त रक्तस्त्रावामुळे बरेच लोक मृत्युमुखी पडत असतात. त्यामुळे तशा पध्दतीची व्यवस्था त्या ॲम्ब्युलन्समध्ये केली पाहिजे. जे ट्रॉमा सेंटर्स आहेत त्या ठिकाणी सिटी स्कॅनची सोय असेल, कृत्रिम श्वास देण्याची सोय असेल अशा गोष्टी केल्या पाहिजेत. लेव्हल थ्री म्हणजे ज्याला टर्शरी ट्रिटमेंट म्हणतो त्यामध्ये सर्व प्रकारच्या तपासण्या करण्याच्या सुविधा असतील. त्या ठिकाणी हृदयाला, पोटाला, मणक्यांना अधिक मार लागतो. त्या ठिकाणी मेंदूच्या संदर्भात न्युरो सर्जन असतील. ॲबडॉमिनल सर्जरी होऊ शकतील अशा प्रकारचे टर्शरी सेंटर्स सुध्दा निर्माण करणे गरजेचे आहे. तामिळनाडूमध्ये अतिशय चांगली व्यवस्था निर्माण केलेली आहे. संपर्कासाठी त्यांनी टोल फ्री नंबर्स सुध्दा ठेवलेले आहेत. हायवेवर जागोजागी बूथ निर्माण केलेले आहेत. कमीतकमी अपघात कसे होतील आणि झालेल्या अपघातातून होणारी मनुष्यहानी कमीतकमी कशी होईल यासाठी त्या ठिकाणी चांगले प्रयत्न झालेले आहेत.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

डॉ. सुधीर तांबे .....

सभापती महोदय, यामध्ये जनजागृतीचा महत्वाचा मुद्दा आहे. या सगळ्या गोष्टींच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्याची आवश्यकता आहे. जसा जंगल कायदा असतो त्याप्रमाणे आपल्याकडे रोड कल्चर निर्माण होणे खूप गरजेचे आहे. आपल्यापैकी अनेक सन्माननीय सदस्य परदेशात जात असतात. त्या ठिकाणचे रोड कल्चर आपल्याला माहीत आहे. आपण सर्वजण बघतो की, त्या ठिकाणी एखादा पादचारी रस्त्यावर आला की, गाडी लगेच थांबते. काही वर्षापूर्वी मी जर्मनीला गेलो होतो. त्या ठिकाणी चारवेळा खासदार राहिलेल्या एका महिलेबरोबर आम्ही फिरत होतो. त्या स्वत: ड्रायव्हींग करीत होत्या. माजी मंत्री असूनही त्यांना ड्रायव्हर ठेवणे परवडत नव्हते. हे मी ओघाओघाने सांगत आहे. गाडीत बसल्यानंतर सर्वांनी बेल्ट लावले आहेत की नाही हे पाहिल्यानंतरच त्यांनी गाडी सुरु केली. एका खेडेगावामध्ये त्यांचा कार्यक्रम होता. आम्ही त्या खेडेगावामध्ये गेल्यानंतर त्या पार्कीन्गसाठी जागा शोधत होत्या. त्यांनी पार्कींगची जागा शोधली. ते अतिशय छोटे गाव होते. रस्ता निर्मनुष्य होता. तरी सुध्दा त्यांनी पार्कींगची जागा शोधून त्या ठिकाणी गाडी पार्क केली. तेथून कार्यक्रमाचे ठिकाण दूर होते. आम्ही त्या ठिकाणी चालत गेलो. मी हे यासाठी सांगत आहे की, जेव्हा कोठलेही कल्चर निर्माण करावयाचे असते तेव्हा त्यामध्ये नेतृत्वाने पुढाकार घेतला पाहिजे असे माझे प्रामाणिक मत आहे. म्हणून मी हे उदाहरण या ठिकाणी दिले.

सभापती महोदय, यामध्ये अपघात विमा हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. अपघातांमध्ये लोक जखमी होतात. अनेक वेळा अज्ञात वाहनाच्या धडकेमुळे अपघात होतो आणि ते वाहन पळून जाते. त्या वाहनाचा शोध लागत नाही. मग त्या गरीब व्यक्तीच्या संपूर्ण ट्रिटमेंटची जबाबदारी कोणी घ्यावयाची ? आपला मोटार व्हेईकल ॲक्ट 1939 मध्ये तयार झाला. त्यामध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे. हा केंद्राचा विषय असला तरी त्या कायद्यामध्ये बदल व्हावयास पाहिजे. जखमींना अपघात विम्याची सुविधा मिळाली पाहिजे. कारण त्या ठिकाणी प्राण वाचवावयाचे म्हटल्यानंतर प्रचंड खर्च होतो. त्या व्यक्तीला अपघात विमा सुरक्षितपणे कसा मिळेल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे....

सभापती महोदय, अपघाताचा विषय अत्यंत महत्वाचा आहे. अनेकदा मधुमेह, एडस् या आजारांवर चर्चा केली जाते. मधुमेह, एडस् किंवा हृदयविकार या आजारांपेक्षा अपघाताने मृत्यू होण्याचे किंवा अपंग होण्याचे प्रमाण जास्त आहे आणि त्यावर कोट्यवधी रुपये खर्च होतो. म्हणून या महत्वाच्या विषयावर शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. ज्यावेळी आपला जवळचा मित्र किंवा नातेवाईक अपघातामध्ये दगावतो त्यावेळी संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होते. अशा वेळी त्या अपघाताची दाहकता जाणवते. म्हणून या महत्वाच्या विषयावर शासनाने त्वरित उपायोजना केली पाहिजे अशी मंत्री महोदयांना मी विनंती करतो. सभापती महोदय, मला आपण प्रस्ताव मांडण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपलेही आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी नियम 260 अन्वये संवेदनशील विषय सभागृहासमोर उपस्थित केलेला आहे. या प्रस्तावात विषयाची व्यापकता व त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती यासंबंधी सविस्तर विवेचन करण्यात आलेले आहे. आपण कोणतेही वर्तमानपत्र उघडले तर अपघाताची बातमी वाचावयास मिळते. टी.व्ही.वरील कोणतेही चॅनेल सुरु केले तर त्यामध्ये रस्त्यावरील अपघाताची बातमी हमखास बघावयास मिळते. अपघाताची बातमी दिसली नाही असा एकही दिवस जात नाही. रस्त्यावरील वाहनांची दिवसेंदिवस वाढत चाललेली संख्या हे त्याच्या पाठीमागचे कारण असू शकेल असे मला वाटते.

सध्या अनेक राज्य रस्त्याने जोडली जात आहेत. राज्यभर रस्त्याचे जाळे पसरलेले आहे. त्याचा विस्तार होत आहे. रस्त्यांचे चौपदरीकरण होत आहे तर काही ठिकाणी सहापदरी रस्तेही कमी पडू लागले आहेत. मोबिलिटी सातत्याने वाढल्याचे दिसत आहे. आता कामानिमित्त पुण्याहून मुंबईला आणि मुंबईहून पुण्याला रस्त्यावरुन जाणे सहज शक्य झालेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:05

श्री.हेमंत टकले....

कारण रस्तेच अशा पध्दतीचे झालेले आहेत की त्यामुळे रस्त्यावर असणा-या लोकांची संख्या आणि लोकांची वाहतूक करणा-या वाहनांची संख्या यामध्ये गेल्या 20 वर्षात फार मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. त्याच प्रमाणे माल वाहतुकीची वाहने ही देखील पूर्वीपेक्षा अधिक मोठी आणि अधिक चाकांची, रस्त्यावरील जागा अधिक व्यापणारी अशी आहेत. या सर्व वाहनांची नोंद झालेली असते. त्यांनी आपल्या वाहनामध्ये किती वजनाच्या मालाची वाहतूक करावी यासंबंधी निर्बंध घातलेले आहेत, वाहन सुस्थितीत असणे आवश्यक असून त्याची परिवहन खात्या मार्फत वारंवार तपासणी केली जाते. अशा प्रकारच्या अनेक यंत्रणा आपल्याकडे आहेत.

सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी काही परदेशांचा उल्लेख केला. मला अमेरिकेला जाण्याचा योग्य अजून आलेला नाही. परंतु माझे काही मित्र अमेरिकेमध्ये आहेत. त्यांच्याकडून मला जी माहिती मिळालेली आहे त्यानुसार आपल्याकडे माल वाहतुकीसाठी जी वाहने वापरली जातात त्यापेक्षा खूप मोठी वाहने अमेरिकेमध्ये माल वाहतुकीसाठी वापरली जातात. अमेरिकेमध्ये त्या वाहनांना नियंत्रण करणारी यंत्रणा जीपीआरएसच्या माध्यमातून निर्माण केलेली आहे. प्रत्येक चालकाने एका दिवसामध्ये किती तास गाडी चालविली पाहिजे याबाबतीत त्यांच्यावर बंधन आहे. उदाहरणार्थ समजा एका वाहनाचा एकूण प्रवास 400 कि.मी. होणार असेल तर चालकाने किती किलो मीटर अंतर कापल्यानंतर वाहन थांबविले पाहिजे यासंबंधीचे नियम केलेले आहेत. तसेच त्याने थांबल्यानंतर किती काळ विश्रांती घेतली पाहिजे याचे मोजमाप करणारी यंत्रणा देखील तेथे असते. अर्थातच जे इन्फ्रास्ट्रक्चर यासाठी वापरले जाते ते तेथील हायवेवर अतिशय चांगल्या प्रकारे उपलब्ध करुन दिलेले आहे.

त्या ठिकाणी सिग्नलिंगची देखील व्यवस्था केलेली आहे. जर कामगाराला 8 तासाची शिफ्ट असेल तर 7व्या तासानंतर त्याच्या वाहनामध्ये सिग्नल दिला जातो आणि सांगितले जाते की, या नंतर एक तासाने तुला वाहन थांबवायचे आहे. एक तासानंतर जे ठिकाण येणार असेल त्या ठिकाणी मुख्य रस्ता सोडून बाजूच्या रस्त्याला कोणत्या ठिकाणी वाहन उभे करावयाचे ती जागा देखील चालकाला दर्शविली जाते. मनुष्य हानी टाळायची असेल, नागरिकांचे प्रश्न सोडवायचे असतील, यंत्रणा जाणीवपूर्वक राबवायची असेल तर या क्षेत्रामध्ये आपण ज्या स्तरापर्यंत जाऊ शकू तेथपर्यन्त जाण्याची वेळ आज आलेली आहे. जर तेथपर्यन्त जाता येणे शक्य नसेल तर असलेल्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

परिस्थितीमध्ये आपल्याला काय करता येईल हे पाहिले पाहिजे.

सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी सांगितले की, ट्रॉमा सेंटर असावे, ॲम्ब्युलन्सची व्यवस्था असावी. मी देखील एका ट्रस्टच्या मार्फत राज्यामध्ये ॲब्युलन्स देण्याचा प्रयत्न करुन पाहिलेला आहे.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले..

मी एका ट्रस्टच्या मार्फत जवळ जवळ 120 रुग्णवाहिका या कामासाठी दिलेल्या आहेत. बेसिक रुग्णवाहिका दिल्यानंतर त्या रुग्णवाहिकेचे ट्रॉमाकेअर रुग्णवाहिकेमध्ये रुपांतर करण्यासाठी जादा निधीची तरतूद दुसऱ्या संस्थेकडून करुन त्याचा किती परिणाम होतो याचा सुध्दा आम्ही अभ्यास केलेला आहे. ज्या प्राथमिक गोष्टी आहेत म्हणजे आपण रुग्णवाहिका दिली, परंतु त्या रुग्णवाहिकेमध्ये प्रशिक्षित पॅरामेडिकल स्टाफ नसेल तर त्या रुग्णवाहिकेचा काही उपयोग नाही. एखाद्या ठिकाणी अपघात झाला असेल तेथे रुग्णवाहिका पोहोचली आणि जे कोणी जखमी झालेले आहेत त्यांच्या जखमा कशा स्वरुपाच्या आहेत हे न पाहता जखमींना धडाधड स्ट्रेचर घेऊन निघालो तर अपघातामध्ये होणाऱ्या इजेपेक्षा घाईगर्दीने नेल्यामुळे त्यांची इजा अधिक वाढते. अपघातामध्ये एखाद्याच्या पाठीला काही मार लागला असेल तर त्याला स्ट्रेचरवरुन नेण्यासाठी कोणती पध्दत अमलात आणायला पाहिजे याची प्राथमिक माहिती आज आपल्या जवळ उपलब्ध नाही.

सभापती महोदय, रस्त्यांवरील वाहनांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी गृह विभागाकडे आहे. परिवहन विभागाकडे किती आहे हे मला माहीत नाही. रस्ता सुरक्षा पथकाचे जे काम सुरु आहे त्यामध्ये खूप कमतरता असल्याचे आपणास रस्त्यांवरुन प्रवास करताना दिसते. हा विभाग म्हणावा तसा परिणामकारकपणे, पुरेशा तातडीने काम करताना दिसत नाही.

सभापती महोदय, मी मागे मुंबई-पुणे एक्सप्रेस हाय-वे वरुन जात असताना माझ्या गाडीचा चालक 100 ते 110 च्या वेगाने गाडी चालवित होता. एके ठिकाणी मला 70 किलोमीटर वेगाचा बोर्ड दिसला. मी वाहनचालकाला सांगितले की, आपण 100 ते 110 च्या वेगाने गाडी चालवत आहोत. या ठिकाणी 70 च्या स्पीडने गाडी चालविण्याचा बोर्ड लावलेला आहे." वाहनचालकाने त्या 70 कि.मी.वेगाचा अर्थ कमीत कमी 70 च्या वेगाने गाडी चालवा असा लावला. अशाप्रकारे एक गैरसमज निर्माण होतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले..

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी गाडीचे टायर्स फुटल्या संबंधीचा उल्लेख केला. मुंबई-पुणे एक्सप्रेस हाय-वेवर टायर्स सबंधीची होर्डींग्ज लावलेली आहेत. ज्या क्षमतेचे टायर्स बनविलेले आहेत त्या क्षमतेपेक्षा जास्त वेगाने टायर्स धावल्यास ते टायर्स फुटतात. टायर्स फुटल्यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटून ते भरकटत जाऊन कुठेतरी आदळते, त्यामुळे अपघात होतात.

सभापती महोदय, गाडीचे मालक आणि वाहनचालकांनी आपल्या गाडीची काळजी घेतली पाहिजे. वाहनचालकांना योग्य तासांची डयुटी दिली पाहिजे. त्यांच्यावर अतिरिक्त ताण येणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. आपणास बऱ्याच वेळा असे दिसून येते की, एका ठिकाणाहून वाहन आल्यानंतर ते वाहन सुरक्षित नसताना देखील दुसऱ्या ठिकाणी नेले जाते. यामध्ये शाळेच्या बसेस, खाजगी टुरिस्टच्या गाड्यांचा समोवश आहे. या गाड्यांचा चालकवर्ग कशा पध्दतीने काम करतो, त्यांना ज्या डयुटीज दिल्या जातात त्यामुळे त्यांच्यावरील कामाचा ताण वाढत आहे. तेव्हा या गोष्टींकडे लक्ष देण्याची फार मोठी गरज निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, रस्त्यांवरील अपघातामुळे होणारे मृत्यू हे खरोखर दुर्दैवी मृत्यू आहेत. हे टाळता येण्यासारखे मृत्यू आहेत. यासाठी रस्ते चांगले पाहिजेत, रस्त्यांवरील मार्गदर्शक सूचना योग्य प्रकारे असल्या पाहिजेत.

सभापती महोदय, या सर्वांचे नियंत्रण परिवहन विभागाकडे आहे. परिवहन विभागाने गाड्यांची जी काही लाईफ ठरविली असेल,

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

त्या गाडया वापरल्या जात आहेत काय, त्या गाडया आपण बदलतो आहोत काय, नवीन प्रकारच्या गाडया आणतो आहोत काय, आपल्या सर्व वाहन चालकांची आरोग्य तपासणी करतो आहोत काय, प्रामुख्याने त्यांच्या दृष्टीबद्दलचा जो भाग आहे, त्या बाबतीत आपण सतर्क आहोत काय असे असंख्य प्रश्न या विषयात गुंतलेले आहेत. या विषयाकडे परिवहन खात्याने, गृह खात्याने आणि रस्ते बांधणी खात्याने एकत्रितपणे येऊन या बाबतीत ज्या काही उपाययोजना आहेत, त्या केल्या पाहिजेत. या गोष्टींचा लोकशिक्षणासाठी उपयोग करुन दिला पाहिजे. आपण ही व्यवस्था अतिशय चांगल्या प्रकारे सुधारु शकतो अशा प्रकारचा दिलासा शासनाने देण्याची आवश्यकता आहे. या गोष्टीकडे शासनाने लक्ष द्यावे अशी विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रस्ते अपघातांचे दिवसेंदिवस वाढत असलेले चिंताजनक प्रमाण या विषयाच्या अनुषंगाने नियम 260 अन्वये प्रस्ताव सभागृहासमोर मांडलेला आहे, त्यावर मी माझे मत व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, आज दुपारी खरे सुपरस्टार श्री. राजेश खन्ना यांचे दु:खद निधन झाले. त्यांचे एका हिंदी चित्रपटातील गाणे मी या ठिकाणी जाणीवपूर्वक नमूद करु इच्छितो.

"जिंदगी, एक सफर, हैं सुहाना,
यहाँ कल, क्या हो, किसने जाना."

सभापती महोदय, रस्त्यावर जाताना उद्या काय होईल यासंबंधीची परिस्थिती डॉ.सुधीर तांबे यांनी या प्रस्तावाच्या माध्यमातून विशद केलेली आहे. या प्रस्तावाच्या निमित्ताने मला दोन, तीन गोष्टी सभागृहासमोर मांडावयाच्या आहेत. राज्य शासनाने टोल संस्कृतीचा अंगीकार केला. नंतर टोळधाड झाली ही गोष्ट सोडून द्या. परंतु टोलमुळे रस्त्यांची क्वालिटी अतिशय चांगली झाली आहे हे मात्र तितकेच खरे आहे. त्याचवेळी ऑटोमोबाईल क्षेत्रात खऱ्या अर्थाने एक नवीन क्रांती आली. या देशात मोठी वाहने, चांगल्या दर्जाची वाहने रस्त्यावर आली. टोलमुळे रस्त्यांची क्वालिटी वाढली, त्यामुळे मोठ्या, लहान वाहनांची संख्याही वाढली. त्या तुलनेमध्ये वाहने चालविणाऱ्या प्रशिक्षीत चालकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली पाहिजे, कारण अप्रशिक्षीत वाहन चालकांना वाहतुकीची माहिती नसते ही गोष्ट मला या ठिकाणी नमूद केली पाहिजे. आपले वाहतुकीचे नियमन करणारा जो कर्मचारी वर्ग आहे, त्या कर्मचाऱ्यांमधील मॅच्युरिटी वाढली पाहिजे. त्यांच्या मॅच्युरिटीमध्ये वाढ झालेली नाही. त्यामुळे अपघाताच्या घटना वारंवार होताना आपल्याला दिसून येतात.

महोदय, 15 ते 20 वर्षापूर्वी टेल लॅम्प नसणाऱ्या गाडया रस्त्यावर चालत होत्या, त्यांच्या मागून भरधाव वेगाने गाडया चालत होत्या, त्यावेळी भरधाव गाडीचा वेग 30 ते 40 एवढा असावयाचा. एखाद्या गाडीला मागील गाडीने ठोकले तरी त्या अपघातात माणसांचे मृत्यू होत नव्हते. आता महामार्गांवर ताशी 110 ते 120 च्या वेगाने गाडया धावतात. मी मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वरुन जाताना पाहतो की, अनेक गाडयांना टेल लॅम्पच नसतो. त्या रस्त्यावर अर्ध्या अर्ध्या तासाने

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

चार टोल नाके बसविलेले आहेत. ज्या गाडयांना टेल लॅम्प नसतो, त्यांना अडविण्यासाठी मात्र वाहतूक विभागाकडे काहीही व्यवस्था नाही. आता अत्याधुनिक यंत्रणा मोठया उपलब्ध झालेल्या आहेत, परंतु त्या यंत्रणांचा उपयोग वाहतूक विभागाकडून होताना दिसून येत नाही. टोल लावला, रस्ते चांगले केले, गाडया मोठया व नवीन आल्या, त्या गाडयांचा वेग खूपच वाढला आहे. त्या वेगावर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने वाहतूक विभागाकडून काही व्यवस्था करण्यात येणार की नाही, या गोष्टीचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी सांगितले की, ज्याप्रमाणे विमानाच्या पायलटचे कामाचे तास ठरलेले असतात त्याच धर्तीवर कमर्शियल लायसन्स घेऊन वाहन चालविणाऱ्या चालकांसाठी अशा पध्दतीचे नियमन करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

रस्त्यांवरील अपघातांचा अभ्यास करण्यासाठी गडकरी साहेब बांधकाम मंत्री असताना माजी सचिव तांबे साहेबांच्या अध्यक्षेखाली एक समिती नेमली होती. अभ्यास पूर्ण झाला होता. बोओटी तत्वावर एवढे चांगले रस्ते पूर्ण झाल्यानंतर सुध्दा अपघात होत आहेत याची कारणे काय आहेत त्याचा अभ्यास शासनाने केला आहे काय  आणि त्यातून सरकार कोणती पावले उचलणार आहे याचा विचार झाला आहे काय हे मला जाणून घ्यावयाचे आहे. मायनिंग वाढले आहे.वाळूचे डंपर्स आहेत. या डंपर्सना ठराविक वेळेमध्ये ठराविक ट्रीप पूर्ण कराव्या लागतात. त्यामुळे त्यांचे स्पीड आणि त्यामुळे कोणत्या भागात अपघात जास्त होतात याचा अभ्यास केला आहे काय ? काही क्रोमिंग डिसीज आहेत जे सातत्याने या अपघातामुळे होत असतात. ऊसाच्या वाहतुकीच्या काळात ट्रॅक्टरने ऊसाची वाहतूक सुरु असते त्यावेळी काही अपघात होतात. त्याच्या धुरामुळे होणारे आजार असतील याचा नीट अभ्यास करुन यामध्ये काही उपाययोजना करता येतील काय याचा विचार करावा.

सभापती महोदय, बरेच वर्षे एक विषय प्रलंबित आहे तो मी याठिकाणी मांडणार आहे. पंढरपूरच्या यात्रेसाठी माऊली आणि तुकारामांच्या पालख्यांची वारी निघते. वारकऱ्यांची वर्षानुवर्षे मागणी आहे की, त्यांना वारीच्या मार्गावर बायपास हवा आहे. यावर्षीच्या वारीमध्ये सातारा जिल्हयातील नीरा नदीमध्ये वारीतील 7 माणसे मृत्युमुखी पडलेली आहेत. वारीतील ट्रक नीरा नदीमध्ये कोसळून हा अपघात झाला होता. यावर्षी वारीमध्ये गेल्यानंतर तेथील वारी प्रमुखांशी माझे बोलणे झाले होते. मुख्यमंत्र्यांसोबत आणि बांधकाम मंत्र्यांसोबत याबाबतीत बैठक झाली. वारीच्या मार्गावरील 11 ठिकाणी आम्हांला बायपास पाहिजे असे वारकऱ्यांनी सांगितले. वारीला निघताना पहाटे 4.00 वाजता उठलो की वारीसोबत तंबू आणि जे काही सामान असते ते गावाच्या बाहेरुन जाऊ शकतात. परंतु बायपास नाही. त्यामुळे एका बाजूला वारी आणि दुसऱ्या बाजूला ट्रक वारीसोबत हळूहळू जातात. ती वारी मुक्कामाला जाण्यापूर्वी सामान तेथपर्यंत पोहोचणे आवश्यक असते आणि मुक्कामाच्या ठिकाणी तंबू ठोकणे आवश्यक असते. त्यामुळे बायपासची मागणी या दोन्ही पालख्या म्हणजे माऊलींची आणि तुकाराम महाराजांची पालखी करीत आहेत. पण त्याबाबत आपण काहीच करीत नाही. वर्षातून एकदाच वारी होत असल्यामुळे डेड इन्व्हेस्टमेंट म्हणून त्याकडे पाहिले जाऊ शकते.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

पण यातील 5 बायपास करता येतील काय, 7 करता येतील काय किंवा आम्ही टप्प्याटप्प्याने बायपास करु याबाबतीत शासन काही ठोस पावले उचलणार आहे काय असा माझा प्रश्न आहे. एका वर्षात होणार नाही. राज्यातील हा असा एक उत्सव आहे की सगळया अर्थाने या उत्सवाकडे महाराष्ट्रातील जनता पाहते आहे. या वारीच्या विषयामध्ये बायपासची मागणी आहे त्याबाबतीत शासनाने त्वरित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

बायपासमध्ये अपघात टाळण्याबरोबर वारकऱ्यांना जे आजार होतात त्याचाही विचार केला पाहिजे. कारण वारीच्या बाजूने जाणारे जे ट्रक असतात ते 10-15 वर्षे जुने असतात कारण त्यांना तेच परवडतात परंतु त्यातून जो धूर सोडला जातो तो सगळा वारकऱ्यांच्या नाका-तोंडात जात असल्यामुळे त्यांना लंग्जचा आजार हा होणारच. या विषयाचा त्या गांभीर्याने सरकार विचार करीत आहे. विठूरायाच्या दर्शनाला जाणारा जो वारकरी आहे त्याची आपण काही वेगळी व्यवस्था करु शकतो काय याचा विचार करणे आवश्यक आहे. ट्रक 10 वर्षाचा जुना असता कामा नये अशी अट घालून चालणार नाही कारण वाऱ्या बंद पडतील. रस्त्यावर एवढे खड्डे आहेत की अपघात होणारच. कार्बन मोनॉक्साईड जर वारकऱ्यांच्या नाकात जाऊ नये असे वाटत असेल तर बायपास दिला पाहिजे. खड्डे बुजविण्यासाठी शासनाकडे पैसे नाहीत तर बायपास कुठून देणार ? तुम्ही अजितदादांना सांगणार. अजितदादांचा आम्ही वारीत फोटो पाहिला. हातात मृदंग आणि वीणा आहे, डोक्यावर पगडी घातलेला अजितदादांचा वारीतील फोटो पाहिला आहे. फोटो लावण्यापेक्षा काहीतरी करा.

सभापती महोदय, कोकणामध्ये गणपती सणासाठी चाकरमानी जाताना गणपतीच्या दिवशी निघतो आणि विसर्जनाच्या दिवशी पोहोचतो.

नंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

मागील वर्षी आम्ही सर्व कोकणातील आमदारांनी पुढाकार घेऊन बांधकाम विभाग, परिवहन विभाग व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली होती. त्यानंतर कोकणातील माणूस जो दरवर्षी गणपतीला जातो तो वेळेत पोहचू शकला. अशा प्रकारे रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या माध्यमातून देखील रस्ते वापरण्याबद्दलची जागरुकता करुन दिली पाहिजे पण ही कल्पकता बांधकाम व परिवहन खात्याकडून होतानादिसत नाही. त्याचा परिणाम मग खारपाट्याला अडकणे अथवा अन्य ठिकाणी गाड्या अडकण्याचे प्रकार घडतात. मंत्री महोदयांनी यासंदर्भात एफएम चॅनेल्स, टी.व्ही. चॅनेल्स किंवा इतर माध्यमातून प्रवासी व वाहकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याचे प्रयत्न करावेत. हे सर्व न करता आपण केवळ रस्त्यांवर पोस्टर्स लावतो पण हे पोस्टर्स बधण्यासाठी कोणालाच वेळ नसतो त्यामुळे त्याचा उपयोग होत नाही, म्हणून लेटेस्ट टेक्नॉलॉजी अथवा चॅनेल्सचा वापर करुन माहिती दिली तर त्याचा फायदा होऊ शकतो. दरवर्षी ऑगस्ट-सप्टेबर महिन्यात गणेशोत्सव येत असतो. त्याची पूर्वतयारी म्हणून अगोदरच दोन महिन्यापूर्वी बांधकाम व परिवहन या दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रित चर्चा केली आणि काय काय उपाययोजना करणे आवश्यक आहे याचा विचार केला तर यात सुधारणा होऊ शकते. पाऊस पडल्यानंतर खड्ड्यांचे प्रमाण वाढते व अपघाताचेही प्रमाण वाढत जाते, यासाठीच ही पूर्वतयारी करणे आवश्यक आहे. याचे कारण म्हणजे वेळेवरच असे खड्डे बुजविण्याचा प्रयत्न केला तर पावसामुळे ते दोन दिवस सुध्दा टिकत नाहीत.

महोदय, गणेशोत्सव असो अथवा अन्य सण असोत नेहमीची ट्रॅफिक कोणत्या बाजूने होणार हे ठरलेलेच असते. त्याचा विचार करुन रस्त्याची अथवा वाहनांची व्यवस्था करण्यापेक्षा अमुक भागातून गर्दी वाढणार म्हणून त्या भागात जादा गाड्यांची सोय करणे व त्यातून आपल्याला कसे उत्पन्न मिळेल एवढाच विचार परिवहन खाते करते असे मला वाटते. मी सुरुवातीलाच सांगितले की, गेल्या पाच वर्षात टोलमुळे वाढलेल्या रस्त्यांची क्वॉलिटी चांगली सुधारली पण त्याबाबतीत परिवहन विभागाने कोणती खबरदारी घेतली पाहिजे याचा अभ्यास करुन त्याचा अहवाल सादर करावा व त्यानुसार कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे या दृष्टीने विचार केला पाहिजे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

महोदय, परवा पुण्याला एक्सप्रेस-वे वर जो अपघात झाला त्याचे स्वरुप तर अतिशय भयानक होते. यात दोष कुणाचा आहे याची कारणमिमांसा मी करणार नाही. पण एक्सप्रेस वे वर एखादे वाहन थांबल्यानंतर त्याला मागून येणाऱ्या वाहनाने अशा प्रकारे धडक देणे मग त्यात दोष कुणाचा हे मला माहीत नाही पण असे प्रकार अतिशय दुर्दैवी आहेत. या रस्त्यावरुन जाणाऱ्या ड्रायव्हर्सना उजव्या बाजूचा ट्रॅक फक्त ओव्हर टेक आणि हाय स्पीडसाठीच आहे याची जाणीव करुन देण्याची व्यवस्था करावी. तसेच टोल भरण्यासाठी साधारण जो वेळ लागतो तेवढ्या वेळात टोल प्लाझावर देखील अशा सूचना देणारी ईलेक्ट्रॉनिक यंत्रणा बसविली तर त्याचाही फायदा होऊ शकेल. अन्यथा आजची परिस्थिती तर अशी आहे की, कोकणात जाताना घाटात जो तो ओव्हर टेक करुन पुढे जाण्याचा प्रयत्न करीत असतो....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

विदर्भात सुध्दा अशीच परिस्थिती आहे. जेथे जेथे मोठ मोठया कंपन्या आहेत तेथे अपघातांचे प्रमाण जास्त आहे. परिवहन खात्याने तर काही ट्रक्सला स्टीकर्स दिले असून त्या ट्रक्स मध्ये कितीही लोड असला तर तो न तपासता या ट्रक्स पुढे जात असतात. स्टीकर्सचा हप्ता खालपासून वरपर्यंत येत असतो. स्टीकर्स लावलेली ट्रक्स दिसली की, सॅल्यूट मारायचा, हात वर करायचे, हातामध्ये काही तरी घ्यावयाचे व ट्रक पुढे जाऊ द्यायचे असा सर्व प्रकार स्टीकर्सच्या ट्रक्सच्या बाबतीत सुरु आहे. यातील काही तरी बांद्रयाला पोहचत असेल परंतु सद्या पोहचत नसावे असे मी ऐकतो. मी आताच कै.बाळासाहेब आपटे यांच्या अंत्ययात्रेवरुन आलेलो असल्यामुळे मी आपल्याला हे स्टीकर्स दाखवू शकत नाही. हा स्टीकर्स ट्रकला लावला की, त्या ट्रकमध्ये कितीही वजन असले तरी ते तपासले जात नाही. रेशनींग आणि परिवहनचे नाके कॉम्प्युटराईज करण्यासाठी त्या ठिकाणचा स्टाफच विरोध करीत आहे. सतत मागणी होत असतांना सुध्दा ते कॉम्प्युटराईज केले जात नाही. (अडथळा) गुजरात राज्यात परिवहन विभागामध्ये जास्त पैसे जमा होतात परंतु आपल्या राज्यात गुजरातपेक्षा कमी पैसे जमा होतात. अधिक वजनाच्या वाहनामुळे जास्त प्रमाणात अपघात होतात. अपघाताचा विषय हा बांधकाम व परिवहन विभाग या दोन्ही विभागांशी येतो. मी जे काही बोलतो ते हवेत बोलत नाही. यासंदर्भातील सर्व पुरावे मी द्यावयास तयार आहे.

सभापती महोदय, वारीच्या बायपासची कोणती सोय करुन दिली जाणार आहे. यासंदर्भात मंत्री महोदयांनी माहिती देण्याची आवश्यकता आहे. कोकणातील यात्रेच्या दोन महीने आधी संबंधित खात्याच्या बैठका होत असतात. अंगणेवाडी तसेच अशाच प्रकारच्या पाच सहा यात्रांच्या वेळेस जास्त लक्ष देण्याची आवश्यकता आहे. रस्त्याची गुणवत्ता तसेच वाहनांमध्ये तंत्रशुध्द पणा आल्यानंतरही अपघातांचे प्रमाण कमी न होता वाढणे व या अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी त्याची कारणमीमांसा आणि त्यावरील उपायासंदर्भातील माहिती माननीय मंत्री महोदयांनी दिली तर चर्चेचे काही तरी फलित निघाले असे म्हणता येईल.

-----------

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य डॉ. तांबे यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. रस्ते अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होण्याऐवजी वाढतच चालले आहे. या सगळया गोष्टींचा विचार केला तर संपूर्ण देशामध्ये दर मिनिटाला अपघातामध्ये एक माणूस जखमी होत असतो व दोन मिनिटाला एक माणूस दगावत असतो.

सभापती महोदय, आजारपणाच्या मृत्यूच्या प्रमाणापेक्षा अपघातामुळे मृत्यूचे प्रमाण जास्त असून अपघातामध्ये तरुण मुलांचे मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. या चर्चेमध्ये मुख्य भाग सार्वजनिक बांधकाम विभागाचा व परिवहन विभागाचा आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली...

आमच्याकडे NH-17 आहे. या मार्गावर ब्रिटीश कालीन पूल आहेत. त्याचे आयुर्मान संपलेले आहे. याबाबत आपल्याकडून कार्यवाही व्हायला पाहिजे ती अद्यापि झाल्याचे दिसून येत नाही. या मार्गावर भरपूर धोकादायक वळणे आहेत. ती काढली पाहिजेत अशी चर्चा आपण नेहमी करतो. या कामाकडे देखील आपण थोडेसे दुर्लक्ष करतो. दरवेळी आपण निधीचा विषय पुढे करतो व या गोष्टी टाळल्या जातात हे मी आपल्याला कबूल करतो.

आपण आता बोओटीवर कामे घेत आहोत. मी येथे रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथील घाट रस्त्यांचा विषय मांडणार आहे. आपल्या राज्यातील घाट ब्रिटीश कालीन आहेत. आपल्या राज्याने आता पर्यंत नवीन किती घाट तयार केले आहेत ? आमच्या येथील आंबोली घाट हा दोन राज्यांना जोडणारा आहे. तो रूंद करण्यासाठी, दुरूस्त करण्यासाठी आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत. याबाबत माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांच्याकडे बैठका देखील झाल्या. पण त्याचा रिझल्ट मिळत नाही. आंबोली घाटासाठी पर्यायी घाट किंवा मार्ग निर्माण करावा अशी मागणी देखील करण्यात येत आहे. पण कार्यवाही होत नाही. वन खात्यामुळे काम अडले आहे अशा प्रकारचे कारण सांगितले जाते. आंबोली घाट हा ब्रिटीश कालीन आहे. पाणी साठू नये म्हणून छोटे टनेल्स काढले होते. पण नवीन टनेल्स काढण्यासाठी वन विभाग परवानगी देत नाही अशा अनेक अडचणी येत आहेत.

कोकणामध्ये गणपती उत्सावासाठी जाणाऱ्या गाड्यांच्या वाहन चालकांसाठी चांगली सोय केलेली असते. वाहन चालक झोपणार नाही ना याची प्रत्येक ठिकाणी काळजी घेतली जाते. वाहन चालक दारू प्यायला आहे किंवा नाही याची चाचणी केली जाते. त्याला चहा, फुल, चॉकलेट विविध संस्थांच्या कार्यकर्त्यांमार्फत तसेच परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत देण्यात येते. अशा प्रकारे तो चालक झोपणार नाही याची दक्षता गाडी मुंबईहून सुटल्यानंतर कोकणात पोहचे पर्यंत घेतली जाते.

काही अपघात हे वाहन चालविताना डुलकी लागल्यामुळे होतात. काही अपघात वाहन जलद चालविल्यामुळे होतात. काही अपघात तांत्रिक चुकांमुळे होतात. गाडी ब्रेक डाऊन झाल्यानंतर जागेवरच टायर बदलण्यात येतो. त्यावेळी चारही बाजूने लावलेल दगड क्लिनर व चालक उचलतच नाहीत. चालक तसाच गाडी घेऊन निघून जातो. त्यामुळे देखील अपघात होतात. अपघात झाल्यानंतर ताबडतोब उपचार व्हायला पाहिजेत ते दुर्दैवाने होत नाहीत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली...

आज आपण तालुक्याच्या, जिल्ह्याच्या ठिकाणी ट्रॉमा सेंटर उघडले पाहिजे. लोकांना चांगल्या प्रकारची आरोग्याची सुविधा मिळाली पाहिजे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये काहीही झाले तरी लोकांना गोव्यामध्ये जावे लागते. आमच्या आरोग्य मंत्र्यांनी ग्रामीण भागासाठी बऱ्यापैकी डॉक्टर्स दिले आहेत. पण आज अशी स्थिती आहे की, शासकीय रूग्णालयांमध्ये सीटीस्कॅन करायचे असेल तर तांत्रिक माणूस नसतो. त्यामुळे अडचणी निर्माण होतात. त्यामुळे आपण चांगल्या प्रकारचे नियोजन करायला पाहिजे.

साखर कारखान्यामध्ये बैल गाडीतून ऊस नेला जातो. त्याच मार्गावरून मोठी वाहने देखील जात असतात. त्यामुळे त्यांच्यासाठी छोटा ट्रॅक करता येईल काय, हे पाहिले पाहिजे. अशा प्रकारे आपण नियोजन केले पाहिजे. मुंबई-पुणे एक्सप्रेसवर एकाच लेन मधून सर्व प्रकारची वाहने जात असतात. त्यावेळी परिवहन विभागाचे अधिकारी काय करतात हे मला माहीत नाही. त्याकडे देखील लक्ष द्यायला पाहिजे. पण ते दिले जात नाही. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढत जातात.

यानंतर श्री.सरफरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

दुसरी गोष्ट अशी की, आपल्याला चांगल्या प्रकारचे चालक मिळत नाही. मध्यंतरी एस.टी. महामंडळामध्ये चालकांची भरती करण्यात आली. कोकणामध्ये सिधुदुर्ग जिल्ह्यात 250 चालकांची पदे रिक्त आहेत. या करिता राज्य शासनाच्या वतीने औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामार्फत नवीन चालक आपल्याला निर्माण करता येतील काय त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रशिक्षण केंद्र आपल्याला काढता येईल काय याचा विचार केला पाहिजे.

त्याचप्रमाणे एस.टी. महामंडळामध्ये ज्या ठिकाणी बसमधील चालक त्याची डयुटी संपल्यामुळे बदलला जातो. उदा. एखादा चालक कणकवलीहून बस घेऊन तो चिपळूण पर्यंत आल्यानंतर त्याची डयुटी संपल्यामुळे बदलला जातो. त्यानंतर तो विश्रांती गृहामध्ये ज्यावेळी जातो त्या विश्रांती गृहाची अवस्था गुरांच्या गोठयापेक्षा वाईट असते. त्या विश्रांती गृहाची आपण केव्हा तरी एकदा पाहणी करावी अशी माझी आपणास विनंती आहे. रस्त्यावर होणारे अपघात टाळण्यासाठी आपल्याला वाहन चालकांना चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण देता येत असेल किंवा ते शालेय अभ्यासक्रमामध्ये अंतर्भूत करता येत असेल तर ते आपण केले पाहिजे. सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. तांबे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे दिल्ली, चेन्नई, हैद्राबाद येथे वाहन चालक प्रशिक्षण केंद्रे काढण्यात आली आहेत त्या धर्तीवर आपल्या राज्यामध्ये प्रशिक्षण केंद्रे काढता येणे शक्य आहे काय याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, रस्त्यावर ऑईल पडल्यानंतर त्यामधून सुध्दा अपघात होत असतात. मी एकदा रत्नागिरीला जात असतांना रस्त्यावर पडलेल्या ऑईलवरुन माझी गाडी घसरली. सुदैवाने मला काहीच झाले नाही हे माझे नशीब. प्रश्न असा आहे की, रस्त्यावर सांडलेल ऑईल तो ड्रायव्हर पहात नसल्यामुळे त्यावरुन बऱ्याच गाडया घसरुन अपघात होतात. असे लहान लहान विषय जरी असले तरी त्यामधून जीवितहानी होत असते हे आपण लक्षात घ्यावे. या करिता जी समिती नेमण्यात आलेली आहे त्या समितीने या गोष्टीकडे लक्ष देऊन आवश्यक ती उपाय योजना केली पाहिजे. या करिता महामार्गावर ठिक ठिक्‍ाणी चेक पोस्ट निर्माण केलेली आहेत, पोलिसांची पथके निर्माण केली आहेत त्यांचे अशा गोष्टींकडे लक्ष आहे की नाही हे सुध्दा आपण पाहिले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली....

सभापती महोदय, त्याचप्रमाणे रस्त्यावरील वाहतुकीबरोबर आपण जल वाहतुकीला सुध्दा प्राधान्य दिले पाहिजे. आज कोकण रेल्वे झाल्यामुळे 17 क्रमांकाच्या महामार्गावरील वाहतुकीचे प्रमाण कमी झाले आहे. अशाप्रकारच्या नवीन उपाय योजना करता येतील काय याचा विचार राज्य शासनाने करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे रत्नागिरीमध्ये एअर पोर्ट होत आहे व सिंधुदुर्गमध्ये देखील होत आहे. त्याचप्रमाणे रत्नागिरीमध्ये आणि सिंधुदुर्गमध्ये नवीन पोर्ट होत आहेत. त्या ठिकाणी आपल्याला रस्त्यांचे चौपदरीकरण करता येईल काय? त्याठिकाणी जड वाहनांसाठी एक वेगळा ट्रॅक आपल्याला ठेवता येईल काय याचा विचार करावा. तालुका स्तरावरुन जिल्ह्याला जोडणारे रस्ते आणि जिल्ह्याच्या ठिकाणाहून राजमार्ग आणि राष्ट्रीय महामार्ग हे बी.ओ.टी. तत्वावर चौपदरी करता आले तर या रस्त्यांवरील अपघातांच्या प्रकारांना आळा बसेल. अशाप्रकारच्या चांगल्या उपाय योजना आपण कराव्यात अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी मांडलेला प्रस्ताव अत्यंत महत्वाचा आहे. हा प्रस्ताव ग्रामीण भाग, शहरी भाग, तालुका व जिल्ह्यातील प्रत्येक व्यक्तिशी निगडीत आहे. यामधील प्रत्येक व्यक्तिचा वाहतुकीशी नेहमी संबंध येत असतो. अपघात टाळण्यासाठी वाहतुकीचे नियंत्रण, नियोजन कसे असावे या दृष्टीने मी या प्रस्तावाकडे पहात आहे. परंतु दुर्दैवाने या ठिकाणी करण्यात आलेल्या भाषणांमध्ये वाहतुकीमधील विस्कळीतपणा आणि उपलब्धीमुळे होत असलेले अपघात यासंबंधी आपले म्हणणे मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला. या अपघातांच्या बाबतीत करावयाच्या उपाय योजनासंबंधी शासनाकडून कोणत्याही प्रकारच्या अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या नाहीत. एखाद्या प्रश्नासंबंधी सरकारची राजकीय इच्छाशक्ती कशी आहे यावर ते सरकार चालत असते.

एका शाळेच्या बसला दुर्दैवीरित्या अपघात झाला, ती बस पेटली आणि त्यामध्ये सर्व मुले मृत्युमुखी पडली. ही एकच घटना घडली तिची नोंद केंद्र सरकारने घेतली नाही, राज्य सरकारने घेतली नाही परंतु सर्वोच्च न्यायालयाने घेतली. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार केंद्र सरकारने कायदा केला. त्यानंतर देशाच्या सर्व राज्यांमध्ये स्कूल बस कशाप्रकारची असावी याचे एक मॉडेल दिसते. आपल्या सभागृहामध्ये स्कूल बसच्या नियंत्रणासंबंधी् एक विधेयक मांडण्यात येणार आहे. ती स्कूल ही फक्त मुलांना शाळेत सोडणे आणि परत आणण्यासाठीच वापरली जाईल.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

ती बस फक्त शाळेसाठीच वापरली जाईल, मग शाळेला सुट्टी असताना, शनिवार किंवा रविवार टूर वगैरे अशा कामासाठी वापरली तर त्या ड्रायव्हरवर येणारा अतिरिक्त ताण व त्याची सुरक्षा अशा सर्व बाबी आहेत, यालाच आपण वाहतुकीची सुरक्षा म्हणतो.

सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने सांगितले म्हणून अशा प्रकारचे बंधन आपल्याला कायद्याच्या माध्यमातून आणावे लागले. पण आपल्या कोणत्याच राजकीय क्षेत्रातील व्यक्तिमत्वाच्या डोक्यात ही कल्पना आली नाही किंवा अधिकाऱ्याला देखील सुचले नाही की अशा प्रकारे शाळांच्या बसवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने काही तरी उपाययोजना करावी. यासंदर्भात इतर सन्माननीय सदस्यांचेही विचार आम्ही ऐकले.त्यात आपल्या राज्यापेक्षा रस्त्यांच्या बाबतीत इतर राज्ये कशी प्रगत आहेत असाही उल्लेख सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी आणि आम्ही देखील केला. आम्ही गुजरात राज्याच्या प्रगतीबाबतचा विषय सभागृहात काढल्यानंतर मात्र अशा प्रकारच्या कॉमेन्ट्स होतात की, गुजरात पुढे गेले आम्ही मागे आहोत काय?पण हा प्रश्न आपण आपल्यालाच विचारलेला बरा. तसेच सत्ताधारी पक्षाच्या ज्या सन्माननीय सदस्यांनी हा प्रस्ताव मांडला तेच म्हणाले की, तामिळनाडू राज्य पुढे गेले आहे. यावरुनच दिसून येते की, आपले राज्य रस्त्यांच्या बाबतीत किती मागासलेले आहे.तसेच ते या भागांमध्ये प्रत्यक्ष जाऊन व फिरुन आल्यानंतर त्यांच्या लक्षात ही बाब आली व त्यातून त्यांनी हा प्रस्ताव मांडलेला आहे, असे मला वाटते. पण सध्या आपल्या राज्यात जी परिस्थिती आहे त्या परिस्थितीतून आपल्याला कोणत्या सुधारणा करणे शक्य आहे हेच या चर्चेतून अपेक्षित आहे.

सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी पंढरीला जाणाऱ्या वारकऱ्यांचा विषय काढला व त्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून दिले की, ठराविक ठिकाणे अशी आहेत की, तेथून वारकऱ्यांना जाणे सुकर होण्याच्या दृष्टीने तेवढ्यापुरताच बाय-पास मार्ग तयार करावा. लाखो वारकरी अनेक वर्षांपासून दरवर्षी या रस्त्याने जात आहेत, त्यांना जाण्यासाठी रस्ता तयार करुन देणे हीच माफक अपेक्षा आहे.ती सरकारने पूर्ण केली तर लाखो वारकऱ्यांच्या आनंदात आपण भर घालू शकतो.दरवर्षी आषाढी वारीच्या निमित्ताने मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री हे सपत्नीक जाऊन विठ्ठलाची पूजा करतात. हे सर्व करण्यापेक्षा या वारकऱ्यांच्या माफक मागण्या मान्य केल्या तरच आपल्याला तो पंढरीचा विठ्ठल पावेल.मगच आपण घातलेले पाण्याचे गाऱ्हाणे तो ऐकेल, अन्यथा तो कशाला ऐकणार आहे हा महत्वाचा भाग आहे, एवढीच अपेक्षा राज्यकर्त्यांकडून

श्री.दिवाकर रावते . . . .

असते. अशा मूळ बाबींवर विचार करण्यापेक्षा अमेरिका, जर्मनी सारख्या देशातील गोष्टी करुन काय उपयोग होणार आहे, आपण कोणत्याच बाबतीत त्यांच्या आजूबाजूला सुध्दा नाही. हवाला-टवाला हा जो विषय असतो त्याबद्दल आम्हाला काही देणे घेणे नाही, ते आपले आपणच बघा. प्रस्ताव मांडणाऱ्या सन्माननीय सदस्यांची अशी भूमिका असल्याने प्रस्तावाबद्दल शंका निर्माण झाली.

महोदय, प्रस्तावात आरोग्याच्या सुविधांबाबतचा विषय दिलेला आहे म्हणजे रुग्णवाहिका पाहिजे मग ती व्यवस्था कोणी करावयाची तर जेसी, लायन्स क्लब वगैरे यांनी करावयाची असे प्रस्ताव मांडतानाच त्यांनी सांगितले.त्यानंतर ट्रॉमा केअर सेंटर, रुग्णालय ही कोणी करावयाची तर खाजगी रुग्णालयांशी टाय-अप वगैरे करा अशा प्रकारच्या अपेक्षा या प्रस्तावातून व्यक्त होत असतील तर प्रस्ताव मांडण्याची गरजच काय असाही प्रश्न निर्माण होतो. यात सरकारची भूमिका काय आहे हा प्रश्न नव्याने निर्माण होतो.खाजगीकरणाच्या माध्यमातून आतापर्यंत जे रस्ते बांधले त्याबद्दल कौतुकाचा एकही शब्द त्यांनी काढला नाही.महाराष्ट्रात रस्त्यांचा व इतर विकास झाला याचाही उल्लेख नाही.एरवी ठराविक काळ सोडला तर आपलीच सत्ता होती पण आमच्या काळातच मुळात बीओटीची संकल्पना आली तीच पुढे सतत चालू आहे.ती संकल्पना ज्या-ज्या भागात वापरली त्या त्या भागात मोठे रस्ते झाले, त्यांची निगा राखणे हा नंतरचा विषय आहे.

सभापती महोदय, मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे याच माध्यमातून सुरुवातीलाच तयार करण्यात आला. संभाजीनगरचा रस्ता, नाशिकचा रस्ता झाला. माननीय केंद्रीय मंत्री श्री. शरद पवार साहेब एकदा कसाऱ्याच्या घाटात अडकले होते तेव्हा हा रस्ता झाला.त्याचप्रमाणे मुंबई-पुणे या रस्त्यातील घाटात सुध्दा माजी सभापती जयवंतराव टिळक अडकले होते, त्यानंतर तो रस्ता बांधण्यात आला. माननीय शरद पवार अडकले तेव्हा मात्र मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ यांनी सभागृहातच घोषणा केली होती की, पुढील तीन वर्षात हा रस्ता पूर्ण होईल व त्याच रस्त्यावरुन माननीय श्री. शरद पवार साहेबांना मी नाशिकला घेऊन जाईन. ते जसे बोलले तसेच त्यांनी करुन दाखविले. हा आदर्श मात्र आपल्या कोणत्याच मंत्र्यांनी घेतला नाही. एवढे कर्तबगार मंत्री आपल्याकडे असताना इतर मंत्र्यांनी देखील तसे करुन दाखवावे. काल मी सभागृहात बोललो असता सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी ते बोलणे वेगळ्याच अर्थाने मनावर घेतले.अशा प्रकारे सांगण्याचे तात्पर्य एवढेच की मुंबई-पुणे, मुंबई-नाशिक हे रस्ते झाले आहेत. नागपूर, संभाजीनगर आणि नाशिक-पुणे या रस्त्यांची कामे चालू आहेत.

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्याचप्रमाणे मुंबई-गोवा रस्त्याच्या बाबतीत शासनाकडून अजूनपर्यंत कोणत्याही प्रकारचा खास प्रयत्न झालेला नाही. आदरणीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, पनवेलनंतर वनाची जमीन असल्यामुळे टनेल काढण्यात येईल. याबाबत मी वाचले होते. त्याबाबत पुढे काय झाले हे कळले नाही. त्या रस्त्यावर सर्वात जास्त वाहतूक असून वाहतुकीची फार मोठी कोंडी होते.

सभापती महोदय, या ठिकाण्‍ी अपघात विम्याचा विषय मांडण्यात आला. अपघाताच्या बाबतीत आपल्याला माहीत आहे की, तडजोडीमध्ये वकीलच जास्त कमावतात. तुझे प्रकरण माझ्याकडे दे, तू काही फी देऊ नको असे वकील सांगतात. या बाबतीत आपण काय नियंत्रण करणार ? सन्माननीय सदस्यांनी अपघातग्रस्तांबद्दल चिंता व्यक्त केली. कुटुंबे उद्ध्वस्त होतात असे सांगितले. पण जी कुटुंबे उद्ध्वस्त होतात त्यांना जर विमा मिळणार असेल तर तो पूर्ण कसा मिळेल या संदर्भात जर शासन काही नियंत्रण आणि नियोजन करणार असेल तर ते फार महत्वाचे आहे. आता रस्ते वाहतुकीमध्ये तुम्हा-आम्हाला सर्वांना जर कोणती अडचण असेल तर ती म्हणजे 25 टायरचे, 27 टायरचे, 40 टायरचे प्रचंड मोठमोठे ट्रक रस्त्यावरुन जातात त्यामुळे वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण होते. हे सर्व टाळण्याकरिता परिवहन खात्याकडे काय योजना आहे ? लहान गाड्या या मोठ्या गाड्यांना बाजूने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करतात आणि त्यातून मग अपघात होतात. त्यांना सुध्दा तसे करणे अपरिहार्य असते. कारण अर्धा-अर्धा तास त्या मोठ्या ट्रकच्या मागे 20 च्या स्पीडने चालत राहावे लागते. त्यांना पुढे जाण्यासाठी साईड मिळत नाही. अपघातातील या ज्या बाबी आहेत त्या परिवहन विभागाच्या नियोजनाच्या माध्यमातून कशा टाळता येतील या संदर्भात माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर आले पाहिजे.

सभापती महोदय, ट्रकचे सर्वात जास्त अपघात होतात. काल अपघाताच्या दोन घटना घडल्या. अलिबाग-रोहा रस्त्यावर 10 किलोमीटरवर अपघात झाला. त्या ठिकाणी बाजूला जो छोटा पूल आहे त्याला कठडे नव्हते. त्यामुळे बस खाली पडली आणि त्यामुळे एका महिलेचा मृत्यू झाला. त्यानंतर त्या ठिकाणी स्पीडब्रेकर बसविले, बोर्ड लावले. म्हणजे कोणी तरी मेल्याशिवाय हे सरकार जागेच होत नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. नुकतेच चार-पाच अपघात सतत झाले. त्यामध्ये सहज

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

दरीमध्ये बस कोसळते, सहज बस पुलावरुन खाली पडते. धाराशीव येथे झालेला अपघात फारच भीषण आहे. शिर्डीला जात असलेल्या लोकांची संपूर्ण बस खाली कोसळली. ही जी परिस्थिती आहे त्यामध्ये बांधकाम खात्याच्या माध्यमातून पुलांवर वाहतुकीच्या दृष्टीने किमान संरक्षण निर्माण करण्यासाठी काही करता येईल का याचा विचार केला पाहिजे. माणसे मरण्यापेक्षा सगळीकडे स्पीडब्रेकर टाकले तरी हरकत नाही. लोक थोडे उशिरा पोहोचले तरी चालतील. जे छोटेछोटे पूल आहेत त्या ठिकाणी नवीन पूल बांधण्यासाठी शासनाकडे पैसे नसतील तर किमान संरक्षणाच्या दृष्टीने तेवढे जरी केले तरी त्याचा उपयोग होईल आणि आपण मोठमोठ्या अपघातांबाबत जे वाचतो ते अपघात होणार नाहीत असे मला वाटते.

सभापती महोदय, यानंतर मी सर्वात महत्वाचा विषय मांडत आहे. जे ट्रक ओव्हर लोडेड असतात तो प्रकार काही थांबत नाही. ती अनैतिकता थांबत नाही. त्यामुळे त्या संदर्भात काय करता येईल यासाठी मी परिवहन मंत्री असताना आयुक्तांची बैठक घेतली आणि त्यांना सांगितले की, ओव्हर लोडींग होणारच आहे, ते जास्त भार घेणारच आहेत, त्यामुळे सुरुवातीला जो जास्त भार असल्याचे जाहीर करील त्यांच्याकडून पैसे घ्यावेत आणि त्या ट्रकला ठराविक टॅग लावावा. म्हणजे त्याचा ट्रक तपासावयाचा नाही. मध्ये जो ट्रकवाला सांगेल की, माझ्या ट्रकमध्ये 20 टनाच्या वर आणखी पाच टन माल आहे तर त्याच्याकडून पाच टनाचे पैसे घ्यावेत. म्हणजे आपल्या खात्याचे उत्पन्न सुध्दा वाढेल आणि ओव्हर लोडच्या बाबतीत प्रत्येक नाक्यानाक्यावर थांबून जे काही प्रकार होतात ते थांबतील.

हल्ली तर रात्री बनावट पोलीस उभे राहतात. माननीय सभापती महोदय, हे ऐकून आपल्याला सुध्दा धक्का बसेल की, "बनावट पोलिसांपासून सावत राहा" असे बोर्ड पोलिसांनी लावले आहेत. जनतेने सावध राहावे म्हणून पोलिसांनी फलक लावले आहेत. मी फोटो आणून दाखवू का ? उद्या मी बोर्डाचा फोटो सभागृहात आणून दाखवतो. पोलिसांनी अधिकृत फलक लावले आहेत आणि बनावट पोलिसांपासून सावध राहा असे पोलीस खाते जनतेला सांगत आहेत. मी उद्या पाचसहा वेगवेगळे फोटो आणतो. मुंबईमध्ये रस्त्यावर असे फोटो लावलेले आहेत. जाहिरात सुध्दा येते. रात्रीच्या वेळेला पिवळा दिवा लावलेले सर्व अधिकारी त्या ठिकाणी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते .....

असतात. आता माझ्या मोबाईलमध्ये पोलीस खात्याचा एक फोटो आहे. तो फोटो मी सन्माननीय सदस्यांना कशा पध्दतीने दाखवू हे सांगावे. म्हणजे अक्षरश: बनावट, बोगस बोर्ड बनविला आहे. मी फोटो काढून पोलिसांना नेऊन दाखविला. मी पोलिसांचा सुध्दा फोटो काढलेला आहे. पण काहीही परिणाम झाला नाही. कोणालाही अटक झाली नाही. माझ्याकडे त्याचा व्हिडिओ आहे. एवढे सगळे चालते. गृह खात्याचे मंत्री कोठे गेले माहीत नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

ओव्हर लोड हा महत्वाचा विषय आहे.

मी परिवहन मंत्री म्हणून हा विषय हाताळला होता. राज्याला रेव्हेन्यू मिळावा म्हणून मी त्यावेळी निर्णय घेतला होता. परिवहन विभागाच्या मालकीचा एकच काटा होता. यापूर्वी या खात्याला भाड्याने काटे घ्यावे लागत होते. आपल्या खात्याचे ते काटे असावेत अशी मी भूमिका घेतली होती. त्यावेळी मी निर्णय घेतल्यामुळे परिवहन खात्याकडे आता स्वत:च्या मालकीचे 8 काटे झालेले आहेत. गुजरातपासून नागपूरपर्यंत, गुजरातपासून कोल्हापूर पर्यंत महिन्याला 3-4 लाख ट्रकची वाहतूक होत असते. प्रत्येक ट्रकमागे महिन्याला 40-50 हजार रुपये हप्ता गोळा केला जातो. तो हप्ता गुजरातमध्ये गोळा होतो. या हप्त्याची रक्कम अनेक कोटी इतकी होते. ही बाब अत्यंत गंभीर आहे. ही वस्तुस्थिती असल्यामुळे रस्त्यावरील अपघात कसे टळणार ? माणसांच्या चुकांमुळे जे अपघात होतात त्याला ते जबाबदार असतात. परंतु परिवहन खात्याच्या अकार्यक्षमतेमुळे होणाऱ्या अपघातांची जबाबदारी हे खाते घेणार आहे की नाही ? हप्ता शेवटपर्यंत दिला जातो आणि तो गुजरातपर्यंत पोहोचतो. मुंबई ते गुजरातपर्यंतच्या पासासाठी ठराविक रक्कम घेण्याची कल्पना राबविण्यात आली. पण रामाचा फोटो, हनुमानाचा फोटो, गणपतीचा फोटो गाडीत लावण्यात येतो. त्या फोटोप्रमाणे हप्ता वसूल केला जातो. म्हणजे आता देवाच्या फोटोचाही हप्त्यासाठी वापर केला जातो. मी हे अधिकृतपणे बोलत असून माननीय गृह मंत्र्यांनी याबाबत चौकशी करुन काही निष्पन्न होते का ते पहावे.

आपल्या वाहनाच्या क्षमतेपेक्षा अधिक माल वाहनात भरतात त्यातून हे अपघात होत असतात. काल एका अपघातामध्ये गाडीतील व-हाडाची सर्व माणसे मरण पावली आहेत. या गाडीतील सर्व माणसे कापली गेली होती. असे भीषण अपघात रस्त्यावर होतात. त्याची बातमी आपण वाचतो थोडा वेळ आपले मन चुरचुरते.

त्याचप्रमाणे बुलढाण्यामध्ये एका खड्ड्यामुळे अपघात झाला होता. त्या अपघाताच्या ठिकाणी मी स्वत: जाऊन आलो होतो. तो खड्डा फक्त साडेतीन फूट लांबीचा व दीड-दोन फूट रुंद असा होता. दोन प्रवासी व्होल्वो बस एकमेकाच्या समोरुन येत होत्या. त्यातील एका बसच्या चालकाने खड्डा चुकविण्याचा प्रयत्न केल्यामुळे ती बस उलटली आणि संपूर्ण बसने पेट घेतल्याने आतील सर्व प्रवासी जळून मेले. हा अपघात रात्री पावणे दोन वाजता घडला होता. अपघाताच्या ठिकाणी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

जवळ असलेले शेतकरी अपघातग्रस्त माणसांना वाचवू शकले नाहीत. त्या शेतकऱ्यांनी ती माणसे किंचाळताना, जळत मरताना पाहिल्याचे सांगितले होते. तो अपघात केवळ एका खड्डयामुळे झाला होता. या अपघाताची संपूर्ण राज्याला माहिती आहे. अत्यंत दारुण असा अपघात होता. म्हणून मी म्हणतो की, खड्डयाची काळजी घेतली पाहिजे. यासाठी फार मोठे काम होईल असे मला वाटत नाही. कारण खात्याकडे पैसेच नसल्यामुळे अनेक कामे बी.ओ.टी.तत्वावर केली जात आहेत.

अनेक ठिकाणी टोल नाके सुरु आहेत. टोल नाक्यामार्फत पैसे जमा झाले पाहिजेत, त्यातून कामे झाली पाहिजेत. रस्त्यांची सुधारणा झाली पाहिजे. पैसे नसले तरी रस्ते सुधारले पाहिजेत. याबाबत शासनाने धोरणात्मक भूमिका स्वीकारली पाहिजे. रस्त्यावरील 70 टक्के अपघात माणसांच्या प्रवृत्तीमुळे होतात व 25 ते 30 टक्के अपघात प्रशासकीय यंत्रणेकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे होतात. त्याकडे जरी लक्ष दिले तरी खूप फरक पडेल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि येथेच थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

---------



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

NTK/

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी महत्वाच्या विषयावर नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावावर मी माझे विचार मांडण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

नवीन युगामध्ये नवीन प्रकारची वाहने येणे, अत्यंत सक्षम पध्दतीचे वाहने येणे, त्याचे एक्सलेटर चांगले असणे, गाडीची गती चांगली असणे हे ओघाने आले. कारण दिवसेंदिवस तंत्रज्ञान बदल असते. वाहनांची स्वरुप बदलत असते. या सर्व गोष्टी घडत असताना ज्या प्रमाणात रस्त्यांची रुंदी वाढणे आवश्यक आहे, ज्या प्रमाणात रस्त्यांचा विकास होणे आवश्यक आहे त्या प्रमाणात तो होत नसल्यामुळे बी.ओ.टी.च्या माध्यमातून कामे केली जात आहेत. बी.ओ.टी.ची कामे चांगल्या प्रकारे झालेली आहेत, वाहतुकीला चांगला आधार मिळाला आहे.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:00

**तालिका सभापती** : सभागृहाची नियमित बैठक 6.00 वाजेपर्यन्त होती. कामकाज संपेपर्यन्त सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. प्रकाश बिनसाळे : राज्यात रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण वाढलेले असून त्यासंदर्भात या सभागृहामध्ये आपण गांभीर्याने चर्चा करीत आहोत. गाडयांच्या कंडिशनमुळे किती अपघात होतात, चालकाच्या बेपवाईमुळे किती अपघात होतात ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. परिवहन खात्यामार्फत ड्रायव्हिंग लायसन्स दिली जातात. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी सांगितले की, चालकाने एका दिवसात किती तास ट्रक चालविला पाहिजे यासंबंधी काही बंधन असले पाहिजे. अशा प्रकारचे बंधन आपल्याकडे आहे की नाही याची मला कल्पना नाही. परंतु आपण सतत 12-12 तास ट्रक चालविणारे ड्रायव्हर पहातो. इतका वेळ ट्रक चालविल्यामुळे साहजिकच शरीराला थकवा येतो. त्यामुळे ट्रक ड्रायव्हरमध्ये दारु पिणा-यांचे प्रमाण फार जास्त आहे. याबाबतीत काही तरी नियमन करण्याची गरज आहे. जे ट्रक मालक ड्रायव्हर नेमतात त्यांच्यावर देखील काही बंधने घालणे गरजेचे आहे. एक ट्रक अधिक दूर अंतरावर जाणार असेल तर त्या ट्रकवर किती ड्रायव्हर्स असले पाहिजेत यासंबंधी नियमन केले गेले पाहिजे.

सभापती महोदय, मी मुबई-गोवा हायवेचे उदाहरण देतो. पनवेलवरुन पळस्पे फाट्यापर्यन्तचा हा हायवे अत्यंत छोटा आहे. मुंबई-गोवा हायवे दुपदरी आहे. तो चौपदरी केव्हा होईल हे माहीत नाही. पण  ते काम सुरु आहे. या रस्त्याला लागून टाऊन प्लॅनिंग विभागाने कंटेनर यार्ड करण्यास कशी काय परवानगी दिली असा प्रश्न माझ्या समोर आहे. मोठमोठे कंटेनर्स त्या ठिकाणी दोन लेन्सच्या हायवेवर सर्रासपणे पार्क करुन ठेवलेले असतात. त्या कंटेनर्सना कोणत्याही प्रकारचे रिफ्लेक्टर्स नसतात. अर्धा कंटेनर रस्त्यावर आणि अर्धा कच्च्या रस्त्यावर पार्क केलेला असतो. रिफ्लेक्टर्स नसल्यामुळे काळोखात ते कंटेनर्स दिसत नाहीत.  याबाबतीत काही बंधने घालण्यात येणार आहेत की नाहीत ? रस्त्याची रुंदी किती असली पाहिजे, कंटेनर यार्ड किती दूर अंतरावर असले पाहिजे यासंबंधी काही नियम आहेत की नाहीत ? माझ्या मनाला वाटेल तेथे कंटेनर यार्ड करण्यास परवानगी दिली जात असेल, मनाला वाटेल तेथे ट्रक उभे केले जात असतील तर राज्यातील रस्त्यावर होणारे अपघात थांबविणे अत्यंत कठीण आहे. हा परिवहन किंवा रस्ते करणारे सार्वजनिक बांधकाम खाते यांचा प्रश्न नाही. हा प्लॅनिंगचा प्रश्न आहे. नगरविकास विभागाचा प्रश्न आहे, पोलीस खात्याचा प्रश्न आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, परवा मी अलिबागवरुन मुंबईला येत होतो. पेण येथे ट्राफिक जॅममध्ये मी दीड तास अडकलो होतो. नंतर ट्राफिक हळूहळू पुढे गेले. त्याठिकाणी एक विचित्र अपघात झाला होता. एक मल्टीएक्सेल ट्रक लोखंडी पाईप घेऊन जात होता. ते लोखंडी पाईप त्या ट्रकमधून सटकले आणि मागून येणा-या ऑईल टँकरच्या कॅबिनमध्ये आरपार घुसले. यामध्ये त्या आईल टँकर चालकाचा काय दोष होता ? मग अशा प्रकारे जी वाहतूक केली जाते त्यावेळी सेफ्टी मेझर्स पाळले जातात की नाही हे कोण पहाणार ? मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे या ठिकाणी ट्रक ओव्हर लोड होऊन त्याचे हप्ते गुजरातमध्ये घेतले जात असतील आणि हे असेच होणार असेल तर अपघात कमी होणार नाहीत असे मला मनोमन वाटते. तेव्हा याबाबतीत कडक निर्बंध घालण्यासाठी शासन पावले उचलणार आहे की नाही हा खरा प्रश्न आहे.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे..

सभापती महोदय, गाड्यांची तपासणी करण्यासाठी वाहतूक पोलीस अधिकारी रस्त्यांवर उभे असतात असे आपण अनेकदा पाहतो. त्या अधिकाऱ्यांनी कोठे उभे रहावे याची त्यांनी माहिती असली पाहिजे. रस्ता अरुंद असतो आणि त्या रस्त्यावर एखाद्या ट्रकला उभे राहण्यासाठी हात दाखवणार, पोलिसांनी हात दाखविला म्हणून तो ट्रक अचानकपणे ब्रेक दाबून थांबणार आणि अचानक ब्रेक दाबल्यामुळे ट्रकमागून भरधाव येणाऱ्या छोट्या गाडीला अपघाताला सामोरे जावे लागते. जिथे रस्ता रुंद आहे, जिथे् ट्रक बाजूला उभा राहू शकतो आणि रस्त्यावरील वाहतुकीला कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण होणार नाही अशा ठिकाणी ट्रकला अडविले पाहिजे. जे तुम्हा आम्हाला कळते ते पोलिसांना कळू नये यासारखे आश्चर्य नाही. अशाप्रकारे ट्रक अडवून वाहतुकीला अडथळा निर्माण करुन अपघाताला निमंत्रण देण्याचे काम जे अधिकारी करतात त्यांच्यावर आपण कारवाई करणार की नाही ?

सभापती महोदय, मी अमेरिकेतील दहा-बारा लेनच्या एक्सप्रेस-वेवर गाडी चालविली आहे. त्या ठिकाणी गाडीची लेन बदलता येत नाही. ओव्हर टेक करायचे असेल तर त्यासाठी वेगळी लेन असते, त्या लेनमधूनच ओव्हर टेक करावे लागते. मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे वरील वाहतूक पाहिल्यास तेथे काय परिस्थिती आहे ? पहिल्या लेनमध्ये सर्रासपणे ट्रक धावताना दिसतात. लहान गाड्यांना ओव्हर टेक करायचे असेल तर त्यांना डावीकडून ओव्हर टेक करावे लागते. अशा पध्दतीने ओव्हर टेक केल्यामुळे अपघात होणार नाहीत काय ? पहिल्या लेनमधून धावणाऱ्या ट्रकवर वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांनी कारवाई केली पाहिजे. मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे संपल्यानंतर पुढच्या रस्त्यांवर सुध्दा पहिल्या लेन मधूनच ट्रक धावतात. काही दिवसांनी असे चित्र दिसेल की, पहिल्या लेनमधून आपण छोटी गाडी घेऊन गेलो तर पोलीस आपणास दंड करतील. पहिला लेन तर ट्रकसाठी आहे असे ते सांगतील. तेव्हा वाहतुकीच्या नियमानुसार पहिल्या लेनमधून छोट्या गाडया आणि दुसऱ्या लेनमधून ट्रकसारखी मोठी वाहने धावली पाहिजेत.

सभापती महोदय, या ठिकाणी स्पीड ब्रेकर्सचा उल्लेख करण्यात आला. स्पीड ब्रेकर्स कोणत्या स्वरुपाचे असावेत याचेही नियम आहेत. टोल नाक्यावर लावण्यात आलेले स्पीड ब्रेकर्स



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे..

लहान गाड्यांच्या खालच्या बाजूला लागतात. ज्यांना टोल वसुलीचा ठेका दिलेला आहे त्यांनी पध्दतीचे स्पीड ब्रेकर्स लावले आणि त्या स्पीड ब्रेकर्सवर एखादी गाडी आदळून तेथे अपघात झाला तर त्याची जबाबदारी कोण घेणार ?

सभापती महोदय, जे.एन.पी.टी.रोडवर रमलर स्वरुपाचे स्पीड ब्रेकर्स कशासाठी उभारण्यात आले आहेत हे समजत नाही. तेथील स्पीड ब्रेकर्स लहान गाडीच्या खाली लागतात. अशा पध्दतीचे एकमेकांना लागून असलेले दहा-दहा स्पीड ब्रेकर्स तेथे कशासाठी उभारण्यात आले आहेत ? आपणास स्पीडवर नियंत्रण ठेवायचे असेल तर ज्या गतीने ट्रक धावायला पाहिजे त्यावर नियंत्रण आणले पाहिजे. जागोजागी स्पीड ब्रेकर्स उभारुन हा प्रश्न सुटणार नाही. किंबहुना स्पीड ब्रेकर्स उभारल्यामुळे आपण अनेक अपघातांना आमंत्रण देत आहोत कारण आपण तेथे अचानकपणे थांबतो.

सभापती महोदय, आपण स्कूटर आणि मोटार सायकल चालविणाऱ्यांसाठी हेल्मेटची सक्ती केलेली आहे. केंद्र सरकारच्या कायद्यानुसार गाडीमध्ये पुढच्या सीटवर बसणाऱ्यांसाठी बेल्ट लावण्याची सक्ती केली आहे. अमेरिका, जर्मनीमध्ये गाडीमधील सेफ्टी फीचर बंधनकारक आहेत. आपल्याकडे एअर बॅग्ज किंवा एन्टी ब्रेकींग सिस्टीम किंवा एन्टी फ्युअल सिस्टीम म्हणजे अपघात झाल्यास इंधन पुरविण्याची लाईन कट होते अशा प्रकारच्या सिस्टीम ऑप्शनलला का आहेत ? गाडीमध्ये अशा प्रकारची सुरक्षा व्यवस्था बसविण्यासाठी आपण कायदा का करीत नाही ? सेफ्टीकडे दुर्लक्ष करुन आपणास अपघातांचे प्रमाण कमी करता येणार नाही. आपणास अपघाताचे प्रमाण कमी करायचे असेल तर सेफ्टीला प्राधान्य असले पाहिजे. हा मंत्र आपण समोर ठेवला तर आपण अपघाताचे प्रमाण खूप कमी करु शकू हे मला या चर्चेच्या निमित्ताने सुचवावयाचे आहे. या ठिकाणी अनेक मुद्दे चर्चिले गेले आहेत त्याची मी पुनरावृत्ती करीत नाही. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.अजित 18:10

श्री.सय्यद पाशा पटेल ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, रस्ते अपघातांचे दिवसेंदिवस वाढत असलेले प्रमाण या विषयाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव सभागृहात मांडला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी अतिशय महत्वाचा प्रस्ताव या ठिकाणी आणला आहे त्याबद्दल मी त्यांचे प्रथम आभार मानतो. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी मागील अधिवेशनात सिम्युलेटरच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी योगायोगाने माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित होते. त्या प्रश्नावर या सभागृहात 20 ते 25 मिनिटे चर्चा झाली. एवढा वेळ या प्रश्नावर चर्चा होत होती, मला वाटत होते की, या प्रश्नाच्या बाबतीत काही तरी चमत्कार होईल. परंतु त्या चर्चेचा शेवट होत असताना माझा सारख्या लहान कार्यकत्याचा भ्रमनिरास झाला. परिवहन खाते माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे. त्या प्रश्नाच्या चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित होते. परंतु त्या प्रश्नाच्या उत्तराने माझे समाधान झाले नाही. या प्रस्तावाच्या सूचनेच्या अनुषंगाने मला दोन, तीन गोष्टींचा उल्लेख करावयाचा आहे. वाहतुकीच्या बाबतीत वाहन चालकांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था आपल्याकडे बरोबर नाही. वाहन चालकांना प्रशिक्षण व्यवस्थितपणे दिले जात नाही तर ड्रायव्हींग स्कूलची काय अवस्था असेल याचा विचार शासनाने करावा.

सभापती महोदय, माझ्या माहिती प्रमाणे महाराष्ट्रात 1600 ड्रायव्हींग स्कूल आहेत. त्यातील 1500 ड्रायव्हींग स्कूल हे 100x100 स्केअर फुटाच्या आत वसलेले आहेत. या बाबतीत केंद्रीय कायदा वेगळा आहे. परंतु केंद्रीय कायद्याला छेद देऊन कोंबडयांचा खुराडा तरी मोठा असतो, त्यापेक्षा लहान जागेमध्ये या ड्रायव्हींग स्कूल चालविल्या जात आहेत. एवढया लहान ड्रायव्हींग स्कूलमध्ये वाहन चालविण्याचे प्रशिक्षण चालले तर प्रशिक्षित वाहन चालक कशा प्रकारचे असतील या गोष्टीचा आपण सर्वांनी विचार केला पाहिजे. महाराष्ट्रात कोणत्याही आर.टी.ओ.कार्यालयात ड्रायव्हींग ट्रॅक नाहीत. आर.टी.ओ.कार्यालयात पैसे घेऊन फक्त शिक्के मारुन लायसन्स देण्याचे काम होते. पैसे घेण्याशिवाय दुसरे कोणतेही काम आर.टी.ओ.कार्यालयात चालत नाहीत. माणसे मारण्याचे प्रमाणपत्र वाटण्याचा कारखाना कुठे चालत असेल तर तो कारखाना आर.टी.ओ.कार्यालयात चालतो आहे.

18-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4G-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल...

सभापती महोदय, मला या निमित्ताने एक प्रश्न विचारावयाचा आहे की, 100 चौरस फुटाच्या जागेत ड्रायव्हींग स्कूल कसे चालविले जाते याचे प्रात्यक्षिक जर कोणी अधिकारी द्यावयास तयार असेल तर त्या अधिकाऱ्यांचे घर आयुष्यभर झाडण्यास मी तयार आहे. दरम्यानच्या काळात महाराष्ट्रातील सर्व ड्रायव्हींग स्कूल चेक करावयाचे अशी योजना परिवहन विभागाकडून सुरु करण्यात आली होती. परिवहन विभागाकडून ड्रायव्हींग स्कूल चेक करण्यात आले. माझ्या लातूर शहरामध्ये ड्रायव्हींग स्कूलची अवस्था अतिशय वाईट आहे. त्यांचे परवाने रद्द करण्या ऐवजी त्यांना पुन्हा रेग्युलर करण्यात आले. महाराष्ट्रामध्ये कदाचित माझे एकमेव सिम्युलेटर असलेले ड्रायव्हींग स्कूल असेल. आम्हाला ड्रायव्हींग स्कूल चालविण्याच्या बाबतीत सर्टिफिकेट मिळत नाही. खुराडयात चालविण्यात येणाऱ्या ड्रायव्हींग स्कूलच्या मालकांना मात्र सर्टिफिकेट लागलीच दिले जाते. काय त्या मालकांचे नशीब आहे. त्यांना लागलीच सर्टिफिकेट मिळते, आम्ही कोणते पाप केले आहे तर आम्हाला सर्टिफिकेट मात्र मिळत नाही.

सभापती महोदय, मला या निमित्ताने विनंती करावयाची आहे की, रस्त्यावर होणाऱ्या अपघातास आर.टी.ओ.यांना जबाबदार धरावे. अपघात कसे होतात, त्याची मी माहिती देऊ इच्छितो. परंतु यात सुध्दा एक गोम आहे. शासन आर.टी.ओ.कार्यालयांना मंजुरी देते. ते मंजूर कसे करता याची मला माहिती नाही. परवा सातारा येथे एक आर.टी.ओ.कार्यालय कार्यान्वित झाले आहे, तेथील कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी जागा नाही. त्यांचा कार्यक्रम एका गोडाऊनमध्ये चालतो आहे. मुंबई-हैद्राबाद हायवेवर आर.टी.ओ.यांचे कार्यालय आहे. त्याचे उत्पन्न प्रचंड आहे. त्यांना कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा नाहीत. परंतु अधिकारी व कर्मचारी कार्यालयास जागेची मागणी करीत नाही. अधिकाऱ्यांची एवढी मजा आहे त्यासंबंधी आपण कल्पना करु शकत नाही. मंत्री महोदय, तुम्ही जर तेथील वस्तुस्थिती पाहिली तर तुम्हाला वाटेल की, मंत्री होण्यापेक्षा आर.टी.ओ.अशिकारी झालो असतो तर किती मजा झाली असती.

सभापती महोदय, मध्यप्रदेशात अधिकाऱ्यांच्या घरी धडाधड धाडी पडता आहेत. तेथे अधिकाऱ्यांवर धाडी टाकण्याचा कार्यक्रम मोठया प्रमाणात हाती घेतला आहे. राज्यात जेवढे आर.टी.ओ.अधिकारीआहेत, त्यांच्या मालमत्तेची चौकशी करा. तुम्हाला एक वेगळेच चित्र दिसून येईल. यांच्याकडे मोठया प्रमाणात मालमत्ता आहेत, त्यामुळे त्यांचे विभागाच्या कामाकडे लक्षच

3...



ABG/ प्रथम श्री.अजित 18:10

श्री.सय्यद पाशा पटेल...

नाही. म्हणून वाहतुकीच्या नियमांचे ते पालन करीत नाहीत. अपघातांकडे ते गांभीर्याने पहात नाहीत. अशा विषयांच्या बाबतीत सभागृहात गंभीरपणे चर्चा होते. त्याप्रमाणे सभागृहाच्या बाहेर अधिकाऱ्यांबरोबर गांभीर्याने चर्चा घेतली पाहिजे. या बाबतीत काही तरी झाले पाहिजे असे माझ्या सारख्या संवेदनशील माणसाला वाटते म्हणून मी महाराष्ट्रातील सर्व अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली. त्यांच्या समवेत चर्चा केली. मला वाटले होते की, यातून काही तरी मार्ग निघेल. परंतु काहीही मार्ग निघाला नाही. मग मी देखील तो विषय मनातून बाजूला केला. या विषयाच्या बाबतीत कोणीही गंभीर नाही तर आपण तरी कशाला गंभीर व्हावयाचे, त्यामुळे तो विषय माझ्या मनातून काढून टाकला.

सभापती महोदय, या राज्यात अपघात होऊ नये, माणसे मरु नये असे शासनास वाटत असेल तर वाहन चालकांना चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण दिले पाहिजे....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी तामिळनाडू राज्याचे याठिकाणी उदाहरण दिले. तामिळनाडू राज्यातील अधिकाऱ्यांना जे सुचते आणि त्या राज्यामध्ये जे होऊ शकते ते आपल्या महाराष्ट्र राज्यामध्ये का होऊ शकत नाही याचा विचार केला पाहिजे. त्या राज्यातील लोकांना जे सुचते ते आपल्या राज्यातील लोकांना का सुचत नाही याचा विचार केला पाहिजे. महाराष्ट्र हे देशातील नंबर एकचे राज्य होते. आता कुठे गेला आपला नंबर याचा विचार करा.

आज आपण पाहिले तर प्रत्येक क्षेत्रात विज्ञान आले आहे. तसे परिवहन क्षेत्रात देखील प्रचंड विज्ञान आले आहे. प्रचंड मशीनरी तयार झालेली आहे. जगातील 22 देशांना आपला देश यंत्रणा पुरवितो अशा कंपनीत जाऊन मी दोन दिवस त्याचा अभ्यास केला. मी मॅट्रीक पास माणूस आहे. मला गरज वाटली म्हणून मी अभ्यास केला. शासनातील अधिकाऱ्यांना गरज का वाटली नाही याचे सगळयात महत्वाचे कारण म्हणजे त्यांना लोकांच्या जिवाशी देणे-घेणे नाही.माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना पैशाशी देणे-घेणे आहे. या अधिकाऱ्यांना सडकून काढा. अजिबात अपघात होणार नाही. या आरटीओ अधिकाऱ्यांचे काय काय खेळ चालू आहेत ते बघा आणि हे खेळ बघितले तर मी तुम्हांला सांगतो की महाराष्ट्रातील अपघातांचे प्रमाण नक्कीच कमी होईल. कारण अपघातामध्ये कोण जातो याचा विचार केला तुम्ही-आम्ही सगळेच जातो. लाल दिवा काढला तर कोणाची गाडी आहे हे सुध्दा कळत नाही. दिवा असला तरी आणि नसला तरी गाडीला ठोकरले जाईल. रस्त्याशिवाय पर्याय नसल्यामुळे सगळयांना रस्त्यावरुन जावेच लागणार आहे. सर्वांचाच जीव मोलाचा आहे. म्हणून सगळयांचे जीव घेणाऱ्याला जबाबदार धरणार किंवा नाही याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे....

**तालिका सभापती** : माननीय परिवहन मंत्र्यांच्याच ताफ्यातील गाडीला अपघात झाला होता.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मंत्र्याच्याच गाडीला अपघात झाला मग आमचे तर काहीच खरे नाही.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, चॅनेलने दिलेली बातमी आहे. मी ऑफीसमध्ये बसलो होतो. माझ्या स्कॉटींगची गाडी, माझी गाडी आणि आरटीओची गाडी रस्त्याच्या बाजूला उभी होती. ब्रेक फेल झाला आणि स्कॉटींगच्या गाडीला मागून धक्का मारला.

.....2

जास्त नुकसान झालेले नव्हते. मी ऑफीसमध्ये बसलो होतो. चॅनेलच्या लोकांनी बातमी दिली की, परिवहन मंत्री आणि पालकमंत्र्यांच्या गाडीला अपघात झाला आणि ते थोडक्यात बचावले. जास्तीचा अतिरेक बातमीमध्ये केला गेला.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, आमचे नशीब चांगले म्हणून मंत्रीमहोदय गाडीत नव्हते. नाहीतर भलतेच झाले असते. सहकारमंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांच्या गाडीला अपघात झाला होता. खूप दिवस ते दवाखान्यात होते. मी कुणावर आरोप करीत नाही. ड्रायव्हींग ट्रॅक मी माझ्या 10 एकरात केला. रिव्हर्स गिअर कसा टाकावा, पुढे जायला कोणता गिअर टाकावा, गाडी चढावर नेऊन मागे न येता पुढे कशी जाईल यासाठी ट्रॅक केला. एके दिवशी पूर्ण जगभरामध्ये जे ट्रॅक आहेत त्यांचे आणि मी केलेल्या ट्रॅकचे नकाशे काढले. जे ट्रॅक कॅनडामध्ये आहेत ते माझ्याकडे आहेत. सर्व अधिकाऱ्यांना मी ते दाखविले. सरकारला होत नाही तर खाजगी लोक करीत असतील तर त्याचे निदान कौतुक तरी करा. जे काम आपल्याला जमत नाही आणि दुसरे कोणी करीत असेल तर त्याला उत्तेजन द्या. त्याचे समर्थन केले पाहिजे. मदत करता येते किंवा नाही हे पाहिले पाहिजे पण असे होत नाही. दुर्लक्ष करुन त्याची जिरवायची कशी हे काम येथे चालते.

सभापती महोदय, मी शासनाला यासंदर्भात विनंती करणार आहे. माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी याविषयाबाबत जो अभ्यास केला आहे तो अभ्यास बघून मला सॅल्यूट करावासा वाटतो. परंतु तुमच्या अभ्यासाचा येथे काहीही उपयोग होणार नाही. असे मला गेली सहा वर्षे दिसलेले आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

जयहिंद, जय महाराष्ट्र.

------

नंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे अत्यंत महत्वाचा विषय सभागृहात उपस्थित केला आहे. त्यावर माझे विचार मी व्यक्त करणार आहे.

महोदय, सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावात अपघात कोणत्या कारणांमुळे होतात त्याची कारणे दिलेली आहेत. त्यात प्रामुख्याने वाहनांचा वाढलेला वेग, जखमींवर उपचार करण्यासाठी असलेल्या ट्रॉमा सेंटर्स व ॲम्बुलन्स व्यवस्था अपुरी असणे, अपघातात बळी पडण्यात तरुणांची संख्या मोठी असणे अशी जवळपास सात कारणे दिलेली आहे. राज्यात दररोज सरासरी 212 रस्ते अपघात होतात. जगाच्या तुलनेत भारत देशातील अपघाताचे प्रमाण 10 ते 15 पटींनी जास्त आहे. वाहनांची संख्या पाहिली तर सन 1961 मध्ये 1 लाख एवढी वाहने होती आणि सन 2011 मध्ये 1.69 कोटी म्हणजे 40 वर्षात 170 पटीने वाहने वाढली आहेत. रस्त्यांचा विचार करता सन 1961 मध्ये 39241 किलोमीटर लांबीचे रस्ते होते पण सन 2011 मध्ये 2,41,712 किलोमीटर लांबीचे रस्ते झाले आहेत. रस्त्यांची लांबी देखील 7 पटीने वाढली आणि गाड्यांच्या संख्येत मात्र 170 पटीने वाढ झाली आहे. 2.41 लाख किलोमीटर लांबीचे रस्ते झाले पण त्याच रस्त्यांच्या रुंदीचा विचार केला तर चार पाच महत्वाचे रस्ते सोडून कोठेच रस्त्यांची रुंदी वाढलेली नाही. या पुस्तकाच्या पृ.क्र. 141 संदर्भात सन 2011 मध्ये मागील वर्षीच्या तुलनेत रस्त्यांची लांबी फक्त 1672 किलोमीटरने वाढलेली आहे. एकाही राज्य महामार्गाची राष्ट्रीय महामार्गात श्रेणीवाढ झालेली नाही. राज्य मार्गाच्या एकूण लांबीत कोणताही बदल झालेला नाही. प्रमुख जिल्हा मार्ग फक्त 35 किलोमीटरने वाढलेले आहेत, जिल्हा मार्गात 80 किलोमीटरने वाढ झाली तर ग्रामीण रस्त्यांची लांबी फक्त 1556 किलोमीटरने वाढली व 9 गावे फक्त जोडली गेली आहेत.

महोदय, 11 व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत विभागासाठी असलेला नियतव्यय व खर्चाचा तपशील पाहता सन 2007-08 मध्ये 1704 कोटी रुपये एवढी रक्कम नियतव्यय म्हणून ठरविण्यात आली परंतु 1702 कोटी रुपये प्रत्यक्षात मिळाले होते. सन 2011-12 चा विचार करता 2751 कोटी एवढा नियतव्यय मंजूर करण्यात आला पण प्रत्यक्षात मात्र 1495 कोटी इतकाच निधी मिळाला.

....2

18-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4I-2
PFK/ पूर्वी श्री. कानडे .... 18:20

श्री. अरुण गुजराथी .......

अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सार्वजनिक बांधकाम विभागाला जास्त निधी मिळाला पाहिजे अशी मागणी करण्यासाठी मी उभा आहे. जर राज्याच्या निधीतून हा पैसा मिळत नसेल तर विभागाने पैसे उभे करावे आणि टोलच्या माध्यमातून रस्त्यांची निर्मिती करावी. तसेच जेथे रस्ते नसतील तेथे हे रस्ते घ्यावेत व जेथे रुंदी कमी असेल तेथे रुंदी वाढवावी व त्यासाठी निधी उपलब्ध करावा अशी मागणी मी करतो. राज्यात सन 2006 मध्ये 75 हजार अपघात झाले होते तर सन 2010 मध्ये हे प्रमाण 69 हजारवर आले. मृतांची संख्या सन 2006 मध्ये 11300 एवढी होती तर सन 2011-12 पर्यंत 12987 एवढी झाली. राज्य परिवहनच्या संदर्भात देखील काही मुद्दे माझ्याकडे आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ......

सन 2010-2011 मध्ये एस.टी.चे एकंदर 3407 अपघात झाले होते व त्यामध्ये मृतांची संख्या 547 असून जखमींची संख्या 6523 एवढी होती. दर लाख कि.मी.च्या मागे 0.18 टक्के असा उल्लेख माननीय मंत्री महोदयांनी दिलेला आहे. अपघातांची नुकसान भरपाई करण्यासाठी एस.टी.ला एका वर्षात 35 कोटी रुपये द्यावे लागले व त्या भरपाई पोटी गेल्या पाच वर्षात एस.टी. महामंडळाने 163 कोटी रुपयांची नुकसानभरपाई दिलेली आहे. परिवहन व सार्वजनिक बांधकाम विभागांनी एकत्र येऊन काम केले तर अपघांताच्या संख्येमध्ये निश्चितपणे घट होऊ शकेल. एकत्र काम केले तर आपण पाच वर्षात नुकसानभरपाई पोटी जे 163 कोटी रुपये दिलेले होते त्याची गरज पडणार नाही.

सभापती महोदय, वारकऱ्यांच्या अपघातांच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केलेले आहेत. वारकऱ्यांचे अपघाती मृत्यू होणे हे फार चुकीचे आहे. त्यामुळे रस्ते विकसित करण्याच्या संदर्भात विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पंढरपूरची वारी तर वर्षातून दोन वेळेस होत असते परंतु मुंबई ते शिर्डी अशी वारी तर रोजच होत असते. आजही मुंबई आग्रा रोडवर त्यासंदर्भात वेगळी अशी व्यवस्था करण्यात आलेली नाही त्यामुळे यासंदर्भातील विचार सार्वजनिक बांधकाम खात्याने करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, घाटाच्या अगोदर चालकाने नशा केलेली आहे की, नाही यासंदर्भात एस.टी. महामंडळाकडून चालकांची तपासणी होत असते परंतु तरी देखील घाटामध्ये एस.टी.चे अपघात होत असतात त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी योग्य ती कारवाई करावी.

सभापती महोदय, एस.टी.मधील चालकांच्या डोळयाची तपासणी करणे फार महत्वाचे आहे. खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या चालकांच्या डोळयांचीही तपासणी करणे फार गरजेचे आहे.

सभापती महोदय, स्कूल बस व रिक्षामधून कोंबून कोंबून विद्यार्थी शाळेत पोहचवले जातात. एका एका रिक्षात तर 20-20,25-25 विद्यार्थी कोंबले जातात. एस.टी.ची सेवा कमी आहे म्हणून खाजगी गाडया मोठया प्रमाणात चालवल्या जातात. काही गाडयांच्या टपावर तर 25-25 लोक बसवले जातात फक्त चालकाला रस्ता दिसेल एवढीच जागा रिकामी सोडलेली असते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ......

सातपुडयाकडे जाणाऱ्या ज्या गाडया आहेत त्या गाडयांच्या बोनेटवर सुध्दा 8-8 पॅसेन्जर बसलेले असतात. तोटा झाला तरी चालेल परंतु एस.टी.सुरक्षित चालवली पाहिजे अशी माझी नम्रपणे मागणी आहे.

सभापती महोदय, लग्नाचे वऱ्हाड वाहून नेण्यासाठी एका एका तालुक्यातील नवीन ठराविक गाडयांना परवानगी द्यावी, त्यामध्ये किती लोक बसवायचे हे ठरवावे तसेच या गाडयांची तपासणी किती दिवसांनी करावयाची हे ठरवून हा प्रश्न लवकरात लवकर सोडवला जावा अशी विनंती आहे.

. सभापती महोदय, ट्रकची वजन वाहून नेण्याची क्षमता 10 टनाची असेल परंतु त्या ट्रकमधून 15-20 टन लोड वाहून नेला जात असतो. एकाच रस्त्यावरुन जर 20 टनाच्या 5-25 गाडया रोज गेल्या तर रोड उखडल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे यादृष्टीनेही विचार करावा अशी माझी माननीय मंत्रीमहोदयांना नम्र विनंती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी स्पीड ब्रेकरमुळे अपघात होतात असे सांगितलेले आहे त्यामुळे स्पीड ब्रेकर्सच्या संदर्भात सुध्दा लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, गाडयांची किंमत वाढली आहे, गाडयांची लांबी-रुंदी वाढली आहे, गांडयांचा स्पीड वाढलेला आहे. गाडयांच्या स्पीड बरोबरच अपघांताचाही स्पीड वाढलेला आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याचा शासनाने जरुर विचार करावा अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या ): सभापती महोदय, वाहन सुरक्षा संस्कृती आपल्या समाजात रुजलेली नाही. आपण दुचाकीत आहोत, टॅक्सीत आहोत,बसमध्ये आहोत, रिक्षात आहोत की, कार मध्ये आहोत. कार छोटी आहे की, मोठी आहे यावर बहुतेक चालक वागत असतात.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

त्याच बरोबर वारकऱ्यांसह इतर जे अपघात झाले आहेत त्याबाबत मी पाच मागण्या करणार आहे. आपण पोलीस नियंत्रण कक्ष उभे केले आहे त्याचा काय उपयोग झाला याचा कधी आढावा घेतला असेल तर त्या संबंधातील माहिती आम्हाला कळली पाहिजे. बोगद्यामध्ये सांडलेल्या तेलावर घसरून 27 ते 28 वाहनांची टक्कर होऊन अनेक लोक जखमी झाले. बोगद्यामध्ये अंधार असल्यामुळे लोकांना मदत मिळाली नाही. तेथे वाळू असती आणि ती टाकली गेली असती तर तो अपघात टाळता आला असता.

मुंबई-पुणे महामार्गासह इतर महामार्गावर अपघात पीडितांसाठी विशेष रूग्णालय असणे आवश्यक आहे. त्यांना ताबडतोब वैद्यकीय सेवा मिळणे आवश्यक आहे. खासदार श्री.भारतकुमार राऊत यांना काही महिन्यांपूर्वी अपघात झाला होता. त्यावेळी देखील त्यांना वैद्यकीय सुविधा लगेच मिळाली नसल्याचे निदर्शनास आले. मुंबई-पुणे एक्सप्रेसवर अपघात झाल्यानंतर प्रथमोपचार मिळण्यासाठी कमीत कमी दीड ते दोन तास लागतात असे निदर्शनास आले आहे. अपघात झाल्यानंतर रूग्णाला चिंचवडच्या रूग्णालयात न्यावे लागते किंवा मुंबईला आणावे लागते. अपघातग्रस्त लोकांचा रक्तस्राव ताबडतोब थांबला नाही तर जखमी दगावण्याची शक्यता असते. त्याकडे देखील मी लक्ष वेधते.

पुणे शहर भारतामध्ये अपघातांमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात मुंबई पहिल्या क्रमांकावर आहे व पुणे दुसऱ्या क्रमांकावर आहे. पुणे शहरामध्ये बीआरटीमुळे खूप अपघात होतात. पुणे शहर हे चौक असावे असे वाटते. नगर, नाशिक, सोलापूर, बारामती येथे जाणारी सर्व वाहने पुणे शहर क्रॉस करून जात असतात. त्याकडे देखील मला लक्ष वेधावेसे वाटते.

कॉन्व्हॉय जाताना आम्ही आमची गाडी देखील कोपऱ्यामध्ये घेतो. कॉन्व्हॉयमध्ये असलेले मंत्री महोदय मागे पुढे किती गाड्या आहेत हे बघतात की नाही हे मला माहीत नाही. तो कॉन्व्हॉय जमेल तशी वाहने चिरडत जातो. मला येथे व्यक्तिचे नाव घ्यायचे नाही. पण एका मंत्र्यांच्या सुपुत्राने वरळी सी-लिंकवर अनेक जणांना उडविण्याचे प्रकार केलेले आहेत. त्यामुळे तो कॉन्व्हॉय नसून रस्त्यावरून निघालेले सैन्य आहे अशा थाटामध्ये गाड्या चालविल्या जातात.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

आमच्या संरक्षणासाठी पोलीस गार्ड दिला जातो. मला त्या पोलीस गार्डला कामावरून काढायचे नाही. माझ्याकडे गेल्या 4-5 वर्षात 30 ते 40 गार्ड डयुटीसाठी येऊन गेले असतील. त्या गार्डना सिट बेल्ट कसे लावतात हेच माहीत नसते. मी स्वत: पोलिसांना सिट बेल्ट कसा लावतात हे दाखविलेले आहे. गेल्या महिन्यात मी एक गार्ड बदलून घेतला होता. कारण त्याला कितीही सांगितले तरी तो सिट बेल्टवरच बसायचा. मी त्याला म्हणायचे तू पोलीस आहेस, तू सिट बेल्ट लावला नाही तर कशी काय सुरक्षा करणार ? तो मला म्हणायचा मला त्रास होतो. सिट बेल्ट लावणे ही सुरक्षिततेची संस्कृती आहे. मी सांगून देखील तो मार्गदर्शन घेत नव्हता. येथे मुद्दा सिल्ट बेल्टचा नाही. किमान सुरक्षितता कशी पाळणार हा मुद्दा आहे. त्यामुळेच सुरक्षा संस्कृती राबविली पाहिजे याकडे मी लक्ष वेधते आणि सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देते. सभापती महोदय, मी आपले सकाळीही आभार मानले आहेत आणि आता दिवस संपतानाही मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानते. धन्यवाद.

......

**उप सभापती** : आता आभाराचा हा भार मला सहन होत नाही.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी एका मुद्याचा मुद्दाम येथे उल्लेख करू इच्छितो. आज गटारी अमावस्या आहे. आज ड्रंकन ड्रायव्हींच्या भरपूर केसेस होतील.

श्री.आर.आर.पाटील : मी सन्माननीय सदस्य यांना विचारू इच्छितो की, गटारी अमावस्येशी त्यांचा संबंध आहे. आपला याच्याशी काय संबंध आहे ?

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, आज मुंबईमध्ये अतिशय चोख बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. असा बंदोबस्त पुणे, नाशिक आणि अन्य शहरांमध्ये ठेवला तर निश्चितच मोठ्या प्रमाणावर अपघाताचे प्रमाण टाळता येईल. मध्यंतरी खासदार श्रीमती सुप्रियाताई सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र स्टेट रोड सेफ्टीचा ड्राफ्ट तयार करण्यात आला होता. तो ड्राफ्ट आम्ही माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांना दिला आहे. त्यात अनेक मुद्दे आहेत. त्यातील सर्वच मुद्दे मी येथे मांडणार नाही. गृह विभागातील जॉईंट सी.पी.श्री.फणसळकर साहेब यांनी शालेय अभ्यासक्रमामध्ये रोड सेफ्टी हा विषय असावा असे सुचविले आहे. तो एक संस्कार आहे. तो संस्कार शालेय जीवनामध्ये विद्यार्थ्यांवर घडविला तर निश्चितच त्याचा सदुपयोग भविष्यकाळामध्ये होईल.

यानंतर श्री.सरफरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. निरंजन डावखरे....

त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी सांगितल्याप्रमाणे आर.टी.ओ. ऑफिसमध्ये व्यवस्थित ट्रॅक्स नाहीत. त्यांच्याकडे असलेल्या सुविधांप्रमाणे आपल्याकडे सुविधा केल्या, चांगले ग्राऊंड तयार केले तर मुलांना लायसन्स देण्यापूर्वी त्यांना चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण देता येईल. या वर्षी अपघातामध्ये जे 13 हजार लोक मृत्युमुखी पडले आहेत त्यामध्ये 15 ते 40 वयोगटामधील 60 टक्के लोक आहेत. तेव्हा या बाबत आपण योग्य ती काळजी घेतली तर निश्चितपणे या जीवांना आपल्याला वाचविता येऊ शकते.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा असा की, आमच्या पक्षाच्या युवक संघटनेचा पदाधिकारी श्री. अभिजित माळी हा तरुण, तडफदार आणि अतिशय ताकदीने काम करणारा, प्रत्येक तालुक्यामध्ये काम करणारा, सर्व तालुक्यांतील आवडता कार्यकर्ता पाली येथून राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या एका कार्यक्रमाहून येत असतांना पेण-पनवेल रस्त्यावर झालेल्या अपघातामध्ये मरण पावला. त्यावेळी जवळपास ॲम्बुलन्स नसल्यामुळे तो लवकर हॉस्पिटलमध्ये पोहोचू शकला नाही. त्यामुळे त्याचा मृत्यू झाला. त्याचे आई-वडील, पत्नी आणि एक लहान मुलगी त्याच्या पाठिमागे आहेत. मघाशी अनेक माननीय सदस्यांनी उल्लेख करतांना सांगितले आहे की, मुंबई-गोवा महामार्गावरील पेण, पनवेल येथील रस्त्याला "डेड हायवे" म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. मघाशी माननीय सदस्य डॉ. तांबे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे ई.एम.एस. स्कीमअंतर्गत 50 कि.मी. च्या रेंजमध्ये ॲम्बुलन्स उपलब्ध झाली असती तर त्या चिमुकल्या मुलीचे बाबा आज जीवंत राहिले असते. एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, रस्त्यावरील होणाऱ्या अपघातासंबंधी अनेक माननीय सदस्यांनी मांडलेल्या विचारांची मी पुनरावृत्ती करणार नाही. परंतु ज्या तीन माध्यमामधून अपघातांचे प्रमाण वाढत चालले आहेत त्या तिन्ही माध्यमांना शिस्त लावण्यासाठी काही तरी कडक कायदा करण्याची आवश्यकता आहे. त्यापैकी एकाचा उल्लेख करीत असतांना माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी असे सांगितले की, ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर आवश्यक तेवढी एस.टी. बसेसची सुविधा नसल्यामुळे खाजगी वाहनांची सेवा मोठया प्रमाणामध्ये सुरु आहे. त्या वाहनांना ग्रामीण भागात वेगवेगळी नावे आहेत त्याप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रामध्ये त्याला "वडाप" असे नाव दिले आहे. अशाप्रकारच्या वाहतूक व्यवस्थेला एक प्रकारचा दर्जा देण्याची आवश्यकता आहे. एस.टी. बसेसला पर्याय म्हणून अशाप्रकारची वाहतूक व्यवस्था आपल्याला करता येणार नाही असे म्हणून चालणार नाही. परंतु या सुविधेला आपल्याला कायद्याच्या चौकटीमध्ये बांधता येईल काय याचाही विचार केला पाहिजे. जर आपण या व्यवस्थेला कायदेशीर परवानगी दिली तर आपोआप त्यांना नियम देखील लागू होतील. आज एस.टी. बसेसला ही एक पॅरेलल वाहतूक सुरु असून त्यांना कोणत्याही प्रकारचे नियम सध्या लागू नसल्यामुळे होणाऱ्या अपघातांचे हे देखील एक कारण आहे. यामध्ये मोठया प्रमाणावर हप्ते देऊन हे "वडाप" चालविले जात आहेत. गेल्या दोन-तीन वर्षापासून सभागृहामध्ये या वाहतूक व्यवस्थेला आम्ही मान्यता देणार आहोत अशाप्रकारची घोषणा केली जात आहे.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे रिक्शामधून शाळेमधील मुलांची केली जाणारी वाहतूक कायदेशीररित्या बंद केली पाहिजे. शहराच्या ठिकाणी दुसरी वाहन व्यवस्था उपलब्ध असतांना एका रिक्शामधून दहा ते पंधरा मुलांना दाटीवाटीने कोंबून नेण्याची काहीही आवश्यकता नाही. शाळा पालकांकडून मोठया प्रमाणात शुल्क घेत आहेत, पालकांमध्ये देखील आपल्या मुलांसाठी मोठया प्रमाणावर खर्च करण्याची क्षमता आहे. त्यामुळे बसेसमधूनच मुलांची वाहतूक करण्याची सक्ती करण्यात आली पाहिजे. अशाप्रकारे रस्त्यावरील वाहतुकीच्या होणाऱ्या अपघाताचा हा देखील एक मुद्दा आहे. त्याचप्रमाणे या सभागृहामध्ये एक मुद्दा चर्चेला आलेला नाही तो म्हणजे रस्त्यावर मोटार सायकलचे होत असलेले अपघात. या राज्यामध्ये सर्व गोष्टींसाठी शासनाने नियम, कायदे व प्रशिक्षणाची व्यवस्था केली आहे. परंतु आपल्या लक्षात येईल की, मोटार सायकलींचे 90 टक्के

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील.....

होणारे अपघात हे त्या मोटार सायकल चालविणाऱ्या मुलाच्या चुकीमुळे झालेले असतात. त्यामध्ये निम्मे अपघात हे मुलगा 18 वर्षाचा झाल्यानंतर त्याच्या आई-वडिलांनी प्रेमाखातर घेऊन दिलेल्या मोटार सायकलमुळे झालेले असतात. अगदी तरुणपणी त्या मुलाला मोटार सायकल घेऊन दिली जाते, पुरेसे प्रशिक्षण नसल्यामुळे आणि त्याच्याकडे वाहन परवाना नसल्यामुळे चुकीच्या पध्दतीने वाहन चालविल्यामुळे अपघात होत असतात याचाही आपण कुठेतरी विचार केला पाहिजे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील ....

सभापती महोदय, परिवहन विभागाच्या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांनी दोन तीन मुद्यांच्या संदर्भातील स्पष्टीकरण द्यावे अशी विनंती करणार आहे.

सभापती महोदय, एस.टी.महामंडळाकडे एकंदर किती वाहने आहेत व त्यांची आजची स्थिती काय आहे? या वाहनांचे लाईफ किती वर्षाचे असते, किती वाहनांचे लाईफ पूर्ण झालेले आहे, किती वाहने लाईफ पूर्ण झाल्यानंतरही कार्यरत आहेत? एस.टी. चालकांची किती दिवसातून वैद्यकीय तपासणी केली जाते, वैद्यकीय तपासणी करण्याचे काही नियम केलेले आहेत काय यासंदर्भातील माहिती देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मल्टी टायर व्हेईकल्सच्या संदर्भात कोणते नियम करण्यात आलेले आहेत ? किती लांबीचे वाहन रोडवर आणावे व यासाठी काही नियम आहेत काय ?

सभापती महोदय, महाराष्ट्रात मोठया प्रमाणात पवन चक्क्या उभ्या राहत आहेत. पवन चक्कीचा मेन पार्ट प्रचंड मोठा असतो. या पार्टची वाहतूक करणे आपल्या नियमात आहे काय ? नेमके किती लांबीचे वाहन रस्त्यावर येऊ शकते याबाबत काही नियम आहेत काय ? या प्रश्नाच्या संदर्भातील सर्व माहिती माननीय मंत्री महोदयांनी आपल्याला उत्तरात द्यावी अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, परिवहन विभागाच्या संदर्भात मी केवळ दोन तीन सूचना करणार आहे.

सभापती महोदय, मी औरंगाबादवरुन मुंबईला येत असतांना टोल नाक्यावर उभ्या असलेल्या एका ट्रक मध्ये लोखंडी सळया लोड केलेल्या होत्या. परंतु या ट्रकल टेल लँप, रेडियम नसल्यामुळे आमची गाडी त्या गाडीवर जाऊन आदळणार होती. रोडवरील अनेक वाहनांना टेल लँप, हेड लाईट, रेडियम नसल्यामुळे अपघात होत असतात. टोल नाक्यावरील पोलीस चौकीत या ट्रकच्या संदर्भात तक्रार देण्यासाठी गेले असता पोलीस चौकीला कुलूप लावलेले होते. त्यामुळे टोल नाक्यावरुन फोन करुन पोलिसांना बोलावून घेऊन संबंधित ट्रकवर ॲक्शन घ्यावयास लावली. त्यावेळेस पोलिसांनी सांगितले की, आम्हाला अशा गाडयांवर केवळ 200-400 रुपयाचा दंड करण्याचा अधिकार आहे. अशा प्रकारचे वाहन आम्ही जप्त करु शकत नाही किंवा कोणतीही कायदेशीर कारवाई करु शकत नाही.परंतु आपण आमदार असल्यामुळे संबंधित ट्रक चालकावर कारवाई करुन ट्रक जप्त करतो व कोर्टात हजर करतो.

सभापती महोदय, पुण्यावरुन मुंबईला येत असतांना रोडवरील अनेक वाहनांना रेडीयम, टेल लॅम्प, रिफ्लेक्टर्स, लाईट नसतात व त्यामुळेच मोठया प्रमाणात अपघात होत असतात. अपघाताचे दुसरे कारण असे आहे की, वाहनांच्या चालकांना चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण मिळत नाही.गाडीवरील जे क्लिनर्स असतात ते ड्रायव्हर गाडी कशी चालवतो ते पाहून गाडया चालवण्यास शिकतात. वाहन चालक भरधाव वेगाने गाडया चालवतात, गाडया चालवतांना त्यांना कशाचेही भान राहत नाही. जर आरटीओला अशा प्रकारचे अधिकार नसतील तर आपण अपघात थांबवूच शकणार नाही. त्यामुळे अपघात टाळण्यासाठी शासनाने कठोर उपाययोजना करावी व ती तातडीने करावी अशी मी या निमित्ताने सूचना करते व माझे दोन शब्द पूर्ण करते.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त): सभापती महोदय, रस्त्यावरील अपघात व त्यावरील उपाय योजना यासंदर्भात नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन 2006 ते 2011 या पाच वर्षाच्या काळात आपल्या राज्यात जवळ जवळ साडे नऊ हजार अपघात झालेले आहेत. आपल्या राज्यात वर्षाला साधारणत:1400-1500 अपघात होतात व त्यामध्ये साधारणत: 400-500 लोकांचा मृत्यू होत असतो.

सभापती महोदय, आताच्या आषाढी एकादशीच्या दिवशी नीरा नदीमध्ये ट्रक उलटल्यामुळे जे 9 वारकरी मृत्युमुखी पडले त्या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र व्यथित झालेला आहे. नीरा नदीच्या पुलावर ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नामुळे हा ट्रक पुलावरुन नदीमध्ये कोसळला होता. यवतमाळ येथे कंटेनरच्या धडकेने दोन वारकऱ्यांचा मृत्यू झाला होता. कर्नाटक मधून पंढरपूरकडे दिंडीत जाणाऱ्या सात वारकऱ्यांना बसने चिरडले. मुंबई पुणे महामार्गावर लग्नाच्या मिनी बसला अपघात झ ाला व त्या घटनेमध्ये अनेक लोकांचा मृत्यू झाला. त्यामुळे हे सर्व भीषण चित्र डोळया समोर येत असल्यामुळे अपघातावर कोणाचे नियंत्रण आहे की नाही असा मुद्दा समोर येतो. ट्रक चालकांवर किंवा इतर वाहन चालकांवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण ठेवले जात नाही व त्यामुळेच अपघात होतात ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

पुण्याचा जो एक्स्प्रेस हायवे आहे त्या रस्त्यावर सुध्दा मोठ्या प्रमाणात अपघात होताना दिसतात. दळणवळणाची यंत्रणा वेगाने व्हावी, त्यातून वेगाने विकास व्हावा यासाठी असे एक्स्प्रेस हायवे बांधल्यानंतर त्यावर होणारे अपघात हा सुध्दा चिंतेचा विषय झालेला आहे. मागील दोन वर्षामध्ये त्या रस्त्यावर 3426 अपघात झाले. या अपघातांमध्ये मानवी चुकांमुळे होणाऱ्या अपघातांचे प्रमाण जवळजवळ 80 ते 85 टक्के आहे आणि फक्त 10 ते 15 टक्के अपघात यांत्रिक चुकांमुळे झालेले असतात. एखादा अपघात होऊन त्यामध्ये मृत्युमुखी पडल्यानंतर मागे राहिलेले जे कुटुंबीय असतात त्यांना अक्षरशः मरणयातना भोगाव्या लागतात. बऱ्याच वेळा आपण बघतो की, संपूर्ण कुटुंब अपघातात मरण पावते आणि 7-8 वर्षाचे किंवा 2-4 वर्षाचे एखादे अपत्य त्या अपघातामधून वाचते आणि त्याला संपूर्ण आयुष्यभर यातनांना सामोरे जावे लागते. त्यामुळे याकडे गांभीर्याने बघावयास पाहिजे.

सभापती महोदय, वाहन चालकांवर कायद्याचा आणि नियमांचा धाक राहिलेला नाही. बऱ्याच वेळा आपण हायवेवर बघतो की, सर्वसाधारण वाहन राहू द्या पण व्हीआयपीचे एखादे लाल दिवा असलेले किंवा पिवळा दिवा असलेले वाहन रस्त्यावरुन जात असेल तर त्याला सुध्दा हे वाहन चालक आणि त्यातत्या त्यात जड वाहनांचे चालक कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद देत नाहीत किंवा साईड देत नाहीत. ते आपल्याच तोऱ्यामध्ये जात असतात. म्हणून मला या ठिकाणी मुद्दाम नमूद करावेसे वाटते की, दहशतवाद हा जसा आपला राष्ट्रीय चिंतेचा विषय आहे त्याच पध्दतीने रस्त्यावरचे अपघात हा सुध्दा राष्ट्रीय चिंतेचा विषय आहे. कारण यामध्ये लाखो लोकांचे बळी जातात. त्यामुळे हा राष्ट्रीय चिंतेचा विषय आहे असे गृहीत धरुन त्या बाबतीत उपाययोजना करणे अतिशय आवश्यक आहे.

सभापती महोदय, जड वाहनांमुळे 5 लाख लोक जखमी होतात आणि जवळजवळ सव्वा लाख लोक मरण पावतात. या अपघातांमुळे या देशामध्ये वर्षाला 75 हजार कोटी रुपयांचे नुकसान होते. रोज जवळजवळ एक हजार वाहनांचे रजिस्ट्रेशन होते. रोज एक हजार वाहनांचे रजिस्ट्रेशन होत असताना आपण त्या प्रमाणात उपाययोजना आणि नियोजन करताना दिसत नाही. यामध्ये

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रमेश शेंडगे .....

पोलिसांची संख्या वाढविली पाहिजे. आरटीओ कार्यालयामध्ये सुध्दा आज अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. ती संख्या वाढविली पाहिजे. एखाद्या अपघातांवर मानवांकडून नियंत्रण होत नसेल तर त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून किंवा माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करुन त्यावर नियंत्रण केले पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, मुंबईमध्ये ताडदेव येथे आरटीओ कार्यालय आहे. ते कार्यालय फार मोठे आहे पण त्या ठिकाणी जुन्या गाड्या ठेऊन डम्पींग ग्राऊंड केलेले आहे. त्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या चाचण्या करण्यासाठी चांगल्या प्रकारची साधनसामुग्री उपलब्ध करुन दिली तर ताडदेव येथील आरटीओ कार्यालय चांगले होऊ शकते. एस.टी. ही जी आपली सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे त्यामध्ये आमच्या सांगली जिल्ह्यामध्ये 100 एस.टी.गाड्या उभ्या आहेत. एस.टी. महामंडळाकडे 700 ड्रायव्हर्स नाहीत असे एस.टी.चे अधिकारी आम्हाला सांगतात. राज्यामध्ये अनेक ठिकाणी ड्रायव्हर नसल्यामुळे अशा प्रकारे एस.टी. बसेस उभ्या आहेत. त्या गाड्या चालविण्यासाठी ड्रायव्हर्स नाहीत त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थित होत नसल्यामुळे लोक स्वत:ची मोटारसायकल बाहेर काढतात, स्वत:ची कार बाहेर काढतात त्यामुळे अपघात होतात आणि नको असलेल्या प्रसंगाला त्यांना सामोरे जावे लागते.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी परदेशातील उदाहरणे दिली. युरोपमध्ये ड्रायव्हर बसमध्ये बसत असताना त्याला सीडी घेऊन बसावे लागते. ती सीडी त्या बसमधील डेकमध्ये टाकतात. त्या ड्रायव्हरने किती तास काम केले हे त्या सीडीवर रेकॉर्ड होते. ज्यावेळी तो ड्रायव्हर लायसन्स रिन्यू करावयास जातो त्यावेळी त्याला आपली सीडी आरटीओला द्यावी लागते. त्याने किती तास काम केले हे त्या सीडीवरुन कळते. मनावर ताण येऊ नये आणि अपघात होऊ नये म्हणून जेवढी मर्यादा घालून दिलेली आहे तेवढेच कमीतकमी काम करावयास पाहिजे अशा प्रकारची बंधने त्या ठिकाणी घातली जातात. अशा प्रकारचे काही नियोजन आपण केले तर त्याचा उपयोग होईल असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. गुलाबराव देवकर ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी अत्यंत महत्वाच्या विषयावर या सभागृहामध्ये नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने त्यांनी परिवहन खात्याच्या बाबतीत अनेक सूचना केल्या आणि अनेक प्रश्न या ठिकाणी उपस्थित केले. त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो आणि एका चांगल्या विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सन्माननीय सदस्य श्री हेमंत टकले, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य सर्वश्री राजन तेली, प्रकाश बिनसाळे, सय्यद पाशा पटेल, अरुण गुजराथी, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री निरंजन डावखरे, चंद्रकात पाटील, श्रीमती विद्या चव्हाण तसेच श्री. रमेश शेंडगे या सन्माननीय सदस्यांनी चर्चेमध्ये सहभाग घेऊन अतिशय मोलाच्या सूचना केलेल्या आहेत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर...

सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी असे म्हटले की, देशात अपघाताच्या बाबतीत महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे. 84 टक्के अपघात मनुष्याच्या चुकांमुळे होतात. जगाच्या तुलनेमध्ये भारतात 10 ते 15 पट अपघात होतात. त्यामुळे या अपघातांकडे अतिशय गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. 70 टक्के चुका चालकांमुळे होतात. चालकांचे योग्य पध्दतीने प्रशिक्षण झाले पाहिजे. चालकांमधील व्यसनाचे प्रमाण कमी झाले पाहिजे. अतिवेगामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे. रस्त्यांवर रिफ्लेक्टर्स लावले पाहिजेत. रस्त्यावर वाहने व बैलगाड्या उभ्या केल्या जातात. इ ाडांनाही रिफ्लेक्टर्स लावले पाहिजेत. वाहन चालकांना परवाना देत असताना परीक्षा घेतली जात नाही. परदेशात प्रशिक्षण संस्था आहेत, तशा राज्यातही संस्था निर्माण केल्या पाहिजेत. चालकासोबत मालकांनाही शिक्षा व्हावी. स्पीड मोजण्याची यंत्रणा निर्माण करण्यात यावी. 22 टक्के अपघात तरुण मुलांमुळे होतात. कायद्याची कठोर अंमलबजावणी व्हावी. प्रत्येक 50 कि.मी.अंतरावर ॲम्ब्युलन्सची व्यवस्था केली पाहिजे. जनजागृती करण्यात यावी. वाहनांच्या अपघात दगावलेल्या नातेवाईकांना त्वरित मदत मिळाली पाहिजे. अशा प्रकारच्या चांगल्या सूचनांसहित त्यांनी हा प्रस्वाव मांडला आहे. त्याचप्रमाणे अनेक सन्माननीय सदस्यांनीही चांगल्या सूचना केलेल्या आहेत.

परिवहन खात्याच्या माध्यमातून अपघात होऊ नयेत म्हणून अनेक उपाययोजना केल्या जातात. महाराष्ट्रात राज्य परिवहन विभागामध्ये 17,200 बसेस आहेत. तसेच दरवर्षी नवीन 2,800 बसेसचा समावेश महामंडळामध्ये होत असतो. सन्माननीय सदस्यांनी एस.टी.बसेसचे आयुर्मान किती असावे, त्यासंबंधी शासनाचे धोरण काय आहे असा प्रश्न विचारला होता. मुंबई विभागामधील बसेसचे आयुर्मान 8 वर्षे निश्चित केलेले आहे. यापूर्वी बसेसचे आयुर्मान ठरविण्याचे धोरण नव्हते. पण गेल्या दोन वर्षांपासून एस.टी.बसेसचे आयुर्मान ठरविले जात आहे. इतर विभागांमध्ये 12 वर्षे बसचा वापर केला जातो. या माध्यमातून चांगली सुविधा देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर....

सभापती महोदय, अपघातांच्या संख्येबाबत मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो. सन 2009 मध्ये 71,995 अपघात झाले होते. या अपघातांमुळे 11,403 जण मरण पावले आणि 47,878 व्यक्ती जखमी झाले होते. सन 2010 मध्ये 71,289 अपघात झाले होते. या अपघातांमुळे 12,340 व्यक्ती मरण पावल्या आणि 46,985 व्यक्ती जखमी झाले होते. सन 2011 मध्ये 68,438 अपघात झ ााले होते. या अपघातात 13,057 व्यक्ती मरण पावल्या आणि 45,616 व्यक्ती जखमी झाले होते. या अपघातांचे प्रमाण कमी होण्याची आवश्यकता आहे. ट्रककडून अधिकचा दंड वसूल करुन क्षमतेपेक्षा अधिकचा माल वाहतूक करणाऱ्या वाहनांना परवानगी देणे योग्य होणार नाही. वाहनांमध्ये जास्तीचा माल भरला जातो त्याला नियमित करुन परवानगी देण्यात यावी अशीही सूचना करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार दंड वसूल केला जातो. वाहनामध्ये जास्तीचा माल भरल्यामुळे काही गैर प्रकार होत असेल तर दंड वसूल करण्यात यावा असे त्या निर्णयात म्हटलेले आहे. त्यामुळे जास्तीचा भरलेला माल उतरुन घेऊन त्या ट्रकवाल्यांकडून दंड वसूल करण्याचे धोरण स्वीकारलेले आहे.

सन 2012-2013 मध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड, श्रीरामपूर, बुलढाणा येथील इमारतींचे बांधकाम सुरु करण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयांची अवस्था वाईट आहे, त्यामुळे ती कार्यालये चांगली होण्याची आवश्यकता आहे असे म्हटले होते. त्यासंबंधी सुध्दा शासनाने बऱ्यापैकी लक्ष घालण्याची सुरुवात केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर..

काही कार्यालयांच्या इमारती मागील दोन-तीन वर्षापासून अतिशय चांगल्या पध्दतीने बांधलेल्या आहेत. प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर, मालेगाव, पिंपरी-चिंचवड इत्यादी ठिकाणी देखील आपण नवीन कार्यालये करीत आहोत. पवन चक्क्यासाठी लागणारे साहित्य, ब्लेडस इत्यादीची वाहतूक करण्यासाठी रस्त्यांच्या रुंदीचा विचार करुन विशिष्ट अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन राहून परवानगी दिली जाते. अशा प्रकारचे धोरण आपण केलेले आहे.

सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी जी क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक केली जाते त्याची तपासणी केली जात नाही असे सांगितले. या बाबतीत मी सांगू इच्छितो की, क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक केल्याबद्दल सन 2009-2010मध्ये 63 कोटी 27 लाख रुपये दंड वसूल करण्यात आला. 2010-2011मध्ये 73 कोटी 58 लाख रुपये दंड वसूल करण्यात आला. 2011-2012मध्ये 75 कोटी 17 लाख रुपये दंड वसूल करण्यात आला. वाहन चालकाने किंवा वाहन मालकाने वाहनातून क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक करु नये यासाठी आपण दंड आकारणी करतो. ब-याचशा गोष्टीमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न आपल्या विभागामार्फत आपण करीत आहोत.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ड्रायव्हिंग लायसन्स देत असताना पाहिजे त्या प्रमाणात काळजी घेतली जात नाही. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी सांगितले की, ड्रायव्हिंग स्कूल ही खुराड्यासारखी 10x10 च्या जागेमध्ये आहेत. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, यामध्ये आम्ही ब-यापैकी सुधारणा करण्याचे काम केलेले आहे. ड्रायव्हिंग स्कूलची गुणवत्ता सुधारण्यासाठी धडक मोहीम सुरु केलेली होती. त्या मोहिमेमध्ये 83 ड्रायव्हिंग स्कूलचे परवाने आम्ही रद्द केलेले आहेत. एकूण 2009 ड्रायव्हिंग स्कूलची तपासणी करण्यात आली. त्यापैकी 404 ड्रायव्हिंग स्कूलची मान्यता रद्द करण्यात आली. तसेच ड्रायव्हिंग स्कूलचे अ,ब,क आणि ड असे वर्गीकरण केलेले आहे. सप्टेंबर 2011मध्ये ही धडक मोहीम घेण्यात आली आणि त्याचा चांगला परिणाम दिसून आलेला आहे.

सभापती महोदय, आणखी एक उपक्रम सुरु करणे विभागाच्या विचाराधीन आहे. राज्यामध्ये 450 औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत. या संस्थांच्या माध्यमातून ड्रायव्हिंगचे प्रशिक्षण देण्याचे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर...

विभागाचे धोरण आहे. या संदर्भात सप्टेंबर 2011मध्ये परिवहन विभागाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाला प्रस्ताव सादर केलेला असून आतापर्यन्त तीन बैठका झालेल्या आहेत. 35 औद्योगिक संस्थांमध्ये मोटार ट्रेनिंग स्कूल प्राथम्याने सुरु करण्याचे धोरण घेतलेले आहे. ज्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑटो मोबाईल कोर्स असेल त्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये मोटार ट्रेनिंग स्कूल सुरु करण्याची व्यवस्था आपण करीत आहोत. या आधी ड्रायव्हिंगचे पक्के लायसन्स देत असताना प्रत्येकाला आर.टी.ओ. कार्यालयामध्ये वारंवार यावे लागत होते.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर...

तो जो काही पत्ता देईल त्यानुसार त्याला लायसन्स दिले जात होते. अशा पध्दतीने चुकीचे लायसन्स दिले जात होते. आता आपण पोस्टाच्या माध्यमातून आणि स्माटकार्डच्या माध्यमातून लायसन्स देण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे बोगस लायसन्सला आळा बसलेला आहे.

सभापती महोदय, धोकादायक रासायनिक पदार्थांची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांना तीन दिवसांचे प्रशिक्षण देण्याचे धोरण घेतलेले आहे.

सभापती महोदय, शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित झाला पाहिजे याचा येथे उल्लेख करण्यात आला. शालेय बसला अपघात होतात म्हणून शासनाने शालेय बसेसच्या संदर्भात दिनांक 22.3.2011च्या अधिसूचनेद्वारे शालेय बस धोरण तयार केलेले आहे. यामध्ये शालेय बसेससाठी अटी घातल्ल्या आहेत जेणेकरुन विद्यार्थ्यांची चांगल्या प्रकारे सुरक्षितता राहील. शालेय बस चालविणाऱ्या वाहनचालकांना प्रशिक्षण देण्याचे धोरण घेतलेले आहे.

सभापती महोदय, रस्त्यावर वाहने जलद गतीने धावतात हे एक अपघाताचे कारण आहे. तेव्हा मोटार वाहन नियम 118 अन्वये परिवहन संवर्गातील वाहनांना वेग नियंत्रण यंत्र बसविण्याचे धोरण नुकतेच जाहीर केलेले आहे. यामध्ये आपण शालेय बसचे धोरण जाहीर केले आहे. त्याची अंमलबजावणी सुध्दा सुरु झालेली आहे. जवळपास 500 ते 550 शालेय बसेसना वेग नियंत्रण यंत्रे बसविण्यात आली आहेत. बाकीच्या वाहनांमध्ये सुध्दा वेग नियंत्रण यंत्र बसविण्यास सुरुवात करणार आहोत.

सभापती महोदय, रस्त्यांवर वाहने उभी करण्यात येतात किंवा रस्त्यांवर बैलगाड्या, ट्रॅक्टर चालविण्यात येतात, परंतु या गाड्यांच्या मागे रिफ्लेक्टर्स लावलेले नसतात असे येथे सांगण्यात आले. खरे म्हणजे सर्वच गाड्यांच्या पाठीमागे रिफ्लेक्टर्स लावले पाहिजेत. आपण तशी एक धडक मोहीम सुरु केलेली आहे. टोल नाक्यावर रिफ्लेक्टर्स देण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

सभापती महोदय, राज्यातील परिवहन कार्यालयात ड्रायव्हींग लायसन्स नुतनीकरणासाठी येणाऱ्या चालकांना सुरक्षित ड्रायव्हींग आणि नियम..

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आमची एक बैठक आहे....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदय उत्तरासाठी ऑन लेग राहतील.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, ठीक आहे.

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदयांचे अपूर्ण राहिलेले उत्तराचे भाषण उद्या होईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 19 जुलै, 2012 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 03 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 19 जुलै 2012 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही